* लघुशोध प्रबंध शिर्षक *

नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासियांचा तुलनात्मक समाजशास्त्रीय अभ्यास

No. F.23-1848/14(SC/61/(WRO) XII Plan

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

सादर

विश्वविद्यालय अनुदान आयोग
मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार
पश्चिम विभागीय कार्यालय, गणेशखिंड, पुणे-७.

विषय

समाजशास्त्र

डॉ. विनोद काळू निरभवणे
सहयोगी प्राध्यापक
समाजशास्त्र विभागप्रमुख

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे
कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
नाशिकरोड, नाशिक.

मार्च २०२२

प्रतिज्ञापत्र

मी असे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, **''नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासियांचा तुलनात्मक समाजशास्त्रीय अभ्यास''** हा लघुशोध प्रबंध **विश्व विद्यालय अनुदान आयोग** मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, पश्चिम विभागीय कार्यालय, गणेशखिंड, पुणे-७ येथे सादर करीत आहे. सदर लघुशोध प्रबंध मी स्वत: लिहिला असून तो संपूर्णपणे स्वतंत्र आहे. मी हा लघुशोध प्रबंध कोणत्याही विद्यापीठाला पदवीसाठी किंवा इतर कारणासाठी सादर केलेला नाही.

ठिकाण :

दिनांक :

संशोधक

डॉ. विनोद काळू निरभवणे

सहयोगी प्राध्यापक
समाजशास्त्र विभागप्रमुख
नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे
कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय,
नाशिकरोड, नाशिक.

सारांश

प्रस्तुत लघुशोध प्रबंधामध्ये नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासियांचा तुलनात्मक समाजशास्त्रीय अभ्यास करण्यात आला असून सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक तसेच व्यसनाधिनता यासंबंधी अभ्यास करण्यात आला आहे.

पहिल्या प्रकरणात झोपडपट्ट्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी यात भारतातील झोपडपट्ट्यांची वाढ स्पष्ट केली आहे. झोपडपट्टीचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये व प्रकार मांडले आहेत. सामाजिक घटकांत अनाधिकृत रहिवासी, झोपडपट्टीतील संपर्क साधने व आंतरक्रिया आणि झोपडपट्टीतील संस्कृती स्पष्ट केली आहे. नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टी वाढीचा इतिहास स्पष्ट केला आहे.

दुसऱ्या प्रकरणात शहरीकरण व झोपडपट्ट्यांशी संबंधित अभ्यास, संशोधन पेपर यांचा संक्षिप्त स्वरुपात आढावा घेतला आहे. झोपडपट्टीतील सामाजिक, आर्थिक, आरोग्य, शिक्षण व व्यसनाधिनता यावरील संशोधन साहित्याचा आढावा घेतला आहे.

प्रकरण तीनमध्ये संशोधन पद्धतीचा अर्थ व नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासीय कुटूंबाची केलेली नमूना निवड व झोपडपट्टीचे नाव, एकूण लोकसंख्या यांचा समावेश केला आहे. दुय्यम तथ्य संकलनात वापरण्यात येणारी साधने स्पष्ट केली आहेत. संशोधन समस्या, संशोधनाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्ट्ये, अभ्यासाचे क्षेत्र, अभ्यास विषयीची मर्यादा स्पष्ट केली आहे.

प्रकरण चारमध्ये नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासीयांच्या सामाजिक व आर्थिक जीवनाचे तुलनात्मक दृष्टीने स्पष्टीकरण केलेले आहे. प्रकरण पाचमध्ये नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीतील व्यक्तींचा शिक्षण व आरोग्य विषयक समस्यांचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे. तसेच आरोग्य घटकात पिण्याच्या पाण्याची सुविधा, मूलभूत सोयी-सुविधा यामध्ये सार्वजनिक शौचालय, नाल्यांची सफाई, परिसरातील स्वच्छता, दवाखान्याची उपलब्धता इत्यादीबाबत स्पष्टीकरण केलेले आहे.

प्रकरण सहामध्ये संशोधनातून मिळविलेल्या माहितीचे निष्कर्ष मांडले आहेत व झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन कायद्यातील तरतुदी मांडल्या आहेत. नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासियांनी सूचविलेल्या उपाययोजना मांडल्या आहेत.

नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासीयांचा तुलनात्मक समाजशास्त्रीय अभ्यास

प्रकरण १

प्रस्तावना व विषयाचे स्वरूप

प्रस्तावना :-

२००१ पासून राष्ट्रीय पातळीवर झोपडपट्ट्यांची जनगणना केली जाते आहे. त्या-त्या महानगरपालिका क्षेत्र अंतर्गत असणाऱ्या झोपडपट्ट्यांची माहिती शासनाकडून मिळवली जात असते झोपडपट्टीवासीयांच्या विकासासाठी स्वतंत्रपणे झोपडपट्टी विभाग महानगरपालिकांनी सुरू केलेला आहे. भारतीय झोपडपट्टी निर्मूलन पुनर्विकास व सुधारणा १९५६ हा कायदा भारत सरकारने केलेला आहे. ज्या झोपडपट्ट्या अधिकृत आहेत, अशा झोपडपट्ट्यांना या कायद्याचा फायदा झालेला आहे. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा निर्मूलन आणि पुनर्विकास अधिनियम १९७१ हा कायदा केलेला आहे. ज्या झोपडपट्ट्या शासनमान्य आहेत, अशा झोपडपट्ट्यांमध्ये सार्वजनिक पाण्याचा नळ तसेच सार्वजनिक स्वच्छतागृह, लाईट, रस्ते याची व्यवस्था केली जाते. ज्या झोपडपट्ट्यांना शासनाने मान्यता दिलेली नाही, अशा झोपडपट्ट्यांचे प्रमाण हे जास्त आहे. महानगरे व लहान शहरे येथेही झोपडपट्ट्या वाढलेल्या आहेत एकूण शहराच्या तुलनेत झोपडपट्ट्यांची संख्या त्या त्या शहरानुसार वेगवेगळी आहे. मुंबई शहरात जवळपास एकूण लोकसंख्येच्या ५३% लोकसंख्या ही झोपडपट्ट्यांची होती.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण १९९५ ला मुंबईत स्थापन झाले व त्यांनी झोपडपट्टी पुनर्वसन करण्यास सुरुवात केली आणि मुंबईमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविली जात आहे व झोपडपट्टीवासियांना घरांचे वाटपही करण्यात येत आहे. कायदेशीरदृष्ट्या सर्व नियम पाळून झोपडपट्टी पुनर्वसन केले जाते आहे, असे असले तरी मुंबई शहरातील एकूण झोपडपट्ट्यांची संख्या ही २४०० आहे. जवळपास ६४,७५,४८० लोक २००१ च्या जनगणनेत मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये राहत होते. ती २०११ च्या जनगणनेत कमी होऊन ५२,०७,७०० पर्यंत आलेली आहे. झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या कुटुंबांची सामाजिक, आर्थिक परिस्थिती ही कमी उत्पन्न गटातील आहे. रोजगारासाठी उत्तर प्रदेश, बिहार येथून मजुरांचे मोठ्या प्रमाणात नोकरीसाठी, मजुरीसाठी स्थलांतर होत असते तसेच देशाच्या इतर राज्यांतूनही कमी-अधिक प्रमाणात स्थलांतर होत असते यामध्ये पश्चिम बंगाल, आसाम, राजस्थान, महाराष्ट्र इत्यादी राज्यांमधूनही मजुरांचे स्थलांतर नोकरीसाठी होत असते. मुंबई हे भारतातील आर्थिक विकासाचे पहिल्या नंबरचे शहर आहे राष्ट्रीय

पातळीवरची व आयात निर्यातीची खूप मोठी व्यवस्था मुंबईतून होत असते. समुद्रातून होणारी वाहतूक ही स्वस्त व सोयीची असल्यामुळे परवडणारी आहे. ईस्ट इंडिया कंपनीने सोळाव्या शतकापासून मुंबई हे बंदर विकसित केले आहे मुंबई ही सात बेटांची मिळून बनलेली आहे व जागतिक पातळीवर होणारी मालाची आयात, निर्यात, वाढ, उत्पादन यासाठी हे ठिकाण महत्त्वाचे ठरलेले आहे. मासेमारी करणारे कोळी लोक हे मुंबईमध्ये राहत होते व विविध प्रकारची गावे येथे होती. यामध्ये कुलाबा, माहीम, बांद्रा, माजगाव, धारावी ही मोठी गावे होती. अठराव्या शतकापासून मुंबईमध्ये कापसाच्या गिरण्या सुरु झाल्यामुळे औद्योगीकरण मोठ्या प्रमाणात झाले व नोकरी-व्यवसायासाठी लोक मुंबईत स्थलांतरित झाले. गोदीमध्ये काम करण्यासाठी तसेच विविध प्रकारचे चामड्याचे, कापडाचे, सोन्या-चांदीचे उद्योग, विविध उत्पादन करणाऱ्या कंपन्या, इलेक्ट्रॉनिक, खाद्यपदार्थ, कपडा तयार करणे हे उद्योग येथे आहेत. कच्च्या मालाची ने-आण करण्यासाठी रस्त्यांचे जाळे आहे. यामध्ये लोहमार्ग तयार झाल्यामुळे कच्च्या व पक्क्या मालाची वाहतूक करणे सोपे झाले आहे. ब्रिटिशांनी खूप मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन पूर्वी हे इंग्लंडमध्ये मँचेस्टरला पाठवले जात होते व नंतरच्या काळात भारतात कापड गिरण्यांमध्ये काम करण्यासाठी खूप मोठा कामगार वर्ग भारतातून मुंबईमध्ये स्थायिक झाला. या वर्गाची राहण्याची व्यवस्था मात्र छोट्या-छोट्या घरांमध्ये करण्यात आली व या कामगार वर्गासाठी राहण्याच्या व्यवस्थेकडे ब्रिटिशांनी लक्ष दिले नाही. मुंबईचा विकास होत राहिला व दुसऱ्या बाजूला झोपडपट्ट्या ही वाढत राहिल्या. मुंबईमध्ये मान्यताप्राप्त झोपडपट्ट्यांना चाळी असे म्हटले जाते. मुंबईचे विभाजन हे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषावार प्रांतरचनेनुसार करण्यात आले व संयुक्त महाराष्ट्र चळवळीमुळे मुंबई ही महाराष्ट्रामध्ये सामील करण्यात आली त्या अगोदर मुंबई हे स्वतंत्र शहर म्हणून ओळखले जात होते.

मुंबईचा विकास करण्यामध्ये ब्रिटिशांचे खूप मोठे योगदान आहे. मुंबई शहराचा विकास होत असताना झोपडपट्ट्यांची वाढ होत गेलेली आहे. ज्या प्रमाणात शहराचा विकास होत गेला त्या प्रमाणात विविध ठिकाणी वसणाऱ्या झोपडपट्ट्यांची वाढ थांबवता आली नाही कारण उद्योगधंद्यांचा विकास अधिक गतीने होत गेला. मुंबई महानगरामध्ये जवळपास एक कोटीपेक्षा अधिक लोक कमी जागेवर वास्तव्य करतात. अतिरिक्त लोकसंख्या मुंबईमध्ये असल्यामुळे स्वच्छतेचा खूप मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. मागील दहा वर्षांपासून मुंबईत पाऊस झाला तर पाणी संपूर्ण मुंबईमध्ये भरते याचे कारण समुद्राचे जे खाडी क्षेत्र होते ते बुजवण्यात येऊन त्या ठिकाणी उंच इमारती बांधण्यात आल्या आहेत व झोपडपट्ट्या वसवण्यात

आल्यात. समुद्रामध्ये खाड्यांमध्ये भराव टाकून त्या बुजविण्यात आल्या आहेत. पुराचे पाणी जाण्यासाठी व्यवस्था केलेली नाही. अतिरिक्त लोकसंख्येमुळे प्रचंड दुर्गंधी होते. खाड्यांच्या पाण्यामध्ये मलमूत्र विसर्जन होत असल्यामुळे या पाण्याच्या गटारी तयार झाल्या आहेत. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येते अशाही परिस्थितीत देशाच्या विविध राज्यांमधून मजुरांचे, व्यापाऱ्यांचे, शिक्षण घेणाऱ्यांचे स्थलांतर सातत्याने होत असते कारण या ठिकाणी राहायला जागा नसली तरी काम मात्र मिळते व रोजगारही इतर ठिकाणांपेक्षा चांगला मिळतो असे असले तरी महागाई तेवढ्याच प्रमाणात वाढत असते कारण वस्तूंची अतिरिक्त मागणी होते. झोपडपट्ट्यांची वाढ ही सातत्याने होत राहिलेली आहे. मुंबईच्या विकासामध्ये झोपडपट्टीतील लोकांचा मोठ्या प्रमाणात वाटा राहिला आहे.

झोपडपट्टीचा अर्थ व व्याख्या

'इ. स. १८१२ मध्ये झोपडपट्टी (Slum) या शब्दाचा उपयोग सर्वप्रथम केला गेला. ऑक्सफर्ड युनिव्हर्सल डिक्शनरीनुसार झोपडपट्टी या शब्दाची उत्पत्ती Slumber या शब्दापासून झाली असल्याचे स्पष्ट केले आहे. स्लम्बर म्हणजे अनोळखी, अंधेरी रस्ते निर्मनुष्य रस्ते असा आहे. तसेच Slum या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ अत्यंत निकृष्ठ दाट वस्ती असलेले ठिकाण म्हणजे झोपडपट्टी होय. म्हणून सैतडोर दैलबेस्की म्हणतात की, 'झोपडपट्ट्यांमध्ये असमानता आहे. एक गलिच्छ वस्ती दुसऱ्या गलिच्छ वस्तीपेक्षा भिन्न असते यामुळे शहरातील गलिच्छ वस्त्यांमध्ये विषमता निर्माण होते. येथे विभिन्न प्रकारचे काम करणारे लोक राहतात. उच्च कुशल कारागिरांपासून ते अकुशल श्रमिक राहतात. म्हणजेच फक्त निर्धन, बेरोजगार लोकच येथे राहतात असे नाही तर वेगवेगळ्या स्तरांतील लोक राहतात. शासकीय नोकरदार वर्गही येथे राहतो. म्हणून सर्व गलिच्छ वस्त्यांची बनावट, घरे आणि राहण्या-खाण्या पिण्याचा स्तर एकसारखा राहत नाही. शहराच्या मध्यवर्ती भागात असणाऱ्या वस्त्या ह्या पक्क्या असतात व त्यांची स्थिती चांगली असते. घरांचा आकार एक दोन खोल्यांपुरताच असतो. या गरीब वस्त्यांना भारतात वेगवेगळ्या शहरांमध्ये वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. जसे कानपूरमध्ये अहाता, कोलकाता व दिल्लीमध्ये बस्ती, मुंबईत चाळ आणि मद्रासमध्ये चेरी म्हटले जाते. 'मद्रास येथील झोपडपट्टीबाबत महात्मा गांधींनी वर्णन केले आहे की, एक चेरी बघण्यास मी गेलो असता तिच्या चारी बाजूंनी पाणी आणि अस्वच्छ गटारी होत्या. ब्रिटीश श्रमिक संघ काँग्रेसचे एक शिष्टमंडळ १९२८ मध्ये भारतात आले होते. त्यांनी श्रमिकांची निवासस्थाने बघितली असता असे म्हटले आहे की, आम्ही ही निवासस्थाने बघितली नसती तर एवढी खराब घरे असतात यावर

कधीच विश्वास ठेवला नसता असे म्हटले आहे. झोपडपट्ट्यांना गलिच्छ वस्ती असेही म्हटले जाते.'

झोपडपट्टीची व्याख्या -

श्री. फोर्ड यांच्या मते, 'ज्या परिसरातील घरे राहण्यास निकृष्ठ, अपुरी आरोग्यास घातक असतात आणि सुरक्षितता, नैतिकता आणि निवासी लोकांच्या राहण्यासाठी हानिकारक असतात अशा मानवांच्या वस्तीला झोपडपट्टी असे म्हणतात.'

श्री. वेबस्टर यांच्या मते, 'झोपडपट्टी ही अत्यंत गजबजलेली वस्ती आणि अतिरिक्त लोकसंख्येचा एक शहरी भाग आहे. त्यामध्ये राहणारे लोक अत्यंत गरीब असतात आणि त्यांचे निवासी ठिकाण अत्यंत गलिच्छ असते. त्यामुळे झोपडपट्टीतून राहणाऱ्या लोकांचे आरोग्य निकृष्ट प्रतीचे असते. निरक्षरता, बेकारी आणि गुन्हेगारी वृत्ती ही या वस्तीची वैशिष्ट्ये आहेत.'

इ. स. १९५७ च्या मुंबई येथील गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन कार्यक्रमाच्या आयोजित चर्चासत्रांमध्ये केलेली व्याख्या 'कोणतीही पद्धतशीर योजना न आखता, अव्यवस्थित निवासी ठिकाण, सुसंस्कृत सामाजिक जीवनाचा अभाव, सरकार, मालक आणि स्थानिक संस्थांकडून दुर्लक्षित ठिकाण, झिजलेली पडकी घरे, दाट लोकसंख्येचे वस्तीस्थान, गरीब आणि निम्न राहणीमान असणाऱ्या शहरातील लोकांचे आश्रयस्थान म्हणजे झोपडपट्टी किंवा गलिच्छ वस्ती होय.'

एस. के. गुप्ता -

'नागरी क्षेत्रात अवैधरित्या बसविलेल्या नियोजन विरहीत कच्च्या साहित्याने बांधलेल्या वस्तीला झोपडपट्टी किंवा गलिच्छ वस्ती असे म्हणतात. या वस्त्यांमध्ये असलेली घरे राहण्यास अयोग्य, आरोग्यास हानिकारक मुलभूत सुविधा नसलेली असतात. मानवी निवासाला अयोग्य अशा घरांची गर्दी असलेली वस्ती म्हणजे गलिच्छ वस्ती होय.'

संयुक्त राष्ट्रसंघ -

'दाट लोकसंख्येची वस्ती, सर्व प्रकारचे अध:पतन, अस्वच्छता आणि निवासी लोकांना जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्वच नागरी सोयी - सुविधांचा अभाव अशा इमारती किंवा घरांच्या सुमदायाला झोपडपट्टी असे म्हणतात. झोपडपट्टीत आढळून येणाऱ्या या स्थितीचा त्या वस्तीमध्ये राहणाऱ्या व्यक्तींच्या किंवा समाजाच्या आरोग्यावर, सुरक्षिततेवर आणि नितीमुल्यांवर निश्चितपणे विपरीत परिणाम होत असतो.' निकृष्ट दर्जाच्या अनारोग्यकारक आणि कोंदट शहरी किंवा निमशहरी वस्तीला झोपडपट्टी असे

म्हणतात.

थोडक्यात ज्या ठिकाणी स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी हे सार्वजनिक असते. अरुंद, अनियोजित घरे व अतिगर्दी, मोकळी हवा व जागेचा अभाव असणाऱ्या व अल्प उत्पन्न गटातील, सामाजिक, आर्थिक दृष्टीने मागासलेल्या व ग्रामीण भागातून शहरात रोजगारासाठी स्थलांतरीत झालेल्या व शहरांच्या जवळपास अनधिकृत ठिकाणी राहिलेल्या लोकांच्या वस्तीला झोपडपट्टी असे म्हणतात.

विविध प्रकारच्या झोपडपट्ट्यांचा आकार, रचना, लोकसंख्या व तेथील व्यवसाय यानुसार झोपडपट्टीची एकच व्याख्या करता येत नाही. कारण आधुनिक काळात शहराच्या मध्यवर्ती भागातील असणाऱ्या झोपडपट्ट्या या पक्क्या स्वरुपाच्या झाल्या आहेत. तसेच काही लोकांनी आपला दर्जा उंचावला आहे. शिक्षण, व्यवसाय, राहणीमानाची पातळी यामध्ये वाढ झाली आहे. तसेच कच्च्या व अनाधिकृत असणाऱ्या झोपडपट्ट्या या शहराच्या बाहेर व अस्वच्छ ठिकाणी असल्यामुळे या लोकांना प्राथमिक सोयीसुविधा स्थानिक शासनाकडून पुरवल्या जात नाहीत. म्हणून या झोपडपट्ट्यांची अवस्था ही अधिक खराब असते.

झोपडपट्टीची वैशिष्ट्ये :-

झोपडपट्टीचे रुपांतर हे एका प्रकारातून दुसऱ्या प्रकारात होत असले तरी झोपडपट्ट्यांतील जीवन हे सर्वत्र सारख्याच स्वरूपातील आहे. सर्वसाधारणपणे झोपडपट्ट्यांच्या वैशिष्ट्यात अपुरी घरे, मुलभूत सोयी सुविधांचा अभाव, अतिगर्दी, जागेचा अभाव याप्रमाणे आणखी अनेक घटक यात समाविष्ट होतात. समाजशास्त्रीय दृष्टीने येथे उपसंस्कृती असते. येथील हलक्या दर्जाची सांडपाण्याची व्यवस्था, आरोग्याचा अभाव, विचलीत वर्तन, ताणतणाव व सामाजिक विलगीकरण हि झोपडपट्टीची वैशिष्ट्ये आहेत.

१) घराची स्थिती - सर्व झोपडपट्ट्यांचे वैशिष्ट्ये म्हणजे भौतिक पातळीवरील घरांची अवस्था होय. झोपडपट्ट्यांचा भाग हा शहरांमध्ये सामान्यपणे घरांची गर्दी, नकारात्मक तसेच बिघडलेली व कालबाह्य स्वरुपातील असते. पुष्कळ घरांची अवस्था हि अपुरी लाईट, हवा, घरांची रचना आणि सांडपाण्याची व्यवस्था, अतिगर्दी आणि अपुरा निवारा अशा स्वरुपाची असते. विकसित देशांमध्ये पुष्कळ शहरात मोठ्या स्वरुपाच्या वसाहती वापरात नसलेल्या मटेरियलपासून बनविलेल्या असतात व अतिक्रमित जमीन आणि कमीत कमी संरक्षण या झोपडपट्ट्यांना पुरवले जाते. घरांचा दर्जा व भौतिक पातळी ही इतर सर्वसामान्य घरांची तुलना करता मोठ्या प्रमाणात खालावलेली असते. झोपडपट्टीतील जीवन हे विचलीत वर्तनाला चालना देते.

२) सार्वजनिक सुविधा - झोपडपट्टीतील सार्वजनिक सुविधा ह्या पुष्कळ प्रमाणात कमी असण्याबरोबर त्या जुनाट व मोडकळीस आलेल्या स्वरुपात असतात. त्यांची गुणवत्ता राखली जात नाही. रस्ते पथदीप हे वेळोवेळी दुरुस्त केले जात नाही. उद्याने, शाळा यांची अवस्थाही चांगली राहत नाही. कचरा आणि फेकून दिलेले अन्न यामुळे हानीकारक पर्यावरण तयार होते. अल्पसंख्यांक व अतिवंचित झोपडपट्टीवासीय प्राथमिक सुविधांपासून वंचित व दुर्लक्षित राहतात. भारतातील झोपडपट्ट्या ह्या नियोजनविरहीत व दुर्लक्षित आहेत. झोपडपट्टीतील अतिरिक्त लोकसंख्या व अतिगर्दी यामुळे भौतिक आणि सामाजिक वातावरणाचा परिणाम येथील कुटूंबांवर होतो. ते शारिरीक, मानसिक व सामाजिक दुष्परिणामांच्या बळी ठरतात. पाणी, लाईट आणि सांडपाणी व्यवस्था ह्या सार्वजनिक स्वरुपात कमी प्रमाणात असतात. एकच सार्वजनिक पाण्याचा नळ अनेक कुटूंबे वापरतात. सांडपाणी सुविधा हि अधिक गंभीर समस्या आहे. स्वच्छतागृहे हि कधीतरी स्वच्छ केली जातात व एकाच स्वच्छतागृहाचा उपयोग अनेक लोक दररोज करतात.

३) हलक्या दर्जाची सांडपाणी व्यवस्था आणि आरोग्य - झोपडपट्ट्या ह्या सामान्यपणे अस्वच्छ आणि घाणीच्या ठिकाणी असतात. येथे सांडपाणी व्यवस्थेचा अभाव असतो. स्वच्छतागृहे व पाणी हे पुरेशा प्रमाणात नसते. त्यामुळे आजारांचे प्रमाण अधिक असल्यामुळे मृत्यूचा दर हा अधिक असतो. काही झोपडपट्ट्या ह्या अतिगर्दीच्या असल्यामुळे येथे झुरळे, मच्छर व माश्या ह्या सांडपाणी व्यवस्था चांगली नसल्यामुळे होतात. तसेच अर्भक मृत्यूचा दर इतर समुदायांपेक्षा अधिक असतो. म्हणून सांडपाणी व्यवस्था व आरोग्य यांचा जवळचा संबंध असल्यामुळे सांडपाणी व्यवस्था चांगली करणे आवश्यक असते.

४) विचलित वर्तन - विचलीत वर्तनाचे प्रमाण झोपडपट्ट्यांत जास्त असते. यात गुन्हेगारी, बालगुन्हेगारी, मानसिक विकृती, आत्महत्या, कौटूंबिक वादविवाद यांचा संबंध हा झोपडपट्टीतील जीवनाशी अधिक असतो. तसेच बालमृत्यू यांचे प्रमाण अधिक असते. काही झोपडपट्टीधारक हे गुन्हेगारी कारवायांमध्ये सामील असतात.

५) झोपडपट्ट्यांतील संस्कृती - झोपडपट्टीवासीयांची एक स्वत:ची संस्कृती असते व ती संस्कृतीच जीवन जगण्याचा मार्ग असते व हाच जीवन जगण्याचा मार्ग एका पिढीकडून पुढच्या पिढ्यांकडे जात असतो व स्वत:ची संरचना, तर्कसंगत व स्वत:ला संरक्षित करण्याची यंत्रणा असते व त्यातून जीवन जगण्यातील अडथळे दूर करून जीवन जगण्याला प्रोत्साहन दिले जात असते. अनेक संस्कृतींचे एकत्रीकरण

होऊन येथील संस्कृती तयार होत असते. लेव्हिस यांनी झोपडपट्टीला दारिद्र्याची संस्कृती म्हटले आहे. तसेच झोपडपट्टीवासीय हे कनिष्ठ स्तरातील व आर्थिक दृष्टीने गरीब असतात.

६. झोपडपट्टीवासियांवरील शहरी जीवनाचा प्रभाव :-झोपडपट्ट्या शहरांमध्ये व्यवसायाच्या ठिकाणी बसतात म्हणून येथे विभिन्न प्रकारचे काम करणारे कुशल कारागीरही राहतात व विशिष्ट वस्तू बनवून बाजारात विकतात. तसेच झोपडपट्ट्यांमध्ये लाईट, पाणी इत्यादी सुविधांमध्ये वाढ झाली आहे. येथील लोक शहरी जीवनाने प्रभावीत होवून स्वत:च्या विकासाची महत्वाकांक्षा बाळगतात. माहिती तंत्रज्ञानाने या वस्त्यांमध्ये मोबाईल, कॉम्प्युटर, इंटरनेट, टिव्ही यांचा वापर वाढला आहे. प्रत्येक व्यक्तीकडे मोबाईल असतोच. येथे कुशल व अर्धकुशल कारागीर राहतात. कार ड्रायव्हर, रिक्षा, ऑटो रिपेरींग, लॉन्ड्री, वाहनांची डागडूजी, भाजीपाला विकणे इत्यादी व्यवसाय करतात. तसेच महानगरपालिका, महामंडळे, शासकीय संस्थांमध्ये येथील लोक नोकऱ्या करतात. झोपडपट्ट्यांवर शहरातील कार्यसंस्कृती, जीवनसंस्कृती आणि व्यवसायाच्या संस्कृतीचा प्रभाव असल्याचे दिसते. तरुण पिढीमध्ये विकास करण्याची जागरुकता निर्माण होते. म्हणजेच तरुण पिढी या वस्त्यांमधून बाहेर पडून आधुनिक जीवन जगण्यासाठी प्रयत्न करते. विविध शासकीय योजनांद्वारा येथील लोकांच्या जीवनाची स्थिती सुधारण्याला मदत होते. यावरुन झोपडपट्ट्यांच्या स्वरुपामध्ये परिवर्तन होत असते.

७. झोपडपट्टीवासीय हे समाजव्यवस्थेचा एक अविभाज्य भाग :- झोपडपट्टीवासीय समाजव्यवस्थेकडे कसे बघतात व बिगर झोपडपट्टीवासीय लोक झोपडपट्टीवासीयांकडे कसे बघतात या दोन्ही घटकांमध्ये सामाजिक संबंध कसे आहेत. हे पाहणे आवश्यक ठरते. शहरी जीवनातला एक अविभाज्य भाग म्हणून झोपडपट्टी आहे.

भारतात काही शहरातील झोपडपट्ट्यांवर अभ्यास झाले आहेत. महानगरपालिका, नगरपालिका विभागातूनही झोपडपट्टी सुधारणा विभाग कार्यरत आहेत. तसेच स्वयंसेवी संस्था झोपडपट्ट्यांमध्ये विविध विषयांवर विविध शहरांमध्ये काम करत आहेत. एकूण झोपडपट्टीतील लोकसंख्या, झोपड्यांची संख्या व इतर प्राथमिक सोयीसुविधा पाणी, वीज, सांडपाणी व्यवस्था, स्वच्छतागृहे, रस्ते, आरोग्य केंद्रे, बालवाडी, शाळा इ. बाबतची माहिती दिली जाते. २००१ पासून जनगणना करताना झोपडपट्ट्यांचीही लोकसंख्या मोजली जाते व इतर माहिती गोळा करुन प्रकाशित केली जाते. झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन करण्यासाठी घरांची उपलब्धता व इतर प्राथमिक सोयीसुविधा पुरवल्या जातात.

८. अधिकृत व अनधिकृत रहिवासी :- 'इतर व्यक्ती संस्था किंवा शासन यांच्या जागेवर त्यांच्या परवानगीशिवाय राहणे म्हणजे अनधिकृत रहिवासी होय. अशी जमीन एक तर खाजगी किंवा शासकिय मालकीची असते अशा ठिकाणी अतिशय साध्या पद्धतीने झोपड्यांची उभारणी केली जाते व येथे झोपड्यांमध्ये राहणारे लोक एकत्रित येवून जागा मिळविण्यासाठी तसेच इतर मुलभूत सुविधा मिळविण्यासाठी संघर्ष करतात. बेकायदेशीर निवाऱ्याचे स्थान असण्याचे वाईट परिणाम येथील लोकांवर होत असतात. झोपड्या वाचविण्यासाठी संघर्ष करावा लागतो. नियमांचे उल्लंघन केल्यामुळे अत्यंत निराशेची मन:स्थिती येथील कुटूंबाची तयार होते किंवा नैराश्य येते काहीवेळ येथील लोकांविरुद्ध उघड आरोप केले जातात. अनधिकृत ठिकाणी राहणाऱ्या लोकांवर पोलिस कारवाई करण्यात येते. अशा झोपड्या पाडण्यात येतात. पुन्हा या लोकांना नवीन ठिकाणी शहराच्या बाहेर लांब कुठेतरी राहावे लागते यातून अनेक कुटूंबे बेघर होतात. घर बांधण्यासाठी केलेला खर्च वाया जातो. मुलांच्या शिक्षणाची समस्या निर्माण होते. कुटूंबाच्या उदरनिर्वाहासाठी असणारे कामाचे ठिकाण बदलते. दुरच्या अंतरावरुन कामाच्या ठिकाणी येण्याचा प्रश्न निर्माण होतो. निर्वासित व्यक्ती अनधिकृत जागांवर ओबडधोबड स्वरुपाची झोपडी तयार करतात व राहतात. तसेच निर्वाहासाठी येणाऱ्या लोकांना झोपडी एक दिवस किंवा काही दिवसांसाठी भाड्याने दिली जाते. ही प्रक्रिया अव्याहतपणे सुरु असते व रिकाम्या जागांवर अशा झोपड्या उभारल्या जातात. निर्वासितांना मिळेल त्या जागांवर शहरांमध्ये निवारा करावा लागतो असे ठिकाण अनधिकृत मानले जाते'.

९ झोपडपट्टीतील संपर्क साधने आणि आंतरक्रिया :- 'आंतरक्रिया आणि संपर्क साधण्याची प्रक्रिया म्हणजे माहितीची देवाण घेवाण ही स्वत:साठी व समूहाबरोबर होत असते. भाषा, प्रतिके ही संपर्काची साधने आहेत. झोपडपट्टीतील लोक इतर समाजाशी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे संपर्कात असतात व त्याचा प्रभाव येथील लोकांवर होत असतो. प्रत्यक्ष साधनांमध्ये शासन, राजकीय, आर्थिक व्यवहार, शिक्षण, आरोग्याच्या सुविधा मनोरंजन यांचा समावेश होतो. अप्रत्यक्ष संपर्क साधनांमध्ये वर्तमानपत्रे रेडिओ, दुरदर्शन, मोबाईल, कंम्प्युटर, इंटरनेट, वॉटस्अप, फेसबूक, सोशल मिडीया यातून इतर समूहांबरोबर संपर्क साधला जातो.

१०. राजकीय सहभाग :- 'काही लोक झोपडपट्टीतील समस्या राजकीय सहभागातून व्यक्त करतात व त्या सोडविण्याचा प्रयत्न करतात. संघटनेच्या माध्यमातून महानगरपालिकेकडून संघर्ष करुन काही फायदे मिळवून घेतात. यात मुलभूत सोयी सुविधांचा समावेश होतो. काही राजकीय पक्ष आपली विचारसरणी

येथे राबविण्याचा प्रयत्न करतात व येथील संघटनांना पाठिंबा देतात. पण येथील संघटना एकत्रितपणे सार्वत्रिक प्रभाव टाकू शकत नाही.

११. शासकीय व स्वयंसेवी संघटनेची भूमिका :- काही शासकीय व स्वयंसेवी संघटना येथील लोकांशी संपर्क साधण्यात महत्वाची भूमिका पार पाडतात. यात महानगरपालिका, सामाजिक कल्याणकारी संस्था, सहकारी सोसायट्या, लायन्स क्लब, रोटरी क्लब, राष्ट्रीय सामाजिक सेवा संघटना, कुटूंब नियोजन संस्था, क्षेत्रीय प्रसार माध्यमे इत्यादी संस्था येथील समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करतात. विविध प्रकारच्या सेवा पुरविण्याच्या माध्यमातून शहरातील इतर समूहांबरोबर संबंध तयार होतात. सार्वत्रिक धार्मिक सण, उत्सवात येथील सर्वच लोक येतात. होळी, दिपावली, गणपती उत्सव या कार्यक्रमांच्या निमित्ताने इतर समुहांशी संपर्क साधला जातो. यात विविध जाती, धर्माच्या लोकांचा सहभाग असतो.

एकाचवेळी अनेक लोकांपर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे इलेक्ट्रॉनिक मिडिया व लिखित प्रसार माध्यमे होय. ही प्रसार माध्यमे एकाच प्रकारचे सांस्कृतिक वातावरण व लोकांचे मत बनविण्याचे काम करतात. समाजातील कोणताही प्रश्न, कार्यक्रम किंवा समस्या ही सर्व लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करतात व एखाद्या प्रश्नाला किंवा समस्येला सार्वत्रिक करण्याचा प्रयत्न करतात व समाजातील सदस्यांमधील सामाजिक सांस्कृतिक रचनेत एकात्मता निर्माण करतात. झोपडपट्टीधारक व इतर समूहातील सांस्कृतिक दरी भरुन काढण्याचे काम प्रसारमाध्यमे करतात. वर्तमानपत्रे, मासिके यांचा कमी प्रमाणात झोपडपट्टीत वापर होतो. कारण अशा गोष्टींवर पैसे खर्च केले जात नाही. त्याबरोबर अशिक्षित लोकांचे प्रमाणही येथे असते.

१.४ झोपडपट्ट्यांचे प्रकार -

झोपडपट्ट्यांचे वर्गीकरण रतना नायडू यांनी तीन प्रकारात केले आहे.

१) चांगल्या स्थितीतील झोपडपट्ट्या.

२) पडक्या व जुन्या स्वरुपातील झोपडपट्ट्या.

३) अति गलिच्छ झोपडपट्ट्या.

सामान्य स्वरुपात झोपडपट्ट्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे -

१) शहराच्यामध्ये असणाऱ्या पक्क्या झोपड्या.

२) शहराच्यामध्ये असणाऱ्या कच्च्या व पक्क्या झोपड्या.

३) रेल्वे लाईनच्या बाजूला असणाऱ्या वस्त्या.

४) मोठ्या नाल्यांच्या बाजूला असणाऱ्या कच्च्या झोपड्या.

५) शहरांपासून दूर मोठ्या रस्त्यांच्या कडेला असणाऱ्या झोपड्या.

६) शहरांपासून दूर मैदानावर कच्यापासून बनवलेल्या झोपड्या.

झोपड्यांच्या बांधकामानुसार केलेले वर्गीकरण -

१) कच्च्या घरांच्या झोपडपट्ट्या.

२) शहराच्या मध्ये असणाऱ्या पक्क्या झोपडपट्ट्या.

३) पडक्या स्वरुपातील झोपडपट्ट्या.

४) अस्थाई झोपड्या.

नाशिक शहरात २००८ मध्ये झोपडपट्ट्यांची संख्या १६८ झाली व झोपड्यांची संख्या ४२७४२ एवढी झाली. म्हणजेच ६४ झोपडपट्ट्यांची वाढ झाली व २१४७६९ एवढी लोकसंख्या झाली. लोकसंख्येत ७५९७२ एवढी वाढ झाली. हि वाढ मागील ३० वर्षांतील वाढीपेक्षा खूपच जास्त आहे व एकूण शहरी लोकसंख्येच्या लोकसंख्येपैकी १४.४४ एवढी लोकसंख्या झोपडपट्ट्यांतील आहे. जागतिकीकरणाचा परिणाम हा २००१ नंतर दिसू लागल्याने ग्रामीण भागातून लोकांना रोजगारासाठी शहरात येणे व स्वत:चे व कुटूंबाचे जीवनमान उंचावणे याला अधिक महत्व प्राप्त झाले. थोडेफार शिक्षण घेतलेल्या व्यक्तींनी शहरात स्थलांतर करुन मिळेल ते काम करणे याला महत्व दिले. कारण ग्रामीण भागात वाढत जाणारा कुटूंबाचा आकार व शेतीतून येणारे अल्प उत्पन्न, शेतीतील भांडवलाचा अधिक खर्च यामुळे शेती हा तोट्यातला व्यवसाय ठरला म्हणून अल्प भूधारक, भूमिहिन शेतमजूर यांनी शहरांमध्ये रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतरे केली आहेत. सर्वच लहान मोठ्या शहरात हि स्थलांतरे झाली आहेत. म्हणून २००१ नंतर नाशिक शहरातील झोपड्यांची संख्या व लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसते. २००६ नंतर शहरातील जय भवानी रोड, आर्टिलरी सेंटरची संरक्षक भिंत, उपनगर कॅनाल, सिन्नरफाटा, म्हसरुळ, पाथर्डी, वडाळा गाव, गंगापूररोड, पंचवटीतील फुलेनगर, पेठरोड, गंगावाडी, सातपूर, सिडको या भागात मोठ्या झोपडपट्ट्या वाढल्या आहेत.

नाशिक शहरातील इ. स. १९८१ ते २००८ पर्यंतची झोपडपट्ट्यांची वाढ व लोकसंख्यावाढ

अ. क्र.	वर्ष संख्या	झोपडपट्ट्यांची संख्या	झोपड्यांची लोकसंख्या	झोपडपट्टीतील लोकसंख्या	शहराची एकूण लोकसंख्येची	झोपडपट्टीच्या टक्केवारी
१)	१९८१	८१	१८९४५	६६४९८	४,१८,२६१	१५.९०
२)	१९९१	८५	२०४३८	७५५२६	६,५६,९२५	११.४९
३)	२००१	१०४	२५०९२	१३८७९७	१०,७७,२६६	१२.९०
४)	२००८	१६८	४२७४२	२१४७६९	१४,८६,०५३	१४.४४

संदर्भ - नाशिक महानगर पालिका झोपडपट्टी सुधारणा विभाग २००८

वरील तक्त्यानुसार १९८१ मध्ये नाशिक शहरात झोपडपट्ट्यांची संख्या ८१ होती व झोपड्यांची संख्या १८९४५ व लोकसंख्या ६६४९८ होती. एकूण शहरी लोकसंख्येच्या १५.९०% लोकसंख्या झोपडपट्टीतील होती. यात पुढील दहा वर्षांत फारशी वाढ झोपड्यांत व लोकसंख्येतही झालेली नाही. १९९१ मध्ये झोपड्यांची संख्या ८५ झाली. म्हणजे ४ झोपडपट्ट्यांची वाढ झाली तर झोपड्यांची संख्या २०४३८ झाली तर लोकसंख्या वाढ नैसर्गिक व स्थलांतरीत अशी ७५५२६ एवढी झाली. एकूण शहरी लोकसंख्येच्या ११.४९% एवढी वाढ झाली. २००१ मध्ये झोपडपट्ट्यांची संख्या १०४ एवढी झाली म्हणजेच १९ झोपडपट्ट्यांची वाढ झाली व झोपड्यांची संख्या २५०९२ एवढी झाली. लोकसंख्या १३८७९७ एवढी झाली. एकूण शहराच्या लोकसंख्येपैकी १२.९०% लोकसंख्या वाढली. १९८१ ते २००१ पर्यंतची झोपड्यांची व लोकसंख्येची वाढ हि नैसर्गिक पद्धतीने झालेली दिसते व थोड्याफार प्रमाणात स्थलांतरीत झालेली लोकसंख्या आहे. कुटूंब वाढले की नवीन कुटूंबातील सदस्यांसाठी नवीन घरांची आवश्यकता असते. याप्रमाणे ही वाढ झालेली दिसते. पण २००१ ते २००८ या कलावधीत झोपडपट्ट्या वाढण्याचा व लोकसंख्या वाढण्याचा वेग खूपच जास्त आहे. विशेषत: २००१ नंतर खाजगी जागांवर झोपड्या बसविल्या गेल्या आहेत व ही वाढ शहराच्या सर्वच विभागांमध्ये व शहराच्या बाहेर व शहरात समाविष्ट असणाऱ्या गावांमध्ये मोकळ्या भूखंडांवर झालेली आहे. यात नैसर्गिक लोकसंख्या वाढीबरोबर स्थलांतरीत लोकसंख्या वाढीचा वेग जास्त आहे.

नाशिक शहरातील २००८ च्या सर्वेक्षणानुसार शासकीय, महानगरपालिका व खाजगी जागेवरील झोपडपट्ट्यांची संख्या, झोपड्यांची संख्या, लोकसंख्या व घोषित - अघोषित झोपडपट्ट्या खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	जागेचे प्रकार	झोपडपट्टी संख्या	झोपड्यांची संख्या	लोकसंख्या	घोषित झोपडपट्ट्या	अघोषित झोपडपट्ट्या
१)	शासकीय जागा	३३	११३७६	५६४९२	१३	२०
२)	मनपा जागा	१६	८१३१	४०६०१	११	०५
३)	खाजगी जागा	११९	२३२३५	११७६७६	३२	८७
	एकूण	१६८	४२७४२	२१४७६९	५६	११२

संदर्भ - नाशिक महानगर पालिका झोपडपट्टी सुधारणा विभाग २००८

वरील आकडेवारीवरुन खाजगी जागांवरील अघोषित झोपडपट्ट्यांची संख्या ८७ आहे. तर घोषित झोपड्यांची संख्या ३२ आहे. शासकीय जागेवरील १३ घोषित तर २० झोपडपट्ट्या अघोषित आहे व महानगरपालिकेच्या जागेवरील ११ घोषित व ५ अघोषित झोपडपट्ट्या आहेत. विशेषत: खाजगी जागांवरील झोपड्यांची संख्या व लोकसंख्याही अधिक आहे. दिर्घकाळापासून या झोपडपट्ट्या या जागांवर वसलेल्या आहेत. तरीही त्याची गणना न झाल्यामुळे या झोपडपट्ट्यांना शासन मान्यता देण्यात आली नाही. सिडको विभागात सन १९९५ पुर्वीच्या ७ व १९९५ ते २००८ पर्यंतच्या १२ झोपडपट्ट्या आहेत. येथे शासकीय जागेवर ६ व खाजगी जागेवर १३ झोपडपट्ट्या आहेत. नदी काठालगत १ व नाल्याच्या काठालगत २ झोपडपट्ट्या आहेत.

नाशिक पश्चिम विभागात शासकीय जागेवर १ खाजगी जागेवर १४ व महानगर पालिकेच्या जागेवर १ झोपडपट्टी आहे. येथे नदी काठालगत ४ झोपडपट्ट्या आहेत. सन १९९५ पुर्वीच्या १५ व १९९५ ते २००८ पर्यंतच्या ०३ झोपडपट्ट्या आहेत. नाशिक पुर्व विभागात शासकीय जागेवर ५, खाजगी जागेवर २१ व मनपा जागेवर एकूण २ झोपडपट्ट्या आहेत. १९९५ पर्यंतच्या १४ व १९९५ ते २००८ पर्यंत १४ झोपडपट्ट्या आहेत.

नाशिकरोड विभागात शासकीय जागेवर १० व खाजगी जागेवर ३४ झोपडपट्ट्या आहेत. १९९५ पुर्वीच्या ३१ व १९९५ ते २००८ पर्यंतच्या १३ झोपडपट्ट्या आहेत. येथे नदी काठालगत ७ व नाल्याच्या कडेला १ झोपडपट्टी आहे. पंचवटी विभागात शासकीय जागेवर ९, खाजगी जागेवर २८ व महानगर पालिका जागेवर ११ झोपडपट्ट्या आहेत. यात नदी काठालगत ८ व नाल्याच्या कडेला ३ झोपडपट्ट्या

आहेत. १९९५ पुर्वीच्या २८ व १९९५ ते २००८ पर्यंतच्या २० झोपडपट्ट्या आहेत.

सातपूर विभागात शासकीय जागेवर ८, खाजगी जागेवर ९ व महानगर पालिका जागेवर १ झोपडपट्टी आहे. येथे नदी काठालगत ६ व नाल्याच्या कडेला १ झोपडपट्टी आहे. १९९५ पुर्वीच्या ९ व १९९५ ते २००८ पर्यंतच्या ९ झोपडपट्ट्या आहेत.

१९९५ नंतर सिडको विभागात १२, नाशिक पश्चिम विभागात ३, नाशिक पुर्व विभागात १४, नाशिकरोड विभागात १३, पंचवटी विभागात २० व सातपूर विभागात ९ झोपडपट्ट्या आहेत. एकूण ७१ झोपडपट्ट्या ह्या १९९५ नंतरच्या आहेत. तर १९९५ पुर्वीच्या १०४ झोपडपट्ट्या आहेत. एकूण १७५ झोपडपट्ट्यापैंकी नाशिक महानगर पालिका झोपडपट्टी सुधारणा विभागाच्या मशाल यादीमध्ये १५५ झोपडपट्ट्यांना क्रमांक दिले आहेत. तर १३ झोपडपट्टीधारकांनी २००८ च्या सर्वेक्षणाला विरोध केल्यामुळे त्यांचे नव्याने सर्वेक्षण होवू शकले नाही.

म्हणून १६८ झोपडपट्ट्यांची नावे नाशिक महानगरपालिकेकडून प्रसिद्ध करण्यात आली आहेत. छोट्या स्वरुपाच्या ३० ते ४० झोपड्या असणाऱ्या व १९९५ पुर्वीच्या झोपड्यांचे रुपांतर हे काही प्रमाणात पक्क्या स्वरुपात झाले आहे. तर यातीलच काही झोपडपट्ट्या ह्या फक्त नावापुरत्याच झोपडपट्ट्या म्हणून शिल्लक राहिल्या आहेत. त्यांचे रुपांतर हे पक्क्या व चांगल्या वस्त्यांमध्ये किंवा कॉलनी स्वरुपात झाले आहे. जागेवरील मालकी व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा लाभ मिळावा तसेच घरभाडे म्हणून उत्पन्नाचे साधन व विविध करांवरील सुट तसेच येथील राहणीमान व जीवनमानावरील खर्चही कमी होत असतो. त्याबरोबर व्यवसाय असल्यामुळेही झोपडपट्टीत राहणे सोयीचे ठरते. बऱ्याच अंशी झोपडपट्टीत अधिक कालावधीपासून राहणाऱ्या लोकांनी इतरत्र फ्लॅट, रो-हाऊस मध्ये स्थलांतर केले आहे. तर काही कुटूंबातील इतर सदस्य येथे राहतात किंवा ती झोपडी भाड्याने दिली जाते किंवा थोड्याफार किंमतीला विकून टाकली जाते. स्थलांतरीत व नव्याने शहरात रोजगारासाठी आलेल्या लोकांचा समावेश झोपडपट्ट्यांमध्ये होत राहतो.

मुंबई शहराचा ऐतिहासिक आढावा :-

'मुंबईत अनेक जाती, धर्माचे लोक येऊन राहिले आहेत. त्यांची मोजणी करणे देखील अवघड आहे. अनेक भाषा बोलणारे लोक राहतात. पारशी, मुसलमान, मोगल, यहुदी, इस्त्राईल, बोरी खोजे, मेमण, अरब, कंधारी या जातीचे, धर्माचे लोक आहेत तर इंगज, पोर्तुगीज, फ्रेंच, युनानी, वलंदेजी, तुर्क, जर्मन, अर्मानी, चिनी इत्यादी लोक आहेत. येथे अनेक प्रकारचे छोटे-मोठे व्यवसाय केले जातात. फेरीवाले भरपूर आहेत. वेगवेगळा पोशाख असणारे, अतिश्रीमंत व्यापारी आहेत. अतिगरीब लोकही आहेत. अनेक प्रकारच्या देश-विदेशातील वस्तू विकल्या जातात, यात घड्याळ अधिक प्रमाणात विकली जातात. मुंबई शहरावर अनेक गाणी, पोवाडे रचले गेलेत. अनेक प्रख्यात स्थळे ब्रिटिशांनी निर्माण केलेत. उद्योग व्यवसाय आणलेत, यंत्रांवर चालणारे अनेक उद्योग उभे केलेत, यामुळे उत्पादन मोठ्या प्रमाणात केले जात होते.

१५३० मध्ये मुंबई शहर मुसलमानांकडून पोर्तुगीज लोकांच्या हाती आले. त्यावेळी केवळ ओसाड गावे होती व त्यात सुमारे लहान मोठी मिळून ४०० घरे होती आणि पाच दहा हजार लोकांची वस्ती होती. ती केवळ कोळी, भंडारी आणि पांच कळशी या जातीतील लोकांची होती आणि जमिनीचा महसूल शासनाला दरसाल ७०० असुरक्या म्हणजे १८६५ च्या काळात ३५०/- रुपये एवढा होता. येथील जमीन कातळवट व बरड असल्यामुळे व आजूबाजूला खारेपाणी असल्यामुळे धान्याचे उत्पन्न फारते होत नसे.

मुंबई बेट सन १६६१ मध्ये पोर्तुगालच्या राजाने आपली कन्या इंग्लंड देशाचा राजा दुसरा चार्लस यास लग्नात भेट दिले. तसेही मुंबई बेट काहीही करून ब्रिटिशांना पाहिजे होते. ते यानिमित्ताने मिळाले. ब्रिटिशांनी मुंबईतील जमिनीचे भाग समुद्रात होते ते भरून काढले. सन १६६६ ला मुंबई बेट इंग्लंडच्या राजाने वर्षाला १०० रुपये सोन्याचे नाणे ब्रिटिश सरकारला द्यावे या करारावर ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात दिले, तेव्हापासून हळूहळू मुंबई शहराची भरभराट होत गेली व विविध देशाचे लोक येथे येऊन राहू लागले. मुंबई बंदरामुळे व्यापाऱ्यांना जहाजांवरून इंग्लंड देशातून मालाची ने-आण करणे व इतर देशातूनही मालाची वाहतूक करणे सोपे झाले व हे बेट तेव्हापासून नावारूपाला आले. १६६१ ते १८५० या कालावधीतच मुंबई बेटाचा खूप मोठा विस्तार झाला व मोठे शहर उदयाला आले.

इंग्रज लोकांच्या राज्यसत्तेचा पाया भारतात प्रथम मुंबईत घातला गेला आणि पुष्कळ वर्ष मुंबई हिच त्यांची मुख्य राजधानी होती. केवळ कोळी व भंडारी यांचेच मुंबई हे स्थान होते. मुंबईचे ऐश्वर्य पाहण्यासाठी विविध देशातून श्रीमंत लोक येत असत व आजही येतात. याचकाळात मुंबईत गरीब लोक,

अंध अपंग व्यक्ती येत होते. त्यांना अन्न, वस्त्र मिळत होते व पैसेही कमवत होते. यामुळे अनेक जातीचे श्रीमंत व गरीब असे सर्वच लोक मुंबईत येत होते. पुरातन काळापासून मुंबई बेटावर कोळी, भोंगळे, भंडारी, पळसे, जोशी, पाताणे परभू व पाच कळसे-वाडवळ-सुतार हे होते. या पाच जातीचे पुरातन लेख व कथा पाहिल्या असता त्यावरून हे अनुमान करता येते, असे गो. ना. माडगावकर यांच्या मुंबईचे वर्णन या पुस्तकात स्पष्ट केले आहे. या पाच जातीचे लोक पोर्तुगीज या बेटावर येण्यापूर्वीपासूनच राहत होते.

जेव्हा मुसलमान लोकांनी पहिल्यांदा सन १२९२ मध्ये दक्षिणेवर हल्ला केला तेव्हा अल्लाउद्दिन याने देवगड, ज्यास हल्ली दौलताबाद असे म्हणतात. तेथील हिंदू राजा रामदेव जाधव याचा पराभव करून इ.स. सन १३१८ मध्ये आपली सत्ता कोकण समुद्रापर्यंत वाढविली व त्याचवेळी पहिल्या मुबारक बादशहाने त्या शहराजवळ हरपाळ देव याचा पराभव करून त्यास ठार मारले आणि लष्करात कोकण समुद्रापर्यंत रखवाली करण्याचा हुकूम केला. अल्लाउद्दिन याने रामदेव याचा पराजय केला आणि आपली सत्ता माहीम, साष्टी, कोकण समुद्र आणि दुसरी कित्येक बंदरे येथे चालू केली, याचा उल्लेख पाताणे परभू यांच्या पुरातन लेखात लिहिला आहे. इ.स. १२९५ चे पूर्वी मुंबईत कोळी लोक होते व ते येथील मूळ स्थानिक होते.

मुंबईची चार-पाच सुटी बेटे होती, यात कुलाबा, मुंबई (किल्यापासून पायधुणीपर्यंत) महालक्ष्मी, वरळी, माजगाव आणि शीव ही बेटे होती. पायधुणी, उमरखाडी, नळ, भेंडीबाजार येथील विहिरीचे पाणी अगदीच वाईट असून त्या ठिकाणी झरे लागत नाहीत व वरळीचा व कुलाब्याचा बांध बांधलेला आहे. महालक्ष्मीच्या खालची सगळी शेते खारी, खाजणे होती. कामाठीपुरापासून थेट महालक्ष्मीपर्यंत सलग खाडी होती, असे मिस्टर मर्फी यांनी शोधले आहे. भुगर्भशास्त्रज्ञांच्या मते मुंबईत पूर्वी एकच बेट होते व भूकंप होऊन त्याची पाच-सहा बेटे झालीत, असे मत आहे. सन १५४० सालापासून एक दोन पारशी गृहस्थ सहकुटुंब येथे राहत होते व ते पोर्तुगीज दरबारात काम करीत होते. नंतर इंग्रज लोकांच्या कारकिर्दीपासून त्यांची वस्ती वाढत गेली. पोर्तुगीज लोकांच्या कारकिर्दीत दोराबजी नावाचा एक पारशी गृहस्थ मुंबईत सहपरिवार राहत होता व सरकारचा कारभार त्याच्याकडे होता, असे इतिहासावरून आढळते. पुढे कंपनी सरकारच्या वेळी देखील हे लोक सरकारी कारभारात होते. यावेळी इंग्रज लोकांना सर्वस्वी माहिती नसल्यामुळे या पारशी गृहस्थांचा त्यांना उपयोग झाला. मुंबईत राहण्याची नीट व्यवस्था नसल्यामुळे परिवारासह कोणी येऊन राहत नव्हते. सन १६९२ मध्ये मुंबईत महामारीचा रोग आला व इंग्रज लोकांचे सैन्य या रोगास बळी पडले. मुंबईची लहान लहान पाच बेटे आहेत आणि त्यातून खाऱ्या पाण्याच्या खाड्या असून त्या चिखलाने भरलेल्या आहेत.

ओहटीच्या वेळी ही बेटे पाच दिसतात, परंतु भरती आली. म्हणजे जिकडे तिकडे पाणी भरून सात होतात. असे माडगावकरांनी मुंबईचे वर्णन या पुस्तकात लिहिले आहे.

मुंबई बेटावर लोकांना अनेक उपद्रव होऊन ते अल्पायुषी होत असत. त्यामुळे ते उदयास येत नसे. जे इंग्रज येत ते दोन-चार वर्षाचे आत नाहीसे होत असत. रोग होण्याची कारणे इंग्रजांनी शोधली व मुंबई शहरात जिकडे तिकडे खारे पाणी साचलेले असते आणि ओहोटी लागली म्हणजे त्यापासून जो गंध निघतो, त्यावरून मनुष्यास विकृती होते, तेव्हा ह्या पाण्याचा बंदोबस्त केल्याशिवाय मुंबईत वास्तव्य करणे कठीण आहे, असे इंग्लंड सरकारास १६८५ मध्ये कळविण्यात आले व सर्व अधिकार १६८६ मध्ये मुंबईच्या गव्हर्नरास देऊन मुंबईत इंग्लंड देशातून गव्हर्नरची नेमणूक होऊ लागली. ज्यावेळी सुरतेहून कामगार लोकांची मुंबईवर नेमणूक होत असे, तेव्हा कामगार येथे येण्यास तयार होत नसत. मुंबईत जाऊन राहणे म्हणजे संकटात जाऊन राहणे असे वाटे मुंबईस 'यमपुरी' देखील म्हटले जात असे. मुंबईत धान्य फार पिकत नसे.

समुद्रास मागे हटवून ते स्थळ सुपीक व मनुष्यास राहण्यायोग्य प्रशस्त व निरोगी करणे आणि त्यापासून लक्षावधी रुपये मिळविणे हा सातत्याने ब्रिटिशांनी केलेला प्रयत्न आहे, असे माडगावकर लिहितात. मुंबईतील हवा केवळ निरोगी नसण्याचे कारण फक्त लोकांची गर्दी हा आहे असे ते म्हणतात. मुंबईत रोग उद्‌भवण्याची अनेक कारणे होती. त्यापैकी शेतात व माडांस मासळीचे खत शेती करणारे लोक घालत असत, त्यावर सरकारने १७२० मध्ये बंदी घातली व शेणखत झाडास घालण्याचे आदेश दिलेत. सन १६७६ मध्ये मुंबईत पहिले हॉस्पिटल ब्रिटिश लोकांसाठी बांधण्यात आले व तेव्हापासून ब्रिटिश लोकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी झाले. मुंबई संपूर्ण इतिहासात अनेक नावांनी ओळखली जाते. १६ व्या शतकात पोर्तुगीजांनी 'बॉम बहिमा' म्हटले आहे. मुंबादेवीच्या नावावरून बंबई हे नाव ब्रिटिशांनी सतराव्या शतकात शहराला दिलेले नाव आहे.

हिंदी नाव मुंबादेवी आणि आई हे नाव मराठी आहे म्हणून मुंबई या मराठी नावाने हे शहर ओळखले जाते आहे. १९९५ मध्ये महाराष्ट्र सरकारने मुंबई हे मराठी नाव वापरण्यात यावे, असे जाहीर केले व लिखीत नियम केला. ब्रिटिशांनी भारतातील पहिला रेल्वे मार्ग मुंबई ते ठाणे असा तयार केला व रेल्वे १८५४ मध्ये सुरू केली. अरबी समुद्रावरील प्रमुख बंदर आणि व्यापारी केंद्र ब्रिटिशांनी बनवले. मुंबईतील सात बेटांना जोडण्यासाठी रस्ते व पुल बांधलेत. अमेरिकन गृहयुद्धामध्ये युनायटेड स्टेटस्‌मधून येणारा कापूस थांबल्यामुळे भारतातून इंग्लंडला कापसाचा पुरवठा करण्यात आला व तेव्हाच या शहराने वेग घेतला. सन १८८१ मध्ये

कोलकाता हे भारताचे महत्त्वाचे बंदर मानले जात होते तर मुंबई हे झोपडपट्ट्यांनी भरलेले औद्योगिक शहर होते. ब्रिटिशांनी मुंबईत लोकांना आकर्षित करण्यासाठी धार्मिक स्वातंत्र्य देण्याचे वचन दिले व नऊ दशलक्ष हिंदू, वीस लाख मुस्लिम आणि पारशी, शीख, जैन, बौद्ध, ज्यू आणि ख्रिश्चन लोक राहत होते, असे माडगावकरांनी मुंबईचे वर्णन या पुस्तकात लिहिले आहे. या लोकांचे एकमेकांशी चांगले मैत्रीपूर्ण संबंध आजही आहेत. १९६० मध्ये मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी करण्यात आली.'

विभागवार २००१ ते २०११ पर्यंत मुंबईतील झोपडपट्टीतील लोकसंख्यावाढ

झोन	वार्ड नंबर	वार्डस्	झोपडपट्टी लोक-संख्या २००१	झोपडपट्टी लोक संख्या २०११	दशवार्षिक वाढ%
आईसलॅन्ड सिटी	१	ए (कुलाबा)	६०८९३	६३४००	४.१२
	२	बी (सॅन्डहर्ट रोड)	१८७४६	१४४००	-२३.१८
	३	सी (मरीन लाईन्स)	झो.नाही	झो.नाही	-
	४	डी (ग्रॅन्ट रोड)	३८०७७	३३०००	-१३.३३
	५	ई (भायखळा)	५२२३०	७७८००	४८.९६
	६	एफ/एन (माटुंगा)	३०४५००	३०८४००	१.२८
	७	एफ/एस (परेल)	१४१६५३	९५२००	-३२.७९
	८	जी/एन (माहीम/दादर)	३२४८८६	१८९६००	-४१.६४
	९	जी/एस (एलफिन्सटनरोड)	१५१५०६	७८३००	-४८.३२
		मुंबई बेट एकूण	**१०९२४९१**	**८६०१००**	**२१.२७**
पश्चिम उपनगरे	१०	एच/ई (खार सांताक्रुझ)	४५७६६२	२३४८००	-४८.७०
	११	एच/डब्ल्यू. (बांद्रा)	१३८५४१	११८५००	-१४.४७
	१२	के/ई (अंधेरी पूर्व)	४७२२२६	४०३८००	-१४.४९
	१३	के/डब्ल्यू (अंधेरी पश्चिम)	३१६०६५	१०८८००	-६५.५८
	१४	पी/एन (मालाड)	५०८४३५	५०४५००	-०.७७
	१५	पी/एस (गोरेगाव)	२१०५९१	२६४०००	२५.३६
	१६	आर/सी (दहिसर)	१७३१६०	१०४३००	-३९.७७
	१७	आर/एन (बोरिवली)	१६९६६२	२२१५००	३०.५५
	१८	आर/एस (कांदिवली)	३२६२३५	३९९२००	२२.३७
		पश्चिम उपनगरे एकूण	**२७७२५७७**	**२३५९४००**	**-१४.९०**
पूर्व उपनगरे	१९	एल (कुर्ला)	६५८९७२	४९०४००	-२५.५८
	२०	एम/ई (चेंबूर पूर्व)	५२३३२४	२४५३००	-५३.१३
	२१	एम/डब्ल्यू. (चेंबर पश्चिम)	२८३५५७	२१७२००	-२३.४०
	२२	एन (घाटकोपर)	४३५००९	३८५६००	-११.३६
	२३	एस (भांडूप)	५९३३००	५३७९००	-९.३४
	२४	टी (मुलुंड)	११६२५०	१११८००	-३.८३
		सर्व उपनगरे एकूण	२६१०४१२	१९८८२००	-२३.८४
ग्रेटर मुंबई	**२४**	**सर्व वार्डस्**	**६४७५४८०**	**५२०७००**	**-१९.५८**

संदर्भ : http://www.udri.org.upload pdf 18/3/2022

सन २००१ व २०११ ची लोकसंख्या वरील तक्त्यात मांडली आहे व दहा वर्षातील या लोकसंख्येची वाढ व घट दर्शविली आहे. २००१ मध्ये मुंबईत असणारी ६४,७५४८० लोकसंख्या २०११ मध्ये कमी होून ती ५,२०,७०० पर्यंत कमी झाली आहे म्हणजेच १९.५८ टक्क्याने झोपडपट्टीतील लोकसंख्या कमी झाली आहे. येथील कुटुंबाचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून पुनर्वसन करण्यात आले आहे. तसेच अतिगर्दीमुळे अनेक कुटुंबांनी नाशिकसारख्या शहरामध्ये स्थलांतर केले आहे. नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यामुळेदेखील काही कुटुंबे आपल्या गावी राहायला गेली आहेत. तसेच मोठ्या प्रमाणात झोपडपट्टीतील लोकांनी मुंबईच्या बाहेर ठाणे, कल्याण अशा ठिकाणी स्वत:चे घर किंवा फ्लॅट घेतला आहे. रेल्वेने प्रवासाची सुविधा असल्यामुळे व मुंबईच्या बाहेर ५० ते १०० किलोमीटरवर फ्लॅट घेणे शक्य असल्यामुळे अशी कुटुंबे मुंबई उपनगरातून बाहेरच्या ठिकाणांवर स्थलांतरीत झाली आहेत तसेच नाशिकमध्ये मुंबईतील अनेक कुटुंबियांनी फ्लॅट, रो-हाऊस तसेच प्लॉट घेऊन घरे बांधली आहेत. नाशिकमध्ये मुंबईपेक्षा फ्लॅटच्या किंमती कमी असल्यामुळे घरे घेणे परवडते, म्हणून देखील बहुतेक कुटुंबे नाशिकला स्थायिक झाली आहेत, तरी कामानिमित्त मुंबईमध्ये या लोकांचा प्रवास व राहणे होत असते. त्यामुळे दशवार्षिक वाढ कमी झालेली दिसते.

संदर्भ -

१. **डॉ. सुधीर बोधनकर व डॉ. साहेबराव चव्हाण, श्रम अर्थशास्त्र, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.**

2. **A. R. Desai, & S. Devdas Pillai (1970) Slums and Urbanisation edited by Popular Prakashan, Bombay.**

3. **R. M. Thakur, M. S. Dhadave, Slum and Social System, Archeves Pub. New Delhi - 55.**

4. **नाशिक महानगर पालिका झोपडपट्टी सुधारणा विभाग, सर्वेक्षण २००८**

5. **(download from - Shodhaganga.inflibnet.ac.in/bitstream/10603/27129/14/14-chapter%205.pdf) Date 14/05/2017**

६. **गो. ना. माडगावकर (२०२०), मुंबईचे वर्णन, वरदा प्रकाशन, पुणे**

७. **विनोद निरभवणे (२०२१), नाशिक शहरातील झोपडपट्टीवासियांचा समाजशास्त्रीय अभ्यास, (अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध) कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.**

प्रकरण - २

संशोधन साहित्याचा आढावा

प्रस्तावना :-

भारतात शहरे उदयाला येऊन ती स्थिर होण्याचा कालावधी अतिशय कमी राहिला आहे. त्यामुळे प्रशासकीय पातळीवरून शहरांचे नियोजन करणे शक्य झाले नाही. शहरांमध्ये व उद्योगांच्या ठिकाणी कामगारांसाठी योग्य त्या सोयी-सुविधा, घरे यांचा पुरवठा करणे उद्योगांना शक्य झाले नाही, याचा परिणाम म्हणून झोपडपट्ट्यांची निर्मिती झाली व त्यात दिवसागणिक वाढ होत गेली आहे. संघटित उद्योगांतील रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणात करण्यात आली नाही, याचा परिणाम म्हणून असंघटित क्षेत्रात रोजगाराची उपलब्धता कायमस्वरूपी चांगले आर्थिक उत्पन्न मिळविण्यासाठी होऊ शकली नाही. किमान मानवी गरजा पूर्ण होऊ शकतील, इतकाही रोजगार असंघटित क्षेत्रात उपलब्ध झाला नाही. परिणामी झोपडपट्यात अनेक अनधिकृत व्यवसाय वाढीस लागलेत, हिंसा, गुन्हेगारी यांच्यात वाढ झाली. झोपडपट्टीवासियांचे शासनाने पुनर्वसन करण्यात केलेली दिरंगाई, शहरातील मोकळ्या भूखंडावर बसविलेल्या झोपड्या उठविणे, जागेची मालकी न देणे यामुळे ही झोपडपट्ट्यांची समस्या वाढत गेली आहे. सामाजिक व आर्थिक दृष्टीने मागास असलेल्या लोकांचा समावेश झोपडपट्टीत झाला आहे, म्हणून या लोकांच्या विकासासाठी शहरांमध्ये स्वतंत्र योजना दीर्घ कालावधीपर्यंत राबविण्यात आल्या नाहीत.

डिसेंबर २०१२ मध्ये राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या ६९ व्या अहवालातील निष्कर्षानुसार भारतात ३३ हजार ५१० शहरी झोपडपट्ट्या अस्तित्वात आहेत. यामधील ४१% झोपडपट्ट्या या अधिसुचित आहेत. बिगर अधिसूचित झोपडपट्ट्यांची देशमरातील संख्या १९ हजार ७४९ एवढी आहे. यापैकी महाराष्ट्रात २९%, पश्चिम बंगाल १४%, तर गुजरातमध्ये १०% आहे. महाराष्ट्रात ७ हजार ७२३ झोपडपट्ट्या आहेत. हे प्रमाण सर्वाधिक म्हणजे २३% आहे. यानंतर आंध्रप्रदेश १३.५%, पश्चिम बंगाल १२% आहे. देशभरातील झोपडपट्ट्यांत राहणाऱ्या कुटूंबापैकी ३८% कुटूंब महाराष्ट्रातील झोपडपट्टीत राहतात. तर १८% आंध्रप्रदेशात राहातात. अधिसूचित झोपडपट्ट्या आंध्रप्रदेशात सर्वात जास्त २३% आहेत. तर हे प्रमाण महाराष्ट्रात १४% आहे. मध्यप्रदेश, पश्चिम बंगाल व तामिळनाडू येथे प्रत्येकी ९% अधिसूचित झोपडपट्ट्या आहेत.

सामाजिक घटक :-

'भारतात प्रत्येक राज्यांची झोपडपट्ट्यांची व्याख्या वेगवेगळी आहे. १९५६ च्या भारतीय कायद्यानुसार झोपडपट्टीचे ठिकाण कशास म्हणावे हे स्पष्ट केले आहे. मानवाला राहण्यास अयोग्य ठिकाण, अतिरिक्त लोकसंख्या, घरांची व इमारतींची चुकीची रचना, अरुंद रस्ते व चुकीचे नियोजन, मोकळ्या हवेचा अभाव, सांडपाण्याची चांगली व्यवस्था नसणे, आरोग्य, सुरक्षितता व नितिमुल्यांचा अभाव असणारे ठिकाण म्हणजे झोपडपट्टी होय. शहरांमधील लोकसंख्या वाढीचे कारण म्हणजे रोजगार उपलब्ध होण्याचे प्रमाण जेवढे अधिक तेवढ्या प्रमाणात झोपडपट्ट्या वाढतात. झोपडपट्टीवासीयांच्या आर्थिक समस्यांपलिकडे व्यसनामुळे येथील नैतिक व आर्थिक परिस्थिती आणखी ढासळते. काही लोक हे नियमित व्यसन करतात व त्याचे प्रमाण हे आपल्या उत्पन्नापेक्षा जास्त असते. शैक्षणिक समस्येत मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक असणारा खर्च, कुटूंबाची आर्थिक स्थिती, शिक्षणाविषयीची आस्था यांचा अभाव असतो. तसेच आरोग्य, स्वच्छता, घरांची समस्या तसेच जागेचा अभाव आहे. मुंबईतील झोपडपट्टीतील ५५ टक्के लोकसंख्या शहराच्या ६ टक्के जमिनीवर राहते.[१]

'तिरुपती येथे शहरीकरण व औद्योगिकरणामुळे रोजगाराची संधी निर्माण झाली. त्याबरोबर मागासवर्गीय लोकांचे रोजगारासाठी शहरात स्थलांतर झाले व झोपडपट्टीची समस्या निर्माण झाली. तिरुपती येथील झोपडपट्टीवासीयांच्या राहणीमानाची स्थिती तसेच भारतातील शहरी गरीबी त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या यामध्ये सामाजिक आर्थिक परिस्थिती, आरोग्य, निरक्षरता, व्यसनाधिनता, रोजगाराचा अभाव, घरांची स्थिती व या सर्व परिस्थितीचा येथील लोकांवर परिणाम झाला आहे. आंध्र प्रदेशातील शहरी दारिद्र्याचे प्रमाण २००४-०५ नुसार ३७ टक्के होते. नेलोर व अकुथोटा झोपडपट्टींचा अभ्यास केला असता निरक्षरता ५५ टक्के होती व रोजगारावर अवलंबन ८८ टक्के होते. तसेच व्यसनाचे प्रमाण ७२ टक्के दिसून आले. कमला गुप्ता यांनी भारतातील आठ मोठ्या शहरातील झोपडपट्टीतील लोकांच्या आरोग्य आणि राहणीमानाचा अभ्यास केला. त्यानुसार झोपडपट्टीतील लोकांची स्थिती खूपच वाईट असून त्यात सुधारणा करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.'[२]

'यांत्रिकीकरणामुळे संपत्ती केंद्रीत अर्थव्यवस्था निर्माण झाली व सामाजिक असमानता अधिक मजबूत झाली व शहरे, महानगरे हे व्यावसायिकतेची केंद्रे बनली. शहरांचे आकर्षण व ग्रामीण भागातील व्यक्तींच्या गरजा पुर्ण करण्याचा शेतीक्षेत्राचा अभाव यामुळे शहरात काम करण्याच्या हेतूने स्थलांतर करणाऱ्यांची

संख्या दिवसेंदिवस वाढत गेली व शहरांची लोकसंख्या ही वाढत गेली. रेल्वेच्या बाजूला किंवा शहरापासून दूर झोपड्या करुन कापडाचे छप्पर बनवून रस्त्यांच्या कडेला फुटपाथवर स्थलांतरीत कुटूंबे राहू लागली. या झोपड्यांमध्ये स्वयंपाक घर, पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृह यांचा अभाव असतो. अशा श्रमिक वस्तीत रोगकारक ठिकाणी हे लोक राहतात. औद्योगिकीकरणामुळेच शहरांमध्ये झोपडपट्ट्यांची समस्या निर्माण झाली आहे. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी नविनीकरण मिशन योजना दहा लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या शहरात लागू केली आहे. निर्धन वर्गासाठी घरांची सुविधा निर्माण करुन दिल्यास त्यांची कार्यक्षमता वाढेल आणि दररोजच्या समस्यांमधून मुक्तता मिळेल. घरांची प्राथमिकता यावर भर देण्यात येऊन शासनाने शहरांमध्ये प्रत्येकाला घर यासाठी विविध धोरणे, योजना तयार केल्या आहेत. सी.बी. मेमोरिया यांनी झोपडपट्टी ही एक सामाजिक, आर्थिक व नागरी समस्या आहे असे म्हटले आहे.

उत्तरप्रदेश स्लम एरियाज ॲक्ट १९६२ नुसार जेथे अधिक इमारती ह्या तुटलेल्या अवस्थेत व अनियोजित रचना, मोकळी हवा, वीज, आरोग्य, स्वच्छता, सुरक्षा व नैतिकता यांचा अभाव आहे व मनुष्याला राहण्यालायक ठिकाण नसणे अशी झोपडपट्टीची व्याख्या केली आहे. कानपूर इन्क्वायरी कमिटी रिपोर्टनुसार अस्वच्छ वस्त्यांमध्ये राहणाऱ्या व्यक्ती पावसाळ्यात पुर्णतः सुरक्षित राहतात. परंतु इतर वेळेस मानवजातीचे भयंकर शत्रू असणारे किडे, मकोडे आणि ढेकुण यांचे खूप लवकर शिकार होवून जातात. मुंबई, कानपूर, मद्रास येथील अस्वच्छ वस्त्यांची अवस्था किती दयनीय होती याचे स्पष्टीकरण वेगवेगळ्या अभ्यासकांच्या निदर्शनातून केले आहे. लखनऊ मध्ये ७८७ अधिकृत व अनाधिकृत अस्वच्छ वस्त्या आहेत. डिस्ट्रिक्ट अर्बन डेवलपमेंट अथॉरिटी (DUDA) २००५ नुसार लखनऊ शहरात स्लम सुधार योजना राबविल्या आहेत. विविध पंचवार्षिक योजनांमधील झोपडपट्टी सुधार व शहरी गरीबी निर्मुलन योजना राबवून झोपडपट्टीची स्थिती सुधारण्याचे प्रयत्न केले आहे.'[३]

'झोपडपट्टीतील लोकांसाठी काय करता येईल या उद्देशाने भारत सरकार व आंतरराष्ट्रीय मजूर परिषद यांनी मुंबईतील धारावी, चित्ता कॅम्प, जोगेश्वरी व वडाळा येथील दोन हजार कुटूंबाचा अभ्यास केला. एक टक्का कुटूंबाची रॅन्डम सॅम्पल पद्धतीने निवड केली होती. महानगरपालिकेने घरांना दिलेल्या नंबरचा वापर करण्यात आला. शहरीकरणाचा वेग व त्यामुळे वाढत जाणाऱ्या समस्यांमध्ये झोपडपट्टीचा प्रश्न निर्माण होत गेला व तो जगामध्येही निर्माण झाला. परंतु भारतात हा वेग प्रचंड असल्यामुळे शहरांचे नियोजन करणे शक्य झाले नाही. टोकियो, मनिला, जकार्ता, बँकॉक, कराची, मुंबई, कलकत्ता ही शहरे समाजाच्या गरजेपोटी

वाढत गेली. नोकरी आहे म्हणून ग्रामीण भागातील लक्षावधी लोक शहरात आले व त्यामुळे मुलभूत सोयीसुविधांच्या अभावी झोपडपट्ट्यांमधून असे लोक राहू लागले. युरोपमध्ये उद्योग आणि शहरे यांची वाढ अशा तऱ्हेने झाली की एक शहर मोठे होईपर्यंत दशकाचा कालावधी जात असे. याउलट आशियामध्ये शहरीकरणाचा वेग इतका मोठा आहे की, शहरातील बदल कसा घडतो हे उमजण्यापुर्वीच शहरात झोपडपट्ट्या निर्माण होतात.'[४] 'झोपडपट्ट्यांच्या वाढीची समस्या शहरीकरणाच्या वाढीमुळे झाली असून घरांची उपलब्धता नसणे व श्रमिकांना घर भाड्याने घेणे शक्य नसल्याने बहुतेक देशांत शहरांमध्ये झोपडपट्ट्यांची वाढ झाली आहे. येथील वातावरणाचा परिणाम श्रमिकांच्या आरोग्यावर, विचारांवर आणि कार्यक्षमतेवर होत असतो. जेवढे प्रतिकूल वातावरण असेल तेवढा जास्त प्रतिकुल परिणाम होतो. झोपडपट्टीचे तीन प्रकार मांडले आहेत. शहरी खेडे, निराशावादी वस्ती व आशावादी वस्ती तसेच जन्मजात, स्थानांतरीत व संक्रमण असे झोपडपट्ट्यांचे वर्गीकरण केले आहे.'[५]

'भारतीय राज्यघटनेतील मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वांच्या आधारे झोपडपट्टी अधिनियम स्पष्ट केला आहे. राज्यघटनेतील कलम १४, १९, ३८, ४१, ४५, ३०० व ३०० अ या अंतर्गत प्रत्येक भारतीय व्यक्तीला समानता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, देशात कोठेही नोकरी, व्यवसाय करण्याचे, राहण्याचे, संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. स्वत:चे संरक्षण, जिवीताचा व सुरक्षिततेचा हक्क, अन्याय व शोषणाविरुद्धचा हक्क, काम करण्याचा व रोजगार मिळविण्याचा हक्क दिला आहे. कलम २१ नुसार व्यक्तीला जीवन जगण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. राज्यघटनेतील वरील कलमांचा आधार घेत न्यायालयाने झोपडपट्टीतील व्यक्तींच्या मुलभूत अधिकारांचे संरक्षण केले आहे. केंद्र शासनाच्या शहर विकास तसेच शहरी रोजगार व दारिद्र्य निर्मुलन मंत्रालयाने शहरी भागातील झोपडपट्टीवासीयांचे जीवनमान उंचावण्याचा एक भाग म्हणून अपायकारक अशा परिस्थितीत राहणाऱ्या झोपडपट्टीवासीयांसाठी राष्ट्रीय शहरी झोपडपट्टी सुधार कार्यक्रम व वाल्मिकी आंबेडकर आवास योजना बंद करुन राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान जाहीर केले आहे. यात राष्ट्रीय झोपडपट्टी धोरण आराखड्याची उद्दिष्ट्ये, शासकीय तत्वे, पुनर्वसन, एकात्मिक नियोजन, पर्यावरण, भौतिक साधने, शिक्षण, आरोग्य, आर्थिक पुरवठा आणि झोपडपट्टी सुधारणा व सेवा, महानगरपालिकांची भूमिका महत्त्वाची आहे.'[६]

'आंध्र प्रदेशातील विजयवाडा शहरातील भास्करराव पेटा झोपडपट्टीचा अभ्यास झालेला आहे, यात स्थलांतर, रोजगार, शहरातील झोपडपट्टीवासीयांची जीवनाची स्थिती आणि ग्रामीण शहरी संबंध महत्त्वाचा

आहे. पेटा झोपडपट्टीत ग्रामीण भागातील स्थलांतरीत असंघटीत क्षेत्रात स्थलांतरीत झालेत. अतिशय गरीब स्थलांतरीत हे शहरातील रिकाम्या जागांवर अनाधिकृत ठिकाणी व कामाच्या जवळ असणाऱ्या आणि कोणत्याही सोयीसुविधा नसणाऱ्या ठिकाणी राहिलेत व असे स्थलांतरीत अनाधिकृत असल्यामुळे स्थानिक प्रशासनाकडून कोणत्याही सुविधा दिल्या गेल्या नाहीत. अशा अनाधिकृत घरांची संख्या वाढत राहते. झोपडपट्ट्या सर्वसामान्यपणे सामाजिक समस्यांशी निगडीत असतात. यात गुन्हेगारी, विचलीत वर्तन, अवैध व्यवसाय याचा प्रभाव झोपडपट्टीवासियांवर होत असतो. स्थलांतरीतांना शहरी जीवनाशी जुळवून घ्यावे लागते. झोपडपट्टीवासीय हे शहरी अर्थव्यवस्थेचा एक भाग असतात. साधारणपणे बिगरकौशल्य असणाऱ्या क्षेत्रात स्थलांतरीत लोकांचा रोजगार असतो. तसेच स्वयंरोजगारीत व्यक्तींचाही समावेश असंघटीत क्षेत्रात होत असतो. शहरातील राजकिय प्रक्रियेतही झोपडपट्टीवासीयांचा सहभाग असतो. भास्करराव पेटा झोपडपट्टीच्या अनुषंगाने स्थलांतर, शहरीकरण, ग्रामीण शहरी आंतरसंबंध व या आंतरसंबंधाचा शहरी विकास आणि झोपडपट्टीवासीयांच्या समस्यांवर प्रभाव पडत असतो. स्थलांतरीत शहरी जीवनाशी कसे जुळवून घेतात. झोपडपट्टीवासीयांचे व्यवसायासाठी असणारे संबंध शहरातील आर्थिक संबंधांवर प्रभाव टाकतात. व्यावसायिक गतीशिलता व झोपडपट्टीवासीय आपल्या मुळ ठिकाणाशी संबंध ठेवतात.'[७]

आर्थिक घटक :-

'ग्रामीण जनतेचे शहरांकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर झाले. शहरातील बलिष्ठांनी अशा लोकांना रहिवास व सार्वजनिक सुविधांसाठी जमीन देण्यास विरोध केला व शहरी औद्योगिक व्यवस्थेतील संघटीत उद्योगातील रोजगार निर्मितीवर मर्यादा आल्यात. त्यामुळे अशा शरणार्थी लोकांनी अनौपचारीक क्षेत्रामध्ये प्रवेश केला व यातूनच झोपडपट्ट्यांचा उदय झाल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच अनधिकृत झोपडपट्ट्या या हिंसा, गुन्हेगारी, गैरव्यवहार, समाजविघातक गोष्टींचे आगार बनल्या आहेत. झोपडपट्ट्यांमुळे नागरी सुखसोयींवरील ताण वाढत जातो. झोपडपट्टीवासीयांचे शहरी अर्थव्यवस्थेतील स्थान, शहर उभारणीतील त्यांचा मोलाचा वाटा झोपडपट्टींच्या प्रश्नामागील विकासाच्या प्रादेशिक असमतोलची पार्श्वभूमी, पुनर्वसनाच्या आराखड्याशिवाय झोपडपट्टीतील लोकांचे विस्थापन करण्यामागील अन्यायी भूमिका, प्रस्थापित व्यवस्थेकडून झोपडपट्टीवासियांचे होणारे शोषण या मुद्यांच्या आधारे झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन त्याच जागी करणे आवश्यक आहे. १९९१ साली स्विकारण्यात आलेल्या जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरणाच्या धोरणांनी झोपडपट्ट्यांच्या वाढीमध्ये आणखी भर पडली असून त्याचा झोपडपट्टीवासीयांवर परिणाम झाला आहे.

झोपडपट्टीतील लोकांच्या असंघटीत क्षेत्रातील विविध कामांमध्ये इतर समाजघटकांना त्यांचे शोषण करणे सोपे जाते. विविध सेवांचा उपभोग घेत असतानाच त्या पुरवणाऱ्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न, मुलभूत सेवा सुविधांचा प्रश्न याविषयी समाज म्हणून आपली काही जबाबदारी आहे याची जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे.'[८]

'पुणे शहरातील कचरा गोळा करणाऱ्या स्त्री-पुरुष कामगारांच्या समस्या म्हणजे अतिशय स्वच्छ राहणाऱ्या चांगले जीवन जगू पाहणाऱ्या स्त्रियांना कचरा गोळा करण्याची कामे करावी लागतात. त्यामुळे विविध प्रकारचे रोग स्त्रियांना होतात. अस्वच्छ, कष्टाची कामे करावी लागतात. थंडी असो की पावसाळा संपुर्ण आयुष्य झोपडपट्टीत राहण्याशिवाय पर्याय राहत नाही. झोपडपट्टीवासीयांना मताधिकार मिळून देखील राजकीय प्रक्रियेवर प्रभाव टाकण्यासाठी फारसा उपयोग होत नाही. परिणामी आर्थिक व राजकीय निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याची ताकद कमी होते. झोपडपट्टीवासीयांच्या हिताच्या विरोधी जाणारे अनेक आर्थिक व राजकीय निर्णय सातत्याने घेतले जात असतात. राजकीय सत्ता असणारे प्रभावी गट झोपडपट्टीवासीयांच्या प्रश्नावर जाणीवपुर्वक दुर्लक्ष करतात'[९]

'धारावी झोपडपट्टीतील महाराष्ट्रातील मराठवाडा येथून स्थलांतरीत झालेल्या महिलांना रोजगार मिळण्यासाठी श्रमिक विद्यापीठाने प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणामुळे या महिलांना त्यांच्या कौटूंबिक जीवनासाठी फायदा झाला. कुटूंब नियोजनाबाबतची जाणीव, आरोग्याची समस्या, मुलभूत सोयी सुविधांबाबतचे समाधान, शेजारी राहणाऱ्या कुटूंबांचे शिक्षण त्यांची मदत, उत्पन्नाचे स्त्रोत याबाबतचा अभ्यास केला व रोजगारा बाबतची स्थिती जाणून घेवून श्रमिक विद्यापीठाने रोजगाराबाबत दिलेल्या प्रशिक्षणाचा रोजगार मिळवण्यासाठी व कुटूंबाचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रशिक्षणाचा रोजगार मिळविण्यासाठी फायदा झाला आहे.[१०]

अमर्त्य सेन यांच्या मते अनेक विकसनशील देशात मुक्त अर्थव्यवस्थेत कामगाराला औद्योगिक उत्पादनातील भागिदारीपासून दूर ठेवण्यात आले. त्याबरोबर छोटे-मोठे शेतकरी व परंपरागत व्यवसाय करणारे लोकही औद्योगिक उत्पादनाच्या भागिदारीपासून दूर राहिले. आर्थिक व्यवहारातील भागिदारीचा सामाजिक जीवनात निश्चित उपयोग होतो. बाजारकेंद्रीत अर्थव्यवस्थेच्या बाहेर राहिलेल्या इतर मागास वर्गातील लोकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. अशा प्रक्रियेत शासनाचा हस्तक्षेप महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे मानवी जीवन समृद्धच होत असते. सामाजिक किंवा राजकीय स्वातंत्र्याच्या अभावामुळे आर्थिक स्वातंत्र्याला संकुचित केले जाते. आर्थिक स्वातंत्र्याच्या अभावामुळे सामाजिक समस्यांचा जन्म होतो.

शैक्षणिक घटक :-

कुटूंबाची सामाजिक, आर्थिक व व्यावसायिक स्थिती मुलांच्या शिक्षणात महत्वाची असते. यामध्ये कुटूंबाचा आकार, अवलंबित सदस्यांची संख्या यांचा परिणाम मुलांच्या शिक्षणावर होतो. कुटूंबाचे उत्पन्न हा घटक महत्वाचा आहे. आर्थिक दृष्टीने मागास कुटूंब असेल तर उत्पन्नातील जास्त भाग हा मुलभूत गरजांसाठी खर्च होतो व मुलांच्या शिक्षणाला दुय्यम महत्व दिले जाते. वस्तूंच्या वाढणाऱ्या किंमती, कुटूंबाचा मोठा आकार व कमावणारी एक व्यक्ती यामुळे सरकारी शाळांवर अशा मुलांना अवलंबून राहावे लागते. काही कुटूंबातील सदस्य उत्पन्नाचा काही भाग व्यसनासाठी खर्च करतात. पालक हे कौशल्य आणि बिगर कौशल्य असलेल्या व्यवसायात मजूर म्हणून काम करतात व कामाचे स्वरुप हे अनियमित असून उत्पन्न हे अतिशय कमी असते. जी मुले खाजगी शाळांमध्ये जातात त्यांच्या पालकांचे उत्पन्न अधिक असते त्यांना नियमित रोजगार मिळतो.

झोपडपट्टीतील वातावरणाचा परिणाम मुलांच्या शिक्षणावर होत असतो. सुरक्षित घराची बांधणी व रचना, स्वच्छता, चांगले वातावरण, पुरेसा प्रकाश, शुद्ध हवा आणि पाणी तसेच सांडपाणी वाहून नेण्याची सुविधा रस्ते व लाईट असणे हा प्रत्येक माणसाचा अधिकार आहे. पण झोपडपट्टीतील कुटूंबांना या सुविधा पुरेशा प्रमाणात मिळत नाही. भौतिक सुविधा न मिळण्याबरोबर आहे त्या अनधिकृत ठिकाणाहून झोपडपट्टी हटविण्याची भिती कायम असते. एकाच खोलीत जास्त लोक राहतात. खोल्या अतिशय छोट्या असतात व यामध्ये शुद्ध व खेळती हवा राहत नाही. सार्वजनिक ठिकाणी पिण्याचे पाणी असते. तसेच स्वच्छतागृहे ही लोकसंख्येच्या प्रमाणात अतिशय कमी व सार्वजनिक स्वरुपाची असतात. मुलांना पाणी भरणे व मुलींना दररोज कौटूंबिक स्वरुपाची कामे करावी लागतात. म्हणून मुलांना शिक्षण घेणे व गुणवत्ता राखणे शक्य होत नाही.

'दिल्ली येथील झोपडपट्टीतील पहिली ते चौथी पर्यंतच्या शाळेतील मुलांचा शिकण्याच्या प्रगतीचा तुलनात्मकदृष्ट्या खाजगीरित्या चालविल्या जाणाऱ्या शाळांच्या मुलांशी भाषा आणि गणित विषयातील शिकण्याच्या प्रगतीचा अभ्यास केला आहे. दिल्लीतील धर्म, जात आणि व्यवसाय यात फरक व सामुहिक वैशिष्ट्ये असणाऱ्या सहा झोपडपट्टीतील शाळांची हेतुपुर्वक निवड करण्यात आली. तुलनात्मक अभ्यासासाठी १६ दिल्ली महानगरपालिका व १४ खाजगी शाळा अशा एकूण ३० शाळांची संशोधनासाठी हेतुपर्वक नमूना निवड केली. पहिलीतील ६५४ मुलांचा अभ्यास करण्यात आला. यात ४१५ महानगरपालिका २३९ खाजगी

शाळांतील मुले निवडण्यात आली. चौथीतील ५७६ मुलांचा अभ्यास करण्यात आला. तसेच ९२ शिक्षकांकडून अध्ययन - अध्यापनाबाबत प्रश्नावली भरुन घेण्यात आली. झोपडपट्टीतील मुलांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये कुटूंबाची सामाजिक, आर्थिक व व्यावसायिक स्थिती, कुटूंबाचा आकार, झोपडपट्टीतील वातावरण, पालकांचे शिक्षण, शाळेचे अंतर इत्यादी घटक अडथळा ठरले आहेत. शाळेतील शिक्षकांची कर्मठ भूमिका, काही शिक्षक शाळेत मुलांना शिकवत नाही, शिक्षकांचा मुलांच्या प्रमाणातील अभाव, मुलांची जास्त संख्या व इतर मुलभूत सोयीसुविधांचा अभाव, शाळेतील वातावरण, तसेच शिक्षणाचे माध्यम हे मुलांसाठी अडथळा ठरते. झोपडपट्टीतील कुटूंबाची मातृभाषा ही वेगवेगळी असते. इंग्रजी भाषा मुलांना शिकता येत नाही. मुलांना शाळेत शिकवलेले समजत नाही. अभ्यासासाठी मुलांना पालकांची मदत मिळत नाही. प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील मुलांच्या गळतीचे प्रमाण जास्त असते.'[११]

'भारतातील झोपडपट्टीवासीयांचा २००१ च्या जनगणनेनुसार राज्यांमधील साक्षरता दर व बिगर झोपडपट्टीवासीयांचा साक्षरता दर यातील तफावत स्पष्ट केली आहे. झोपडपट्ट्यांमध्ये स्त्री-पुरुष प्रमाणातील तफावत असण्याबरोबर स्त्री-पुरुष साक्षरतेतील तफावत देखील मोठ्या प्रमाणात आहे. त्रिपुरा व मेघालय येथील साक्षरता दर पुरुषांचा ८० टक्के आहे. झोपडपट्टीतील केरळ आणि महाराष्ट्रातील पुरुष साक्षरता दर चांगला आहे. परंतु कर्नाटक, बिहार आणि उत्तर प्रदेश येथील झोपडपट्टीतील पुरुष साक्षरता दर समाधानकारक नाही. भारतीय पातळीवर झोपडपट्टीतील स्त्रीयांचा साक्षरता दर ५५ आहे. जम्मू-काश्मिर, दिल्ली, राजस्थान, उत्तर प्रदेश, गुजरात आणि गोवा येथील झोपडपट्टीतील स्त्री साक्षरता दर भारतीय पातळीवरील कमी आहे. आंध्र प्रदेशात ७७ शहरांमध्ये झोपडपट्ट्यांचे प्रमाण जास्त आहे. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि दिल्ली येथे भारतातील ६६ टक्के झोपडपट्टीवासीय राहतात. झोपडपट्टीतील साक्षरता दर चंदिगढ येथे सर्वात कमी ३० टक्के तर मेघालय येथे सर्वात जास्त ७५.५ टक्के होता. शहरीकरणाच्या प्रक्रियेबरोबर झोपडपट्टीवाढीची प्रक्रिया सुरु असते. झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसन, मुलभूत सोयी-सुविधा व शासकीय योजनांबरोबर साक्षरता दर वाढविण्यासाठीच्या योजना राबविणे आवश्यक आहे. झोपडपट्टीतील लोकसंख्या शिक्षणापासून वंचित आहे. म्हणून झोपडपट्टीवासीयांसाठी विशेष शाळा कमवा व शिका योजनेवर आधारीत असणे आवश्यक आहे.'[१२]

आरोग्य घटक :-

'कोल्हापूर शहरातील राजेंद्रनगर या झोपडपट्टीतील भौतिक पर्यावरण आणि झोपडपट्टीवासीयांचे

आरोग्य याचा अभ्यास केला आहे. व्यक्तीगत स्वच्छतेमध्ये स्नान, दातांची स्वच्छता, पिण्याचे पाणी, आहार, व्यसनाधिनता, कुटूंबनियोजन व स्त्रियांचे बाळंतपणाचे ठिकाण हे घटक अभ्यासले आहेत. त्यात बऱ्याच प्रमाणात उणीवा दिसून आल्या आहेत. येथील झोपडपट्टीवासीयांच्या आजारांमध्ये ताप, खोकला, जुलाब, त्वचारोग, दातांचे विकार, हे अल्पकालीन आजार दिसून आलेत. तर दमा, क्षयरोग, मधुमेह, कॅन्सर, हृदयरोग हे दिर्घकालीन आजारही दिसून आले आहेत. झोपडपट्टीतील भौतिक पर्यावरणात कच्च्या व निम कच्च्या घरांचे प्रमाण ८० टक्क्यांपेक्षा अधिक आढळले. घरातील दोन खोल्यांची संख्या अधिक दिसली पण हि घरे फक्त निवारा असल्यासारखी आहेत. स्वयंपाकासाठी चुलीचा वापर ८५% लोक करतात. येथील घरांना खिडक्या नाहीत. घरे बांधण्यासाठी बांबूच्या तट्यांचा, प्लॅस्टिक कागद तसेच पत्र्यांचा वापर केलेला आहे. घरांना खिडक्या नसल्यामुळे घरामध्ये शुद्ध मोकळी हवा येत नाही. तसेच अधिकतर घरांना विजेची सोय नाही. दिव्यासाठी रॉकेलचा वापर केला जातो. तसेच सर्वच झोपडपट्टीवासीय सार्वजनिक शौचालयांचा वापर करतात. म्हणजेच स्वत:चे घरगुती शौचालये नाहीत. सार्वजनिक शौचालये महानगरपालिकेने बांधलेली असून ती जूनी झाली असल्याचे दिसून आले आहे. महापालिकेकडून येथील शौचालयांची नियमित स्वच्छता केली जात नाही. बरेच लोक शौचालयांभोवती बाहेर उघड्यावर शौचास बसल्याचे दिसले आहे. वरील संशोधनपेपरमध्ये झोपडपट्टीवासीयांच्या वैयक्तिक व सार्वजनिक आरोग्याबाबतचा अभ्यास केला आहे.

भारतातील दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, हैदराबाद, तिरुपती, पुणे इ. शहरांमधील झालेल्या अभ्यासांमधून झोपडपट्टीवासीयांची आरोग्याची पातळी व भौतिक पर्यावरण खूप मोठ्या प्रमाणात ढासळलेले दिसून आले आहे. शहरांमधील झोपडपट्टीवासीयांची लोकसंख्या सातत्याने वाढत गेली आहे. यात स्थलांतरीत लोकसंख्येचाही समावेश होत राहतो. म्हणून सातत्याने शहरांमध्ये आहे त्या झोपडपट्ट्यांवर लोकसंख्येचा भार वाढत राहतो. यामुळेही पर्यावरण, सार्वजनिक सोयी सुविधांवरील ताण वाढतो. येथील लोकसंख्येच्या प्रमाणात घरांची व आरोग्याच्या सुविधांची वाढ होत नाही. नदी किनारी, रस्त्याच्या कडेला असणाऱ्या व झोपडपट्ट्यांमध्ये सार्वजनिक शौचालयांची सुविधा नसणाऱ्या लोकांना उघड्यावर शौचालयाला बसावे लागते. सार्वजनिक शौचालयांच्या ठिकाणी अतिरिक्त लोकसंख्या असल्यामुळे लोक रांगेत उभे राहतात. म्हणून येथील अस्वच्छ पर्यावरणामुळे झोपडपट्टीवासीयांमध्ये विविध आजारांचे प्रमाण जास्त दिसून येते.'[६]

'मुंबईमध्ये १९५९ मान्यताप्राप्त झोपडपट्ट्या आहेत व येथील झोपडपट्ट्यांमधील आरोग्यासाठी घ्यावयाच्या खबरदारीचा पुर्ण अभाव आहे. तर ११५ झोपडपट्ट्यांमधील घरे ही तात्पुरत्या स्वरुपाची होती.

पाण्यासाठी सार्वजनिक नळाचा वापर ४९ टक्के लोक करत होते. तर ७३ टक्के झोपडीधारक हे सार्वजनिक शौचालयांचा वापर करत होते. २८ टक्के लोक उघड्यावर शौचास बसत होते. अशीच परिस्थिती इतर शहरांमधील दिसून आली आहे. अहमदाबादमध्ये कारखान्यांजवळ असणाऱ्या झोपडपट्टीवासीयांना प्रदूषित हवा व कचऱ्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाला बळी पडावे लागते. कोलकात्यामध्ये बांगलादेशामधून स्थलांतरीत झालेले लोक आहेत. येथील झोपडपट्टीवासीयांमध्ये ७० ते ८० टक्के लोक दारिद्र्य रेषेखालील जीवन जगतात. बहुतांश लोक कचरा गोळा करुन जीवन जगतात. पर्यावरणीय प्रदूषणाने येथे हिपॅटायटिस, टायफाईड व रेबीज या आजारांनी मृत्यू होणाऱ्या लोकांचे प्रमाण जास्त होते. त्वचारोग व किडनीचेच आजारांचे प्रमाणही अधिक होते. दिल्लीमध्ये प्रत्येकी सहा व्यक्तींमागे एक व्यक्ती झोपडपट्टीत राहते. या झोपड्यांची रचना तात्पुरत्या स्वरुपाची असून त्या प्लास्टिक कागद, फुटलेले पत्रे, पोती, कचऱ्यातील वस्तुंपासून बनवलेल्या आहेत. या झोपडपट्ट्यांमध्ये पुर्णपणे मुलभूत सोयीसुविधांचा अभाव आहे. दारिद्र्य, व्यसन व प्रदूषण या घटकांचा परिणाम येथील लोकांच्या आरोग्यावर झाला आहे. तिरुपती हे भारतातील देवस्थानचे ठिकाण आहे. येथे ४२ झोपडपट्ट्या आहेत. येथे अतिगर्दी, अस्वच्छ पर्यावरण व सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था नसणे यामुळे डासांचे प्रमाण वाढून येथील लोकांच्या आरोग्याची स्थिती बिघडलेली आहे. तसेच पुणे शहरात ५०३ झोपडपट्ट्या आहेत. यात ३५३ घोषित व १५० अघोषित झोपडपट्ट्या आहेत. येथील झोपडपट्ट्यांमध्ये अतिगर्दी, अपुरा सुर्यप्रकाश, शुद्ध हवेचा अभाव दिसून आला आहे.'[१३]

'केंद्र सरकारने ३ डिसेंबर २००५ रोजी शहरातील गरीब नागरीकांना मुलभूत सुविधा देण्यासाठी बेसिक सर्व्हिसेस टू अर्बन पुवर ही योजना सुरु केली व राज्य सरकारने ही योजना अंमलात आणली आहे. या योजनेखाली बांधण्यात येणारी घरे गरीबांना परवडणारी आहेत. एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम, वाल्मिकी आंबेडकर आवास योजना तसेच झोपडपट्टी पुनर्विकास योजना तर ग्रामीण भागासाठी इंदिरा आवास योजना, राजीव गांधी ग्रामीण निवास योजना इ. योजना महाराष्ट्र शासन राबवत आहे.'[१४]

'स्वच्छ पिण्याचे पाणी आणि सुधारीत स्वच्छता हे गरीबी कमी करण्यासाठी महत्वाचे घटक असून त्यामुळे सर्व मानवी हक्कांची परिपुर्ती होण्यास मदत होते व मानव विकास निर्देशांकही वाढतो असे संयुक्त राष्ट्रसंघाने स्पष्ट केले आहे. शहरी स्वच्छतेची धोरणे आणि योजना स्पष्ट करताना केंद्र सरकारच्या पातळीवरील विविध योजनांचा आढावा घेतला आहे. वाढत्या झोपडपट्ट्यांच्या लोकसंख्येमुळे पाणी आणि स्वच्छता या

मुलभूत सुविधांवर अधिक ताण पडतो म्हणून स्वच्छतेच्या उपायांमध्ये शौचालये हा केवळ एक भाग आहे म्हणून मलनि:स्सारण, सांडपाणी आणि घन कचरा व्यवस्थापन करण्यात शहरी यंत्रणांनी महत्वाची भूमिका बजावणे गरजेचे आहे. स्वच्छतेच्या अधिकारांसाठी एक व्यापक आणि शाश्वत अशी चळवळ उभी राहणे गरजेचे आहे. झोपडपट्ट्यांमध्ये जमीन धारणेबाबतचे हक्क, रोजगाराचे पर्याय, शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा यासारख्या व्यापक समस्यांचे निवारण करणे, स्वच्छतेची धोरणे आणि योजना यांना पुरेसे आर्थिक पाठबळ देणे, राज्यांच्या आणि महापालिका प्रशासनाच्या पातळीवर मजबूत राजकीय इच्छाशक्ती निर्माण करणे, त्याशिवाय स्वच्छता योजना प्रभावी ठरु शकणार नाही.'[१५]

'तुलनात्मक सर्व्हेक्षणांद्वारे मुंबईतील कच्च्या झोपडपट्टीतील मुलं व स्त्रियांमधील कुपोषणाची तीव्रता आदिवासी क्षेत्रापेक्षाही अधिक असल्याचे सिद्ध झाले आहे. त्यासाठी मुंबईतील झोपडपट्टीतील १००५ कुटूंबांचा अभ्यास करण्यात आला व ५ वर्षांखालील मुलांचे वजन, वय व उंची यांची तुलना केली तर आदिवासी व शहरी भागात मुलींच्या कुपोषणात विशेष फरक आढळला नाही. पण आदिवासी मुलांपेक्षा शहरी भागातील मुलांमध्ये खुजेपणाचे प्रमाण जास्त आढळले व कुपोषणाची तीव्रताही शहरी भागातील मुलांमध्ये तीव्र दिसली. शहरी झोपडपट्ट्यांतील स्त्रियांच्या पोषणाची स्थिती अल्प भूधारक वा भूमिहीन आदिवासी स्त्रियांपेक्षाही बिकट असून पुरुषांची पोषणस्थितीही ग्रामीण भागापेक्षा खालावलेली आहे. म्हणजेच कुपोषणाची समस्या फक्त आदिवासी भागात व तेथील मुलांपुरती मर्यादित नसून शहरी भागात झोपडपट्टीतील महिला व पुरुषांमध्ये अधिक आहे. शहरी कुपोषणाच्या कारणांमध्ये दारिद्र्य, मुलभूत सोयींचा अभाव, अपुरे स्तनपान, आरोग्य निगराणीतील अडचणी यांचा उल्लेख केला आहे. कुपोषण ही सार्वत्रिक व गंभीर समस्या आहे. शासकीय यंत्रणेने मुंबईत कुपोषणाच्या केसेस आढळल्यावर देखील त्यांची दखल घेतली नाही. याबद्दल खेद व्यक्त करण्यात आला आहे. जागतिकीकरणातून उद्‌भवणाऱ्या संधीचा फायदा कुपोषणामुळे अकुशल व अशक्त वर्गाला मिळणार नाही. म्हणून कुपोषण समस्येवर वेळीच उपाय व्हावेत, कुपोषण एक वैद्यकीय बाब नसून तिचे सामाजिक व आर्थिक संदर्भ अधिक महत्वाचे मानले आहेत.'[१६]

'धारावीचे क्षेत्र हे २१४ हेक्टर असून ७० हेक्टर क्षेत्रात प्लॉट विकसित झालेले आहेत व १४४ हेक्टर क्षेत्रात मशाल ह्या संघटनेने केलेल्या पाहणीनुसार ६७००० कुटूंबे राहतात. धारावी हे एक अत्यंत उद्यमशील, समृद्धी सन्मुख ठिकाण आहे. परंतु येथील परिसर अत्यंत गलिच्छ, अमानवी, अनारोग्यकारक असा आहे. म्हणून या ठिकाणाचे पुननिर्माण करण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे. येथील उद्योग हे कसल्याही

मदतीशिवाय उभे राहिले आहेत. परंतु येथील जनसमुहाला ग्रासणाऱ्या समस्या म्हणजे सांडपाणी वाहून नेण्याची सोय नसणे, स्वच्छ पाण्याचा अभाव, उघडी गटारे आणि त्यामुळे होणारे प्रदूषण शासकीय दुर्लक्षामुळे निर्माण झाले आहे. म्हणून धारावीच्या रहिवाशांचे हित हा पुनर्वसनाचा केंद्रबिंदू असला पाहिजे.'[१७]

'सफाई कामगारांना समाजाकडून मानसन्मान व शासनाकडून न्याय्य मिळण्याची आशा व्यक्त केली आहे. सफाई कामगार हा शहरातील गटारी साफ करतो. जो कचरा फेकून दिलेला असतो त्यामध्ये मेलेली कुत्री, घुशी, शरीरातून कापून टाकलेले अवयव असतात. गटारीमध्ये उतरल्यामुळे या कामगारांना अनेक आजारांना सामोरे जावे लागते व त्यांचे सरासरी वय ४५ ते ५० इतकेच असते. वेतनातील ३०% पैसा हा औषधे व दवाखान्यासाठी खर्च होतो. दरवर्षी देशभरात सुमारे २५,००० सफाई कर्मचाऱ्यांचे बळी जात असतात. त्यांचे घर म्हणजे १०० ते २५० चौरस फुटी जागा असते. चाळ असो वा झोपडपट्टी पिण्याचे पाणी व शौचालय म्हणजे युद्धप्रसंग असतो. मुली व महिलांचे जीवघेणे हाल असतात. स्वस्त धान्य, केरोसीन, गॅस मिळण्याची मारामार असते. घरात पुरुष नसणाऱ्या मुली व महिलांचे आयुष्य म्हणजे निव्वळ शोषण असते. भारतामधील जगण्याची श्रीमंत शैली ही आर्थिक परिस्थितीमुळे नसून उपलब्ध असणाऱ्या स्वस्त मजुरांमुळे आहे. भारतीय श्रीमंत व मध्यमवर्गीय लोकांची कष्ट करणाऱ्यांविषयी उदासिनता आहे.'[१८]

राजकीय घटक :-

झोपडपट्ट्यांची निर्मिती आणि शहरीकरण यांच्या घनिष्ठ सहसंबंध आहे. राजकीय पक्ष झोपडपट्टी कायदेशीर करण्यासाठी मुलभूत सुविधा पुरवितात व त्या बदल्यात निवडणुकीत झोपडपट्टीवासीय मतदान करतात. झोपडपट्टी समुहाचे नेतृत्व करणाऱ्याची भूमिका महत्वाची असते. त्याबरोबर जात, धर्म, नातेसंबंध याआधारे झोपडपट्टीतील समूहाचा नेता निवडला जातो. अधिक शिक्षण असणाऱ्या व्यक्तीला समूहाचा नेता होण्यास अधिक संधी असते. येथे समूहाचा नेता व राजकीय पक्षाचे कार्यकर्ते मध्यस्थ म्हणून काम करतात. झोपडपट्टी सुधारणा करण्यासाठी महानगरपालिका किंवा राज्य स्तरावरील राजकीय नेते किंवा त्यांचे प्रतिनिधी हे झोपडपट्टी सुधारणा करण्यासाठी झोपडपट्टी कायदा व नियम तयार करतात. यात भारतातील विविध ठिकाणांवरील राजकीय पक्ष सक्रीय असतात.

'भारतातील विविध राज्यांमध्ये प्रत्येक राज्याचा झोपडपट्टीचा वाटा आहे व यात अधिकृत झोपडपट्ट्यांची संख्या जास्त आहे. मुलभूत सोयीसुविधा मिळविण्यात राजकीय हितसंबंध हा मोठा घटक आहे. याचा

आधार राजकीय अर्थशास्त्र आहे. २००४ -२००५ च्या झोपडपट्टी सर्वेक्षणात झोपडपट्टीवासीयांमध्ये राजकीय हितसंबंध दिसून आले आहेत. यात मुलभूत सोयीसुविधा मिळवून देण्याबरोबर जागेचा प्रश्नही सोडविला जातो. म्हणजे राजकीय संबंधातून सामाजिक संबंधाचे जाळे तयार केले जाते. त्याबरोबर स्वत: राजकीय व्यक्ती झोपडपट्टीवासीयांच्या सोयीसुविधांसाठी देणगी देत असते. राजकीय मार्गाने झोपडपट्टीमध्ये प्रवेश करणे हि सार्वत्रिक स्वरुपाची व्युहरचना असते व झोपडपट्टीवासीयांच्या असुरक्षिततेचा फायदा मतदानासाठी करुन घेतला जात असतो.

राजकीय पक्ष प्रथमत: स्थलांतरीतांनी शहरातील सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण केले आहे व या झोपडपट्ट्या अतिक्रमित व सार्वजनिक जागेत असून त्या उठविण्याची आत्यंतिक आवश्यकता आहे अशा निर्णयाप्रत येतात व येथे पुरविण्यात येणाऱ्या मुलभूत सोयीसुविधांचा शहरांवर ताण पडतो आहे असे वातावरण तयार करतात. यातून झोपडपट्टी उठविण्याचा मुद्दा तयार करुन झोपडपट्टीतील लोकांशी समझोता करुन मोठ्या प्रमाणात मतदानासाठी झोपडपट्टीवासीयांचा पाठिंबा मिळवितात. यासाठी राजकीय कार्यकर्ते झोपडपट्टीतील प्रमुख नेत्यांशी बोलणी करतात व झोपडपट्टीतील मुलभूत सोयीसुविधा पुरविणे, झोपडपट्टीला शासकीय मान्यता मिळवून देणे याप्रकरणी आश्वासने दिली जातात. यासाठी तात्पुरत्या स्वरुपात झोपडपट्टीवासीयांना महानगरपालिकेचे ओळखपत्र, मतदान कार्ड, रेशनकार्ड देवून त्यांना शहरवासीयांचा कायदेशीर पुरावा देणे व सार्वजनिक वितरण व्यवस्थेत सहभागी करुन घेण्यासाठी मदत केली जाते. निवडणुकीच्या वेळी राजकीय पक्ष झोपडपट्ट्यांमध्ये शासकीय निधी खर्च करुन पाण्याची सार्वजनिक व्यवस्था, सांडपाणी व्यवस्था रस्त्यांची बांधणी, मलनि:स्सारण व्यवस्था या तात्पुरत्या स्वरुपात केल्या जातात. निधी दिला नाही तर भविष्यात लवकरच या व्यवस्था करुन दिल्या जाण्याचा प्रयत्न केला जातो. इतर आशियायी देशांमध्ये राजकीय संबंधाची उपयुक्तता भारतापेक्षा कमी आहे. झोपडपट्टी आणि राजकीय संबंधाच्या पैलूत राजकीय संबंधांची भूमिका आणि तार्किक धोरणे हि या संबंधाशिवाय अधिक सुसंगत असतात.'[१९]

'जयपूर शहरात २११ झोपडपट्ट्या असून त्यांना कच्ची बस्ती असे म्हणतात. येथील झोपडपट्ट्यांमध्ये नेता असणाऱ्या व्यक्तींच्या नेतृत्वासंबंधीचा अभ्यास केला आहे. नेतृत्वाबाबत ८ झोपडपट्ट्यांमधून २५७ कुटूंबाकडून माहिती मिळवली त्यासाठी प्रश्नावली व गुणात्मक चर्चेचा उपयोग करण्यात आला. नेतृत्वासंबंधीच्या माहितीचे विश्लेषण करुन तक्ते केले आहेत. एका झोपडपट्टीत एकापेक्षा अधिक नेते होते. ८ झोपडपट्ट्यांमधून

३८ नेत्यांचा अभ्यास करण्यात आला. चार नेते हे झोपडपट्टीच्या बाहेर राहत होते. संशोधन निष्कर्षामध्ये या नेत्यांकडून झोपडपट्ट्यांची वाढ करणे. आपल्या व्यवसायात काम करणाऱ्या कामगारांनाच जागा उपलब्ध करुन देणे. यात ठेकेदार असणारेच लोक नेते झालेत. तसेच राजकीय नेत्यांशी छुपा संबंध असून मतदानासाठी झोपडपट्ट्यांचा उपयोग करण्यात येतो. झोपडपट्टीत पाणी, लाईट, रस्ते, सांडपाण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याचा फायदा या नेत्यांना होतो. झोपडपट्टीत कोणत्या जाती, धर्माचे लोक जास्त प्रमाणात राहतात त्यानुसार आपल्याच जाती, धर्मातील व्यक्तीची नेता म्हणून निवड करतात. राजकीय पार्टीशी संबंध, आर्थिक दर्जा, मदत करण्याचा दृष्टीकोन, रोजगार मिळवून देणे, झोपडपट्टीचे प्रश्न सोडविण्यासाठीचे प्रयत्न या आधारे नेत्याची निवड केली जाते. झोपडपट्टीतील नेते उत्पन्नाचे साधन म्हणून झोपडपट्टीतील लोकांकडून विविध सेवा सुविधांच्या मोबदल्यात पैसे घेतात. सर्वच झोपडपट्ट्यांमध्ये सर्व नेत्यांना मान्यता मिळत नाही. येथील व्यक्तींचे आर्थिक - सामाजिक व राजकीय शोषण नेत्यांकडून केले जाते.'[२०]

धारावी झोपडपट्टीतील उद्योग व सामाजिक समस्या :-

'कातडी उद्योग हा धारावीतील महत्वाचा व्यवसाय आहे. जनावरांची कातडी कमावणे व त्यापासून चपला, बुट व इतर वस्तूंची निर्मिती करण्याची प्रक्रिया केली जाते. मातीची भांडी तयार करणारा कुंभारवाडा, मासेमारीचा व्यवसाय करणारा कोळीवाडा व कपडे धुणारा धोबीघाट हे उद्योग आहेत. तसेच अन्न प्रक्रिया उद्योग व वस्तूंवरील पुर्नप्रक्रिया उद्योग चालवले जातात. अनौपचारीक स्वरुपातील असंघटीत क्षेत्रातील उद्योग येथे चालवले जातात. म्हणजेच धारावी हे उद्योगांसाठीचे महत्वाचे ठिकाण आहे. कुटूंबातील व्यक्तीच येथे उद्योगाच्या सेवा पुरवतात. विविध प्रकारचे कपडे शिवले जातात व ते स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय बाजारात विकले जातात. झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत बांद्रा - सायन लिंक रोड शेजारी नवीन शांती को-ऑपरेटिव्ह सोसायटी बांधण्यात आली आहे. धारावीतील सल्म रिहॅबिलीटेशन डेव्हलपमेंट सेक्टर निर्माण करुन धारावी पुनर्विकास योजना राबविण्यात येत आहे. धारावी हे मुंबईतील गुन्हेगारांचे लपण्याचे ठिकाण व छुप्या स्वरुपाचे आर्थिक व्यवसायाचे ठिकाण म्हणूनही ओळखले जाते.'[२१]

'धारावीतील असंघटीत चर्मोद्योगाच्या स्थित्यंतराचा अभ्यास केला असता १७ व्या शतकापासूनचा धारावीचा विकास होत गेलेला आहे. धारावीतील छोट्याशा गावामध्ये आदमजी पीरभॉय यांनी एक चर्मालय सुरु केले व १८९० मध्ये एक सर्वात मोठे चर्मालय म्हणून उदयास आले. येथील चामड्याच्या

उत्पादनांची निर्यात युरोप व आफ्रिकेत केली जात असे. चर्मालय येथे सुरु होण्याचे कारण म्हणजे जवळच असलेला कत्तलखाना होय. या चर्मालयामध्ये एक हजार लोक काम करत असत. तमीळ असणारे कामगारांनी आपली चर्मालये सुरु केली. नंतर कसाई असणाऱ्या लोकांनी येथील चर्मालये ताब्यात घेतली. कारण तेच कच्चा माल पुरवत असत. १९ व्या शतकात कोळी, तामिळ व कामाठी लोक हे समूह राहत होते. याच काळात कमावलेल्या चामड्याचा व्यवसाय सुरु झाला व इतर समूह, व्यवसाय स्थापन होण्यास सुरुवात झाली. मराठी व कन्नड भाषा बोलणारे चांभार येथे स्थलांतरीत झाले. तसेच उत्तरप्रदेश व बिहारमधून येणारे समूह राहू लागले व त्यांनी सुटकेस बनवण्याचे काम केले. त्याबरोबर गुजराती, मुस्लिम, ख्रिश्चन असे विविध समुह येथे वास्तव्यास आले. म्हणून धारावीत वेगवेगळ्या जाती समूह व धर्माची लोक आहेत. यातील बरेच लोक हे चर्मोद्योगावर अवलंबून होते. येथे ढोरवाडा असून हे लोक चर्मालयात काम करतात. दळणवळणाची साधने उपलब्ध असल्यामुळे धारावी हे महत्वाचे ठिकाण मानले जाते.

एकूण धारावीची स्थिती पाहता बऱ्याच गोष्टींचा अभाव दिसून येतो. पाण्याची कमतरता, कोंदट वातावरण, मुलभूत सुविधांचा अभाव, झोपडपट्टीतले बकाल जीवन अशा अनेक गोष्टी धारावीत दिसून येतात. याचा परिणाम येथील उद्योगांवर झालेला दिसून येतो. येथील कामगारांची स्थिती चांगली नव्हती पण तरीही मोठ्या प्रमाणात येथे कामासाठी लोक स्थलांतर करत. चर्मोद्योगात काम करणाऱ्या कामगारांचे आरोग्य धोक्यात येत असल्यामुळे येथील मृत्यूचे प्रमाणही अधिक होते. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून स्थलांतरीत झालेल्या आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या व अनुसूचित जाती, जमातीतील लोकांसाठी धारावी हे एक प्रकारचे आरक्षित क्षेत्र तयार झाले. महाराष्ट्रातील चर्मोद्योगाशी संबंधित असणाऱ्या जाती येथे आपले पारंपारीक व्यवसाय करत आहेत. पुरेसे तंत्रज्ञान व भांडवल नसल्यामुळे येथील लोकांचे व्यवसाय मागे पडत आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पादनामुळे येथील उद्योग धोक्यात आले आहेत. येथे प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण मोठे आहे. पण उच्च शिक्षणाचे प्रमाण फारसे दिसून येत नाही. बौद्ध व चर्मकार समाजात शिक्षणाचे प्रमाण अधिक आहे. येथे ढोर समाज हा आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम आहे.'[२२]

शहरीकरणाच्या प्रक्रियेत शहरांच्या विकासाबरोबर अनेक समस्या निर्माण होत असतात. एखादे शहर नवीन उदयाला येत असेल तर तेथे गुन्हेगारी, झोपडपट्ट्या, गरिबी यांचे प्रमाण वाढते. शहराची वाढ होताना नवीन उपनगरे तयार होत असतात. तेथे रस्ते, वीज, पाणी, सांडपाणी व्यवस्था, पथदीप व हे सर्व करण्यासाठी मनुष्यबळाची गरज असते, असे मनुष्यबळ शारीरिक कष्ट करणारे मजूर असतात. कधीकधी जास्त पैसे देऊन

गरजू लोकांना काही तात्पुरत्या कालावधीसाठी आणले जाते व ही संख्या शहरभर वाढत जाते व त्यांना राहण्यासाठी शहरात जिथे मोकळी जागा असेल मग ती खासगी, सरकारी किंवा महानगरपालिकेची असेल अशा ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपात झोपड्या बांधल्या जातात व तेथे सुरुवातीला पाणी, वीज दिले जाते, ही संख्या रोजगारासाठी आलेल्या मजुरांची वाढत गेली की त्याला राजकीय पुढाऱ्यांकडून निवडणुकीच्यावेळी मान्यता घेऊन काही निधी दिला जातो व काही कालावधीनंतर स्वच्छतागृह सार्वजनिक स्वरूपात बांधणे, पाण्याचे नळ सार्वजनिक देणे, वीज देणे, रस्ते बांधणे, सांडपाणी व्यवस्था म्हणजे उघड्या गटारी बांधणे या सोयी पुरविल्या जात असल्या तरी घरांसाठीचा निधी स्वातंत्र्यानंतर जवळपास १९९० नंतर थोड्याफार स्वरूपात देण्यात येऊ लागला.

शहरी गरिबांसाठी जवाहरलाल नेहरू नागरी पुनरूत्थान योजना २००५ मध्ये सुरू केली म्हणजे स्वातंत्र्यानंतर शहरी गरिबांसाठी शासनाला सक्षम योजना राबविण्यासाठी ५५ वर्ष लागलीत, तोपर्यंत सर्वच शहरांमध्ये झोपडपट्ट्यांना शासकीय मान्यता देत राहण्यातच धन्यता मानण्यात आली. प्रत्येक वेळी काही अनधिकृत कच्च्या झोपडपट्ट्यांना मान्यता देत राहणे, मोठ्या प्रमाणात अनाधिकृत झोपडपट्ट्या हटविण्याचा कार्यक्रम शासनाने राबविला, यावरून असे दिसते की, ग्रामीण भागासाठी इंदिरा आवास योजना, राजीव गांधी आवास योजना राबविण्यात आल्यात, पण शहरातील झोपडपट्ट्यांतील गरिबांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याचे दिसते. २००१ पासून शहरातील अधिकृत व अनधिकृत अशा सर्वच झोपडपट्ट्यांची जनगणना करण्यात आली. भारतात तोपर्यंत प्रत्येक शहरामध्ये, तालुक्याच्या ठिकाणी अशा झोपडपट्ट्या मोठ्या प्रमाणात तयार झालेल्या होत्या. या एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या प्राथमिक गरजांकडे, त्यांच्या राहण्याच्या सुविधेकडे शासनाला लक्ष देणे भाग पडले. या झोपडपट्टीतील मतदारांमुळे लोकप्रतिनिधी निवडण्याच्या प्रक्रियेवर प्रभाव पडला आहे. मुंबई, दिल्ली, कोलकाता, चेन्नई अशा महानगरांमध्ये एकच झोपडपट्टी काही किलोमीटरपर्यंत पसरलेली दिसते. यात रेल्वेच्या कडेला सरकारी जागांवर, नदी किनारी, खासगी जागांवर झोपड्या उभारण्यात आल्यात. कारण स्थलांतरित रोजगारांसाठी शहरात आलेल्या मजुरांना झोपडपट्ट्यांतूनच आश्रय मिळाला आहे, म्हणून अशा झोपडपट्ट्यांवर शासकीय कारवाई न करता त्यांची मोजदाद करणे व त्यांच्यासाठी घरे व आवश्यक प्राथमिक सोयीसुविधा पुरविणे आवश्यक आहे. धान्य उपलब्ध करून देणे, कायमस्वरूपी रोजगार देणे, किमान वेतन देणे, काम मिळत नाही तोपर्यंत काही गरजेपुरती उदरनिर्वाह होईल, त्या कुटुंबाच्या सर्व गरजा भागतील एवढी रक्कम देणे आवश्यक होते, पण

त्याकडे पूर्णपणे गरीब व्यक्ती म्हणून, गरीब झोपडपट्टीतील समूह म्हणून दुर्लक्ष करण्यात आले, कारण हे मजूर सामाजिक, आर्थिक दृष्टीने मागासलेले, विविध जाती-उपजातीत, विविध धर्मात विभागलेले असल्यामुळे त्यांची सामूहिक शक्ती निर्माण झाली नाही. भारतातील भयानक अशी जातीप्रथा ही या गरीब लोकांचे कायम शोषण करणारी व्यवस्था ठरली आहे. दलित, अनुसूचित जाती, भटक्या विमुक्त जाती, इतर मागासवर्ग, अतिमागास वर्ग या जातीतील लोकांनी रोजगारांसाठी स्वत:ची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी शहरात स्थलांतर केले, पण त्याच्या वाट्याला झोपडपट्टीतील अस्वच्छता, दुर्गंधी, साथीचे आजार, बेरोजगारी, कायमचे शारीरिक कष्ट, राहण्याची जागा म्हणजे झोपडी असे जीवन वाट्याला आले. शासकीय दृष्टीने या जाती समूहांकडे दुर्लक्षित, उपेक्षित, मागासवर्गातील म्हणून बघितले गेले. जातीय श्रेष्ठ कनिष्ठतेचा आधार दिल्यामुळे स्वातंत्र्यानंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून स्वतंत्र योजना राबविल्या गेल्या नाहीत.

१९५६ चा झोपडपट्टी पुनर्वसन व सुधारणा कायदा करण्यात आला, पण राज्यांनुसार तो तेवढा सक्षमपणे राबविला नाही, यात केंद्र सरकारने झोपडपट्टी निर्मूलनासाठी भरीव निधी दिला नाही व झोपडपट्टी निर्मूलन होण्याऐवजी झोपडपट्ट्यांची संख्या शहरांबरोबर वाढत गेली. याला इतरही अनेक कारणे जबाबदार असली तरी शासकीय दुर्लक्षामुळे अनास्थेमुळे झोपडपट्ट्यांचा प्रश्न खूप मोठ्या प्रमाणात निर्माण होत गेला आहे, म्हणून झोपडपट्टी निर्मूलनासाठी थोडाफार निधी उपलब्ध करून देण्याऐवजी टप्प्याटप्प्याने येथील लोकांना घरे उपलब्ध करून देण्यावर भर २००५ नंतर देण्यात आला व त्यात सातत्य ठेवणे आवश्यक आहे व प्रत्येक व्यक्तीला आरोग्य, शिक्षण या प्राथमिक गरजा पूर्ण करता येतील. मानसन्मान, प्रतिष्ठा टिकविता येईल, यासाठी शासकीय पातळीवरून विविध योजनांची अंमलबजावणी होणे, पारदर्शकता येणे, लोकशाही प्रक्रियेवर येथील लोकांचा विश्वास बसणे आवश्यक आहे. भ्रष्टाचाराला आळा घालणे यासारख्या उपाययोजना करणे किती गरजेचे आहे हे झोपडपट्टी निर्मूलन समस्येवरून दिसते. दिवसेंदिवस शहरातील गरिबांच्या राहणीमानाची पातळी, जगण्याची पातळी उंचावण्याऐवजी खालावत चालली असल्याचे दिसते. अशा वर्गसमूहाला चांगल्या रोजगारांची निर्मिती शासनाकडून होणे आवश्यक आहे.

संदर्भ -

१. Henna Tabussum (2011), Slum in India, ABP Pub. Jaipur.

२. D. Sai (2022), Urban Slums and Poverty, Dph. New Delhi.

३. ग्रामीण नगरीय समाजशास्त्र, ओरियंट ब्लॅकस्वॉन, हैद्राबाद-२०१४

४. शरदचंद्र गोखले (१९८९), सामाजिक विकासाचे प्रश्न व धोरण, व्हीनस प्रकाशन, पुणे-३०.

५. डॉ. सुधीर बोधनकर व डॉ. साहेबराव चव्हाण, श्रम अर्थशास्त्र, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर

६. Shruti Desai (2014), Law Relating to Slums in Maharashtra, Snow White Pub. Mumbai

७. K Ranga Rao, M. S. A. Rao (1984), Cities and slums : A study of squatters settlement in the city of Vijaywada, Concept publishing company New Delhi.

८. झोपडपट्ट्यांचा प्रश्न विकासनीतीमध्ये बदल हवा प्रयास संसाधने व उपजिविका अभ्यास केंद्र, पुणे, नोव्हेंबर २००८

९. अतुल पेठे, कचराकोंडी माहितीपट

१०. Chodankar Smiti (2003), Urban poor women in Dharavi slum - A sociological & Communication study on income generating way and its impact on family life, YCMOU, Nashik (Ph.D. Thesis)

११. www.nuepa.org/Download/Publications/Occasional%20Paper-34schugh.pdf Date 11/11/2017

१२. https://www.scribd.com/document/57204086/kumar-kumar-anurag-3 Date 10/11/2017

१३. सतिश धनवडे (मार्च २०१८), विद्यावार्ता

१४. सतिश धनवडे (नोव्हेंबर २००७), योजना, भारतातील झोपडपट्ट्यांमधील पर्यावरण आणि मानवी आरोग्य.

१५. योजना (जानेवारी २०१५), विशेषांक.

१६. संजय रोडे व निरज हातेकर (जुलै -सप्टेंबर २००६), मुंबईतील गरीब कुपोषणाचे (अ) दृश्य बळी, समाजप्रबोधन पत्रिका.

१७. साधना (१९ जून २०१०)

१८. न्यायाच्या व सन्मानाच्या शोधात सफाई कामगारांची सांगितली न गेलेली कथा भारतीय महिला फेडरेशन, वितरण लोकवाङ्मयगृह प्रकाशन, साधना (१९ ऑक्टोबर २०१३)

१९. https://www.researchgate.net/publication/229745371_Slum_ Dwellers'_ Access_to_Basic_Amenities_The_Role_of_Political_ Contact_its_ Determinants_and_Adverse_Effects Date 11/11/2017

२०. https://www.researchgate.net /publication/314854321_ Leaders_ of_Slum _Dwellers_-_A_study_based_on_slums_of_Jaipur_city Date 11/11/2018

२१. Dharavi - From mega slum to urban paradigm marie caroline saglio yatzimirsky, Routledge pub. 2013, New Delhi

२२. संपादक, श्रृती तांबे (२०१६), वेध शहरांचा, सामाजिक अवकाश कल्पिते आणि धोरणे, डायमंड पब्लिकेशन पुणे.

२३. विनोद निरभवणे (२०२१), नाशिक शहरातील झोपडपट्टीवासियांचा समाजशास्त्रीय अभ्यास, (अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध) कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

प्रकरण - ३
संशोधन पद्धती

संशोधन पद्धतीचा अर्थ :-

संशोधन हि एक बौद्धिक प्रक्रिया आहे. कोणतेही संशोधन जेव्हा सामाजिक घटना किंवा ज्ञान यांच्या संबंधित असते तेव्हा त्याला सामाजिक संशोधन असे म्हणतात. सामाजिक घटना व समस्या बाबत नवीन ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून केलेल्या क्रमबद्ध संशोधनास सामाजिक संशोधन असे म्हणतात. गुणात्मक संशोधनात गृहितके महत्वाची नसतात. कारण आकडेवारी हि सत्य झाकून टाकते. सत्य घटना व समस्या या समाजशास्त्रात दाखविण्यासाठी कथा-कथन आवश्यक असते. यामुळे एका घटनेमागील गुंतागुंत संशोधनातून समोर येते. ज्यांच्यासाठी संशोधन करायचे आहे त्यांना या संशोधन समस्येत सहभागी करुन घेणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात संशोधन ठिकाणी जावून त्या परिस्थितीचा अनुभव घेणे, संवाद करणे, ओळख व भावनिक जिव्हाळा व प्रत्यक्ष समस्या जाणून घेऊन ती सोडविण्यासाठी संबंधितांचा सहभाग व त्याचे पर्याय काय असू शकतात हे शोधता येते. काल्पनिकतेच्या पातळीवरील संशोधन समस्येला प्रत्यक्षात आणण्यासाठी आपल्या अनुभव व भावनांची जोड असते. आपले स्वत:चे विचार त्यात असतात. म्हणून प्रत्यक्ष केलेले संशोधन हे समस्या सोडविण्यासाठी महत्वाचे असते. त्याला विविध पर्याय उपलब्ध होऊ शकतात. प्रत्यक्ष संशोधनकर्ता संशोधन समस्येच्या जवळ गेला तर निरिक्षणातून अनेक नवीन मुद्दे समोर येतात. ज्या व्यक्तीची किंवा कुटूंबाची व समूहाची माहिती घेत असतो तेव्हा इतर लोकांकडूनही त्यासंबंधी माहिती मिळवता येवून त्यातील सत्य पाहता येते. संशोधक आणि संशोधन विषय यातील नाते जवळचे असणे आवश्यक असते.

संशोधक हा ज्ञाननिर्मितीच्या करीत असतो. समाजशास्त्रीय कल्पना या आपल्या अनुभवाच्या आधारे कायम ज्ञानाधारीत काम करतात. सिद्धांत मांडणे व संकल्पना निर्माण करणे यांना निरिक्षण तंत्राची जोड असते. यातून सिद्धांत बांधणी होते. वास्तवाचे सापडलेले तुकडे जोडणे व शास्त्रीय संकल्पनांच्या भाषेत मांडून आणि त्या सार्वजनिक स्वरुपात मांडणे व त्यातून सिद्धांत निर्मिती करणे. हा संशोधनातील मुख्य हेतू असतो. प्रस्तुत संशोधनात नाशिक शहरातील झोपडपट्टीवासीयांचा समाजशास्त्रीय अभ्यास करताना मुलाखत अनुसूची, निरिक्षण पद्धती व चर्चा या संशोधन पद्धतींचा उपयोग करण्यात आला आहे.

मुलाखत अनुसूची :-

मुलाखत अनुसूची ही तथ्य संकलनाची प्रत्यक्ष पद्धती असून अनुसूची ही संक्षिप्त प्रश्नांची यादी असते. संशोधक ती स्वत: भरतो. यावेळी संशोधक व उत्तरदाता यांच्यात प्रत्यक्ष स्वरुपाचे संबंध असतात. मुलाखत अनुसूची प्रथमत: संशोधन विषयासंबंधी प्रश्न निश्चित केलेले असतात. मर्यादित संशोधन क्षेत्रात तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची उपयुक्त ठरते. तसेच अशिक्षित लोकांकडूनही तथ्य संकलीत करता येतात. प्रस्तुत संशोधनात मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आला आहे. मुलाखत अनुसूची हि कुटूंबातील स्त्रिया व कुटूंब प्रमुख पुरुषांकडून भरुन घेण्यात आली आहे. डिसेंबर २०१६ मध्ये नाशिक शहरातील विविध झोपडपट्ट्यांमधून मुलाखत अनूसूची भरुन घेण्यात आली. यावेळी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी झालेल्या नोटाबंदीचा परिणाम झालेला होता. अधिकांश लोकांचे रोजगार बुडाले होते व सर्वत्र भितीदायक व संशयास्पद वातावरण होते.

मुंबई शहरात कल्याण येथून चार झोपडपट्ट्यांतून मुलाखत अनुसूची मार्च-एप्रिल २०१७ मध्ये भरून घेण्यात आली. यावेळी झोपडपट्टीधारकांना विश्वासात घेऊन मुलाखत अनुसूची भरुन घेण्यात आल्यात. मुलाखत अनुसूची भरत असताना हळूहळू अनेक लोक एकत्र आल्यानंतर विविध प्रश्नांची त्यांनी उत्तरे दिली. सार्वजनिक स्वरुपाच्या समस्यांवर अधिक भर दिला जात होता. आरोग्य व स्वच्छता आणि घरांची उपलब्धता यावर अधिक भर या लोकांचा होता. अनौपचारीक स्वरुपात विविध प्रश्नांची माहिती घेण्यात आली. सर्वांना भेडसावणारे सर्वसामान्य स्वरुपाचे प्रश्न विचारण्यात आले. तसेच शेजारी राहणारे लोकही यात सहभागी होत असल्यामुळे मुलाखत अनुसूची प्रक्रियेत सहभागी होण्याचे प्रमाण वाढले होते. प्रत्येक व्यक्तीला आपल्या समस्या मांडण्याची संधी देण्यात आली. जेथे अधिक समस्या होत्या अशा लोकांचा झोपडपट्ट्यांची माहिती देणे व सार्वजनिक समस्यांवर चर्चा करण्यावर अधिक सहभाग होता. अंगणवाडीसेविका, स्थानिक कार्यकर्ते, आशा सेविका यांचा सहभाग घेण्यात आला. संशोधनातील उद्दिष्टांनुसार शिक्षण, रोजगार, आरोग्य, स्वच्छता, घरांची समस्या, सांडपाणी व्यवस्था, गुन्हेगारी, व्यसने व स्थानिक राजकीय सहभाग अशा घटकांवर संशोधनात्मक दृष्टीने मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून माहिती घेण्यात आली.

निरिक्षण पद्धती :-

सामाजिक संशोधनात निरिक्षण पद्धतीला महत्वाचे स्थान आहे. कारण संशोधकाला ज्या समुहाचे अध्ययन करावयाचे आहे त्यांचा एक भाग किंवा अंश म्हणून तो निरिक्षण करतो. संशोधनाची सुरुवात

निरिक्षणातून होत असते. यात संशोधक आपल्या क्षेत्रात संशोधन विषयाशी संबंधित घटना, व्यवहार, भोवतालची परिस्थिती याबाबत निरिक्षणातून माहिती मिळवत असतो. सदर संशोधन करताना सहभागी व असहभागी अशा दोन्ही निरिक्षण पद्धतींनी माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

चर्चा - संशोधकाने मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून तथ्य संकलीत केली आहे. कारण प्रत्येक माहिती प्रश्नोत्तराच्या माध्यमातून मिळालेली नाही. तर काही प्रश्नांची उत्तरे मिळवण्याकरीता चर्चेचे माध्यम उपयोगात आणले आहे.

नमूना निवड - ज्या पद्धतीत समुहांचे प्रतिनिधी सदस्य त्यांच्याकडून माहिती मिळवली जाते व ती माहिती संपुर्ण समुहांची आहे असे मानले जाते. त्या पद्धतीला नमूना निवड पद्धती असे म्हणतात. सामाजिक संशोधनात नमूना निवड पद्धतीचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो कारण सामाजिक संशोधन हे एवढे गुंतागुंतीचे असते की, यामध्ये समाजातील प्रत्येक घटकाचा अभ्यास करणे अशक्य असते आणि म्हणून समाजातील काही घटक नमूना म्हणून सामाजिक शास्त्रांमध्ये अभ्यासली जातात व या नमूना निवडीद्वारेच अभ्यासातील तथ्य संकलीत केले जातात. नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासीयांचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यासाठी साध्या यादृच्छिक नमूना निवड पद्धतीचा उपयोग केला आहे. नाशिक महानगरपालिकेच्या झोपडपट्टी सुधारणा विभागानुसार नाशिक शहरातील झोपडपट्ट्यांचे सहा विभाग करण्यात आले आहेत. झोपडपट्टीवासीयांची साध्या यादृच्छिक नमूना निवड पद्धतीचा उपयोग करुन नमूना निवड केली. संशोधनासाठी १० झोपडपट्ट्यांमधून १०० कुटुंबांची अभ्यासासाठी निवड केली आहे.

नाशिक व मुंबई शहरातील प्रत्येकी १०० कुटुंबांचा समाजशास्त्रीय दृष्टीने तुलनात्मक अभ्यास केला आहे. नाशिक शहरातील नाशिक पूर्व व नाशिक पश्चिम भागातील झोपडपट्ट्यातील कुटुंबाची निवड केली आहे. यात नानावली-१०, भगवतीनगर-१०, काझीची गढी-१०, आगरटाकळी-१०, आंबेडकरवाडी-१० तसेच पंचवटी विभागातील महात्मा फुलेनगर-१०, निलगिरीबाग-१०, दत्तनगर-१०, म्हसोबावाडी-१०, वैदूवाडी-१० या झोपडपट्ट्यातून मुलाखत अनुसूची भरून घेतली व कुटुंबप्रमुखांशी चर्चा केली आहे.

नाशिक शहरात महाराष्ट्रातील नाशिक, मुंबई, जळगाव, लातूर, उस्मानाबाद, औरंगाबाद, अहमदनगर, धुळे, परभणी, पुणे, बीड व जालना-१२ जिल्ह्यातील कुटुंबे राहतात व ही संख्या सर्वाधिक-८५ एवढी आहे. मुंबई शहरातील कल्याण महानगरपालिकेतील सूर्यानगर, चंदननगर, हनुमाननगर व उदयनगर या चार झोपडपट्टीतील प्रत्येकी २५ याप्रमाणे १०० कुटुंबाची निवड केली आहे. मुंबई शहरातील नाशिकमधील -

९, मध्य प्रदेश-२, बिहार-१, राजस्थान-२, आंध्र प्रदेश-१, ओडिसा-१, झारखंड-१, पंजाब-१ आणि उत्तर प्रदेशातील ८२ कुटुंबे आहेत. यात सर्वाधिक ८२ कुटुंबे उत्तर प्रदेशातील आहेत.

तथ्य संकलन :-

सर्वप्रथम हा अभ्यास करण्यासाठी व संकल्पना समजून घेण्यासाठी दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला आहे. ज्यामध्ये संदर्भग्रंथ, संशोधन पेपर, नियतकालिके व शासनाने वेळोवेळी प्रकाशित केलेले साहित्य उदा. योजना, लोकराज्य, वेगवेगळ्या समित्या व संस्थांचे अहवाल, मासिके, दैनिक वर्तमानपत्रे यामधील प्रसिद्ध झालेले लेख यांचाही आधार दुय्यम साधन म्हणून या प्रबंधासाठी घेतलेला आहे. तथ्यसंकलन केल्यानंतर निवडलेल्या नमुन्याचे वारंवारीता करुन तक्ते बनवले आहेत व टक्केवारी मांडली आहे. अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध इंटरनेटवरील प्रकाशित संशोधन पेपर, पुस्तके, लेख यांचा संदर्भ म्हणून वापर केला आहे. मुलाखत अनुसूचित जे प्रश्न विचारले होते या प्रश्नांना उत्तरदात्यांकडून जी माहिती मिळाली ती विखूरलेल्या स्वरुपात होती. या माहितीचे वर्गीकरण केले आहे. वर्गीकरण केल्यानंतर माहितीचे सांकेतिकीकरण करुन म्हणजेच अनुसूचीद्वारा प्राप्त झालेल्या उत्तरांना संख्या देण्यात आली आहे. प्रस्तृत संशोधनात उत्तरांना संख्येच्या स्वरुपात मांडून त्यांची टक्केवारी मांडली आहे.

झोपडपट्टीचा सिद्धांत :-

'रॉबर्ट के मर्टन यांनी सिद्धांत आणि तथ्यांमधील संतुलन साध्य करण्यासाठी मध्यम श्रेणीचा सिद्धांत मांडला आहे. सिद्धातांना प्रमाणित करण्यासाठी तथ्यांकडून समर्थन मिळविणे आवश्यक असते. तथ्य एक प्रकारे सिद्धांताशी संबंधित असते, म्हणून सिद्धांतांना तार्कीकतेच्या पातळीवर मांडण्यासाठी तथ्य महत्त्वाची असतात. शहरांच्या सामाजिक व्यवस्थेत झोपडपट्टी हे एक तथ्य आहे. शहरीकरण आणि झोपडपट्टी ही एक जुळी प्रक्रिया आहे. झोपडपट्टीच्या सिद्धांतांमुळे झोपडपट्टी ही प्रक्रिया समजण्यास सोपी आहे. विकसनशील देशांमध्ये विशेष करून भारतात शहरीकरणाबरोबर झोपडपट्ट्या वाढताना दिसतात. भारतात झोपडपट्टीच्या व्यापक आणि प्रचलित स्वरूपामुळे झोपडपट्टीबाबत सातत्यपूर्ण आणि व्यापक तपशील उपलब्ध नाही. झोपडपट्टी ही गरिबी आणि सामाजिक आर्थिक मागासलेपणाचा परिणाम आहे, म्हणून झोपडपट्टीला योग्य स्वरूपात समजण्यासाठी सैद्धांतिक दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. अठराव्या शतकापासून झोपडपट्टी हा शब्द प्रचलित झाला आहे. लोकसंख्येची घनता अधिक असलेल्या शहरांमध्ये नियोजनविरहित व प्राथमिक सोयी-सुविधांचा अभाव असणाऱ्या घरांचे वर्णन करण्यासाठी झोपडपट्टी हा शब्द वापरला गेला. झोपडपट्टी

म्हणजे गरिबीची जागा असे वर्णन केले आहे. झोपडपट्टीत राहणारे लोक शहरी भागातील अर्थव्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणावर योगदान देतात. युनायटेड स्टेटस्च्या एका अहवालात असे म्हटले आहे की, झोपडपट्ट्या अनियंत्रित आहेत. येथील रहिवासी विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे समायोजित नाहीत. सिली या अभ्यासकाने झोपडपट्टीतील लोकांबाबत आशावादी दृष्टिकोन मांडला आहे की, झोपडपट्टी फक्त डंपिंग ग्राऊंड नाहीत, तर शहरातील स्थिरता निर्माण करण्याचा मार्गदेखील आहे. झोपडपट्टीतील लोकसंख्या ही मागाणी केलेल्या वस्तू आणि सेवांचा पुरवठादार आहेत. झोपडपट्टी म्हणजे फक्त झोपून राहण्याची जागा किंवा विचार नसून शहराच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात व्यस्त असण्याचे ठिकाण आहे, म्हणून श्रीमंतांना त्यांच्या सेवांसाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ पुरविणारे ठिकाण झोपडपट्टी आहे. येथील लोक श्रीमंतांना आपल्या सेवा पुरवितात व स्वत: अंधारात आणि अस्वच्छ ठिकाणांवर राहतात. झोपडपट्ट्यांबाबत दोन दृष्टिकोन स्पष्ट होतात. एक म्हणजे झोपडपट्टीच्या जीवनाचे निराशावादी समर्थन करतो तर दुसरा दृष्टिकोन आशावादी आहे. शहरीकरणासाठी झोपडपट्टी आवश्यक असण्याबरोबर झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना स्वत:च्या विकासासाठी प्रयत्न करून स्वत:चे जीवनमान उंचावता येते व आपला दर्जा वाढविता येतो. विशेषत: भारतातील ग्रामीण भागातील जातीय बंधने झुगारून शहरांमध्ये स्थलांतर केलेल्या काही कुटुबांनी तसेच पुढील पिढ्यांमधील कुटुंब सदस्यांनी शिक्षण, कौशल्यातून आर्थिक प्रगती केली व स्वत:चे जीवनमान उंचावून झोपडपट्ट्यांतून बाहेर पडले आहेत. विविध सामाजिक शास्त्रज्ञांनी व अभ्यासकांनी झोपडपट्टीबाबत मांडलेली दृश्य म्हणजे दारिद्र्य, अस्वच्छता, रोगराई, गर्दी, जागेचा अभाव, समाजापासून असणारी अलिप्तता, गुन्हेगारी, हिंसाचार, व्यसने असणारे ठिकाण म्हटले आहे. शहरातील झोपडपट्ट्यांच्या वाढीबरोबर भारतात नियोजक, धोरण निर्माते आणि सामाजिक शास्त्रज्ञांचे लक्ष आकर्षित केले. झोपडपट्टीचा अभ्यास करताना बरीच गृहितके मांडली जातात. शहरांमध्ये असलेला घरांचा तुटवडा, अतिरिक्त लोकसंख्या व त्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे शहरांत झोपडपट्टीचा प्रश्न निर्माण होतो.'[१]

'झोपडपट्टीच्या एका सिद्धांतानुसार युनायटेड स्टेटस्मधील शहरांच्या अभ्यासानुसार झोपडपट्टीचा विकास हा शहराच्या ठिकाणी असलेल्या व्यवसायाबरोबर होत असतो. नवीन शहरांचा विकास होताना उच्च वर्गातील लोकांसाठी घरे बांधली जातात. येथे व्यापार व उद्योग उभे राहिल्यास एक प्रकारे उद्योगांचे जाळे तयार होते. तेव्हा ह्या उद्योगांच्या जवळ शहरांची निर्मिती होते. उद्योगांमध्ये कमी उत्पन्न व वेतन असलेले कामगार येथे वास्तव्य करतात. कमी उत्पन्न असल्यामुळे येथील लोकांना आपल्या घराची किंवा

इमारतीची चांगली देखभाल करता येत नाही. त्याचे कारण म्हणजे अतिरिक्त लोकसंख्या, जागेचे अतिक्रमण होत असते. झोपडपट्टी असलेल्या जागेवरील जमिनीची किंमत अधिक असली तरी येथील घरांचे मुल्य हे कमी होत असते व झोपडपट्टीच्या जवळ असलेल्या जागेची व घरांची किंमत देखील कमी होत असते. झोपडपट्टी सिद्धांतानुसार औद्योगिक ठिकाणे ही नदीकिनारी, पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणी आणि रेल्वेची सुविधा असलेल्या ठिकाणांजवळ विकसित होतात व कामगारांची वसाहत या ठिकाणी वसवली जाते. उद्योगांसाठी लागणारे मनुष्यबळ इतर ठिकाणांहून मागवले जाते व कमी उत्पन्न असणाऱ्या कामगारांसाठी शहराच्या एका बाजूला उद्योगांजवळ तात्पुरत्या स्वरुपातील वसाहत निर्माण केली जाते. म्हणजेच ज्याठिकाणी शहराच्या जवळ झोपडपट्टी असते तेथे केंद्रीभूत उद्योग व व्यवसायांचा विकास झालेला असतो.

युरोप व विकसित होणाऱ्या आशिया आणि जगातील इतर भागातील शहरांमध्ये मध्यवर्ती व्यवसाय व उद्योगांच्या ठिकाणी झोपडपट्ट्या तयार झाल्या आहेत. येथील घरे ही छोटी व एका खोलीची असण्याबरोबर कुटूंबातील सदस्यांची संख्या जास्त असते व येथील परिसर हा अधिक गरीबीला जन्म देतो. झोपडपट्ट्यांच्या विकासाच्या धोरणामध्ये शासकिय पातळीवरुन बदल होत गेले आहेत. विविध देशांनी झोपडपट्टी विकास योजना राबविल्या आहेत. इमारती बांधून घरांचे वाटप करणे. आशिया, आफ्रिका, लॅटीन अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातील लोक स्थलांतरीत झाली आहेत. अनधिकृत असणाऱ्या झोपडपट्ट्यांतील लोकांचे जीवनमान, आरोग्य, सांडपाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे यांचा दर्जा खालावलेला असतो.'[२]

३.१.७ संशोधन समस्या - झोपडपट्टीत बेरोजगारी अधिक असल्यामुळे अनेक प्रकारच्या समस्या निर्माण होतात. मानसिक ताणतणाव, कुटूंबातील संघर्ष यामुळे आत्महत्या होण्याचे प्रमाणही अधिक असते. किरकोळ आजारांमुळेही येथील लोक दगावतात. झोपडपट्टीतील अस्वच्छता, दुर्गंधी यामुळे साथीचे आजार सतत उद्‌भवतात. त्याची कारणे म्हणजे सार्वजनिक शौचालये व या शौचालयांवर अवलंबून असलेली अतिरिक्त लोकसंख्या, सांडपाण्याची व्यवस्था नसणे व गटारी उघड्या असणे. यामुळे मच्छरांचे प्रमाण वाढते. वेगवेगळ्या प्रकारचे किटाणूंमुळे थंडी, ताप, खोकला हे आजार लोकांमध्ये सातत्याने पसरत असतात. झोपड्यांची असलेली गर्दी, अतिशय लहान झोपड्या व कुटूंबातील व्यक्तींची जास्त संख्या असते. घरात खेळती हवा नसल्यामुळे कोंदट वातावरण तयार होते. याचा परिणाम अन्न पदार्थांवर होतो. एक किंवा दोन खोल्यांमध्येच स्वयंपाक, बाथरुम, घरातील आवश्यक असणारे साहित्य, कपडे, किराणा या जीवनावश्यक वस्तू असतात. झोपडपट्टीत राहिल्यामुळे व्यक्तींच्या आरोग्यावर, मानसिकतेवर व

कुटूंबाच्या सामाजिक प्रतिष्ठेवर परिणाम होत असतो.

कायमस्वरुपी मिळणाऱ्या रोजगाराअभावी येथील कुटूंबे आर्थिक विवंचनांना सामोरे जात असतात. रोजगार मिळाला तरी तो तात्पुरत्या स्वरुपाचा असतो. त्यातून मिळणारा रोजगारही अतिशय अल्प स्वरुपात असतो. शहरातील महागाईमुळे येथील कुटूंबांच्या आवश्यक गरजा पुर्ण होत नाही व या कुटूंबांचे कुपोषण होत राहते. म्हणून किरकोळ आजारांना येथील लोक चटकन बळी पडतात. निरक्षरता, गरीबी, रोजगाराचा अभाव, सरकारी नोकरीचा अभाव, उद्योग व्यवसायांचा अभाव अशा सर्व बाजूंनी येथील लोक समस्याग्रस्त असतात. यामुळे येथील लोक मानसिक दुर्बलता आल्यामुळे किंवा वैफल्यग्रस्ततेमुळे व्यसनांच्या आहारी जातात. तसेच किरकोळ कारणांमुळे व छोट्या छोट्या गरजा भागविण्यासाठी झगडावे लागते. यातून आपसात होणारी भांडणे, कुटूंबातील नवरा - बायकोचे भांडण यातून स्त्रियांना व लहान मुलांना मारहाण करण्याचे प्रकार घडतात. तरुण मुले गुन्हेगारी स्वरुपाच्या कृत्यांकडे वळतात व गुन्हेगारी टोळ्यांमध्ये सामील होतात. या मुलांचा उपयोग अवैध व्यवसाय करण्यासाठी केला जातो. तसेच स्त्रिया व मुली यांनाही विविध प्रकारची कामे करावी लागतात व ती तात्पुरत्या स्वरुपाची असतात. त्यातून मिळणारे उत्पन्न हे अतिशय किरकोळ स्वरुपाचे असते. लहान मुला-मुलींना शिक्षणाऐवजी शारिरीक कष्टाची कामे करावी लागतात. हॉटेल, दुकाने, कंपनीतील कामे, रस्त्यावर वस्तू विकणे यांसारखी मिळेल ती कामे आपल्या व कुटूंबाच्या गरजा भागविण्यासाठी करावी लागतात.

१९५६ च्या भारतीय कायद्यानुसार झोपडपट्टीचे ठिकाण कशास म्हणावे हे स्पष्ट केले आहे. मानवाला राहण्यास अयोग्य ठिकाण, अतिरिक्त लोकसंख्या, घरांची व इमारतींची चुकीची रचना, अरुंद रस्ते व चुकीचे नियोजन, मोकळ्या हवेचा अभाव, सांडपाण्याची चांगली व्यवस्था नसणे, आरोग्य, सुरक्षितता व नितिमुल्यांचा अभाव असणारे ठिकाण होय. भारतातील मुंबई, दिल्ली, अहमदाबाद, कोलकाता, चेन्नई, पुणे, नागपूर, नाशिक इ. मोठ्या शहरांमधील वाढती झोपडपट्ट्यांतील लोकसंख्या आणि त्यांचे शहरीकरणावर चांगले व वाईट परिणाम झाले आहे. झोपडपट्ट्यांचा वाढता आकार, अनौपचारीक क्षेत्रातील कामगारांच्या समस्या, सार्वजनिक सुविधांचा अभाव, दळणवळणांच्या साधनांचा अभाव, शौचालयाच्या सुविधांचा अभाव इ. अनके समस्या आहेत. अनाधिकृत झोपडपट्ट्या या हिंसा, गुन्हेगारी, गैरव्यवहार समाजविघातक गोष्टींचे आगार बनल्या आहेत. झोपडपट्टीतील नेते उत्पन्नाचे साधन म्हणून झोपडपट्टीतील लोकांकडून विविध सेवा सुविधांच्या मोबदल्यात पैसे घेतात. सर्वच झोपडपट्ट्यांमध्ये सर्व नेत्यांना मान्यता मिळत नाही. येथील

व्यक्तींचे सामाजिक, आर्थिक व राजकीय शोषण नेत्यांकडून केले जाते. झोपडपट्टीतील मुलांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये कुटूंबाची सामाजिक, आर्थिक व व्यावसायिक स्थिती, कुटूंबाचा आकार, झोपडपट्टीतील वातावरण, पालकांचे शिक्षण, शाळेचे अंतर इत्यादी घटक अडथळा ठरले आहेत. शाळेतील शिक्षकांची कर्मठ भूमिका, शिक्षकांचा मुलांच्या प्रमाणातील अभाव, मुलांची जास्त संख्या व इतर मुलभूत सोयीसुविधांचा अभाव, शाळेतील वातावरण, तसेच शिक्षणाचे माध्यम हे मुलांसाठी अडथळा ठरते. प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमधील मुलांच्या गळतीचे प्रमाण जास्त असते.

प्रस्तुत संशोधनात नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासीयांच्या समाजिक, आर्थिक, शिक्षण व आरोग्य व व्यसनाधिनता या समस्यांचा अभ्यास करण्यात आला असून त्यात पुढील घटकांचा समावेश करण्यात आला आहे. सामाजिक घटकामध्ये राहणीमानाचा दर्जा, जात, धर्म, विवाह, कुटूंब, स्त्री-पुरुष समानता, आर्थिक घटकामध्ये रोजगार संधी, उत्पन्न व व्यवसाय. आरोग्य घटकामध्ये स्वच्छतागृहांच्या सोयी, स्वच्छतेच्या सवयी, आरोग्य, आरोग्याच्या सोयीसुविधा, तसेच वीज, रस्ते व पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच शैक्षणिक घटकामध्ये मुलांचे शिक्षण, शिक्षणाचा दर्जा, शैक्षणिक सोयीसुविधा इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे.

संशोधनाचे महत्व -

झोपडपट्टीवासीयांचे राष्ट्र उभारणीतील योगदान हे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे महत्वाचे आहे. तसेच झोपडपट्टीवासीय हे समाजाचा असुरक्षित भाग आहेत. त्यांना विविध सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागते. झोपडपट्ट्या हे आधुनिक समाजाचे अपत्य आहे व शहराच्या विकासात झोपडपट्टीवासीयांचे योगदान अतिशय महत्वाचे आहे. म्हणून झोपडपट्टीधारकांच्या गरजांनुसार शासकिय धोरणे, नियोजन व झोपडपट्टी पुनर्वसन हे महत्वाचे आहे म्हणून येथील लोकांना मुलभूत सोयी सुविधा चांगल्या दर्जाच्या उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. झोपडपट्टीवासीयांना अनेक नकारात्मक सामाजिक परिणामांना सामोरे जावे लागते. यात अतिरिक्त लोकसंख्या, दारिद्र्य, गुन्हेगारी, प्रदूषण, कुपोषण, व्यसने, बेकारी, अपघात यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. प्रचंड आर्थिक व सामाजिक विषमता असल्यामुळे येथील लोकांचे जीवन हालाखीचे होऊन जाते. ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर हे झोपडपट्ट्यांतील लोकसंख्या वाढवत असते. या लोकांच्या स्थलांतराची कारणे जाणून घेणे त्यांच्या आर्थिक, सामाजिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे, झोपडपट्टीतील वास्तव्याची वर्ष व झोपडपट्टीतील मुलभूत सोयीसुविधा व निर्माण होणाऱ्या

समस्यांबद्दलची त्यांची मते जाणून घेणे व झोपडपट्टीतील वातावरणाचा या लोकांवर होणारा परिणाम अभ्यासणे हे संशोधन विषयाचे महत्व आहे. झोपडपट्टीत राहत असलेल्या कुटूंबांच्या जीवनमानाचा दर्जा अभ्यासणे अशा संशोधनातून येथील लोकांच्या प्रश्नांविषयीची जाणीव जागृती निर्माण होण्यास मदत होते व एक सामाजिक समस्या म्हणून शासन झोपडपट्टी विषयाकडे गांभीर्याने पाहते व त्यासाठी आवश्यक ती धोरणे राबवते. झोपडपट्टीतील लोकांसाठी रोजगार उपलब्ध करुन देणे, विविध कल्याणकारी योजना राबवणे, मोफत घरे देणे, आरोग्य, स्वच्छता, मुलांसाठी शिक्षण या सुविधा पुरवल्या जातात.

गुन्हेगारी, अवैध धंदे यावर नियंत्रण मिळवता येते व येथील लोकांचे जीवन सुखकर करण्यासाठी समाजाच्या मुख्य प्रवाहात आणता येते. झोपडपट्टीतील लोकांचा शहरातील विविध व्यवसाय व आर्थिक विकासात अनौपचारीक व्यवसायात महत्वाचा सहभाग असतो. त्याबरोबर येथील लोकांचा राजकीय सहभाग अभ्यासणेही महत्वाचे आहे. एक व्यापक प्रकारच्या जनजागृतीसाठी झोपडपट्टीवासीयांच्या विविध सामाजिक समस्यांचा अभ्यास करण्यासाठी हे संशोधन महत्वाचे आहे. कुटूंबांना फायदा झाला व त्याचे प्रमाण किती आहे? याचे संशोधन प्रत्यक्षात झोपडपट्टीधारकांकडून जाणून घेणे. ज्या झोपडपट्टीवासीयांना या योजनेचा लाभ मिळाला नसेल तर त्याची कारणे जाणून घेणे. यामुळे येथील लोकांमध्ये आपले प्रश्न मांडण्याची जाण निर्माण होते. झोपडपट्टीतील लोक शहरात अनेक सेवा पुरवतात व उपभोक्ता वर्ग म्हणूनही आर्थिक क्रियांमध्ये सहभागी होतात. अनेक प्रकारची शारिरीक कष्टाची कामे करतात. अतिशय अल्प वेतनावर येथील व्यक्ती काम करतात. शहरातील स्वच्छता राखणे यात शहरातील कचरा उचलणे, रस्ते साफ करणे, सफाई करणे, मोठ्या व छोट्या गटारांमध्ये उतरणे व ते स्वच्छ करणे यातील कचरा काढणे. याप्रकारची अतिशय महत्वाची कामे करतात. यात अनेक लोकांचा मृत्यू होत असतो.

स्त्रिया धुणीभांडी करणे, मुलांचा सांभाळ करणे, स्वयंपाक करणे, पुरुष वॉचन म्हणून काम करतात. तसेच दवाखाने, हॉटेल, दुकाने येथे स्त्रिया व पुरुष नोकर म्हणून अत्यल्प वेतनात सेवा पुरवतात. तसेच भाजीपाला विकणे, किरकोळ स्वरुपातील वस्तू घरोघर जावून विकणे, ड्रायव्हर म्हणून काम करणे. रिक्षा चालवणे, कंपनीतील अनेक प्रकारची कामे येथील लोक करतात. थोडक्यात प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या, आर्थिक सुबत्ता व व्यवसाय असणाऱ्या व चांगल्या शासकीय पगाराच्या नोकऱ्या असणाऱ्या लोकांना अतिशय अल्प वेतनावर सेवा पुरवणारा वर्ग झोपडपट्ट्यांमध्ये वास्तव्य करत असतो. शहरात अनेक स्थलांतरीत लोक झोपडपट्ट्यांच्या आश्रयाने राहतात व बांधकाम व्यवसायात मजूर म्हणून काम करतात.

म्हणून या लोकांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक तसेच व्यसने, गुन्हेगारी या सामाजिक समस्यांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

झोपडपट्टीतील लोकांना सेवा पुरवताना अनेक छोटे मोठे व्यावसायिक अधिक दराने वस्तू विकतात. कारण किरकोळ स्वरुपातील वस्तूंची खरेदी झोपडपट्टीधारकांकडून एक, दोन किंवा आठवडाभरापुरतीच होत असते. अशावेळी ज्यादा दराने पैसे आकारले जातात. यातून झोपडपट्टीवासीयांचे जाणीवपुर्वक शोषण होत असते. दैनंदिन जीवनातील गरजेच्या वस्तू येथील व्यावसायिकांकडून विकत घेतल्याशिवाय पर्याय नसतो. यात किराणा, रॉकेल तसेच कपडा, खाद्यपदार्थ यांचा अधिक समावेश असतो. झोपडपट्टीवासीय आर्थिक उत्पन्न व रोजगार नसल्यामुळे सक्षम अशा शहरवासीयांकडून शोषीत बनतात. म्हणून झोपडपट्टीवासीयांचा समाजशास्त्रीय अभ्यास महत्वाचा आहे.

३.३ संशोधनाची उद्दिष्ट्ये -

१. नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्ट्यांच्या वाढीचा तुलनात्मक ऐतिहासिक आढावा घेणे.

२. नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीतील व्यक्तींच्या सामाजिक व आर्थिक जीवनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३. नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीतील व्यक्तींच्या शैक्षणिक व आरोग्यविषयक जीवनाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

३.४ अभ्यासाचे क्षेत्र

प्रस्तुत संशोधनात नाशिक व मुंबई शहरातील कल्याण महानगरपालिकेतील झोपडपट्टीवासीयांचा समाजशास्त्रीय अभ्यास हे अभ्यासाचे क्षेत्र म्हणून निवड करण्यात आली आहे.

३.५ अभ्यासविषयाच्या मर्यादा

प्रस्तुत संशोधन हे फक्त नाशिक व मुंबई शहरातील कल्याण महानगरपालिकेतील झोपडपट्टीवासीयांपुरतेच मर्यादित असून नाशिक व मुंबई शहरातील प्रत्येकी १०० कुटुंबियांची निवड करून अभ्यास करण्यात आला आहे.

प्रकरणांची रुपरेषा

प्रकरण - १. प्रस्तावना व विषयाचे स्वरुप - प्रस्तुत प्रकरणात झोपडपट्ट्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी यात भारतातील झोपडपट्ट्यांची वाढ स्पष्ट केली आहे. झोपडपट्टीचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये

व प्रकार मांडले आहेत. नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्ट्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट केली आहे.

प्रकरण - २. संशोधन साहित्याचा आढावा - प्रस्तुत प्रकरणात शहरीकरण व झोपडपट्ट्यांशी संबंधित अभ्यास, संशोधन पेपर यांचा संक्षिप्त स्वरुपात आढावा घेतला आहे. झोपडपट्टीतील सामाजिक, आर्थिक, आरोग्य, शिक्षण व व्यसनाधिनता यावरील संशोधन साहित्याचा आढावा घेतला आहे. झोपडपट्टीतील समस्यांवर प्रकाशित झालेली पुस्तके, अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, शासकीय अहवाल यांचा आढावा घेतला आहे. भारतात विविध शहरांमध्ये झालेली झोपडपट्ट्यांची वाढ व विविध राज्यांमधील झोपडपट्टीवासीयांच्या समस्या व पुनर्वसन योजना यांचा आढावा घेतला आहे.

प्रकरण -३. संशोधन पद्धती - प्रस्तुत प्रकरणात संशोधन पद्धतीचा अर्थ, मुलाखत अनुसूची, निरिक्षण पद्धती, नमूना निवड यांचा अर्थ स्पष्ट केला आहे. नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासीय कुटूंबाची केलेली नमूना निवड व एकूण लोकसंख्या यांचा समावेश केला आहे. संशोधन समस्या, संशोधनाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्ट्ये, अभ्यासाचे क्षेत्र, अभ्यास विषयीची मर्यादा व प्रकरणांची रुपरेषा मांडली आहे.

प्रकरण -४ नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासीयांचे सामाजिक व आर्थिक जीवन - प्रस्तुत प्रकरणात नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासीयांच्या कुटूंबातील व्यक्तींचे शिक्षण, वास्तव्याची वर्षे, मुळगावाचे नाव, वडिलांचा पारंपारीक व्यवसाय, झोपडपट्टीतील जातीभेद इत्यादींची टक्केवारी, सारण्या करुन विश्लेषण केले आहे. आर्थिक घटकांत विविध प्रकारचे व्यवसाय व कामे, महिलांच्या कामाचा प्रकार, शासनाने जागा उपलब्ध करुन दिल्यास तेथे घर बांधण्याची तयारी, स्वस्त रेशन दुकानाचा उपयोग, घरभाडे, घराची रचना, घरबांधणीसाठी वापरलेले साहित्य, समोरच्या घराचे अंतर, सुर्यप्रकाश येण्याचे प्रमाण मागील दहा वर्षांतील घर रिपेरिंग खर्च, कर्ज घेतल्याचे प्रमाण व कारणे यांचे विश्लेषण केले आहे.

प्रकरण- ५ नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासियांचे शिक्षण व आरोग्य - प्रस्तुत प्रकरणात कुटूंबातील शाळेत जाणाऱ्या मुलांचे प्रमाण, शाळेचा प्रकार, शिक्षणाचे माध्यम, मुले खाजगी शाळेत जाण्याची कारणे,मुलांच्या शैक्षणिक प्रगतीतील अडथळे, मुलांच्या गळतीची कारणे यांचे विश्लेषण केले आहे.

आरोग्य घटकात राहण्यासाठी वस्तीची निवड करण्याचे कारण, पिण्याच्या पाण्याचे साधन, जेवण बनवण्याचे साधन, सार्वजनिक शौचालयाचा वापर करणाऱ्यांचे प्रमाण, उघड्यावर शौचालयात जात

असल्याची कारणे, नाल्यांची सफाई, कचरा उचलण्याचे प्रमाण, वस्तीच्या परिसरातील स्वच्छता यांची सारणी मांडून विश्लेषण केले आहे.

प्रकरण - ६ संशोधनाचे निष्कर्ष आणि शिफारशी - प्रस्तुत प्रकरणात नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टी वासीयांचे सामाजिक, आर्थिक, शिक्षण, आरोग्य, व्यसने याबाबत मिळवलेल्या माहितीतून संशोधनाचे निष्कर्ष मांडले आहेत. शिफारशींसाठी शासकिय पातळीवरुन राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती दिली आहे. झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन कायदा १९५६, १९७१ चा महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा निर्मुलन आणि पुनर्विकास कायदा यांच्या तरतुदी मांडल्या आहेत व झोपडपट्टीतील कुटुंबांनी सुचविलेल्या उपाययोजना मांडल्या आहेत.

संदर्भ :

१. R. M. Thakur, M. S. Dhadave, Slum & Social System, Archeves Pub. New Delhi 55

२. Marshall B. Clinard (1966), Slum and Community Development- part 1, Experiments in self help, The Free Press New York Copyright.

३. **प्रदीप आगलावे (२०१०), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.**

४. **विनोद निरभवणे (२०२१), नाशिक शहरातील झोपडपट्टीवासियांचा समाजशास्त्रीय अभ्यास, (अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध) कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.**

प्रकरण - ४

नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासियांचे सामाजिक व आर्थिक जीवन

प्रस्तावना - नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासियांचे सामाजिक जीवन

झोपडपट्ट्यांची वाढ हा नागरीकरणाचा एक अपरिहार्य परिणाम आहे. वाढत्या नागरीकरणामुळे झोपडपट्ट्यांची वाढ होवून दारिद्र्य, बेकारी, असमानता यांची वाढ झाली आहे. औद्योगिकरणामुळे लोकांचे ग्रामीण भागातून शहराकडे स्थलांतर होते. अल्प उत्पन्न असलेले सामाजिक, आर्थिक स्तरातील लोक झोपडपट्टीत वास्तव्य करतात. मुलत:च गरीब असलेल्या झोपडपट्टीवासीयांना वाढत्या महागाईमुळे उदरनिर्वाहविषयक गरजा भागवताना अनेक सामाजिक, आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. झोपडपट्टीवासीयांना असलेली जागेची टंचाई, शहरातील सामाजिक व आर्थिक विषमता, मुलभूत सोयीसुविधांचा अभाव याचा परिणाम कुटूंबाची जीवनमानाची पातळी खालावण्यात होत असतो. झोपडपट्टीवासीयांना रोजगार नसल्यामुळे इतर समस्यांनाही तोंड द्यावे लागते. यात मानसिक ताणतणाव, काम करण्याची प्रेरणा नसणे, कार्यक्षमता आणि आत्मविश्वास कमी होणे, विविध आजारांना बळी पडणे, कौटूंबिक व सामाजिक संबंधांमध्ये तणाव निर्माण होणे, सामाजिक बहिष्कारात वाढ होणे, जातीय तणाव तसेच स्त्री - पुरुषांमधील विषमतेत वाढ होते. अधिक बेरोजगारी सुद्धा सामाजिक विषमता निर्माण करण्यास सहाय्यभूत ठरते. गरीबी आणि दारिद्र्य यांचा संबंध आर्थिक घटकांशीच लावला जात असल्यामुळे सामाजिक घटकातील निरक्षरता, आरोग्य, सामाजिक विषमता, सामाजिक बहिष्कार, व्यसनाधिनता, गुन्हेगारी, बेरोजगारी या महत्वपुर्ण घटकांकडे दुर्लक्ष केले जाते. कुपोषण, मर्त्यता आणि निरक्षरता हे घटक झोपडपट्टीवासीयांचे दारिद्र्य स्पष्ट करतात.

प्रत्येक शहराचा विकास होताना अनेक बदल होत असतात संघर्ष होत असतात या सर्व संघर्षातून मुंबईचे रूपांतर एका जागतिक शहरामध्ये झालेले आहे. लोकांचा कल हा अधिकाधिक पैसा मिळविणे, कामामध्ये बढती मिळवणे याकडे असतो. प्रत्येक नवीन गोष्टीचा अनुभव घेणे, अनेक वस्तू खरेदीवर अधिकाधिक भर देणे, अधिक चांगले जीवन जगणे, जीवनाचा पुरेपूर आनंद घेणे याला महत्त्व दिले जाते. मुंबईत राजकीय व आर्थिक साक्षरता वाढलेली आहे. मोबाईलचा वापर, इलेक्ट्रॉनिक यंत्रांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात असतो. अनेक नवीन गोष्टींचे अनुकरण केले जात असते यामुळे शिक्षणाचे प्रमाण मुंबईत झोपडपट्ट्यांमध्ये ९०% च्या जवळपास आहे. नवीन पिढी थोड्याफार प्रमाणात शिकलेली असल्यामुळे

त्यांना आर्थिक व्यवहार करणे, नवीन काम शिकणे, जबाबदारी घेणे यासाठी ते तयार होतात व आपली सामाजिक आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करत असतात.

पालकांचा जास्त खर्च मुलांबरोबर त्यांच्या कुटुंबियांवर होतो. पैसा साठवून ठेवणे, बचत करणे हे प्रकार या शहरामध्ये कमी प्रमाणात दिसतील अतिशय दाटीवाटीने झोपड्या असल्या तरी संघर्षाचे प्रमाण, दोन गटांमधील भांडणे याकडे दुर्लक्ष केले जाते आहे. त्या जागेत व्यवस्थित राहणे किंवा नवीन ठिकाणी ऐपती प्रमाणे घरे विकत घेणे हे म्हाडाच्या घरबांधणी उद्योगामुळे शक्य झाले आहे. साधारणपणे दहा मजल्यांपेक्षा अधिक उंच इमारती बांधल्या जात असतात. २६९ स्क्वेअर फुटाचे घर हे झोपडपट्टीवासियांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून दिले जात आहे आणि म्हणून नवीन ठिकाणी वैयक्तिक पाण्याचा नळ, स्वतंत्र स्वच्छतागृह असते, साहजिकच यामुळे या लोकांचे आरोग्य सुधारण्याला मदत झालेली आहे, अजूनही जवळपास ४१ टक्के लोक हे मुंबईत झोपडपट्ट्यांमध्ये राहत आहेत, नवीन घरांचे वाटप केले जाते आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी २०१५ मध्ये २४ वॉर्ड केले आहेत. यात २४०० झोपडपट्ट्या आहेत. या सर्व लोकांना घरे देण्याचे नियोजन केलेले आहे सातत्याने त्यावर शासनाचे लक्ष आहे मुंबईमध्ये घर विकत घेणे ही झोपडपट्टीवासीयांच्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे. जमिनीचे गगनाला भिडलेले भाव व घरांच्या किमती या आवाक्यात नसतात. सामाजिक घटक खूप मोठ्या प्रमाणात झोपडपट्टीवासीयांना दहा बाय दहाची घरे किंवा त्याहीपेक्षा कमी घरे असल्यामुळे अनेक मुलांचे विवाह होत नाहीत किंवा विवाह केलेले नाहीत. स्त्रियांनी देखील एकटे राहणे पसंत केले आहे. पुरुषांचाही यामध्ये समावेश आहे. जागेअभावी अनेक समस्या निर्माण होत असतात. झोपडपट्टीत विवाहाच्या बाबतीत निर्माण झालेले प्रश्न म्हणजे उशिरा विवाह करणे, मुले नोकरी करत असतील तरी स्वतःच्या गरजा भागविणे तसेच नवीन गोष्टी शिकणे याकडे लक्ष देत असतात यात मुलींचाही समावेश असतो आणि म्हणून अधिकाधिक उशिरा विवाह केले जात असतात. आर्थिक परिस्थितीमुळे विवाहानंतर कुटुंबात भांडणे देखील होत असतात येथे घटस्फोटाचे प्रमाण मोठे आहे मुलांना सांभाळण्याचा प्रश्न निर्माण होतो संपूर्ण कुटुंब चालविणे हे कुटुंब प्रमुखाला अधिक चांगल्या पगाराची नोकरी असेल तर शक्य होते अशा वेळी महिलादेखील काम करतात. मुले मोठी झाल्यानंतर लवकर कुठेतरी काम करण्यास प्राधान्य देत असतात. विवाहाचा खर्च हा वधूपिता व वरपिता अशा दोन्ही बाजूंनी अर्धा अर्धा केला जात असतो. कमीत कमी लोक हे विवाहासाठी येतील, याकडे लक्ष दिले जाते विवाहासाठी होणारा खाण्यापिण्याचा खर्च हा कमीत कमी केला जात असतो, पाहुणे येणे, वेळ देणे या गोष्टी म्हणजे स्वतःच्या

स्वातंत्र्यावर आलेली गदा मानली जाते म्हणून पाहुण्यांना येऊ देणे त्यांना राहू देणे या गोष्टी टाळल्या जात असतात. कारण जागेअभावी व माणसांची प्रचंड गर्दी झालेली असल्यामुळे येथे पुन्हा नव्याने लोकांना सामावून घेणे अवघड होऊन जाते म्हणून मोठ्या शहरांमध्ये पारंपारिक पद्धतीने पाहुणे येणे त्यांचे स्वागत करणे, नातेवाईक, आई-वडील, कुटुंबातील इतर व्यक्ती यांना सामावून घेणे अवघड होऊन जाते तसेच खाण्यापिण्याचा खर्चही वाढतो अशावेळी बाहेरून येणाऱ्या लोकांना टाळले जात असते.

ग्रामीण भागातून मुंबईत होणारे स्थलांतर :-

झोपडपट्ट्यांमध्ये घर भाडे कमी असते व येथेच काही कालावधीनंतर झोपडी विकत घेतली जात असते येथे राहण्यास पसंत केले जाते कारण बाहेर घर विकत घेणे हे आवाक्याच्या बाहेर असते. आपल्या कुटुंबाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न केले जात असतात व पगाराचा काही भाग हा ग्रामीण भागात स्वतःच्या कुटुंबासाठी पाठवला जात असतो. विशेषत: उत्तर प्रदेशातील कुटुंबांना हे करावे लागते. आपली भावंडे इतर नातेवाईक गावातील व्यक्ती यांनीही इच्छा दर्शविल्यास रोजगारासाठी हे लोक मुंबईमध्ये स्थलांतर करत असतात व काहीतरी काम मिळवत असतात. जातीय भेद, जातीय गुलामगिरी यातून त्यांची मुक्तता होते व चांगले जीवन स्वतंत्रपणे जगायला मिळते म्हणून अशा संघर्षातून सुद्धा अनेक कुटुंबे ही मागील काही दशकांमध्ये शहरांमध्ये स्थलांतरित झालीत. सुरूवातीचा कालखंड हा मुंबईमध्ये स्थलांतर करण्याचा होता अतिरिक्त लोकसंख्या झाल्यामुळे व राहायला जागा नसल्यामुळे येथून अनेक मजूर, कारागीर, नोकरदार हे जवळपासच्या शहरांमध्ये स्थायिक झाल्याचे दिसते व इतर जी नवीन शहरे उदयाला आली आहेत. अशा शहरांमध्ये चांगल्या प्रकारे रोजगार त्यांनी मिळवलेला असून ते स्थायिक झालेले आहेत. भुसावळ, मनमाड, लासलगाव, पिंपळगाव, नाशिक, ओझर, दिंडोरी, इगतपुरी अशा ठिकाणी फर्निचरची कामे, इमारती बांधण्याची कामे या क्षेत्रात बिहार व उत्तर प्रदेश येथील लोक काम करतात हे लोक कामाच्या ठिकाणी किंवा झोपडपट्ट्यांमध्ये राहणे पसंत करतात. झोपडपट्टीत घरभाडे कमी असते. नाशिकसारख्या शहरांमध्ये खर्चही कमी होतो व पैशांचीही बचत होते आणि म्हणून मागील काही दोन ते तीन दशकांपासून मुंबईतून अनेक लोक इतर ठिकाणी स्थलांतरित झालेली आहेत तर नव्याने रोजगार शोधण्यासाठी येणारी तरुण पिढी तरुण मुले ही छोट्या शहरांमध्ये स्थायिक झाली आहेत व महाराष्ट्रात जवळपास ८० टक्के मजूर वर्ग अंगमेहनतीच्या कामांमध्ये उत्तर प्रदेश व बिहार येथील आहे.

महाराष्ट्रातील लोकही सहकुटुंब शहरात स्थलांतरित झालेली आहेत. सातत्याने शेतीतील दुष्काळ,

शेतकरी आत्महत्या या सर्व प्रकारांमुळे हे लोक मुंबई, पुणे, नाशिक या ठिकाणी स्थलांतरित होणे पसंत करतात व मिळेल त्या मजुरी मध्ये काम करतात. त्यांच्या स्थानिक ठिकाणाच्या मानाने अतिशय चांगली मजुरी मिळते कोणत्याही जातीय हिंसाचाराला सामोरे जावे लागत नाही. उत्तर प्रदेश, बिहार येथील लोक कोणत्या जातीचे आहे, याकडे लक्ष देत नाहीत आणि म्हणून या लोकांना चांगली वागणूक दिली जात असते त्यांची आहे ती मजुरी, वेतन हे देण्याकडे कल असतो म्हणून खूप सारी कुटुंबे ही महाराष्ट्रात स्थायिक झालेली दिसतात.

मुंबईमध्ये विविध भाषा, धर्म, जातीचे लोक एकत्रित झोपडपट्ट्यांमध्ये राहतात. याचे कारण त्यांची ओळख म्हणजे झोपडपट्टी धारक अशीच असते. झोपडपट्टीतील घराची रचनाही एकावर एक-दोन-तीन असे मजले चढवले जात असतात व यामध्ये अतिशय कमी जागेत हा परिवार राहत असतो. शक्यतो कुटुंबातील स्त्री आणि पुरुष गरज असल्यास दोघे नोकरीला प्राधान्य देत असतात व सुट्टीच्या दिवशी एकमेकांना वेळ देणे, कुटुंबात रहाणे, फिरायला जाणे यामध्ये आपला वेळ घालवत असतात.

मुंबईमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण हे कमी झालेले आहे. एखाद्या ठिकाणी गुन्हा घडल्यास तात्काळ पोलीस यंत्रणेकडून त्याची दखल घेतली जाते व गुन्हेगारांना जेरबंद केले जाते. यामुळे मुंबई पोलिसांची दहशत ही प्रचंड प्रमाणात आहे याचा परिणाम लोकांना सुखाने शांततेने स्वतःच्या विकासासाठी वेळ देता येतो आणि म्हणून भांडण टाळण्याकडे अधिक लोकांचा कल असतो. चांगल्या सवयी रुजविण्याकडे लोकांचा कल असतो. इतरांच्या कुटुंबांमध्ये गुंतण्याचे प्रमाण, त्यावर चर्चा करण्याचे प्रमाण, अतिशय कमी असते. म्हणजेच सामाजिक दृष्टिकोनातून जात, धर्म त्याच्या पलीकडे जाऊन स्वतःचा विकास करण्यावर स्वतःचे चांगले जीवन जगण्यावर व अधिकाधिक स्वातंत्र्य उपभोगणे यावर लक्ष दिले जात असते.

मुंबईमध्ये १९९२ मध्ये दंगली झाल्यात. गुन्हेगारी टोळ्यांनी झोपडपट्टीतील मुलांचा वापर केला व अनेक गुन्हेगारी टोळ्या जन्माला आल्यात. याच कालावधीत हिंदू-मुस्लीम दंगली झालेल्या आहेत काही ठिकाणांमध्ये मुस्लिम लोक समुदायाने अधिक आहेत. भिवंडी, गोवंडी अशा काही ठिकाणांवर मुस्लिम लोक मोठ्या संख्येने राहत आहेत. उत्तर प्रदेश, बिहार येथून येणारा कामगार वर्ग मुस्लिम असल्याचेही दिसते.

जात आणि धर्म :-

बहुतेक सिद्धांतकार झोपडपट्ट्यांची वाढ ही भौतिक, सामाजिक व आर्थिक दृष्टीने झाल्याचे स्पष्ट करतात. स्थलांतरीत व्यक्तिंची आर्थिक परिस्थिती शहरातील महागडी घरे घेण्याची नसते. त्याला सामाजिक घटकही जबाबदार आहेत. यात नातेसंबंध, जात, धर्म यांचाही प्रभाव असतो. शासनाकडून झोपडपट्टीतील व्यक्तींना कोणतीही सामाजिक सुरक्षितता दिली जात नाही. येथे विविध खेड्यातून व राज्य, धर्म, जात आणि विविध व्यवसायातून लोक आलेले असतात. व त्यांचा एक समूह तयार होतो. परंतु या समूहातही लहान स्वरुपात सामाजिक स्तररचना तयार होते. श्रीमंत आणि गरीब, जातीच्या आधारे श्रेष्ठ आणि कनिष्ठ तसेच सुशिक्षित अशिक्षित ही स्तररचना पारंपारीक भारतीय समाजाच्या वैशिष्ट्यांतून आलेली आहे. येथील व्यक्तींच्या सामाजिक दर्जामध्ये सुधारणा म्हणजे झोपडपट्टीधारक अशी होते. ग्रामीण स्थलांतरीत शहरी जमिनीवरील झोपडपट्टीत राहतात अशी ओळख निर्माण होते.

जात आणि धर्म हे घटक झोपडपट्ट्या वाढविण्यात महत्वाची भूमिका पार पाडतात व त्याचा परिणाम समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक घटकांवर होत असतो. भारतातील विविध राज्यातील अनुसूचित जाती-जमाती इतर मागासवर्गीय समाजातील लोक झोपडपट्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात राहतात. आपल्याला चांगला रोजगार मिळावा व आपली आर्थिक परिस्थिती सुधारावी म्हणून अनेक कुटूंबे शहरात स्थलांतर करतात व तात्पुरत्या स्वरुपाची कामे करतात. औद्योगिक आणि व्यावसायिक उत्पादनांसाठी स्वस्त मनुष्यबळाची गरज असते. असे मनुष्यबळ झोपडपट्ट्यांमधून उपलब्ध होते. ग्रामीण भागातून स्थलांतर केलेली कुटूंबे कामाच्या जवळ झोपडी उभारतात व ही संख्या वाढतच राहते. येथे लाईट, पिण्याचे पाणी स्थानिक प्रशासनाकडून पुरवले जाते व राजकीय नेते या झोपडपट्ट्यांचा उपयोग मतदानासाठी करतात. राजकीय दबावाचा वापर करुन येथे विना परवाना लोक राहतात.

संपूर्ण मुंबई शहराचे सांडपाणी हे खाड्यांमध्ये सोडल्यामुळे पर्यावरण हे संतुलित राहिलेले नाही, सातत्याने नवीन इमारतीची बांधकामे केली जात असतात. शासनाने मात्र तेवढ्या प्रमाणात योजना आखून त्या राबविल्या नाहीत. सरकारी व खाजगी क्षेत्रांमध्ये असणारा नोकरदार वर्ग हा सेवानिवृत्ती झाल्यानंतर म्हातारपणासाठी आपल्या गावी किंवा शांत अशा ठिकाणी राहावयास गेल्याचे दिसते. ज्या प्रमाणात मुंबई शहरातील झोपडपट्टीवासीयांचा सामाजिक व शैक्षणिक तसेच तंत्रज्ञानात्मक विकास झालेला आहे. तसा नाशिक शहरातील झोपडपट्टीवासियांचा झालेला नाही. विवाह संबंधातील जातीचे नियम मुंबई शहरात

फारसे पाळले जात नाही. दोन व्यक्तींची पसंती आवड-निवड तसेच आर्थिक स्थिती, व्यक्तीचा शैक्षणिक दृष्टिकोन स्वतःच्या कष्टाने कमवलेल्या दर्जाला महत्त्व दिले जाते. स्त्रियांनाही खूप मोठ्या प्रमाणात काम करण्याची संधी उपलब्ध होत असते व स्वतंत्रपणे स्त्रिया काम करून स्वतःचे अर्थार्जन करत असतात. स्वतःचा अधिकार, स्वातंत्र्य यांना अधिक महत्त्व दिले जाते, राहणे, बोलणे, कपडे यावर अधिक लक्ष दिले जाते. मुंबई हे कार्पोरेट क्षेत्र असल्यामुळे व फिल्म इंडस्ट्री असल्यामुळे याचा प्रभाव येथील सर्वच लोकांवर होत असतो. झोपडपट्टीतील मुले ही पंधरा-सोळा वर्षाची असताना काहीतरी काम करणे पसंत करतात. येथे सरकारी नोकरी मिळवण्याकडे फारसा कल नसतो कारण तेवढ्याच वेतनाची नोकरी ऑफिस, कंपन्यांमध्ये दुकानांमध्ये उपलब्ध होत असते म्हणून दहावी, बारावी एवढे शिक्षण झाले की मुले मुली ही नोकरी करणे पसंत करतात व स्वतःचा विकास करण्याकडे लक्ष देतात. विविध लोकांच्या संपर्कात आल्यामुळे व्यवस्थित चालणे, बोलणे यावर लक्ष दिले जाते. छोट्या-छोट्या गोष्टी शिकण्याकडे मुले मुली लक्ष देतात. स्वतःसाठी अधिकाधिक वेळ दिला जातो. रिकाम्या वेळेमध्ये काहीतरी नवीन गोष्ट शिकणे छोटा-मोठा व्यवसाय करणे, नोकरी मिळविणे यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असतात आणि म्हणून मुंबई शहरात खेड्यातून येणारी अनेक कुटुंबे यात सामावून जातात मुलांच्या विकासासाठी पूरक असे वातावरण सहजपणे तयार होत असते.

झोपडपट्टीवासियांचे मुळगाव व राज्य दर्शविणारी सारणी

	नाशिक					मुंबई		
अ.क्र.	राज्य	जिल्हा	तालुका	गाव	संख्या	राज्य	जिल्हा	संख्या
१	२	३	४	५	६	७	८	९
१	आंध्रप्रदेश	हैद्राबाद	हैद्राबाद	हैद्राबाद	१	आं.प्रदेश	विकाबाद	१
२	उ.प्रदेश	बिरजन	फरींदा	नयनसर	३	ओडिसा	गंजम	१
		आजमगढ	सगडी	सगडी		झारखंड	देवधर	१
		बनारस	बनारस	सरया		प.बंगाल	टिटाघर	१
३	बिहार	कचारी	कचारी	कट्यार	१		जोधपूर	
			भाल्कि	बिदर		राजस्थान	जालारे	२
			बिदर	बसवे कल्याण		बिहार	पटणा	१
			बिदर	बिदर			महू	
		बिदर	बिटर	बसवे कल्याण		मध्य प्रदेश	महू	२
४	कर्नाटक	बिदर	बिटर	बसवे कल्याण	१०		नाशिक	
			बिटर	बिटर			नाशिक	
			बिटर	बसवे कल्याण		महाराष्ट्र	नाशिक	९
			बिटर	बसवे कल्याण			नाशिक	
		गुलबर्गा	गुलबर्गा	भानकी			नाशिक	
		चिकमुल	चिकमुल	चिकमुल			अ.नगर	
				नाशिक			पुणे	
				नाशिक			कोरेगाव	
				नाशिक			परभणी	
				नाशिक			चोरपूर	
				नाशिक			असठिया	
				नाशिक			ज्ञानपूर	
				नाशिक			पोखरिनापूर	
			नाशिक	नाशिक			काशी	
				नाशिक			कतिकार	
				नाशिक			गजीपूर	
				नाशिक			गोका	
		नाशिक		नाशिक			वारासणी	
				नाशिक			बैसा	
				नाशिक			आंबेडकनगर	
				नाशिक			भदोही	

				नाशिक			बलिया	
				नाशिक			निजामापाबद	
				नाशिक			पसगाव	
				नाशिक			पिपराईच	
				नाशिक			जगदीशपूर	
				नाशिक			बनारस	
				नाशिक			प्रतापगड	
				गंगापूर			प्रतापगड	
				शिंदे पळसे			प्रतापगड	
				आडगाव			प्रतापगड	
				आडगाव			प्रतापगड	
				आडगाव			प्रतापगड	
				विहितगाव			प्रतापगड	
				सातपूर			देवरीया	
			दिंडोरी	नेवाडे			देवरीया	
			सायना	ठामताने			देवरीया	
			पेठ	नवाशी			अलाहाबाद	
			सिन्नर	निरोळी			अलाहाबाद	
			इगतपुरी	वंजारवाडी			अलाहाबाद	
				पिंपळस			अलाहाबाद	
			चांदवड	चांदवड			अलाहाबाद	
५				चांदवड			अलाहाबाद	
				मालेगाव			अलाहाबाद	
			मालेगाव	मालेगाव			अलाहाबाद	
	महाराष्ट्र			मालेगाव			अलाहाबाद	
				अजंग			अलाहाबाद	
				दरेगाव	८५		अलाहाबाद	८२
			नांदगाव	मनमाड		उ.प्रदेश	गोरखपूर	
			निफाड	सुकेणे			गोरखपूर	
				मुंबई			गोरखपूर	
		मुंबई	मुंबई	मुंबई			गोरखपूर	
			जळगाव	नांदे बु।।			गोरखपूर	
			जामनेर	पिंपळवाडे			गोरखपूर	
		जळगाव	चाळीसगाव	चाळीसगाव			गोरखपूर	
				चाळीसगाव			गोरखपूर	

		लातूर	लातूर	उदगीर			गोरखपूर	
		उस्मानाबाद	उस्मानाबाद	उमरगा			गोरखपूर	
		औरंगाबाद	औरंगाबाद	औरंगाबाद			गोरखपूर	
			वैजापूर	जनिफड			गोरखपूर	
				जनिफड			गोरखपूर	
		अ.नगर	अ.नगर	कोपरगाव			गोरखपूर	
		धुळे	साक्री	कडाळे			गोरखपूर	
				छडवेकोड			गोरखपूर	
				पिंपळनेर			गोरखपूर	
				कुडाशी			गोरखपूर	
		परभणी	सेलू	कवडधन			अडोनी	
				राजेवाडी			अडोनी	
				पिंपळगाव			फैजाबाद	
				गुगळी			फैजाबाद	
				शिंगटाळा			शुकलपूर	
				मानवस			शुकलपूर	
				नादारा			जौनापूर	
			जिन्तुर	शेवडी			जौनापूर	
			पाथरी	डोंगरगाव			जौनापूर	
		पुणे	दौंड	रांजणगाव			जौनापूर	
		बीड	बीड	आष्टी			जौनापूर	
				आष्टी			जौनापूर	
				आष्टी			जौनापूर	
			जालना	परतूर			जौनापूर	
				जालना			जौनापूर	
				राजगाव			प्रयागराज	
				हातगाव			प्रयागराज	
				खादगाव			सुलतानपूर	
				कौठाळ			सुलतानपूर	
				परतूर			गौंडा	
				धामणगाव			गौंडा	
			परनूल	पोखरी			गौंडा	
				सावरगाव			गौंडा	
			पाथरी	पायरगव्हाण			गौंडा	

वरील सारणीवरून मुंबई शहरात कल्याण महानगरपालिकेतील सूर्यानगर, चंदननगर, हनुमाननगर व उदयनगर या झोपडपट्ट्यांमध्ये सर्वाधिक ८२ कुटुंबे उत्तर प्रदेश राज्यातील चोरपूर, असडिया, ज्ञानपूर, पोखरिनापूर, काशी, कातेकार, गाजीपूर, गोका, वारासणी, बैसा, आंबेडकरनगर, भदोही, बलिया, निजामाबाद, पसगाव, पिराईच, सोनीपत, जगदीशपूर, बनारस, प्रतापगड, देवरिया, अलाहाबाद, गोरखपूर, अडोनी, फैजाबाद, शकलपूर, जैनपूर, प्रयागराज, सुलतानपूर, गौंडा या जिल्ह्यातील आहेत. ३० जिल्ह्यातील कुटुंबे आहेत व इतर राज्यातील १८ कुटुंबे आहेत. यामध्ये आंध्रप्रदेश, ओडिसा, झारखंड, पश्चिम बंगाल, राजस्थान, बिहार, मध्य प्रदेश व महाराष्ट्र येथील आहेत. नवीन खासगी उद्योग उभारणीला नवीन आर्थिक धोरणाने परवानगी दिली आहे. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून सेवाक्षेत्र विस्तारण्याला आर्थिक मदत व शासकीय परवानग्या देण्यात आल्यात. शाळा, महाविद्यालये, इंजिनीअरिंग कॉलेजेस, माहिती तंत्रज्ञान क्षेत्र, वैद्यकीय महाविद्यालये, संशोधन क्षेत्र, रस्त्यांचा विकास, पूल बांधणे इत्यादी प्रकारे विकासाला गती दिली गेली. त्यामुळे या संधीचा फायदा हा ज्या ठिकाणी सुशिक्षित मनुष्यबळ, आर्थिक सुबत्ता, नैसर्गिक साधनसंपत्ती, पाणी, वीज, रस्ते, शासनाचे सहकार्य, उद्योगासाठी लागणारे प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होते, तेथे भारतातील तसेच परदेशातील कंपन्यांनी संयुक्तपणे उद्योग उभे केलेत व अशा शहरांमध्ये रोजगारासाठी स्थलांतर होण्याचे प्रमाण वाढलेले दिसते, म्हणून लहान शहरांमध्येही झोपडपट्ट्यांमध्ये स्थलांतरित कामगार कुटुंबे राहिली आहेत. नाशिक शहरात महाराष्ट्रातील नाशिक, मुंबई, जळगाव, लातूर, उस्मानाबाद, औरंगाबाद, अहमदनगर, धुळे, परभणी, पुणे, बीड व जालना या १२ जिल्ह्यातील कुटुंबे राहतात व ही संख्या सर्वाधिक ८५ एवढी आहे.

उत्तर प्रदेश हे राज्य भारतातील लोकसंख्येच्या दृष्टीने सर्वाधिक मोठे राज्य आहे व इतर राज्यांच्या तुलनेने या राज्याचा विकास सामाजिक दृष्टिकोनातून झालेला नाही. यामध्ये जातीय ताण-तणाव मागासलेल्या जातीतील कुटुंबांना शिक्षण व नोकरी व रोजगारापासून दूर ठेवले जाते. स्वत:च्या मालकीचा कोणताही छोटा-मोठा व्यवसाय सुरू करता येत नाही. उच्च जातीतील लोक कनिष्ठ जातीतील लोकांना आजही मोठ्या प्रमाणात पारंपरिक दृष्टिने वागवतात. त्यांचा सामाजिक दर्जा उंचावू देत नाही. सातत्याने जातीय कारणावरून अपमान करणे, सामाजिक प्रतिष्ठा न देणे, प्रसंगी हाणमार करणे, खून करणे असे प्रकार होतात, याचा परिणाम म्हणून येथील लोक स्वत:च्या विकासासाठी रोजगार मिळविण्यासाठी महाराष्ट्रातील विविध शहरात स्थलांतर करतात. तसेच मुंबईमध्ये अधिक चांगला रोजगार मिळत असल्यामुळे व मुंबई शहराचे आकर्षण

असल्यामुळे रेल्वेने प्रवास करण्याची सुविधा, जीवन जगण्यासाठी मोकळीकता, व्यवसाय करण्याची सुविधा व स्थानिक लोकांकडून मिळणारी चांगली वागणूक, सहकार्याची भावना, रोजगार उपलब्ध करून देणे इत्यादी अनेक कारणांमुळे येथील मजूर वर्ग कुटुंबासह मुंबईसारख्या शहरात स्थलांतर करणे पसंत करतो. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, सोलापूर, सांगली, सातारा, अहमदनगर इत्यादी जिल्ह्यांच्या ठिकाणी व तालुक्यांमध्ये एमआयडीसीमध्ये घरबांधणी व्यवसायात मजूर, कारागीर, छोटे कंत्राटदार व इतरही छोट्या कामांमध्ये उत्तर प्रदेश येथील मजुरांचा समावेश असल्याचे दिसते. शारीरिक कष्टाची कामे करण्यासाठी येथील मजुरांचा सर्वाधिक समावेश आहे, याचे कारण म्हणजे प्राथमिक गरजा पूर्ण करण्याच्या अभाव, शिक्षणाचा अभाव यात प्राथमिक गरजांपासून वंचित असणाऱ्या लोकांचा समावेश होतो. महाराष्ट्रातसुद्धा खूप मोठी लोकसंख्या गरीब आहे, पण उत्तर प्रदेशातील अतिमागास वर्गातील लोकसंख्या याहीपेक्षा गरीब असल्याचे दिसते, म्हणून उत्तर प्रदेशातील अतिमागास, मागास वर्गातील लोकांना जीवन जगण्यासाठी मुंबई, दिल्ली, अहमदाबाद अशा शहरांमध्ये स्थलांतर करावे लागते.

नाशिक शहरातील द्वारका, गंजमाळ, भद्रकाली, शालीमार या ठिकाणी मुस्लिम धर्माचे लोक समुहाने राहतात. हिंदू धर्मीय लोक झोपडपट्टीत आपल्या प्रदेशातील तालुक्यातील तसेच गावाकडील व जातीतील व्यक्तींच्या संपर्काने राहतात. विविध जाती असल्या तरी धर्म, भाषा, आर्थिक परिस्थिती, कामाचे स्वरुप चालीरिती, प्रथापरंपरा थोड्या फार फरकाने सारख्याच असल्याने इतर व्यक्तींशी जुळवून घेणे शक्य होते. अगदी सहजरित्या अशी कुटूंबे सामावली जातात. अनुसूचित जातीतील महार असणाऱ्या व्यक्ती हिंदू धर्माबरोबरच बौद्ध धर्माचे पालन करतात. बौद्ध धर्माचे लोक पारंपारीक पद्धतीने मागच्या पिढयांनी हिंदू सण, उत्सव व धार्मिक प्रथा परंपरा पाळल्या आहेत. आंबेडकरांच्या प्रभावाने बौद्ध धर्माचे अनुसरण करतात. पण बौद्ध म्हणून कागदोपत्री उल्लेख नाही. शासनाचे तेव्हाचे व आताचे धोरण याला जबाबदार आहे. आरक्षणाची सवलत हि फक्त हिंदू असणाऱ्या लोकांनाच मिळेल. धर्मांतर केलेल्या लोकांना मिळणार नाही. मागच्या पिढ्यांनी हिंदू महार असेच कागदपत्रे नवीन पिढ्यांची तयार केली आहेत.

भटक्या विमुक्त जमाती नाशिक या शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये राहत आहेत. एकाच ठिकाणी राहून आपले पारंपरिक उद्योगांबरोबर इतर किरकोळ स्वरूपाच्या वस्तू बाजारात व शहरांमध्ये रस्त्याच्या कडेला विकताना दिसतात. काही भटक्या विमुक्त जमाती कायमस्वरूपी एकाच ठिकाणी झोपडपट्ट्यात वास्तव्यास राहिल्या आहेत. शेती क्षेत्राशी निगडीत कारागीर शेतमजूर व प्रत्यक्ष अल्पभुधारक शेतकरी कि ज्याचे रुपांतर

आता शेतमजूरामध्ये झाले आहे. त्याबरोबर शहरांचा आकार वाढल्यामुळे शहराच्या जवळ असणारी गावे ही उपनगरांत समाविष्ट झाली आहे. यात कोळी वाडे, आदिवासी वस्ती यांचा समावेश झोपडपट्टीत झाला आहे. अनुसूचित जातीत महार, मांग, चांभार तर अनुसूचित जमातीत महादेव कोळी, कोकणा, वारली ही कुटूंबे आहेत. इतर मागासवर्गात सुतार, माळी, गुरव, सोनार, लोहार, कुणबी मराठा, शिंपी, कासार, जिरेमाळी, गवळी, कुंभार, न्हावी यांचा समावेश आहे. खुल्या वर्गात मराठा, मुस्लिम, बौद्ध व इतर राज्यातील लोकांचा समावेश आहे. भटक्या विमुक्त जातीत वंजारी, घिसाडी, पंचाळ, कैकाडी, वैदू, लमाण बंजारा व वडारी या लोकांचा समावेश आहे. सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या जातीतील लोकांची संख्या सर्वाधिक आहे.

कुटुंबातील प्रथम नाशिक व मुंबई येथे येणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण दर्शविणारी सारणी

अ.क्र.	स्थलांतराचे कारण	वारंवारिता नाशिक	टक्केवारी नाशिक	वारंवारीता मुंबई	टक्केवारी मुंबई
१)	स्वत:	३४	३४	१५	१५
२)	वडील	२९	२९	३८	३८
३)	आजोबा	२३	२३	४२	४२
४)	नातेवाईक	११	११	५	५
५)	प्रतिसाद न देणाऱ्या व्यक्ती	३	३	०	०
	एकूण	१००	१००	१००	१०

नाशिक येथे स्वत: येणाऱ्या ३४%, वडील आल्याचे प्रमाण २९% व आजोबा आल्याचे २३% प्रमाण आहे. मुंबई येथे स्वत: १५%, वडील ३८% तर आजोबा ४२% असे आहे. म्हणजेच नाशिक येथे स्वत: येणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण जास्त आहे व मुंबईत हे प्रमाण कमी आहे व आजोबा येण्याचे प्रमाण जास्त आहे. कारण मुंबईत राहण्यासाठी जागा उपलब्ध नसणे, महागाई व लोकसंख्येची गर्दी इत्यादी कारणांमुळे स्वत: मुंबई येथे स्थलांतर करणाऱ्यांचे प्रमाण अतिशय कमी म्हणजे १५% आहे त्यामानाने मुंबईपेक्षा लहान शहरांमध्ये स्वत: येणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण जास्त आहे. कारण लहान शहरांमध्ये राहण्यासाठी जागा व रोजगार देखील उपलब्ध होतो व कुटुंबाला देखील सोबत आणता येते व कुटुंबासोबत राहता येते. अशा स्वत: येणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण नाशिक शहरात ३४% आहे. लहान शहरांमध्ये घराची उपलब्धता, झोपडीचे भाडे कमी असणे, महागाई कमी असणे, मोठ्या शहरांपेक्षा लहान शहरांमध्ये रोजगाराची उपलब्धता झाल्यामुळे लोक नाशिकसारख्या शहरांमध्ये स्थलांतर करतात. मागील १० ते २० वर्षांमध्ये स्थलांतर केलेली ही कुटुंबे आहेत.

कुटुंबातील वडील आल्याचे प्रमाण नाशिकमध्ये २९% आहे तर मुंबईमध्ये ३८% आहे, यावरून २० वर्षांपूर्वी मुंबईमध्ये अधिक स्थलांतर झाल्याचे स्पष्ट होते तर नाशिकमध्ये तुलनेने कमी स्थलांतर झाल्याचे स्पष्ट होते. कारण मुंबईमध्ये असणारी अधिक रोजगाराची उपलब्धता व जास्त वेतन किंवा मजुरी मिळत असल्याचे दिसते तर त्या तुलनेने नाशिकसारख्या शहरांमध्ये या काळात तुलनेने कमी रोजगाराची संधी उपलब्ध असल्याचे स्पष्ट होते. गेल्या वीस वर्षात नाशिकसारख्या शहरांचा व तालुक्यांचासुद्धा झपाट्याने विविध क्षेत्रात विकास झाल्याचे दिसते. लोकसंख्याही वाढली. रोजगाराची संधी, उद्योगधंदे, घरबांधणी उद्योग, रस्ते बांधणी व इतरही अनेक व्यवसाय, उद्योग भरभराटीला आले आहेत. त्यामुळे नाशिक शहरांमध्ये

स्थलांतर वाढले आहे.

२० ते ३० वर्षापूर्वीचा कालखंड म्हणजे १९९१ ते २००१ हा कालावधी १९९१ ला भारताने नवीन आर्थिक धोरण स्विकारले व खऱ्या अर्थाने २००१ नंतर त्याची प्रचिती यायला लागली. मोटार उद्योग व घरबांधणी, सेवाक्षेत्र, माहिती तंत्रज्ञान क्षेत्र भरभराटीला आली. अनेक परदेशी कंपन्यांनी रिटेल क्षेत्र, मोटार क्षेत्र, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू यात फोर व्हीलर, टू व्हीलर यांची उत्पादने बाजारात आणली. बँकांनी घरबांधणी उद्योगात बिल्डर तसेच घर विकत घेणाऱ्याला कर्जे देण्यास सुरुवात केली. बँकींग क्षेत्राचा विस्तार केला व शहरांमध्ये स्थलांतरचा वेग वाढला.

कुटुंबाची झोपडपट्टीतील वास्तव्याचे वर्ष दर्शविणारी सारणी

अ.क्र.	निवड करण्याची कारणे	वारंवारिता नाशिक	टक्केवारी नाशिक	वारंवारीता मुंबई	टक्केवारी मुंबई
१)	१ वर्षापेक्षा कमी	१	१	०	०
२)	१ ते ५ वर्ष	५	५	१३	१३
३)	६ ते १० वर्ष	८	८	१९	१९
४)	११ ते १५ वर्ष	५	५	१५	१५
५)	१६ ते २० वर्ष	४९	४९	२०	२०
६)	संपूर्ण जीवन	३२	३२	३३	३३
	एकूण	१००	१००	१००	१०

वरील सारणीवरून नाशिक येथे एक वर्षापेक्षा कमी वास्तव करणारे एक कुटुंब आहे व एक ते पाच वर्षांपर्यंत वास्तव्य करणारी कुटुंबे नाशिकमध्ये पाच तर मुंबईत १३ कुटुंबे आहेत. तर ६ ते १० वर्षांपासून नाशिकमध्ये ८ व मुंबईत १९ कुटुंबे आहेत. ११ ते १५ वर्षांपासून नाशिकमध्ये ५ तर मुंबईत १५, १६ ते २० वर्षापासून नाशिकमध्ये ४९ तर मुंबईत २० वर्ष व २० वर्षापेक्षा अधिक नाशिकमध्ये ३२ व मुंबईत ३३ कुटुंबे वास्तव्य करणारी आहेत. म्हणजेच १ ते ५ वर्षापासून मुंबईत व स्थलांतर कुटुंबाची संख्या स्थलांतर करणाऱ्या कुटुंबाची संख्या जास्त आहे. नाशिकमध्ये १६ ते २० वर्षांपासून राहणाऱ्या कुटुंबाची संख्या जवळपास ५०% आहे, तर मुंबईत ही संख्या २०% आहे. संपूर्ण जीवनभर वास्तव्य करणाऱ्या कुटुंबाची संख्या मुंबईत ३२% तर नाशिकमध्ये ३३% आहे. म्हणजेच २० वर्षापूर्वी मुंबई व नाशिकमध्ये स्थलांतर करणाऱ्या कुटुंबांचे टक्केवारीनुसार प्रमाण सारखे असल्याचे दिसते. म्हणजेच मुंबईत राहणाऱ्या सुविधेचा अभाव, प्रचंड महागाई व अतिरिक्त मनुष्यबळामुळे मुंबईत काम न मिळणे व आवश्यक ती कौशल्याची कामे मिळण्यासाठी राहिली आहेत. आजही ही कुटुंबे मोठ्या प्रमाणात झोपडपट्टीत भाड्याने घेतलेल्या झोपडीत राहत आहेत. ज्या कुटुंबांना झोपडी घेणे शक्य झाले, त्यांनी दोन पाच लाखापर्यंत एक ते दोन खोल्यांची झोपडी घोषित झोपडपट्ट्यांमध्ये घेतली आहे, तर अतिशय मोजके कुटुंब हे फ्लॅट किंवा रो-हाऊस कमीत कमी किंमतीला घेऊ शकली आहेत.

मुंबईमध्ये मात्र २० वर्षापूर्वी स्थलांतर करून रोजगारासाठी अप्रशिक्षित किंवा अशिक्षित कुटुंबे स्थलांतरीत झाली आहेत. त्यांना घोषित घोपडपट्टीत घर घेणे शक्य झालेले नाही तर फ्लॅट घेणे ही अतिशय अवघड बाब आहे, कारण मुंबईत झोपडपट्टीत भाड्याने झोपडी मिळणेसुद्धा अतिशय महत्त्वाचे समजले

जाते. मुंबईत कामाच्या ठिकाणी राहणे किंवा ओळखीच्या कुटुंबावरती कामाची व्यवस्था करणे व काही काळ या कुटुंबाचा राहण्यासाठी आधार घेणे किंवा रस्त्याच्या कडेला मोकळ्या जागेत रात्रभर राहणे या प्रकारे व्यक्तीला रहावे लागते. कुटुंब आणणे ही गोष्ट काही कालावधीनंतर शक्य होते. उत्तर प्रदेश, बिहार येथून रोजगारासाठी मुंबईत सातत्याने स्थलांतर होत असते. याचे कारण म्हणजे रेल्वेची स्वस्तातली प्रवासाची सुविधा, गावातील किंवा आपल्या भाषेची, नातेवाईक असणारी कुटुंबे असल्यामुळे मुंबईत स्थलांतर करणे सोपे आहे. तसेच मुंबई शहराचे असणारे आकर्षण, झोपडपट्टीत का होईना राहण्याची सोय होते. उत्तर प्रदेश बिहार येथील अगोदर आलेले मजूर हे विविध कामे शिकून घेतात व त्या कामाचा ठेका स्वस्तात घेऊन त्यासाठी लागणारे मजूर आपल्या गावाकडून आणतात. यामुळे आवश्यक ते मनुष्यबळ स्वस्तात उपलब्ध होते. अतिशय कमी मजुरीत या लोकांकडून ठेकेदार काम करून घेत असतात. अधिकाधिक कामे मिळविण्याकडे या लोकांचा कला असतो व पैसे मिळाल्यानंतर आपल्या गावाकडे काही रक्कम पाठविली जात असते. यामुळे गावाकडे असणाऱ्या आपल्या परिवाराच्या गरजा भागविणे शक्य होते. बालमजूर, स्त्रिया, लहान मुली यांच्याकडून रोजंदारीने कामे करून घेतली जातात. मुंबईसारख्या शहरात राहण्यासाठी एका खोलीचा वापर दिवस व रात्र या पद्धतीने केला जातो. दिवसभर खोलीमध्ये ८ ते १० लोक राहतात व ते रात्री कामावर गेल्यानंतर तेवढेच किंवा त्यापेक्षा जास्त मजूर एका रूममध्ये राहतात. शौचालयाची सोय ही सार्वजनिक ठिकाणी असते. सातत्याने स्थलांतरीत मजुरांची भर मुंबईत पडत असते, म्हणून मुंबईत अतिशय कमी जागेत जास्त लोक राहतात. मुंबईत २००१ मध्ये ५३% लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहत होती तर २०२१ मध्ये हे प्रमाण ४१% पर्यंत खाली आले आहे, कारण म्हणजे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून घोषित झोपडपट्टीतील कुटुंबांना घरे दिली जात आहेत व गेल्या २० वर्षात मुंबईत जमिनीची किंमत ही सर्वसाधारण व्यक्तींच्या आवाक्याबाहेरची आहे तर झोपडपट्टीत राहणाऱ्या व्यक्तींना किमान दुसरी पिढी येईपर्यंत वाट पहावी लागते. जर मुलांना चांगल्या पगाराची नोकरी मिळाली तर छोटा-मोठा व्यवसाय करता आला तर मुंबईच्या बाहेर दूरवर फ्लॅट घेणे शक्य होते. अन्यथा मुंबईत घर घेणे हे झोपडपट्टीतील मजुरी काम करणाऱ्या व्यक्तींच्या आवाक्याबाहेरचे आहे. मुंबईत जमिन माफीया किंवा भूमाफिया असा शब्द सर्वसाधारण लोक वापरत असतात.

मुंबईमध्ये भारतातील सर्वच राज्यांमधील लोक विविध कारणाने स्थलांतरीत झाली आहेत. यात गुजरातमधून आलेल्या कुटुंबांनी व्यापारातून खूप मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे व विविध व्यवसायातून

हे लोक स्थिर स्थावर झाले आहेत. तसेच केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश, राजस्थान, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल या राज्यांतून मुंबईत उच्च, मध्यमकुटुंबातील लोक उच्च शिक्षण असल्यामुळे नोकरीसाठी, उद्योग व्यवसायासाठी तसेच सिनेमामध्ये काम करण्यासाठी येत असतात. संगीत, नाटक, डिझायनर, फॅशन, जाहिरातींसाठी अशा अनेक प्रकारच्या प्रसिद्धीसाठी व स्वत:चे नाव सर्वदूर पोहोचविण्यासाठी सर्व प्रकारची कौशल्य आत्मसात करणे इत्यादीसाठी लोक स्थलांतर करत असतात, पण अशा लोकांकडे पैसा उपलब्ध असणे. चांगल्या व्यवसायातील नातेसंबंध, उच्च जातीतील नातेवाईक, धर्म, कुटुंब, शिक्षण यामुळे या स्तरातील लोकांना जीवन जगण्याचा प्रश्न मुंबईत राहत नाहीत तर स्वत:चे उज्ज्वल भविष्य, आवडीनिवडीसाठी, चैन करण्यासाठी, अधिक पैसा कमावण्यासाठी, दुसऱ्या देशात पर्यटन, नोकरी यासाठी स्थलांतर केले जात असते, अशा कितीही लोकांनी स्थलांतर केले तर शासन, प्रशासन, महानगरपालिका, उच्चस्तरातील लोक यांचा आरोग्याचा किंवा शासकीय यंत्रणेवर, शहरावर कोणताही अतिरिक्त ताण पडत नाही. सोयी-सुविधांवर ताण पडत नाही. त्याबाबत वर्तमानपत्र किंवा कोणीही ओरड करत नाही, पण मजुरांनी रोजगारासाठी स्थलांतर केले आणि ते झोपडपट्टीत राहिले, त्यांची संख्या वाढली तर शहराच्या सोयी-सुविधांवर, आरोग्य व्यवस्थेवर, कायदा सुव्यवस्थेवर, पर्यावरणावर ताण येतो, अशी ओरड जाणीवपूर्वक केली जाते व याला झोपडपट्टीतील लोकांना जबाबदार धरले जाते. कारण ते सामूहिकपणे या प्रस्थापित स्थिर झालेल्या समूहाला विरोध करू शकत नाही.

विविध भाषा बोलणारे, विविध प्रकारचे शिक्षण, कौशल्य असलेले लोक, मजूर म्हणून मुंबईत खूप मोठ्या प्रमाणात स्थलांतर करतात. तात्पुरत्या स्वरुपात रोजगार मिळवणे व कुटूंबाच्या गरजा पुर्ण करणे यातच संपुर्ण आयुष्य गेलेल्या व्यक्ती आहेत. त्याबरोबर झोपडपट्ट्यांमधील लोकसंख्या स्थलांतरितांमुळेही सातत्याने वाढत असते. ज्याप्रमाणे स्थलांतरीत कुटूंबाची संख्या वाढते त्याप्रमाणे नैसर्गिक पद्धतीनेही कुटूंबाचा आकार वाढत असतो. कुटूंबाच्या प्राथमिक गरजांमध्ये अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य याबरोबर मनोरंजनाची साधने, समाजात प्रतिष्ठा, मानसन्मान टिकवून ठेवणे. विविध कार्यक्रम, सण उत्सव समाजातील सहभाग या सर्व गरजा पुर्ण करण्यामध्ये येथील व्यक्तींची आयुष्य निघून जातात. वर्षानुवर्षे भाड्याच्या झोपडीतच काही कुटूंबांना रहावे लागते. अतिक्रमीत जागेवरील झोपड्यांना कधीही हटविण्याचा धोका कायम असतो. अशा वेळी आपली झोपडी पक्क्या स्वरुपात बांधता येत नाही. कारण झोपडीसाठीचा खर्च वाया जाण्याची शक्यता असते. या वास्तव्यामध्ये मानसिक ताण, तणाव व शारिरीक झीज होवून

प्रसंगी कर्त्या पुरुषाचा अगदी तरुण किंवा ३५ ते ४० व्या वर्षी देखील किरकोळ आजारामुळे किंवा अपघातामुळे मृत्यू होतो.

काही व्यक्तींचे विवाह होत नाही. कारण झोपडपट्टीत राहिल्यामुळे येथे मुलगी देणे धोक्याचे मानले जाते. कामधंदा मिळवणे, पैसे बचत करणे, स्वत:च्या पायावर उभे राहणे व नंतर विवाह करणे या सर्व प्रक्रियेत मुलांचे विवाहाचे वय ३५ ते ४० वर्षांपर्यंत होते. यामुळे कौटूंबिक जबाबदारी नको म्हणून देखील विवाह करणे टाळले जाते. कारण घरामध्ये एका किंवा दोन छोट्या खोल्यांमध्ये अधिक माणसे राहणे अशक्य असते. अशावेळी अविवाहित राहणेच अधिक फायदेशिर ठरते. भारतात शहरांमध्ये मुलींच्या विवाहाचे वय देखील वाढले आहे. कामधंदा करणे व शिक्षण याला महत्व दिले जाते. आंतरजातीय विवाहाचे प्रमाण मुंबईत अधिक आहे. कारण मुला-मुलींची आवड, यामुळे आंतरजातीय विवाह होतात. याला आई वडिलांचाही फारसा विरोध राहत नाही. कारण विवाहाचा खर्च, वर-वधू शोधणे या सर्व प्रक्रियांपासून आई वडिलांची व मुला - मुलींचीही सुटका होते. झोपडपट्टीतील जीवनमानाचा दर्जा, आर्थिक परिस्थिती, घरांची स्थिती या सर्व प्रक्रिया येथील लोकांनी स्विकारलेल्या असतात. शहरातील धावपळीचे जीवन, कलह या सर्व परिस्थितीचा स्विकार करण्याशिवाय पर्याय राहत नाही. झोपडपट्ट्यांमध्ये आरोग्याच्या समस्यांमुळे व घरांची असलेली दुरावस्था आजूबाजूची परिस्थिती, दुर्गंधी, यामुळे येथील लोकांना विविध आजारांना, साथीच्या रोगांना बळी पडावे लागते.

कुटुंब प्रमुखाच्या वडिलांचा पारंपरिक व्यवसाय दर्शविणारी सारणी

अ.क्र.	स्थलांतराचे कारण	वारंवारिता नाशिक	टक्केवारी नाशिक	वारंवारीता मुंबई	टक्केवारी मुंबई
१)	शेती	४	४	४५	४५
२)	शेतमजूर	३४	३४	१०	१०
३)	कारागीर व व्यवसाय	१५	१५	१३	१३
४)	प्रतिसाद न देणाऱ्या व्यक्ती	४७	४७	३२	३२
	एकूण	१००	१००	१००	१०

मुंबई शहरात राहणाऱ्या कुटुंब प्रमुखाच्या वडिलांचा शेती हा पारंपरिक व्यवसाय ४५% कुटुंबाचा आहे तर नाशिक शहरातील फक्त ४% कुटुंबाचा पारंपरिक व्यवसाय शेती आहे तर शेतमजूर असणारी कुटुंबे जास्त म्हणजे ३४% आहे तर मुंबईत हे प्रमाण १०% आहे. कारागीर व व्यवसाय असणारी नाशिकमध्ये १५% तर मुंबईत १३% कुटुंबे आहेत, तर प्रतिसाद न देणारी कुटुंबे नाशिकमध्ये ४७% आहेत तर मुंबईत ३२% आहेत. वडिलांच्या पारंपरिक व्यवसायात नाशिक शहरात स्थलांतर करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण फक्त ४% आहे. कारण शेती हा व्यवसाय असल्यामुळे व शेतीत आपल्या गरजा पूर्ण होत असल्यामुळे शेतकरी शहरात मजुरीसाठी स्थलांतर करत नव्हते. नाशिकमध्ये होणारे स्थलांतर हे शहराच्या जवळच्या खेड्यांमधून झालेले आहे, तर नाशिक शहरात शेतमजुरांनी स्थलांतर केल्याचे प्रमाण सर्वात जास्त ३४% आहे. म्हणजेच शेतमजुरीवर उदरनिर्वाह व आपल्या कुटुंबाच्या गरजा पूर्ण होत नाहीत. अल्प प्रमाणात शेतमजुरी मिळते तर शहरात मजुरी किंवा कंपनी व इतर खासगी व्यवसायात शेतमजुरीपेक्षा जास्त मजुरी किंवा दरमहा वेतन मिळते, म्हणून नाशिक शहराच्या जवळील गावे व तालुक्यांवरून शेतमजूर असणाऱ्या कुटुंबांनी स्थलांतर केले आहे. तसेच कारागीर व शेतीवर अवलंबून असणारे व्यवसाय बंद पडल्यामुळे १५% कुटुंबांनी नाशिक शहरात स्थलांतर केले आहे.

मुंबईतील कुटुंबात कुटुंब प्रमुखाच्या वडिलांचा पारंपरिक शेती व्यवसायातून ४५% कुटुंबांनी स्थलांतर केले, कारण शेतीतून येणारे अल्प उत्पन्न, कुटुंबांचा मोठा आकार म्हणून उदरनिर्वाहासाठी सर्वाधिक शेतीव्यवसायातून स्थलांतरीत झालेत. यात उत्तर प्रदेश, बिहार तसेच महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा येथील कुटुंबांचा समावेश होतो. कारण दुष्काळ, नापिकी यामुळे शेतीतून उत्पन्न येत नसल्यामुळे कुटुंबप्रमुखांच्या वडिलांना पारंपरिक व्यवसाय सोडून मुंबईत स्थलांतर करावे लागले. शेतमजूर १०% व कारागीर व इतर

व्यवसायातून १३% कुटुंबांनी मुंबईत स्थलांतर केले आहे. एकूण २३% कुटुंबे ही शेतमजुरी व शेतीशी निगडित व्यवसाय करत होते. या कुटुंबांनी शहरात कुटुंबाच्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी मुंबईत स्थलांतर केले आहे. मुंबईमध्ये मिळणारी मजुरी रोजंदारीने किंवा अंगमेहनतीच्या कामातून रोजगार उपलब्ध होतो व रोजगार पुरेसा नसला तरी जीवनावश्यक गरजा भागविण्याबरोबर काही पैशांची बचत करून कुटुंबासाठी गावाकडे पाठविली जाते तसेच मुलांचे शिक्षण, आरोग्य, कुटुंबाच्या आवडी-निवडी राहण्याचे ठिकाण घरभाडे यासाठी खर्च केला जातो. कपडे, खाण्या-पिण्याचे पदार्थ, किराणा व जीवनावश्यक इतर वस्तूंची खरेदी केली जाते. म्हणजेच मुंबईमध्ये चांगल्या पैकी रोजगार कामधंदा मिळाल्यामुळे मुंबईत स्थलांतर करणे सोयीचे ठरते. झोपडपट्ट्यांमध्ये, भाड्याची झोपडी घेऊन जास्त लोक राहतात. यात कुटुंबाबरोबर पत्नी, मुले-मुली, भाऊ व इतर नातेवाईक भावाची मुले, बहिणीची मुले राहतात. कुटुंबातील जास्त सदस्यांनी काम केल्यामुळे जास्त पैसे मिळतात, यातून कुटुंब प्रमुख मुलांच्या गरजांकडे लक्ष देण्याबरोबर कुटुंबासाठी झोपडपट्टीतील झोपडी घेण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच छोट्या-छोट्या व्यवसायातूनही पैसे मिळविले जातात. यात पाणीपुरी, भाजीपाला विकणे, पाववडा, चहाची टपरी, रिक्षा चालविणे, चादर बेडशीट, ब्लँकेट विकणे इत्यादी व्यवसायातून पैसे मिळविले जातात व आपले व कुटुंबाचे जीवनमान सुधारण्यासाठी कुटुंबाची प्रतिष्ठा उंचावण्यासाठी प्रयत्न केला जातो. गावाकडे वर्षातून किंवा सहा महिन्यातून एकदा जाणे, पैसे पुरविणे, विवाह समारंभ यासारख्या गोष्टींवर पैसे खर्च केले जातात. मुंबईमध्ये कितीही राहण्याची, आरोग्याची समस्या निर्माण झाली तरी या जीवनमानाशी रूळलेली कुटुंबे मुंबईत झोपडपट्टीत का होईना राहण्याचा प्रयत्न करत असतात, कारण रोजगार उपलब्ध होत असतो.

स्थलांतराचे कारण दर्शविणारी सारणी

अ.क्र.	स्थलांतराचे कारण	वारंवारिता नाशिक	टक्केवारी नाशिक	वारंवारीता मुंबई	टक्केवारी मुंबई
१)	दुष्काळ व नापिकी	१३	१३	२२	२२
२)	बेरोजगारी	३	३	२८	२८
३)	जातीय तणाव	७२	७२	४४	४४
४)	प्रतिसाद न देणाऱ्या व्यक्ती	१२	१२	०६	०६
	एकूण	१००	१००	१००	१००

दुष्काळ व नापिकी यामुळे नाशिक शहरात १४% व मुंबईमध्ये २२% कुटुंबांनी स्थलांतर केले आहे. म्हणजेच नाशिकमध्ये दुष्काळ व नापिकी यामुळे स्थलांतर करणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण मुंबईत स्थलांतर करणाऱ्या कुटुंबापेक्षा जास्त असल्याचे दिसते. उत्तरप्रदेश, बिहार येथून मुंबईत रोजगारासाठी येवून झोपडपट्टीत राहणारी कुटुंबे जास्त प्रमाणात असल्याचे दिसते. तसेच बेरोजगारीमुळे होणारे स्थलांतर मुंबईत २८% आहे तर जातीय तणावामुळे होणाऱ्या स्थलांतरचे प्रमाण सर्वाधिक ४४% आहे. म्हणजेच दुष्काळ, नापिकी बेरोजगारी, जातीय तणाव या कारणांबरोबर शिक्षणाचा अभाव, ग्रामीण भाग, रस्त्यांचा अभाव, वाहतुकीची सोय नसणे, शहरांशी रस्ते जोडलेले नसल्यामुळे संपूर्ण गाव हे शहरापासून जास्त दूर असते. यामुळे ग्रामीण भागाची शहरी भागाशी, बाजारपेठांशी जोडलेपणा नसल्यामुळे वरील समस्यांना येथील व्यक्तींना व कुटुंबांना सामोरे जावे लागते. मुलीच्या शिक्षणाचा अभाव व स्त्रियांच्या सर्व प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जाते. अतिमागासलेपण सामाजिक, सांस्कृतिक दृष्टीने वरिष्ठ जातींकडून होणारे शोषण, जमीन मालकी नसणे, वरिष्ठ जातीतील कुटुंबांचा जातीय दबाव यामुळे उत्तर प्रदेश, बिहार येथील कुटुंबे महाराष्ट्रात स्थलांतर करतात त्यात मुंबईमध्ये हे प्रमाण सर्वाधिक आहे. मुंबई, पुणे, नाशिक या शहरांमध्ये कष्टाची जवळपास ८०% कामे करणाऱ्यांमध्ये उत्तर प्रदेश, बिहार येथील मजुरांचा समावेश असल्याचे दिसते. कंपन्यांमध्ये शारीरिक कष्टाची कामे करण्यासाठी याच मजुरांचा उपयोग केला जातो. हे मजूर उपलब्ध झाले नाहीत तर सर्वच प्रकारची कष्टाची कामे थांबवावी लागतात. घरबांधणी व्यवसायात येथील मजूर तसेच गवंडी, पल्बर, स्टील बांधणी, इमारतीची सर्वच कामे या मजुरांकडूनच केली जात आहेत. उत्तर प्रदेशात या मजुरांच्या गावांकडे रोजगाराच्या अभावाबरोबर इतर अनेक सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक समस्या आहेत.

नाशिक शहरात सर्वाधिक स्थलांतर करणाऱ्या कुटुंबामध्ये महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा येथील शेतमजुरांचा, अल्प भूधारक शेतकरी व मागास जातीतील दलित व इतर मागासवर्गात येणाऱ्या कुटुंबांचा समावेश होतो. तसेच नाशिक शहरालगत असणारी आदिवासी गावे, दलितवस्त्या व नाशिक जिल्ह्यातील तालुक्यांमधील मजुरांचा समावेश होतो.

४.१.१० झोपडपट्टीतील मुलांच्या व्यसनाचे प्रकार :

नाशिक शहरात दारू पिणाऱ्या मुलांचे प्रमाण ६८% तर मुंबईत २४% आहे. जुगार खेळण्याचे प्रमाण नाशिकमध्ये २७% तर मुंबईत ४४% आहे. मटका खेळण्याचे प्रमाण नाशिकमध्ये २% तर मुंबईत ६% आहे, तर प्रतिसाद न देणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण नाशिकमध्ये ३% तर मुंबईत ६% आहे. म्हणजेच नाशिक शहरापेक्षा मुंबईत दारू पिणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण कमी आहे, याची अनेक कारणे आहेत. मुंबईत चांगले जीवनमान जगण्याकडे असणारा कल, मुलांवर आपल्या व्यसनाचा वाईट परिणाम होऊ नये याबद्दल पालकांची असणारी जागृतता, झोपडपट्टीतील इतर कुटुंबियांचा असणारा विरोध, झोपडी भाड्याने असल्यामुळे घर मालक झोपडीतून काढून देण्याची शक्यता असते. घरमालकाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न तसेच सामाजिक दबावाबरोबर व्यसनासाठी होणारा व्यर्थ खर्च, मुलांनासुद्धा कायमस्वरूपी व्यसन करणे आवडत नाही. स्वत:च्या विकासाकडे लक्ष देणे चांगल्या आवडी-निवडी जोपासणे व एकूण स्वत:च्या व्यक्तिमत्त्व विकासाकडे देण्यात येणारे लक्ष, शिक्षणाचा प्रभाव व मुंबईतील जीवनातील गतिशीलता, आजूबाजूला असणाऱ्या कार्यसंस्कृतीचा प्रभाव, सतत काहीतरी नवीन गोष्ट शिकणे किंवा आत्मसात करणे, फिल्म इंडस्ट्रीजचा प्रभाव या कारणांमुळे मुंबईतील झोपडपट्टीतील मुले दारू पिण्यासारखे व्यसन करण्याचे प्रमाण कमी आहे. येथील मुलांच्या मनावर शहरातील कार्यसंस्कृती, उच्च जीवनशैली राखण्याचा प्रभाव पडलेला दिसतो. आपली प्रतिमा खराब होऊ नये. तसेच शहरातील या मुलांचे काम करण्याच्या ठिकाणाचा प्रभावदेखील महत्त्वाचा असतो. मुंबईतील झोपडपट्ट्यांतील मुलांमध्ये कमालीचा बदल झालेला दिसतो. मुंबईसारख्या महानगराची जीवनशैली येथील प्रत्येक व्यक्तीला कोणते ना कोणते कार्य करण्यास आपोआपच प्रोत्साहित करत असते. येथे मुले अनेक गोष्टी निरीक्षणाने, अनुभवाने, इतरांच्या संपर्कात शिकतात. संभाषण कौशल्य, ज्ञान अवगत करणे, व्यवहारीक दृष्टिकोन जोपासणे, यासारखे वैज्ञानिक विचार व सत्य परिस्थितीला सामोरे जाण्याचे कौशल्य जोपासतात. येथील मुलांना सहजपणे अनेक कौशल्य येत असतात. फिल्म इंडस्ट्रीचे सर्वात जास्त आकर्षण बालपणापासून या मुलांमध्ये असते. यातूनच फिल्म इंडस्ट्रीमध्ये कुणाच्या ओळखीने वेगवेगळी कामे येथील मुले करतात. मुलीही फिल्म इंडस्ट्रीजच्या गोष्टी आत्मसात करतात. मुलांना, स्त्रियांना अनेक प्रकारच्या संधी उपलब्ध असल्यामुळे विविध प्रकारची कामे, नोकऱ्या, छोटे व्यवसाय करता येतात व स्वत:च्या मनाप्रमाणे जीवन जगता येते.

नाशिक शहरातील झोपडपट्टीतील मुलांमध्ये व्यसनाचे प्रमाण जास्त दिसून आले आहे, याचे कारण

म्हणजे कामाची उपलब्धता न होणे, काम करण्यासाठी प्रोत्साहन देणारे घटक नसणे, कंपनीमधील कामे जास्त वेळ करणे, अंगमेहनतीची कामे असणे, मुलांनाही पालकांकडून कामासाठी दबाव नसणे, खूप मोठ्या महत्त्वाकांक्षा नसणे, आपल्याकडून कोणतेही काम होणार नाही, आपल्याला कामाची संधी मिळणार नाही, आपले शिक्षण नाही, इतरांकडून मानसन्मान मिळणार नाही, अशी नकारात्मकतेची भावना तयार होते व आळशीपणा येत असतो. जास्त वेळ काम करूनसुद्धा मिळणारा मोबदला अतिशय कमी असतो., त्यात आपल्या गरजा व कुटुंबाच्या गरजा पूर्ण होत नाहीत. यामुळे नैराश्याची भावना मुलांमध्ये निर्माण होते व मुले हे नैराश्य कमी करण्यासाठी, टाईमपास करण्यासाठी, झोपडपट्टीतील जीवनाचा विसर पडण्यासाठी इत्यादी कारणांमुळे व्यसनाकडे छोट्या-छोट्या गुन्हेगारी कृत्यांकडे वळत असतात. नाशिक शहरातील झोपडपट्टीतील मुले नियमित काम करत नाही. आठ ते दहा तास किंवा बारा तास काम करणे म्हणजे शिक्षा आहे. कमीत कमी वेळेत जास्त पैसे मिळविण्यासाठी मार्ग शोधले जात असतात. नियमित काम करण्याची सवय या मुलांना नसते. शाळा बाह्य झाल्यामुळे त्यांचा रिकामा वेळ हा टीव्ही पाहणे, स्वतंत्रपणे इतरत्र भटकणे, शहरातील जे डोळ्यांना चांगले दिसेल, अशा बाजारपेठांमधून फिरणे, शहरातील उंच इमारती, गाड्या, कपडे, वरच्या वर्गातील लोकांची जीवन जगण्याची पद्धत, ऐशोआरामी जीवन पाहिले जाते व आपल्या वाट्याला आलेले दारिद्र्याचे जीवन, शिक्षणासाठी चांगली शाळा नसणे, कपडे नसणे, खाण्या-पिण्याचे पदार्थ चांगले नसणे, चांगल्या इमारतीतील घर नसणे, इतर मुलांसारखे कपडे, गाडीमध्ये फिरणे, चांगल्या आवडी-निवडी जोपासणे या गोटी प्रत्यक्ष पाहिल्यामुळे आपल्या कुटुंबाविषयी व स्वत:विषयीदेखील लाजीरवाणे जीवन जगत असल्याचे वाटत असते. जीवनाविषयी असणारे कुतूहल हळूहळू कमी होत जाते. भरपूर पैसा कमविणे म्हणजे चांगले जीवन जगता येते. यात आपल्या सवयी, आवडी-निवडी यांना दुय्यम स्थान दिले जात असते. शासकीय नोकरी, शिक्षण नसल्यामुळे मिळू शकत नाही. या स्पर्धेत आपण उतरूच शकत नाही, कारण तेवढे शिक्षण नाही म्हणून आपल्या वाट्याला पुढे काय येणार आहे, याची ओळखही या मुलांना होत असते, यातून अधिकाधिक नैराश्य येते. विचलित स्वरूपाचे वर्तन करण्याकडे या मुलांचा कल निर्माण होत असतो. शहरातील लग्न समारंभामध्ये जेवण बनविणे, वाढणे, भांडी धुणे, मंडप उभारणे, तो काढणे, अशी कामे रोजंदारीच्या स्वरूपात केली जातात. यात विशेष म्हणजे येथे लग्नसमारंभामध्ये काम करण्यासाठी आलेल्या मुलांना व स्त्रियांना जेवण मिळते, यात गोड पदार्थ मिळतात, जेवण भरपूर मिळते व उरलेले पदार्थ घरीदेखील स्त्रियांना नेता येतात, हा एक या मुलांसाठी आनंदाचा प्रसंग असतो, अशी लहान-

मोठी मुले-मुली, स्त्री-पुरुष या लग्न समारंभाच्या कामासाठी तयार असतात. मिळणारा रोज हा २०० ते ५०० रुपयांपर्यंतचा असतो. तसेच विवाह प्रसंगामध्ये बॅण्ड बाजविणे हे देखील काम उपलब्ध होते. पण नियमित स्वरूपाच्या कामांसाठी मुले तयार होत नाहीत, यात मालक कामावरून काढतो किंवा सुट्टी नसल्यामुळे काही कालावधीनंतर मुले काम सोडून देतात. कामातील तोचतोचपणा, दुसऱ्याच्या हाताखाली काम करणे, अपमानास्पद वागणूक मिळणे, मालकाकडून वेळेवर पगार न देणे, नाशिकमध्ये औद्योगिक क्षेत्रात असणाऱ्या झोपडपट्टीतील काही मुले कंपन्यांमध्ये नियमित काम करत असतात व काही मुले मात्र जास्त पैसे कमविणे, मजा करणे, आई-वडील-बहीण भाऊ काम करतात, म्हणून स्वत: काम न करणे, झोपडपट्टीतील इतर मुलांच्या संगतीत रिकामे फिरणे, राजकारणातील विषयांवर बोलणे, राजकीय व्यक्तीशी ओळख करणे, याला महत्त्व देतात, यातून मुलांमध्ये आपल्या पाठीशी राजकीय व्यक्ती आहे, असे वाटते व मुले छोट्या-मोठ्या गुन्ह्यांकडे वळतात. इतर झोपडपट्टीतील मुलांशी ओळख करणे व नंतर भांडणे करणे असे प्रकार केले जातात. यातून मुलांमध्ये आपसात असणारी छोटी भांडणे देखील मोठी होऊन त्यात इतर मुलांना दाखविण्यासाठी स्वत: काहीतरी वेगळे करणे व डेरिंगबाजपणा करणे, दुसऱ्याला जखमी करणे यात काही वेळा मुले मरतात तर कधी-कधी जाणीवपूर्वक इतर मुलांच्या सांगण्यावरून किंवा अन्य कारणांनी खूनही केले जात असतात. नाशिकमध्ये असे प्रकार मधून-मधून झोपडपट्ट्यातून होत असतात व यातूनच दुसऱ्या मुलांचा बदला घेण्यासाठी टोळी करून हाणामाऱ्या केल्या जातात व तरुण मुलांचे खून होतात.

व्यसनांच्या सवयीतून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले जाते व पुढे या मुलांमध्ये निर्ढावलेपण येते व खुनासारखे प्रकार होतात. यात किरकोळ कारणावरून देखील भांडणे होतात व भांडणांचे पर्यावसन खुनांमध्ये ही होत असते, याची कारणे म्हणजे आर्थिक विवंचना, मागासलेपणा, मानसन्मान, प्रतिष्ठा जोपासण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गरजा पूर्ण न होणे, या उद्विग्नेतून गुन्हेगारी स्वरूपाची कृत्य होतात. झोपडपट्टीतील कुटुंबांमध्येही किरकोळ कारणांवरून भांडणे होतात. स्त्रियांमध्ये अशी भांडणे होत असतात. खूप मोठ्या प्रमाणात नाशिक शहरातील झोपडपट्ट्यांमधून स्वत:च्या झोपडीतून इतर ठिकाणी फ्लॅट, रो-हाऊस तसेच जागा घेऊन घर बांधणे, येथील लोकांनी पसत केले आहे व झोपडपट्टीतून बाहेर पडत आहेत. झोपडपट्टीत मुलांचे वर्तन बिघडते. त्यांच्या सवयी वाईट होतात. त्याचा आपल्या मुलांवर-मुलींवर परिणाम होऊ नये म्हणून इतरत्र राहण्याला पसंती दिली जाते. फ्लॅट, रो-हाऊस, जागा घेऊन घर बांधणे येथे शौचालयाची स्वत:ची उपलब्धता होते. मोकळ्या हवेत घर असते. पाण्याचा स्वत:चा नळ असतो. प्रत्येक

सदस्याला चांगले जीवन जगता येते, काम अगोदरचेच असले तरी राहणीमानाचा दर्जा उंचावतो यामुळे आजारांचे प्रमाणही कमी होते व शहरात येऊन आपण सुधारणो आहोत, याचाही आनंद होत असतो.

नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासीयांचे आर्थिक जीवन -

प्रस्तावना :- रोजगार उपलब्ध होण्याचे प्रमाण शहरांमध्ये अधिक आहे म्हणून तेवढ्या प्रमाणात झोपडपट्ट्या वाढतात. अतिशय गरीब लोक येथे राहतात व असंघटीत व्यवसाय, उद्योगात काम करतात. रोजगारवाढीमुळे आर्थिक वाढ होते व उत्पन्न वाढते. त्यामुळे गरिबी निर्मुलन व झोपडपट्टी निर्मुलन होते. कौटुंबिक स्थितीवर रोजगाराच्या दर्जाचा प्रभाव होत असतो. जास्त लोक हे बिगर कौशल्य असणाऱ्या व्यवसायात असतात. रोजगार नसणाऱ्या लोकांची संख्या अधिक असते. यात स्त्रियांपेक्षा पुरुषांचे प्रमाण अधिक असते. साहजिकच रोजगार नसल्यामुळे या लोकांच्या उत्पन्नात कपात होते. उत्पन्नाचा परिणाम कुटुंबाच्या प्रत्यक्ष जीवन जगण्याच्या गुणवत्तेवर होतो. दरमहा येणारे उत्पन्न हे कुटुंबाचे जीवनमान ठरवत असते. आर्थिक घटकाचा परिणाम कुटुंबाच्या जीवन जगण्याच्या स्थितीवर होतो. आर्थिक घटकामुळे कुटुंबाचा जीवन जगण्याचा दर्जा सुधारतो. शिधा पत्रिका हि येथील लोकांसाठी महत्वाची असते. शिधा पत्रिकेचे दोन प्रकार आहेत. एक अंत्योदय कार्ड व बी.पी.एल. कार्ड हे आहेत. गरीब असण्याचा हा एक महत्वाचा पुरावा आहे. झोपडपट्टीतील सार्वजनिक सेवा तसेच येथील वातावरण ह्या कारणांबरोबर येथील सामाजिक व आर्थिक कारणांमुळे दारिद्र्य आहे. कारण रोजगार मिळत नाही.

आर्थिक संधीमुळे शहरात झोपडपट्ट्यांची वाढ झाली आहे. जीवनमान व प्रतिष्ठा उंचावण्याच्या अपेक्षांची पुर्तता करण्यासाठी लोक शहरात स्थलांतर करतात व शहरातील महत्वाचा घटक म्हणून झोपडपट्ट्या आहेत. शहरात स्थलांतरीत लोकांना राहण्याच्या मुलभूत सेवा सुविधा मिळत नाही. म्हणून झोपडपट्ट्रीत राहण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नसतो. झोपडपट्टीवासीयांचा आर्थिक बाजूने शहरी समुदायाशी अनौपचारीक व घनिष्ठ संबंध येत असतो. बाजारात सेवा पुरवण्याचे काम झोपडपट्टीवासीय करतात. तसेच काही उद्योग, औपचारीक आर्थिक संस्था यांचा यात महत्वपुर्ण सहभाग असतो. सेवा पुरविण्याबरोबर स्वत: उपभोक्ता वर्ग म्हणूनही झोपडपट्टीवासीय महत्वाचा घटक आहेत. घरोघरी सेवा पुरविण्याचे काम हे लोक करतात. येथील गरीब लोक अनौपचारीक क्षेत्रातील आर्थिक घडामोडीत सहभागी असतात व शहरातील आर्थिक व्यवस्थेत महत्वाची भूमिका पार पाडतात. भाजीपाला विकणे, फळे विकणे तसेच संपुर्ण शहरात स्वच्छता राखणे यात महानगरपालिका स्वच्छता विभागाअंतर्गत व कंत्राटीपद्धतीने कामे करतात. रिक्षा चालविणे, कपडे धुणे,

इस्तरी करणे, दुध व्यवसायात काम करणे, घरोघर भांडी, कपडे विकणे, विवाह समारंभामध्ये संगीत, वाद्य वाजवणे, मार्केटमध्ये भाजीपाला, धान्य यांच्या गाड्या भरण्याचे उतरविण्ययाचे काम करतात. काही लोक कापड उद्योग, रेल्वे स्टेशनमधील गुदामांमध्ये काम करतात. अशा अनेक सेवा येथील लोक शहरी समुदायाला पुरवितात व एका विस्तृत समाजाचे सदस्य म्हणून त्यात सहभागी होतात. विविध सेवांच्या माध्यमातून उच्च जातीतील लोकांबरोबरचे संबंध तयार होतात. झोपडपट्टीतील लोक कौटूंबिक व खाजगी सेवा पुरवितात. त्याबरोबर प्रत्येक झोपडपट्टीची स्वत:ची वेगळी ओळख असते. भांडे बनविणे, कंपनी कामगार, विविध वस्तु बनविणे, गृहउद्योग चालविणे इ. महिलांचाही अशा कामांमध्ये मोठा सहभाग असतो.

सहकारी पतसंस्था आणि बँका आपल्या सेवा येथे पुरवितात. त्यात गरीब असणाऱ्या तसेच छोटे व्यवसाय करणारे, रिक्षाचालक यांना कर्जपुरवठा करतात व झोपडपट्टीवासीयांना आपले जीवन बदलण्याची संधी निर्माण करुन देतात. अनेक सामाजिक आर्थिक व राजकीय संघटना झोपडपट्टीवासीयांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करतात. पण त्याचा फायदा घेण्यासाठी येथील लोक पुरेसे सक्षम नसतात.

अमर्त्य सेन यांच्या मते सामाजिक, आर्थिक व्यवस्थेत शिक्षण, आरोग्य स्वास्थ्य आणि आरोग्याच्या सुविधा यांचे महत्वपुर्ण योगदान असते. तर राजकीय अधिकारात शासकीय धोरणांची सार्वजनिक चर्चा महत्वपुर्ण असते. गरीबी हा आर्थिक विकासातील अडथळा आहे. यात आर्थिक विकासाची संधी ही सामाजिक व्यवस्थे अंतर्गत निर्माण होत असते. येथील लोकांना सार्वजनिक सुविधा उपलब्ध करुन देण्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले जाते यात राजकीय शक्तीचा अधिक सहभाग आहे. अधिकाधिक लोकसंख्या ही मुलभूत स्वातंत्र्यापासून वंचितच असते आणि ही वंचितता आर्थिक घटकाशी जोडलेली आहे. यामुळे अधिकाधिक लोकसंख्या ही आपल्या प्राथमिक गरजा पुर्ण करु शकत नाही. यात भुकबळी, कुपोषण आरोग्याच्या गरजा आर्थिक घटकाच्या अभावामुळे पुर्ण करु शकत नाही. घराची सुविधा, स्वच्छ पाणी, स्वच्छता या गरजा पुर्ण करु शकत नाही, यामुळे प्रत्यक्षपणे मानवी स्वातंत्र्यापासून वंचित ठेवले जातात. शासनाकडूनच प्रत्यक्षपणे मानवी अधिकारांपासून या लोकांना वंचित ठेवले जाते. विकास हा लोकसंख्येला मिळालेल्या पुर्ण स्वातंत्र्यावर व स्वयंपुर्णतेवर अवलंबून असतो. आपल्या इच्छा, आकांक्षा पुर्ण करण्यासाठी मिळणाऱ्या स्वातंत्र्यावरच विकास अवलंबून असतो. विकास करण्यासाठी व्यक्तींना पुर्ण स्वातंत्र्य मिळाले तरच व्यापक स्वरुपात ती व्यक्ती आपला विकास करु शकते. व्यक्तीगत स्वातंत्र्य आणि सामाजिक विकास यांचा घनिष्ठ संबंध आहे. समाजाच्या सामाजिक, राजनितिक आणि आर्थिक जीवनावर निरंकुश शासन व्यवस्था राजनितीक किंवा

सामाजिक स्वातंत्र्याचे शोषण करत असते. प्रत्येक कुटूंबाची राहणीमानाची पातळी ही त्याला मिळालेल्या रोजगारावर अवलंबून असते. समाजातील दर्जा, प्रतिष्ठा, मुलांचे शिक्षण, इतर आवडी-निवडी राहण्याचे ठिकाण या सर्वच प्रकारच्या गरजा भागवणे हे रोजगारावर अवलंबून असते. म्हणून शहरांमध्ये झोपडपट्टीवासीयांना मिळेल त्या रोजगारावर जीवन जगावे लागते. यातून स्वत:ची परिस्थिती व जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने कष्ट करण्याची तयारी असते. शहरात स्थलांतराचा उद्देश म्हणजे रोजगार व चांगले जीवन जगण्यास मिळणे हा असतो. कमी शिक्षण असलेल्या लोकांना रोजगार मिळतो. पण त्यातून अतिशय कमी पैसे मिळत असल्यामुळे शहरातील महागाई, घरभाडे व इतर गरजा भागवणे शक्य होत नाही. तरी देखील आहे तो रोजगार टिकवून ठेवण्याकडे या लोकांचा कल असतो. म्हणून प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात त्याचा रोजगार व मिळणारे उत्पन्न हे अतिशय महत्वाचे असते.

अनौपचारीक क्षेत्रात रोजगाराचे स्वरुप अपुरे आणि हंगामी स्वरुपाचे असते. त्यामुळे एकापेक्षा जास्त कामे स्विकारण्याकडे लोकांचा कल असतो. लोक एकापेक्षा जास्त मालकाकडे काम करतात. असघटीत क्षेत्रात काम करणाऱ्यांना कायदेशिर संरक्षण मिळत नाही. कामातील विखुरलेपणामुळे संघटीत होणे अवघड बनते. कायदेशीर संरक्षणाचा अभाव, काम मिळणे सर्वस्वी मालकांच्या मर्जीवर, काम करणाऱ्या लोकांची सतत वाढती संख्या, या साऱ्या घटकांमुळे शोषणाविरुद्ध लढण्ययासाठी असंघटीत क्षेत्रातील लोकांचे संघटन घडविणे अवघड बनते. तसेच मजूरांच्या वाढत्या संख्येमुळे ग्रामीण विस्थापित अनौपचारीक रोजगारांच्या तुटपुंज्या संधीसाठी एकमेकांशी स्पर्धा करावी लागते. त्यामुळे प्रत्यक्षात सारखे हितसंबंध असूनही त्यांच्यात शत्रूत्वाचे नाते तयार होते आणि प्रस्थापित व्यवस्थेला त्यांच्यातील स्पर्धेचा फायदा उठवता येतो. कचरा, भंगार वेचणाऱ्यांना अनेक आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागते. भंगार वेचण्यासारखी कामे करणाऱ्या लोकांना श्रमिकांचा दर्जाही प्राप्त होत नाही. समाजाला उपयुक्त कामे हे घटक करीत असतात. तरी देखील इतर समाजाकडून सातत्याने हेटाळणी, संशयाची वागणूक त्यांना अनुभवायला मिळते. शहरी अर्थव्यवस्थेला आवश्यक असणारे काम हे घटक करत असले तरी राज्यसंस्था या घटकांची कोणतीही जबाबदारी स्विकारण्यास तयार नसते. यामुळे अतिशय असुरक्षित परिस्थितीत असे घटक काम करत असतात. मानवी जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान गरजेचे मानले गेले पण त्याचा उपयोग शहरातील सक्षम, सुशिक्षित वर्गानेच घेतला. औद्योगिक उत्पादनात आधुनिक तंत्रज्ञान स्विकारुन श्रमाचा वापर कमी करण्याची धोरणे स्विकारल्यामुळे बेकारी वाढण्याचे प्रमाण वाढले.

महिलांच्या कामाचा प्रकार दर्शविणारी सारणी

अ.क्र.	महिलांच्या कामाचा प्रकार	वारंवारिता	टक्केवारी नाशिक	वारंवारीता	टक्केवारी मुंबई
१)	घरकाम	३७	३७	७४	७४
२)	बाहेरील धुनी भांडी व साफसफाई	२८	२८	६	६
३)	बाहेरील स्वयंपाक	२	२	३	३
४)	भाजीपाला विकणे	२	२	४	४
५)	कंपनीतील कामे	६	६	८	८
६)	इतर कामे	२५	२५	५	५
	एकूण	**१००**	**१००**	**१००**	**१००**

नाशिक शहरात बाहेरील धुणी-भांडी व साफसफाई करणाऱ्या महिलांचे प्रमाण २८%, बाहेरील स्वयंपाक २%, भाजीपाला विकणे २%, कंपनीतील कामे ६% व इतर कामे २५% व घरकाम ३७% महिला करतात. तर मुंबईमध्ये बाहेरील धुणी-भांडी व साफसफाई करणाऱ्या महिलांचे प्रमाण ६%, बाहेरील स्वयंपाक ३%, भाजीपाला विकणे २%, कंपनीतील कामे ८% व इतर कामे ५% व घरकाम ७४% महिला करतात. मुंबईमध्ये गृहउद्योगात काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण जास्त आहे. यात लोणची, पापड व इतर खाद्यपदार्थ बचतगटाकडून किंवा कंपनीकडून केले जात असतात. वस्तुंची पॅकिंग करणे, कपड्यांवर डिझाईन करणे ही कामे घरीच वस्तुंच्या मागे विशिष्ट रक्कम देऊन केली जातात. तसेच धुणी-भांडी व स्वयंपाक करणाऱ्या महिलांचे प्रमाणही जास्त आहे. तसेच दुकाने, हॉटेल, ऑफिस, कंपनीतील वस्तु बनविण्यासाठीची कामे, शाळा, महाविद्यालय येथे शिपाई, साफसफाई या प्रकारची कामे केली जातात व छोटे व्यवसाय करतात. मुंबईत ७४% महिला स्वत:च्या घरातील कामे करतात असे असले तरी सर्वच महिलांना स्वत:च्या घरातील स्वयंपाक, धुणी-भांडी करावी लागतात. नाशिक शहरात कमी अधिक प्रमाणात वरील प्रकारची कामे स्त्रिया करतात. पण नाशिकमध्ये स्त्रियांसाठी उपलब्ध होणारी कामे कमी आहेत तर मुंबईत वरील कामांना जास्त मोबला मिळत असतो म्हणून दोन शहरांमधील कामाची उपलब्धता, संधी व मिळणारी मजूरी यात मोठी तफावत आहे. तसेच मुंबईत महागाईचे प्रमाण, घरभाडे व सर्वच सेवांवर होणारा खर्च जास्त आहे. पण कामाच्या होणाऱ्या उपलब्धतेमुळे इतर समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते. मुंबईमध्ये स्त्रियांना तेथील कार्यसंस्कृतीमुळे काम करण्याची मुभा मिळते. सामाजिक दबाव, पती व इतर नातेवाईकांकडून कमी होतो.

शासनाने घरासाठी जागा उपलब्ध करून दिल्यास येथून जाण्याची कारणे दर्शविणारी सारणी

अ.क्र.	जाण्याचे कारण	वारंवारिता	टक्केवारी नाशिक	वारंवारीता	टक्केवारी मुंबई
१)	स्वत:चे घर	४९	४९	४८	४८
२)	राहण्यासाठी जास्त जागा	५	५	१६	१६
३)	सोयी सुविधांमध्ये वाढ	१४	१४	२४	२४
४)	राहणीमानाच्या दर्जात सुधारणा	५	५	७	७
५)	नाही म्हणणारे	२७	२७	५	५
	एकूण	**१००**	**१००**	**१००**	**१००**

वरील सारणीवरुन नाशिक शहरात स्वत:चे घर ४९%, राहण्यासाठी जास्त जागा ५%, सोयी सुविधांमध्ये वाढ १४%, राहणीमानाच्या दर्जात सुधारणा ५% व नाही म्हणणारे २७% कुटूंबे आहेत. तर मुंबई शहरात स्वत:चे घर ४८%, राहण्यासाठी जास्त जागा १६%, सोयी सुविधांमध्ये वाढ २४%, राहणीमानाच्या दर्जात सुधारणा ७% व नाही म्हणणारे ५% कुटूंबे आहेत.

शासनाने जागा उपलब्ध करुन दिल्यास झोपडपट्टीतून जाण्यास नाशिकमध्ये ७३% कुटूंबांनी सहमती दर्शवली तर मुंबईत ९५% कुटूंबांची सहमती आहे. जी कुटूंबे नाही म्हणणारी आहेत त्याची कारणे म्हणजे झोपडपट्टीत त्यांचा असणारा व्यवसाय व जवळच असणारे कामाचे ठिकाण हे आहे. येथे असणारे किराणा दुकान, भाजीपाला, चिकन, मटन व इतर किरकोळ स्वरुपाची दुकाने ही झोपडपट्टीतील लोकांसाठीच चालवले जात असतात. शासनाने घर, फ्लॅट किंवा जागा उपलब्ध करुन देण्यामध्ये संबंधित कुटूंबाला स्वत:चे घर मिळणे, तसेच राहण्यासाठी जास्त जागा उपलब्ध होते. स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, लाईट, सांडपाण्याची सुविधा व घरातील सुरक्षितता इत्यादी कारणांमुळे येथील कुटूंबाचा जीवनमानाचा व आरोग्याचा दर्जा सुधारण्यास मदत होते. मुंबई व नाशिक शहरात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून इ. स. २००० सालापर्यंतच्या झोपडीधारकांना घरांचे वाटप करण्यात येत आहे. असे असले तरी अजून संपुर्ण शहर झोपडपट्टी मुक्त होण्यासाठी पुढील ३० ते ४० वर्षांचा कालावधी जावू शकतो. मुंबईत अजून ४१% कुटूबे म्हणजे जवळपास पन्नास लाख कुटूंबे झोपडपट्टीत राहत आहेत. तर नाशिकमध्ये चाळीस हजार कुटूंबे झोपडपट्टीत राहत आहेत. ज्या झोपड्या अनाधिकृत आहेत अशा झोपडीधारकांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा लाभ देण्याची तरतूद नाही. कारण ते अनाधिकृत मानण्यात आले आहेत. इ. स. २००० सालानंतर महाराष्ट्र शासनाने कोणत्याही झोपडपट्ट्यांना शासन मान्यता दिलेली नाही व अशा झोपडीधारकांची संख्या नाशिक शहरात अधिकृत झोपडीधारकांपेक्षा जास्त आहे.

मुंबईमध्ये एकाच घरातील झोपडीमध्ये कुटूंबातील जास्त लोकांनी स्वतंत्र रेशन कार्ड बनवून घेतली

आहेत. याचे कारण म्हणजे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून स्वतंत्र फ्लॅट मिळण्यासाठी एकाच झोपडीत दोन, तीन व चार कुटूंबे राहत असल्यामुळे प्रत्येक कुटूंबासाठी स्वतंत्र फ्लॅट विकासकाकडून मिळावा ही अपेक्षा असते. मुंबईत जमीनींचे असणारे भाव तसेच व्यवसायाचे ठिकाण असल्यामुळे झोपडी कितीही छोटी असली तरी राहण्यासाठी जागा मिळत असते. तसेच एकावर एक झोपडी उभारुन स्वत:च्या कुटूंबासाठी तसेच भाड्याने झोपडी दिली जाते. यातून पाच ते दहा हजार रुपये झोपडीचे भाडे मिळते. तसेच झोपडीधारकांना आपल्या झोपडीची जागा कितीही छोटी असली तरी मुंबईत विकासकाकडून किंवा झोपू योजनेतून किमान २६९ फुटाचे घर मिळणार आहे. काही झोपडीधारक झोपडपट्टी विकासासाठी विरोध करतात. कारण त्यांची स्वत:ची जागा राहिल्यास तिथे पक्के घर बांधून त्यावर आणखी मजले तयार करुन उत्पन्न मिळवता येते. विकासकाला दिल्यास फक्त एकच फ्लॅट मिळतो व झोपडीचे भाडे मिळण्याचे बंद होते व अधिकचे फ्लॅट मिळत नाहीत. तसेच इमारतीमध्ये अधिक वरच्या मजल्यावरती फ्लॅट मिळाल्यास व्यवसाय उद्योग करण्याला संधी मिळत नाही. घरभाडे मिळत नाही व व्यवसाय देखील बंद होतो. म्हणून काही झोपडपट्टीधारक सामुहिकपणे येथील झोपडपट्ट्यांचा विकास करण्यास, जागा सोडण्यास तयार होत नाहीत. आहे त्याच जागेवर फ्लॅट विकासकाकडून मिळाला तरी झोपडीधारकाचेच नुकसान होत असते. विकासकाला मात्र झोपडपट्टीची निम्म्यापेक्षा जास्त जागा मिळत असते. म्हणजेच मुंबईमध्ये झोपडपट्टीत ज्या कुटूंबांचे व्यवसाय आहेत व झोपड्या भाड्याने दिल्या आहेत, त्यांना झोपू योजनेमुळे किंवा विकासकामुळे मोठे नुकसान होते. कुटूंब मोठे होत गेल्याने या कुटूंबांना एकच फ्लॅट मिळणार असल्यामुळे इतर सदस्यांचा राहण्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे आहे त्याच ठिकाणी दाटीवाटीने राहण्याला पसंती दिली जाते. कारण त्यातच त्यांचा फायदा होतो. कितीही असुविधा झोपडपट्टीत असल्यातरी आरोग्य बिघडत असेल, भांडणे होत असतील, मुलांवर त्याचा वाईट परिणाम होत असेल तरी याच ठिकाणी राहण्याशिवाय पर्याय राहत नाही.

मुंबईत झोपडीमालक इतर ठिकाणी स्वत:च्या फ्लॅटमध्ये राहत असला तरी झोपडपट्टीत असणाऱ्या जागेपासून झोपडीपासून उत्पन्न मिळत असते व जागाहीं मालकीची असल्यामुळे त्यावर सातत्याने लक्ष ठेवले जाते व संपर्क ठेवला जातो.

मुंबईतील कुटूंबे मागील ३० ते ४० वर्षांपासून राहणाऱ्या महाराष्ट्रातील काही कुटूंबांनी आपल्या गावाजवळच्या शहरांमध्ये तसेच अधिक करुन नाशिकमध्ये फ्लॅट, रो-हाऊस घरासाठी जागा घेतली आहे व तेथे घरही बांधले आहे. तुलनेने मुंबईत झोपडीची किंमत १५ ते २० लाख रुपये असेल तर तेवढ्या किंमतीत नाशिकमध्ये फ्लॅट, रो-हाऊस घरासाठी जागा मिळत असल्यामुळे बहुसंख्य कुटूंबांनी नाशिकमध्ये फ्लॅट घेतले आहेत.

मुंबईतील घरबांधणी व्यावसायिकांनी नाशिकमध्ये उंच इमारती उभ्या केल्या आहेत. झोपडपट्टीत

राहणारी कुटूंबे सुट्ट्यांमध्ये नाशिक शहरात राहायला येतात. यामुळे मोकळी हवा मिळते व मुंबईतील गर्दीतील धावपळीच्या जीवनातून थोड्या कालावधीसाठी सुटका होते व मनावरील ताणतणाव कमी होतो. नाशिक व मुंबई येथील अंतर रस्त्यांमुळे अतिशय कमी झाले आहे. साधारणपणे नाशिक ते मुंबई हे अंतर १८० किलोमीटर एवढे आहे व रस्ते आणि वाहतुकीच्या सोयी, रेल्वे यामुळे तीन ते चार तासामध्ये नाशिक ते मुंबईचा प्रवास होत असतो. मुंबई हे राजधानीचे व आंतरराष्ट्रीय व्यवसायाचे ठिकाण असल्यामुळे नाशिक व मुंबईच्या जवळच नाशिक शहर हे थंड हवेचे ठिकाण आहे. औद्योगिक वसाहती, मुबलक पाणी, जागा आणि प्रशासकीय दृष्टीने सर्व सोयीसुविधा असल्यामुळे देखील मुंबईतील सर्वच व्यावसायिक, नोकरीधारक, राजकीय व्यक्ती, झोपडपट्टीधारक नाशिक शहराला प्राधान्य देतात. नाशिक शहरसुद्धा बाजारपेठेचे ठिकाण असल्यामुळे मुंबईतील लोक नाशिक शहराला प्राधान्य देतात. नाशिक हा जिल्हा असल्यामुळे तालुक्यांवरील व इतर गावांवरील व्यक्ती शासकीय कामांसाठी तसेच व्यवसाय व वस्तू खरेदीसाठी येत असतात. नाशिकमध्ये कुटूंबे स्थायिक होण्याबरोबर आपले गाव व तालुका याच्याशी देखील जोडलेल्या आहेत. म्हणून बाजारपेठेचे वस्तू विक्री व्यवसायाचे ठिकाण म्हणून नाशिक शहराकडे पाहिले जाते.

मुंबईतील सर्वच लोकांना नाशिक शहराविषयी आकर्षण आहे. कारण बाजारपेठेबरोबर पर्यटनस्थळ व ऐतिहासिक वारसा म्हणून नाशिक शहराचा नावलौकीक आहे.

स्वस्त रेशन दुकानातून रेशन विकत घेण्याचे प्रमाण दर्शविणारी सारणी

अ.क्र.	रेशन घेणारे	वारंवारिता	टक्केवारी नाशिक	वारंवारीता	टक्केवारी मुंबई
१)	होय	५८	५८	९१	९१
२)	नाही	४१	४१	९	९
३)	माहीत नाही	१	१	०	०
	एकूण	**१००**	**१००**	**१००**	**१००**

वरील सारणीतून स्वस्त रेशन दुकानातून रेशन विकत घेण्याचे प्रमाण नाशिकमध्ये ५८% आहे. तर मुंबईत ९१% आहे. स्वस्त रेशन दुकानातून रेशन घेत नाही म्हणणारी कुटूंबे नाशिकमध्ये ४१% आहे. तर मुंबईत ९% कुटूंबे आहेत. म्हणजेच जी कुटूंबे भाड्याने राहणारी रेशन कार्ड व नावनोंदणी नसणारी कुटूंबे आहेत. अशा कुटूंबांचे प्रमाण नाशिकमध्ये जास्त दिसते. तसेच स्वस्त रेशन येण्याचा कालावधी व ते घेण्यासाठी जाण्याची वेळ यांचा ताळमेळ बसत नाही. तसेच रेशन दुकानदाराकडून रेशन आल्याची माहिती दिली जात नाही. यामुळे अनेक कुटूंबे स्वस्त रेशन पासून वंचित राहतात. नाशिक येथे झोपडपट्टीत कुटूंबे राहत असली तरी स्वस्त रेशन दुकानातून मिळणारा गहू व तांदुळ हा चांगल्या प्रतीचा नसल्यामुळे घेतला जात नाही. तसेच स्वस्त रेशनची गरज नसताना देखील काही कुटूंबे हे रेशन स्वस्त असल्यामुळे घेतात. मुंबईत झोपडपट्ट्यांत रेशन येण्याची व वाटण्याची तारीख दुकानदाराकडून जाहीर केली जाते. प्रत्येक कुटूंबाचे रेशन त्या कुटूंबाला बोलावून दिले जाते. त्यामुळे मुंबईत दुकानदाराची व कुटूंबांची जागरुकता दिसते. यामुळे येथील ९०% कुटूंबांना स्वस्त रेशन मिळते व त्याचा अन्न पदार्थांमध्ये वापरही कमी अधिक प्रमाणात केला जातो. कारण मुंबईत असणारे धान्याचे भाव प्रत्येक माणसामागे मिळणारे स्वस्त रेशन हे तेथील कुटूंबांचा चांगल्या प्रकारे उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडवते. मिळवलेला पैसा इतर कारणांसाठी या कुटूंबांना खर्च करता येतो. यात मुलांचे शिक्षण, घरभाडे, आरोग्य, मनोरंजन व इतर कौटूंबिक गरजांसाठी स्वस्त रेशनचा बचत झालेला पैसा वापरता येतो. नाशिकमध्ये ग्रामीण भाग जवळच असल्यामुळे शेतकरी तसेच व्यापारी यांच्याकडून धान्य एकाच वेळेस घेणे येथील कुटूंबांना परवडणारे असते. तसेच येथे ग्रामीण भागातील कुटूंबे असल्यामुळे आपल्या शेतातून तसेच गावातील कुटूंबाकडून धान्य घेत असतात. स्वस्त रेशन दुकानातून काही कुटूंबांना धान्य मिळत असले तरी ते १२ ते १५ रुपये किलोने विकले जाते. स्वत:च्या कुटूंबासाठी स्वस्त रेशनचे धान्य वापरले जात नाही. या धान्यातून इतर पदार्थ बनवले जातात. किंवा इतर ठिकाणी धान्य विकले जाते. ग्रामीण भागात स्वस्त रेशनचे धान्य विकण्याबरोबर शेतकरी कुटूंबे आपल्या गुरांसाठी हे धान्य वापरत असतात. म्हणजेच ग्रामीण भागात छोटे मोठे शेतकरी स्वस्त रेशनचा उपयोग आपल्याकडे मजूरी करणाऱ्या लोकांसाठी तसेच आपल्याकडे असणाऱ्या गायी गुरांसाठी करतात. असे

असले तरी अनेक गरीब कुटूंबांना, झोपडपट्टीतील गरजू लोकांना स्वस्त रेशन दुकानातून मिळणाऱ्या धान्याचा खूप मोठा आधार होत असतो. त्या कुटूंबाला काम उपलब्ध झाले नाही तरी त्याची उपासमार होत नाही व इतर कुटूंबांकडून ही स्त्रीया ओळखीने अल्पदरात हे धान्य मिळवत असतात. राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा २०१३ झाल्यामुळे भारतात गरीब कुटूंबांचा जीवन जगण्याचा प्रश्न सुटला आहे.

ज्या भटक्या विमुक्त कुटूंबांची कुठेही नाव नोंदणी नाही म्हणून अशा कुटूंबांना शासनाच्या स्वस्त रेशनचा फायदा घेता येत नाही. सिग्नल जवळ रस्त्यांच्या पुलाखाली तसेच अनाधिकृत झोपडपट्टीत अशी कुटूंबे राहतात. या कुटूंबांमध्ये साक्षरता नसल्यामुळे व भाषेची अडचण, शासकीय अधिकाऱ्यांची भीती, वारंवार एखाद्या योजनेचा पाठपुरावा करण्यासाठी जाणे या लोकांना परवडत नाही. म्हणजेच हि कुटूंबे वेगवेगळ्या शहरांमध्ये काही कालावधी साठी स्थलांतर करत राहत असल्यामुळे त्यांना स्वस्त रेशनचा लाभ मिळत नाही व लहान मुले, वृद्ध महिला या भीक मागताना दिसतात. जीवनमानाचा कुटूंबाचा दर्जा सुधारण्याकडे लक्ष दिल्यामुळे एका विशिष्ट कालावधीनंतर चांगल्या ठिकाणी स्वत:च्या घरांमध्ये फ्लॅटमध्ये राहायला झोपडपट्टीतील कुटुंबे गेली आहेत. निम्न मध्यम वर्गात या कुटूंबांचा समावेश झाला आहे. हि सामाजिक गतीशिलतेची प्रक्रिया नाशिक व मुंबई शहरातील तसेच इतर शहरातील झोपडपट्टीतील कुटूंबांत झाली आहे. म्हणजेच स्वत:चा व कुटूंबांचा सामाजिक आर्थिक शैक्षणिक सांस्कृतिक विकास करण्यासाठी येथील कुटूंबे सातत्याने प्रयत्न करत असतात. यामुळे व इतरही कारणांमुळे शहरांमध्ये घरबांधणी उद्योगाला मोठी मागणी असल्याचे दिसते. मुंबईतील कुटूंबे झोपडपट्टीतून इतर ठिकाणी राहायला गेली. तरी स्वस्त रेशन दुकानातून रेशन घेत असल्याचे दिसते. यामुळे पैशांची बचत होत असते.

मासिक भाडे तत्त्वावर राहणारे कुटुंब दर्शविणारी सारणी

अ.क्र.	भाडे तत्त्वावर राहणारे	वारंवारिता	टक्केवारी नाशिक	वारंवारीता	टक्केवारी मुंबई
१)	भाडे तत्त्वावर	५७	४७	४८	४८
२)	स्वत:चे घर असणारे	४३	४३	५२	५२
	एकूण	**१००**	**१००**	**१००**	**१००**

वरील सारणीवरुन नाशिक शहरात भाडेतत्वावर राहणारी ५७% कुटूंबे आहेत तर मुंबईत हे प्रमाण ४८% आहे. नाशिकमध्ये स्वत:चे घर असणारी कुटूंबे ४३% आहेत तर मुंबईत हे प्रमाण ५२% आहे. म्हणजे नाशिक व मुंबईत सरासरी ४० ते ५०% कुटूंबे भाडेतत्वावर राहणारी आहेत. तर स्वत:चे घर असणाऱ्यांचे प्रमाणही एवढेच आहे. यावरुन झोपडपट्टीतील ४० ते ५०% कुटूंबे ही स्वत:च्या फ्लॅट, रो-हाऊस किंवा जागा घेऊन घर बांधलेल्या ठिकाणी राहवयास गेली आहेत. हा बदल शहरीकरणाच्या प्रक्रियेत झोपडपट्टीवासीयांच्या जीवनमानाच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाल्याचा दिसत आहे व शहरांमध्ये नव्याने रोजगारासाठी आलेल्या कुटूंबाचा व व्यक्तीचा समावेश झोपडपट्टीत होतो. भारतात सामाजिक, आर्थिक दृष्टीने मागासलेल्या जाती-जमातीतील सर्वात खालच्या स्तरातील कुटूंबांचा यात समावेश आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेतलेली व आपल्या सामाजिक आर्थिक परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी शहरात स्थलांतर करत आहेत. या जाती-जमातीतील मुलांना तसेच कुटूंबांना आपले जीवनमान सुधारण्याचा अनुभव शहरात आल्यावर मिळतो. शहरांचा झगमगाट, पैसा, व्यक्तीस्वातंत्र्य, सामजिक, धार्मिक दबावाचे प्रमाण कमी होणे. यात दलित आदिवासी भटक्या, विमुक्त तसेच इतर मागास जातीतील मुलांचा मुलींचा समावेश दिसतो. मुलींनाही शिक्षण मिळाल्यामुळे शहरातील जीवनाशी समरस होणे शक्य होते. यामुळे नवीन गोष्टी शिकण्याबरोबर ग्रामीण भागातील जाती बंधने, जातपंचायती यांचा प्रभाव कमी होतो आहे. माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव, रस्ते, वाहनांचा वापर, शहरांमध्ये विविध कारणांनी येणारा संपर्क, खरेदी, नातेवाईक यामुळे आपणही काहीतरी कामधंदा मिळवून आपली व कुटूंबांची परिस्थिती बदलू शकतो याचा विश्वास नव्या पिढीला येतो आहे. मागील १० ते २० वर्षांतील तरुण मुलामुलींनी शहराची वाट धरली आहे. हे स्थलांतर झोपडपट्ट्यांत कमी तर शहराच्या जवळपासच्या गावांमध्ये जास्त होते आहे. यामुळे ग्रामीण भागात राहण्यासाठी भाड्याने घर मिळते. तसेच शहरात कामधंदा करण्यासाठी लगेच येता येते. शहराच्या जवळपासची गावेही महानगर पालिकेत समाविष्ट करण्यात आली आहेत. येणारी मुले मुली आपल्या आवाक्यातील कमी पगाराची कामेही करतात. या विविध कामांचे प्रशिक्षण, कौशल्य आत्मसात केल्यानंतर व अनुभव आणि ओळख झाल्यामुळे मुलांना अधिक वेतन किंवा रोजगार देणारी कामे करता येतात. यावरुन शहरांमध्ये स्थलांतर करण्याचे प्रमाण वाढत असल्याचे दिसते व यातून स्थलांतरीत कुटूंबे आपली सामाजिक आर्थिक परिस्थिती व जीवनमानाचा दर्जा सुधारत आहेत.

घर बांधण्यासाठी वापरलेले साहित्य दर्शविणारी सारणी

अ. क्र.	साहित्य	वारंवारिता	टक्केवारी नाशिक	वारंवारीता	टक्केवारी मुंबई
१)	सिमेंट, विटा व स्लॅब	२५	२५	५९	५९
२)	सिमेंट, विटा व पत्रे	३३	३३	२९	२९
३)	माती, विटा व पत्रे	३७	३७	१२	१२
४)	लाकडी फळ्या व प्लास्टिक कागद	५	५	०	०
	एकूण	**१००**	**१००**	**१००**	**१००**

वरील सारणीवरुन घर बांधण्यासाठी वापरलेले साहित्य यात सिमेंट, विटा व स्लॅबची घरे नाशिक शहरात २५% तर मुंबई शहरात ५९% आहेत. म्हणजेच मुंबईत असणाऱ्या स्लॅबच्या घरांचे प्रमाण जास्त आहे. तर नाशिकमध्ये सिमेंट, विटा व पत्रे असणारी घरे जास्त आहेत. नाशिकमध्ये माती, विटा व पत्रे असणारी घरे ३७% आहेत. तर मुंबईत हे प्रमाण १२% आहे. लाकडी फळ्या व प्लास्टीक कागद असणारी घरे नाशिक शहरात झोपडपट्ट्यांमध्ये आहेत. नाशिकमध्ये नासर्डी नदीकिनारी, पंचवटी प्रभागातील फुलेनगर येथील पाटकॅनॉलला लागून असणाऱ्या झोपड्या लाकडी फळ्या व प्लास्टिक कागद टाकून बनवलेल्या आहेत. तसेच राजीवनगर (सिडको) विभाग, विहितगाव, देवळाली कॅम्प, जेलरोडला पाटकॅनाल झोपडपट्टीत लाकडी फळ्या व प्लास्टिक कागद असणाऱ्या तात्पुरत्या स्वरुपाच्या झोपड्या आहेत.

मुंबईत अनाधिकृत ठिकाणी, शहरापासून कचरा डेपो, सांडपाणी वाहून जाणारी ठिकाणे, रेल्वेलाईनच्या बाजूला अशा झोपड्या आहेत. त्या तात्पुरत्या स्वरुपात असल्या तरी तेथे दिर्घकालावधीपर्यंत अनेक कुटूंबे राहताना दिसतात. माती, विटा व पत्रे असणाऱ्या झोपडपट्ट्या नाशिक शहरात सुद्धा जास्त आहेत. अशा झोपड्या असण्याचे कारण म्हणजे झोपडीला मान्यता नसणे व झोपडी मालकाची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे आपली झोपडी किंवा घर पक्क्या स्वरुपात करता येत नाही. आजूबाजूला असणाऱ्या झोपड्यांना त्यामुळे धक्का लागतो. त्यांची घरे पडू शकतात, शेजारील कुटूंबांना त्रास होईल व त्यातून भांडणे होण्याची भीती असते. तसेच घराचे काम पुर्ण करण्यासाठी तेवढे पैसे एकत्रित जमा होऊ शकत नाही. घराच्या भिंती, पत्रे, स्लॅब, फरशी अशा कामांसाठी किमान एक ते दोन लाखांपर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त खर्च येत असल्यामुळे घराचे चांगले बांधकाम करता येत नाही. बँका हातमजुरी किंवा रोजंदारीने काम करणाऱ्या लोकांना एवढे कर्ज देत नाहीत. झोपडपट्ट्यांमध्ये व्याजाने जे पैसे वाटले जातात ते शंभर रुपयाला दहा रुपये किंवा पंधरा ते वीस रुपये महिन्याला द्यावे लागतात.अगदी पाचशे रुपयांपासून ते एक ते दोन लाख रुपयांपर्यंत दहा ते पंधरा टक्क्याने पैसे घेणारे लोक आहेत व असे पैसे दरमहा वसूल केले जातात. जर ते दिले गेले नाहीत तर त्या संबंधित व्यक्तीचे घर किंवा झोपडी ताब्यात घेतली जाते. म्हणजेच झोपडपट्टीतील लोक घर,

विवाह, गाडी, दवाखाना, व्यवसाय, वस्तू खरेदी इ. कारणांसाठी व्याजाने पैसे घेतात व या व्याजाच्या पैशांचे व्यवहार हे अनाधिकृतपणे चालत असतात. यामुळे भांडणे, हाणामाऱ्या, खून होणे, घरातील वस्तू जमा करणे, घर ताब्यात घेणे असे प्रकार होत असले तरी व्याजाच्या पैशांचा व्यवसाय झोपडपट्टीत चालत असतो. म्हणजेच येथील कुटूंबांना प्राथमिक गरजा भागविण्याबरोबर मुलांचे पालनपोषण आरोग्य, समाजातील मानसन्मान राखणे, नातेगोते सांभाळणे, सण साजरे करणे इ. गोष्टींची पुर्तता करताना घर बांधणीसाठी पैसे शिल्लक राहत नाहीत. चांगला व्यवसाय व कामधंदा मिळाल्यास आणि मुले व मुली काम करत असल्यास त्यातून पाच, दहा वर्षात येथील कुटूंबांना आपल्या गरजा पुर्ण करण्याबरोबर किरकोळ स्वरुपात आहे, त्या घरांची दुरुस्ती करता येते किंवा नव्याने बांधता येते. यात स्त्रियांचा सहभाग हा खूप मोठा असतो. स्त्रियाच किरकोळ स्वरुपाचे व्यवसाय व काम करुन पैशांची बचत करत असतात. म्हणजेच घरातील सर्वच व्यक्तींना कोणतेतरी काम करावे लागते. त्याशिवाय त्या कुटूंबाच्या प्राथमिक गरजा पुर्ण होऊन घर घेण्यासाठी किंवा दुरुस्त करण्यासाठी पैसे जमवता येत नाहीत. या सर्व प्रक्रियेत बरेच वर्ष गेल्यानंतर अथक प्रयत्नाने हे साध्य होत असते. यावरुन झोपडपट्टीतील कुटूंबांना दिर्घकालावधीपर्यंत जीवन जगण्यासाठी त्याबरोबर शहरात झोपडपट्टीत का होईना घर बांधण्यासाठी व घेण्यासाठी सतत संघर्ष करत राहावा लागतो. महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागात काम करणारे लोक दिर्घकाळपर्यंत झोपडपट्टीतच राहिले आहेत व काही कुटुंबांनी इतर ठिकाणी फ्लॅट, जागा तसेच रो-हाऊस घेतले तरी झोपडपट्टीत राहणेच अधिक सोयीचे आणि सवयीचे वाटत असते. म्हणून सर्वच कुटूंबे येथून दुसऱ्या ठिकाणी राहावयास जात नाहीत.

घरासमोरील अंतर दर्शविणारी सारणी

अ.क्र.	अंतर	वारंवारिता	टक्केवारी नाशिक	वारंवारीता	टक्केवारी मुंबई
१)	१ ते ५	५२	५२	५९	५९
२)	६ ते १०	१७	१७	२३	२३
३)	११ ते १५	३	३	०	०
४)	समोर रस्ता आहे	२८	२८	१८	१८
	एकूण	**१००**	**१००**	**१००**	**१००**

वरील सारणी वरून नाशिक शहरात घरासमोरील अंतर एक ते पाच फूट आहे असे म्हणणारी २५ टक्के, सहा ते दहा फूट १७ टक्के, ११ ते १५ फूट तीन टक्के, तर घरासमोर रस्ता आहे असे म्हणणारे २८ टक्के कुटुंबे आहेत तर मुंबई शहरात घरासमोरील अंतर एक ते पाच फूट आहे, असे म्हणणारी ५९% कुटुंबे आहेत तर सहा ते दहा फूट ते वीस टक्के व समोर रस्ता आहे असे म्हणणारी १८ टक्के कुटुंबे आहेत यावरून नाशिक व मुंबई शहरात पाच फुटापेक्षा कमी अंतर दोन घरांमध्ये असल्याचे प्रमाण आहे. तसेच या दोन्ही घरासमोरून एक ते पाच फुट अंतरातून सांडपाणी वाहून जाण्यासाठी बंद स्वरूपात नाल्या आहेत तर काही ठिकाणी नाशिकमध्ये उघड्या गटारी आहेत. मुंबईत बहुतांश झोपडपट्ट्यात एक ते पाच फूट एवढे अंतर देखील ठेवले जात नाही दोन्ही बाजूंनी झोपडी पुढे सरकवली जाते जर एखादी व्यक्ती मृत्यू पावली तर त्याला बाहेर काढणे देखील अवघड असते या जागांमधून दोन व्यक्ती एकाच वेळेस जाऊ शकत नाही म्हणजेच झोपड्यांचा आकार अतिशय लहान असल्यामुळे घरासमोरील जागेवर प्रत्येक जण ताबा मिळवत असतो.

घरातील कचरा हा झोपडपट्टीच्या बाहेर रस्त्याच्या कडेला आणून टाकला जातो व मुंबईत महानगरपालिकेकडून गाड्यांमधून हा कचरा दररोज उचलला जातो येथील काही झोपडपट्ट्यांमध्ये सूर्यप्रकाश येत नाही झोपड्यांना खिडक्या नसल्यामुळे मोकळी व खेळती हवा राहत नाहीत अशाही परिस्थितीत येथे लहान कुटुंबे तसेच मोठी कुटुंबे राहतात नाशिकमध्ये घरासमोर सहा ते दहा फूट अंतर आहे असे म्हणणारी १७ टक्के कुटुंबे आहेत तर मुंबईत हे प्रमाण २३ टक्के आहे अधिकृत झोपडपट्ट्यात दोन घरासमोरील अंतर राखले जाते महानगर पालिकेचे कर्मचारी आरोग्य कर्मचारी शिक्षण विभाग विविध प्रकारची माहिती मिळविण्यासाठी झोपडपट्ट्यांमध्ये जात असतात तसेच अधिकृत झोपडपट्ट्यांमध्ये लाईट बिल घरपट्टी पाणीपट्टी ही बिले लोकांना मिळतात मुंबईमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून मिळालेले घर झोपडी मालकाला विकता येते ज्या झोपडपट्ट्या रस्त्याच्या कडेला आहेत. त्यांच्या घरासमोर जास्त जागा आहे तसेच रस्त्याच्या कडेने असणाऱ्या झोपड्यांची संख्याही जास्त आहे येथील घरांमध्ये मोकळी हवा व सूर्यप्रकाश येत असला तरी लहान खोल्या मुळे घरातील वातावरण हे कुबट अशा स्वरूपाचे असते.

नाशिक व मुंबई शहरात स्वयंरोजगारीत स्वरुपाचे व्यवसाय करणारे लोक आहेत. यात रिक्षा चालकांची संख्या सर्वाधिक आहे. तर भाजीपाला विकणाऱ्या व फळविक्री करणाऱ्या व्यक्ती आहेत. भांडी विकणे, जुने कपडे विकणे, बांगड्या, खेळणी विकणे हे व्यवसाय शहरात तसेच उपनगरांत दारोदार जावून केले जातात. तसेच नाशिकमध्ये जवळच्या खेड्यांवर आठवडे बाजारात दुकान लावले जाते. मोबाईल दुरुस्ती, हॉटेल, चहाची टपरी, मच्छी विकणे, शिलाई काम, मंडप, बेकरी, इलेक्ट्रॉनिक्स दुकान, गोळी-बिस्किट विकणे, खारी विकणे हे व्यवसाय स्थानिक परिसरातच केले जातात.

नाशिक महानगर पालिकेत सफाई कामगार म्हणून काम करणाऱ्या व्यक्ती आहेत. शासकीय नोकरीमध्ये श्रेणी ३ व ४ या पदावर काम करणाऱ्या व्यक्ती आहेत. स्थानिक परिसरात अंगणवाडी सेविका म्हणून काम करणाऱ्या महिला आहेत. कंपनीत काम करणाऱ्या कामगारांची संख्या आहे. सातपुर व अंबड येथील झोपडपट्ट्यात करार तत्वावर कंपनीत १२ ते १८ तास काम करणारे कामगार आहेत. साधारणपणे नाशिकमध्ये १० ते १२ हजार रुपये, मुंबईत १५ ते २० हजार रुपये वेतन मिळते. काही कुटुंबे यापेक्षाही जास्त उत्पन्न मिळवितात.

झोपडपट्टीच्या जवळच्या परिसरात असणारे दवाखाने, हॉस्पिटल्स येथे काम करणारे कामगार आहेत. वर्षानुवर्षे काही कामगार एकाच मालकाकडे काम करणारे आहेत. एकाच कुटूंबातील दोन किंवा तीन व्यक्ती काम करत असल्यास कुटूंबाला प्राथमिक गरजा भागवता येवून इतर गरजांकडेही लक्ष देता येते. तसेच शहरातील विविध दुकानांमध्ये काम करणारे कामगार आहेत. यात घरोघरी सिलेंडर पोहचवणे, केबल दुकान, रेशन, मोबाईल, शोरुम, हार्डवेअर, ऑफिस, कॉफिशॉप येथे काम करतात. वॉचमन म्हणून काम करणाऱ्या व्यक्ती आहेत, तर ड्रायव्हर तसेच गवंडी, फिटर, प्लंबर, आचारी, पेंटर, सेंट्रींग, वेल्डींग, सुतार, सलून ही कामे करणाऱ्या व्यक्ती आहेत. या प्रकारे रोजंदारी व मासिक वेतनावर काम करणाऱ्या व्यक्ती नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये राहत आहेत.

घंटागाडीवर काम करणारे, बांधकाम क्षेत्रात बिगारी म्हणून, हॉटेलात वेटर व हमाली म्हणून काम करणाऱ्या व्यक्ती आहेत. कच्च्या झोपडपट्टीतील महिला भंगार वेचण्याचे काम करतात, यात मुलींचाही सहभाग असतो.

वरील प्रकारच्या कामांमध्ये अनौपचारिक क्षेत्रात कामाची सुरक्षितता व हमी नाही रोजगाराचा हक्क,

सुट्ट्या, रजा, पीएफ यांसारख्या सवलती नाहीत. कायद्याचे संरक्षण नाही अशा असुरक्षित वातावरणात काम करावे लागते. यासाठी शासनाचे कोणतेही धोरण नाही किंवा या लोकांच्या संघटना मजबूत नाहीत. शासनाचा व राजकीय पक्षांचा पाठिंबा, संरक्षण मिळत नाही. आहे तो व्यवसाय कधीही अतिक्रमणामध्ये उठवला जात असतो. कधीही व्यवसायावर अतिक्रमण विभागाची कारवाई होत असते. तसेच महापालिका अधिकारी, पोलिस, बाजार समिती यांना दररोज हफ्ता किंवा पावती द्यावी लागते. एवढे करुन व्यवसायात होणारे नुकसान भरुन निघत नाही. किरकोळ स्वरुपात माल भरण्यासाठी पैसा उभा करणे म्हणजे स्थानिक सावकारांकडून व्याजाने पैसे घेणे व दामदुप्पट व्याज भरत राहणे हे प्रकार कायम स्वरुपी चालत असतात. यातनूच वैफल्य, चिंताग्रस्तता, अवैध व्यवसाय करणे हे प्रकार होतात. रोजंदारी व दरमहा कामे करणाऱ्या लोकांना मालकाकडून मजूरी किंवा दरमहा वेतन मिळेलच याची खात्री नसते. कित्येकदा मालकाकडून काम जास्त करुन घेण्याबरोबर अतिरिक्त कामाचा मोबदला मिळत नाही. कंपनी कामगारांना कायमस्वरुपी काम मिळत नाही.

धुणीभांडी व साफसफाई करणाऱ्या व बाहेरील स्वयंपाक हे काम स्त्रिया करतात. तसेच मुंबईत पुरुष देखील हे काम करतात. भाजीपाला विकणे, कंपनीतील कामे, टपरी चालवणे या प्रकारची कामे करणाऱ्या स्त्रिया आहेत. यातील निम्म्यापेक्षा जास्त स्त्रियांना कुटूंबाच्या गरजांसाठी बाहेरील कामे कधीतरी करावीच लागतात. तसेच कंपनीतील विविध वस्तू घरी आणून त्या स्वच्छ करुन देणे, कपड्यांवरील नक्षीकाम, विवाह समारंभ, शाळा, महाविद्यालये व कंपनीतील कार्यक्रमांमध्ये स्वयंपाक बनवणे इत्यादी कामे ही रोजंदारी स्वरुपात केली जातात. यात स्त्रिया, पुरुष व लहान मुले यांचा समावेश असतो. लग्न समारंभ व इतर कार्यक्रमात वाद्य वाजवण्याचे काम येथील लोक करतात. शिवजयंती, आंबेडकर जयंती, पुढाऱ्यांचे वाढदिवस, देवी-देवतांचे सणउत्सव यात वाद्य वाजवणे, गाणी म्हणणे ही कामे करतात. या स्त्रियांवर कुटूंब अवलंबून असते. मुले-मुली लहान असतानाच विधवा होणे. घटस्फोट होणे, नवऱ्याने टाकून देणे, आईवडील म्हातारे असणे, बहिण भावांच्या पालनपोषणाची जबाबदारी, नवरा व्यसनी असणे, आजारी असणे इ. कारणांमुळे स्त्रियांना मिळेल ते काम शोधावे लागते व मिळेल त्या रोजंदारीवर काम करावे लागते. स्त्रियांना सतत पाण्यात काम करावे लागत असल्यामुळे सांध्याचे आजार जडतात. म्हणजेच झोपडपट्टी मध्ये राहणाऱ्या महिलांना आर्थिक शोषणाला बळी पडावे लागते. भंगार वेचणाऱ्या स्त्रियांच्या समस्या पुर्णपणे वेगळ्या व दुर्लक्षित आहेत. त्यांना ना स्वत:ची झोपडी असते ना कुणी भाड्याने घर देते. अशा महिलांना जास्त विवंचनेत जगावे

लागते. मुले इतरत्र परिसरात फिरणे मिळेल तेथे खाण्याचे पदार्थ शोधणे, इतर अवैध व्यवसायातील व्यक्तींच्या संपर्कात येणे, वयाने मोठ्या असणाऱ्या मुलांबरोबर खेळणे, फिरणे यामुळे मुलांच्या वर्तनात बिघाड होतो. मुले शाळेत न जाणे, अभ्यास न करणे यातनू मुलांचा इतर आकर्षक गोष्टींकडे कल वाढत जातो. सिनेमा पाहणे, मोबाईलचा वापर यातून मोठी मुले लहान मुलांचा दुरुपयोग करतात.

नाशिक व मुंबई शहरात शासनाने किंवा महानगर पालिकेने जागा उपलब्ध करुन दिल्यास तेथे घर बांधण्याची तयारी जास्त कुटुंबियांनी दाखवली आहे. याची कारणे म्हणजे स्वत:चे घर, राहण्यासाठी जास्त जागा, सोयी-सुविधांमध्ये वाढ व राहणीमानाच्या दर्जात सुधारणा हि आहेत. ज्या व्यक्तींनी झोपडपट्टीत पक्की घरे बांधली आहेत. व्यवसाय व कामधंदा आहे म्हणून जाण्यास नकार देणाऱ्या व्यक्ती कमी आहेत. तसेच कुटूंबाच्या संख्येनुसार घरे मिळावीत अशी मागणी केली आहे. ज्या व्यक्तींच्या झोपड्या शासनमान्य नाहीत त्यांनी त्या शासनमान्य व्हाव्यात व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून घर मिळावे यासाठी प्रयत्न करत आहेत. कारण महानगर पालिकेकडून होणारी अनधिकृत झोपड्यांची मोडतोड ही या कुटूंबांना परवडणारी नाही व पुन्हा नव्याने त्याच ठिकाणी किंवा इतरत्र झोपडी उभारणे शक्य होत नाही. दुसऱ्या झोपडपट्टीत भाड्याने झोपडी घ्यावी लागते. या सर्व प्रक्रियेत काही कुटूंबांची आयुष्य संपली आहेत.

स्वस्त रेशन दुकानातून रेशन हे येथील कुटूंबांना मिळते. तर काही कुटूंबांना रेशन मिळत नाही. कारण ही कुटूंबे भाड्याने झोपडी घेवून राहणारी व रेशन कार्ड नसलेली आहेत. कामाचे ठिकाण बदलल्यास राहण्याचे ठिकाणही बदलते. स्वत:ची कागदपत्रे तयार करणे व नावनोंदणी करुन स्वस्त रेशन मिळवणे ही आपल्या नोकरशाही प्रक्रियेत सर्वात गरीब माणसासाठी अवघड गोष्ट आहे. दारिद्र्य रेषेचे कार्ड किंवा केशरी कार्ड असेल तर दोन रुपये किलो गहू व तीन रुपये किलो तांदूळ एका व्यक्तीमागे ३ किलो याप्रमाणे दरमहा मिळतात. येथील व्यक्तींना रेशन मिळवण्यासाठी झगडावे लागते.

भाड्याचे घर असणाऱ्या कुटूंबांची संख्या नाशिक व मुंबईमध्ये सुद्धा जास्त आहे. झोपडी मालक हे इतर झोपडीत राहतात किंवा एका झोपडीवर एक झोपडी बांधली जाते. तसेच काही झोपडी मालक हे इतर ठिकाणी फ्लॅट किंवा रो-हाऊसमध्ये राहतात व बऱ्याचदा पक्के घर झोपडपट्टीत बांधले जाते व इतर सुविधा निर्माण केल्या जातात. घोषित झोपडपट्टीत वीज, पाणी, सांडपाण्याची व्यवस्था यांची सोय केलेली असते. पण अघोषित झोपडपट्टीत मात्र या सुविधांची कमतरता असते. म्हणून अघोषित झोपडपट्टीतील घरे कच्च्या

स्वरुपाची, जास्तीत जास्त लाकडी फळ्या, पत्रे, माती, प्लॅस्टिक कागद यांपासून बनवलेली आहेत. वीज, पाणी, रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था व सार्वजनिक स्वच्छतागृहांची सोय पुरेशा प्रमाणात नाही. त्यासाठी शासकिय निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. म्हणून येथे अस्वच्छता देखील जास्त आहे.

स्लॅबच्या झोपड्यांचे प्रमाण कमी आहे. कारण घराची जागा ही स्लॅब टाकण्यासाठी कमी असते व पक्के घर बांधण्यासाठी जागेची शासन मान्यता आवश्यक असते. लाईट बील, पाणी बिल व घरपट्टी या कागदपत्रांची आवश्यकता असते. झोपडी नावावर करण्यासाठी महानगर पालिकेची परवानगी या प्राथमिक गोष्टींची पुर्तता केल्यानंतर परवानगी दिली जाते. तसेच पक्के घर बांधण्यासाठी येणारा खर्च परवडणारा नसतो व बँक किंवा पतसंस्था यांच्याकडून मिळणारी कर्जाची रक्कम अतिशय अल्प असते. झोपडी मालकाचे कायमस्वरुपी असणारे उत्पन्न पाहूनच बँक कर्ज देते. म्हणून येथील लोकांना पक्की घरे बांधता येत नाहीत. सिमेंट, विटा व पत्रे असणारी घरे सुद्धा बऱ्याच वर्षांची झालेली आहेत. पत्रे दिर्घ कालावधीनंतर खराब होतात व त्यावरुन प्लॅस्टिकचे कागद टाकावे लागतात. पावसाळ्यात अशी घरे गळतात व त्यामुळे भिंती देखील दिर्घकाळ टिकत नाहीत. म्हणून सातत्याने घरासाठीचा किरकोळ खर्च डागडुजी करत रहावी लागते. मातीची घरे असण्याचे प्रमाणही जास्त आहे. माती, विटा व पत्रे असणारी घरे कच्च्या स्वरुपाची आहेत. अशी घरे पडण्याची शक्यता जास्त असते. लाकडी, फळ्या व प्लॅस्टिक कागद असणारी घरे म्हणजे तात्पुरत्या स्वरुपाच्या झोपड्या असतात. अशा कुटूंबांना आपली झोपडी चांगल्या स्थितीत बांधण्याएवढे उत्पन्न नसते. जास्त दारिद्र्याचे प्रमाण या कुटूंबांमध्ये दिसून आले. अतिशय कमी जागेत अशा झोपड्या उभारलेल्या आहेत.

दोन घरांमधील कमी अंतरामुळे घरात सूर्यप्रकाश येत नाही. त्यामुळे घरात कोंदट वातावरण तयार होते व घरात मोकळी खेळती हवा राहत नाही. यामुळे घरातील वस्तुंचा भिंतीचा कुबट वास येतो. याचा परिणाम येथील कुटूंबांच्या आरोग्यावर होतो. पंचशील नगर, गंजमाळ (नाशिक पश्चिम) येथील समोरच्या झोपड्यांमधील अंतर पाच फुटांपेक्षा कमी आहे. येथील घरांमध्ये प्रवेश करणे व घरात बसणे अशक्य आहे. कारण येथील पर्यावरण व घरांची परिस्थिती मानवी आरोग्यास मोठ्या प्रमाणात हानीकारक आहे. मागील दहा वर्षांतील घर रिपेरिंग करणाऱ्या कुटूंबांचे प्रमाण जास्त आहे. काही व्यक्तींना घर बांधणी व इतर कारणांसाठी कर्ज घ्यावे लागले आहे.

कर्ज घेण्याच्या कारणांमध्ये मुला-मुलींच्या विवाहासाठी, घरबांधणी, कामधंद्यासाठी, मुलांचे शिक्षण व मोटर सायकल घेण्यासाठी व्यक्तींनी कर्ज घेतले आहे. कर्ज अतिशय कमी लोकांनी घेतले असले तरी सावकाराकडून निम्म्यापेक्षा जास्त व्यक्तींनी कर्ज घेतले आहे. तर बँक व पतपेढीकडून व्यक्तींनी व सोसायटीकडून कमी लोकांनी कर्ज घेतले आहे. यावरुन असे दिसते की, झोपडपट्टीतील लोकांना बँका, पतसंस्था सोसायटी यांच्याकडून पुरेशा प्रमाणात कर्ज मिळत नसल्याचे या आकडेवारीवरुन दिसते. असंघटीत क्षेत्रातील रोजगार असल्यामुळे व कर्जाची गॅरंटी नसल्यामुळे बँका येथील लोकांना कर्ज देत नाहीत.

मिळवत असलेल्या उत्पन्नात कुटूंबाच्या गरजा पुर्ण न होण्याच्या कारणांमध्ये कुटूंबातील व्यक्तींची जास्त संख्या, महागाई व पुरेसा पगार किंवा रोजगार मिळत नसल्यामुळे कुटूंबाच्या गरजा पुर्ण होत नाहीत. तर कायमस्वरुपी नोकरी नाही व रोजगार उपलब्ध होत नाही अशा उत्तरदात्याचे प्रमाण जास्त आहे. म्हणजे निम्म्यापेक्षा अधिक लोकांना कायमस्वरुपी रोजगारच उपलब्ध होत नाही. अशावेळी महिलांना धुणी-भांडी किंवा इतर कामे करावी लागतात. पुरुषांपेक्षा महिलांना काम मिळते पण महिलांना पुरुषांच्या तुलनेत अतिशय कमी पैसे मिळतात. कारण अशिक्षित महिलांना पारंपारीक स्वरुपाचीच कामे करावी लागतात. इतर कौशल्य किंवा व्यवसायाचे कौशल्य नसल्यामुळे मजूरीची कामे करावी लागतात, मिळणारी मजुरी व द्यावे लागणारे घराचे भाडे जास्त असते. म्हणजेच भाड्याने मिळणाऱ्या झोपड्या ह्या विटा, माती तसेच प्लॅस्टिक कागद, लाकडाच्या फळ्या व पत्रे असणारी आहेत. कोणत्याही प्रकारचे फर्निचर अथवा इतर सुविधा नसतात. पाण्याची सुविधा स्वत:ची नसते. तर सार्वजनिक नळावरुन पाणी आणावे लागते. शौचालयाची व्यवस्थाही सार्वजनिक असते. काही झोपड्यांना लाईट इतर ठिकाणाहून भाड्याने घ्यावी लागते. तर काही कुटूंबांना लाईट मिळत नाही. गॅस नसल्यामुळे स्वयंपाकासाठी रॉकेल वापरणारी कुटुंबीय आहेत. अशा कुटूंबांना गॅस मिळत नसल्यामुळे नाईलाजास्तव जास्त दराने रॉकेल विकत घ्यावे लागते. तसेच गॅसचे कनेक्शन आहे, पण गॅस भरण्यासाठी पैसे नसल्यामुळे देखील रॉकेल विकत घ्यावे लागते. अशावेळी रॉकेल दुकानदाराकडून इतर किराणा माल जास्त दराने विकत घ्यावा लागतो. या लोकांकडून दुकानदार इतर लोकांपेक्षा जास्त पैसे घेतात व एक किंवा दोन लिटर रॉकेल देतात. रेशन कार्डवरील रॉकेल इतरत्र वापरासाठी म्हणजे काळ्या बाजारात विकले जाते. गरीबांना मिळणाऱ्या रॉकेलमध्ये भ्रष्टाचार केला जातो याची अनेक उदाहरणे आहेत.

जी मुले मराठी माध्यम व महानगरपालिका शाळेत जातात. त्यांचा खर्च अतिशय कमी आहे. इंग्रजी माध्यमात जाणाऱ्या मुलांची संख्या ही नाशिकमध्ये कमी व मुंबईमध्ये महानगरपालिकेने इंग्रजी माध्यमांच्या

शाळा सुरू केल्या आहे, म्हणून येथील मुलांना इंग्रजी माध्यमांचे शिक्षण मिळते. सर्वाधिक खर्च येथील कुटूंबांचा रेशन व दवाखाना यासाठी होत असल्याचे दिसते. इतर खर्चाचे प्रमाण हे तुलनेने कमी आहे.

नाशिकमध्ये ६० वयावरील लोकसंख्या अतिशय अल्प प्रमाणात आहे. यावरुन येथील स्त्री-पुरुषांचे सरासरी आयुर्मान हे ५० वर्षांपेक्षा कमी आहे. कुटूंब प्रमुखांचे शिक्षणात काही व्यक्ती अशिक्षित आहेत. तर प्राथमिक शिक्षण असणाऱ्या व्यक्ती कमी आहेत. म्हणजेच साक्षरतेचे प्रमाण लिहिता वाचता येण्यापुरतेच असल्याचे दिसते. त्यातून नोकरी, व्यवसाय व इतर कौशल्य मिळवण्यासाठी लागणारे शिक्षण कुटूंब प्रमुखांकडे नाही. यावरुन कौशल्यपुर्ण शिक्षण नसल्यामुळे चांगल्या रोजगाराची संधी येथील लोकांना मिळत नाही.

नवीन औद्योगिक धोरणानंतर भारतात स्थलांतराचा वेग दुपटीने वाढला आहे. शहरांच्या नियोजनाचा अभाव तसेच स्थलांतरीना रोजगार, उपजिविका, शिक्षण, आरोग्य यांची व्यवस्था करण्याविषयी शासनाची उदासिनता निर्माण झाली आहे. असे स्थलांतरीत मजूर झोपडपट्ट्यांमध्ये राहतात व या लोकांना असंघटीत क्षेत्रातील कष्टाची, धोक्याची व घाणीतील कामे करणे भाग पडते. सर्वच स्थलांतरीत वंचित लोकसमूह शहराच्या या असंघटीत क्षेत्रात एकवटले गेले आहेत. बिगारी, हमाल, मोलकरणी, घरकामगार, यंत्रमाग मजूर, मापाडी, खाजगी सफाई कामगार, दवाखान्यातील आया, विक्री कामगार, वीटभट्टी कामगार, रिक्षाचालक, कागद, काच पत्रा कामगार, हॉटेल कामगार, वॉचमन, कुरियर सेवा, सिक्युरिटी इत्यादी सेवेकऱ्यांचा समावेश झोपडपट्ट्यांमध्ये झाला आहे.

संदर्भ -

१) सतिश धनवडे (एप्रिल २०१८) प्रिंटींग एरिया, इंटरनॅशनल रिसर्च जर्नल, Issue-40, Volume-1.

२) प्राथमिक स्त्रोत - मुलाखत अनुसूची

३) युनिक फिचर्स (सन २००१), अर्धी मुंबई, मॅजेस्टिक प्रकाशन, गिरगाव, मुंबई-४

४) अमर्त्य सेन - आर्थिक विकास और स्वातंत्र्य (१९९९) हिंदी अनुवाद राजपाल ॲन्ड सन्स, काश्मिरी गेट, दिल्ली संस्करण - २०१०.

५) विनोद निरभवणे (२०२१), नाशिक शहरातील झोपडपट्टीवासियांचा समाजशास्त्रीय अभ्यास, (अप्रकाशित पीएच.डी.प्रबंध) कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

प्रकरण - ५

नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासियांचे शिक्षण व आरोग्य

प्रस्तावना :- शिक्षण -

प्राथमिक शिक्षण व मुलभूत अधिकार यांचा विचार करुन विकासाची ध्येयधोरणे राजकीय पातळीवर ठरवली जातात. राज्यघटनेतील ८६ व्या तरतुदी नुसार ६ ते १४ वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षणाचा मुलभूत अधिकार आहे. तसेच ६ ते १४ वयोगटातील मुलांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण कायदा २००९ मध्ये करण्यात आला आहे. भारत सरकारने प्राथमिक शिक्षणाच्या अनेक योजना व प्रकल्प सुरु केले आहेत. राज्य सरकार या योजनांची अंमलबजावणी ही प्राथमिक शिक्षणातील सुधारणा किती करते यावर अवलंबून असते. प्राथमिक शाळांमधील उपलब्ध सोयीसुविधा व गुणवत्ता यात राज्यवार, प्रदेशवार भिन्नता आढळून येते. भारतातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक व लिंगभेदभावाचा परिणाम शिक्षणावर व त्याच्या गुणवत्तेवर होतो. सार्वत्रिक शिक्षण हे वंचित आणि विकासाच्या प्रक्रियेबाहेरील मुलांना आकर्षित करत नाही. पंचवार्षिक योजनांमधून विविध योजनांचे मोजमाप केले जाते व ग्रामीण, आदिवासी व मागास भागात विकासासाठीच्या योजना राबविल्या जातात.

'साक्षरता प्रमाण व शाळेत जाणाऱ्या मुलांचे प्रमाण राष्ट्रीय पातळीवर शहरी भागात अधिक चांगले आहे. पण झोपडपट्ट्यांबाबत शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. दारिद्र्याचे प्रमाणही ग्रामीण भागापेक्षा शहरी झोपडपट्ट्यांमध्ये अधिक आहे. हे शासकीय अहवालांतून दिसते. कमी उत्पन्न हे दारिद्र्याचे एकमेव कारण नसून इतर अनेक कारणे त्यास जबाबदार आहेत. चांगले मनुष्यबळ निर्माण होण्यासाठी शिक्षणाच्या संधी खूपच कमी आहेत. झोपडपट्टीतील मुले शिक्षणापासून वंचित राहण्याबरोबरच गुणात्मक शिक्षण मिळत नाही. बहुतेक झोपडपट्टीतील मुलांना शाळेची सुविधा उपलब्ध होत नाही. मागास भाग तसेच नैसर्गिक, भौगोलिक ठिकाणी, डोंगरदऱ्यांमध्ये राहणाऱ्या मुलांना तात्कालीक अडथळे शाळेत न जाण्याला कारणीभूत ठरतात. तसेच शाळेचे अंतर जास्त असल्यामुळे मुलांना शाळेत जाता येत नाही. घरांची रचना, सामाजिक स्तरीकरण आणि लोकसंख्येची घनता यामुळे मुलभूत सुविधांचा पुरवठा करता येत नाही. शिक्षणाचे माध्यम हे या मुलांसाठी शिकण्याच्या प्रक्रियेतील अडथळा ठरते. कारण झोपडपट्ट्यांमध्ये स्थलातरीत कुटुंबे असून त्यांची मातृभाषा ही वेगवेगळी असते. येथील सर्वच मुले सरकारी शाळेत जात नाहीत. तर काही मुले खाजगी

शाळांमध्ये जातात. कारण सरकारी शाळांमध्ये सर्व सुविधा पुरविल्या जात नाहीत व योग्य शिक्षण दिले जात नाही. कुटूंबातून मुलांना शाळेत जाण्यासाठी कोणत्या सुविधा पुरविल्या जातात. तर यात मुलाला शाळेत पाठविले जाते की नाही, कुटूंबातील शैक्षणिक वातावरण, मुलाला शाळेत घेवून जाणे हे निर्णय कुटूंबाचे असतात. भारतात मागास समुदायात शिक्षण हा जीवन जगण्याचा एकमेव पर्याय नाही. म्हणून कुटूंब आणि शाळा हे दोन्ही घटक मुलांच्या शिक्षणाशी संबंधित आहेत.'(१)

पालकांच्या शिक्षणाचा प्रभाव मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर होत असतो. जे पालक थोडेफार शिक्षित असतात ते मुलांच्या शिक्षणात मदत करतात. जास्तीत जास्त पालक हे मुलांना कामाला लावतात. आई ही मुलांच्या शैक्षणिक प्रगतीत महत्वाची जबाबदारी पार पाडते. पण आईचे शिक्षण अधिक असल्यास मुलांची शैक्षणिक प्रगती उंचावते. पण जवळपास ७५% स्त्रिया या अशिक्षित व अल्पशिक्षित असल्यामुळे मुलांना अभ्यासात मदत करु शकत नाहीत. म्हणून शाळेतून मुलांच्या अभ्यासाची जबाबदारी घेणे आवश्यक असते. बऱ्याच शाळांमध्ये वशिलेबाजी किंवा भ्रष्टाचार करुन शिक्षकांची नेमणूक केली जाते. असे शिक्षक मुलांच्या प्रगतीची जबाबदारी घेत नाहीत.'

विविध कारणांमुळे मुले अभ्यास करु शकत नाहीत. नोकरीसाठी आवश्यक असणारी इंग्रजी भाषा मुलांना शिकता येत नाही. शिक्षणासाठी आवश्यक पैसा उपलब्ध नसणे, शाळेचे अंतर लांब असणे म्हणून मुले शाळेत जात नाहीत. प्राथमिक आणि माध्यमिक शाळेपासून मुलांच्या गळतीचे प्रमाण जास्त असते. अतिशय थोडी मुले उच्च माध्यमिक व पदवीपर्यंत शिक्षण घेतात. मुलांनी जास्त शिक्षण घ्यावे अशी पालकांची इच्छा असली तरी मुले काम करण्याला अधिक महत्व देतात. झोपडपट्टीमध्ये अशिक्षित व्यक्तींचे प्रमाण अधिक असते. सरकारी शाळांमध्ये शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या प्रमाणात तफावत असते. विद्यार्थ्यांची संख्या अधिक व शिक्षकांची संख्या कमी असते. विद्यार्थी संख्या जास्त असल्यामुळे मुलांना गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळत नाही.

अमर्त्य सेन यांच्या मते मुले घरात उत्पन्न वाढविण्यामध्ये महत्वाची भूमिका पार पाडतात. पैशांअभावी आई-वडील मुलांना शाळेत पाठवू शकत नाही. भारतात विकासाशी संबंधित शिक्षण साहित्य उदासिनता निर्माण करते. शिक्षणामुळे रोजगार उपलब्ध होईल असे शिक्षण दिले जात नाही. त्यामुळे मुले शिक्षण सोडतात व शाळेतील मुलांची उपस्थिती कमी होते. आपण समाजातील अधिकाधिक गरीब वर्गाकडे गेलो

तर शाळेतील उपस्थिती व साक्षरता यात गळती झालेली दिसते. याचा संबंध आर्थिक कारणाबरोबर लावला तरी इतर अनेक कारणांचा प्रभाव असतो. यात साक्षरता, शाळेतील सुविधांचा दर्जा व मुलांच्या शाळेतील प्रगतीसाठी कुटूंबाचा सहयोग यांचा समावेश होतो. म्हणजेच सुरुवातीला गरीबी हे कारण असले तरी इतर अनेक कारणे जबाबदार असतात. झोपडपट्टीतील मुलांचे प्राथमिक शिक्षण हे महानगरपालिका शाळांमधून मोफत स्वरुपात होते. मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक असणारा खर्च, शिक्षणाविषयीची आस्था, कुटूंबाची आर्थिक स्थिती यावर मुलांचे शिक्षण अवलंबून असते. झोपडपट्टीतील काही लोक आपली मुले येथील परिसराव्यतिरिक्त दुसऱ्या शाळांमध्ये मुलांना पाठवतात. पण या मुलांचे शाळेतील उपस्थितीचे सरासरी प्रमाण कमी होत जाते.

मुलाला शाळेत पाठविण्याचा निर्णय पालकांचा असला तरी सामाजिक नियम, बाह्य घटक मुलांच्या शिक्षणासाठी पालकांना प्रेरीत करीत असतात. शिक्षणामुळे रोजगार उपलब्ध होतो व जीवनमानात सुधारणा होते. परंतु या रोजगार उपलब्ध होण्याच्या संधी विशिष्ट वर्गालाच मिळतील. आपल्याला मागासवर्गातील असल्यामुळे आपल्या मुलांना या संधी मिळणार नाही. मुलांमध्येही हीच भावना वाढीस लागते. मुलेही शैक्षणिक वातावरणाअभावी मागे पडत जातात व शिक्षणातील गळती वाढत जाते. शिक्षणाचा संबंध हा नोकरी मिळवण्याशी लावल्यामुळे मुलांना फारसे शिकू दिले जात नाही व काही पालक आपल्या समाजातील सामाजिक प्रथा, परंपरांमुळे मुलींना शाळेत पाठवत नाही. बालविवाह प्रथेमुळे मुली निरक्षर राहण्याचे प्रमाण मागास जातीत सर्वाधिक आहे. मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढल्यास त्यापेक्षा अधिक उच्चशिक्षित मुलगा शोधणे व विवाहाचा खर्च, हुंडा अधिक द्यावा लागेल. या कारणास्तवही मुलींना शिक्षणापासून दुर ठेवले जाते. अतिमागास वर्गात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे.

अमर्त्य सेन यांच्या मते भारतात समाजातील विभिन्न वर्गातील आर्थिक विषमता हि शैक्षणिक विषमतेत दिसून येते. शैक्षणिक विषमता हीच सामाजिक विषमतेचे दुसरे रुप आहे. यातूनच सामाजिक विषमता कायम राखली जाते. यातील संबंध तोडण्यासाठी राजनितीक प्रयत्नांची आवश्यकता आहे. पण सत्ताधारी व विरोधी व इतर राजकीय पक्षांनीही देशात प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी प्रयत्न केले नाहीत. लोकांच्या प्रती उत्तरदायित्वाची भावना नसल्यामुळे शासकिय यंत्रणेत भ्रष्ट व्यवस्था तयार होते. शिक्षण व्यवस्थेतील विषमता, जाती, वर्ग आणि लिंगभेद यासारख्या विषमतांमुळे मागास व अति मागास वर्गातील लोकांना प्राथमिक शिक्षणापासून वंचित रहावे लागते.

शिक्षण व्यवस्था ढासळत असताना त्यात सुधारणा होताना दिसत नाही किंवा तसे प्रयत्न केले गेले नाही. यामुळे शिक्षक आणि विद्यार्थी संख्या यांच्या प्रमाणातील तफावत वाढत गेली आहे. मागील काही वर्षांत हे शिक्षक विद्यार्थ्यांचे प्रमाण ५०% कमी झाले आहे. यावरुन सरकारी शिक्षण व्यवस्थेत गुणात्मक ऱ्हास होत गेला आहे. साक्षरता दर सरकारी शाळांमधून नव्हे तर खाजगी स्वयंसेवी शाळांमधून वाढला आहे. खाजगी शाळांच्या वाढीमुळे सरकारी शाळांचा ऱ्हास होत गेला आहे.

'बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ नुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी महाराष्ट्रात शासकीय पातळीवरुन प्रयत्न होत असले तरी शाळाबाह्य मुलांची संख्या ही एक लाखापेक्षा अधिक असल्याचा निष्कर्ष स्वयंसेवी संस्थांचा आहे. तर २०१५-२०१६ मध्ये महाराष्ट्र सरकारकडून केलेल्या पाहणी अहवालात शाळाबाह्य मुलांची संख्या ७४, हजार ९७१ आढळून आली. यापैकी ५० हजार ६८२ मुलांना विविध शाळांमध्ये प्रवेश देण्यात आला असे सांगितले जात असले तरी ४८ हजारापेक्षा अधिक मुले शाळाबाह्य होती. यात ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत ऊस तोडणी, वीटभट्टी, रस्ते बांधणी, कृषी उद्योग, बांधकामे, दगडाच्या खाणी, शेती अशा विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात मजूर स्थलांतर करतात. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत स्थलांतरीत कामगारांच्या मुलांसाठी हंगामी वसतिगृहे चालवली जात असली व मुलांना शिक्षणात सहभाग घेण्यास प्रोत्साहन देण्यासाठी आणि पालकांचा आर्थिक भार कमी करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत असल्या तरी त्याची परिणामकारक अंमलबजावणी होत नाही ही वास्तवता आहे.'(२) स्थलांतर करणारे मजूर हे शहरांमध्ये काही प्रमाणात झोपडपट्ट्यांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात राहतात व अशा कुटूंबातील मुले शाळाबाह्य असल्याचे आढळून आले आहे. मुलांची शाळा बदली करण्यासाठी पालकांना मुलांचा दाखला एका शाळेतून काढून दुसऱ्या शाळेत टाकणे ही अवघड बाब आहे. झोपडपट्टीच्या जवळपास असणाऱ्या मराठी माध्यमाच्या खाजगी शाळांमध्ये प्रवेशासाठी साधारणत: ५ ते ७ हजार रुपये फी मागितली जाते व शाळाप्रमुख देखील अशा मुलांना शाळेत प्रवेश देण्याला इच्छूक नसतात व पालकांना विविध कारणे देवून कागदपत्रे व पैसे मागून टाळाटाळ करण्याचा प्रयत्न केला जातो. या संपुर्ण प्रक्रियेला स्थलांतरीत असणारे पालक मुलांना शिक्षण मिळावे म्हणून प्रयत्न करत असले तरी शेवटी त्यांच्या प्रयत्नांना यश येईलच याची खात्री नसते. नवीन ठिकाणी शहरांमध्ये कुटूंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी मिळवलेला पैसा मुलांच्या प्रवेशासाठी, शिक्षणासाठी खर्च करता येत नाही. म्हणून मुलांना कामाला लावणे व कुटूंबाचा उदरनिर्वाह

करणे याकडे लक्ष दिले जाते.

'बालवाडीपासून ते पदव्युत्तर शिक्षणाचा हक्क असणे याची जबाबदारी टाळून शासनाने राज्यघटनेतील २१ - अ च्या तरतुदीनुसार ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण कायदा २००९ केला आहे. महाराष्ट्रात खाजगी व विना अनुदानित शाळांची संख्या वाढलेली आहे. शाळांना बाजारीकरणाचे स्वरुप आले आहे. पालकांकडून जास्तीत जास्त पैसे मिळविण्याचा सर्वोत्तम व्यवसाय म्हणून खाजगी व विना अनुदानित शाळांकडे पाहिले जाते. यामुळे झोपडपट्टीत राहणाऱ्या व मजूरी करणाऱ्या कुटूंबांना आपल्या मुलांना महानगरपालिकांच्या शाळांमध्ये पाठविण्याशिवाय पर्याय राहत नाही. महानगर पालिका शाळेतील शिक्षणाचा दर्जा निश्चितपणे खालावलेला आहे. याला जबाबदार पालकांची आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक परिस्थिती असली तरी शिक्षण व्यवस्थाही त्याला जबाबदार आहे. महानगरपालिका शाळेत शिक्षक तसेच सुस्थितीत, सरकारी नोकरी व चांगल्या व्यवसायात असणारे पालक आपल्या मुलांना येथील शाळांमध्ये पाठवत नाही. म्हणून या शाळांमधील मुलांच्या शैक्षणिक प्रगतीकडे कोणी लक्ष देत नाही. अशी मुले इ. ८ वी पर्यंत पास करुन घेण्याचे धोरण आहे. शिक्षकांनी या मुलांना सातत्याने शिकवत राहिले तरी त्यांच्या पालकांचे राहण्याचे ठिकाण आर्थिक परिस्थिती या सर्वांचा परिणाम या मुलांवर होत असतो. इतर कलाकौशल्य निटनेटकेपणा यात ही मुले हळूहळू मागे पडत जातात व शिक्षणाच्या प्रक्रियेतून बाहेर फेकले जातात. तसेच शिक्षणाचे खाजगीकरण हे गरीब आर्थिक दृष्ट्या दुर्बल तसेच अनुसूचित जाती व जमातीच्या मुलांना शिक्षणाच्या संधी नाकारणारे आहे.

२०१४ मध्ये खाजगी विना अनुदान शाळांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील मुलांचे प्रमाण दोन ते सहा टक्केच होते. म्हणून आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुलांना सरकारी शाळांव्यतिरिक्त दुसरा पर्याय राहात नाही. म्हणून ६ ते १४ वयोगटातील मुलांसाठी सक्तीचा व मोफत शिक्षण कायदा असला तरी तो गुणवत्तापुर्ण शिक्षण देणारा व मुलांचा सर्वांगीण विकास करणारा ठरत नाही. स्वयंअर्थसहायित शाळा पालकांकडून कायम चढ्या दराने फी घेत असतात. २०१४ मध्ये या शाळांमध्ये शिकण्यासाठीचा वार्षिक खर्च ७५ हजार रुपयांपेक्षा अधिक होता.'[३] या व्यतिरिक्त काही शाळांची फी ही वर्षाला एक लाख रुपये आहे. ठराविक उत्पन्न गटातील पालकांच्या मुलांनाच प्रवेश घेता येईल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. नाशिक शहरातील शाळादेखील मुलांची शिक्षण फी घेण्यात मागे राहिलेल्या नाहीत. हीच परिस्थिती भारतातील सर्वच छोट्या मोठ्या शहरांमध्ये असल्याचे दिसते. म्हणून गरीब वर्गातील झोपडपट्टीत राहणाऱ्या

कुटूंबातील मुलांना अशा शाळांमध्ये प्रवेश मिळवता येत नाही. शिक्षण हक्क कायद्यानुसार २५ टक्के प्रवेश गरीब कुटूंबातील व झोपडपट्टीत राहणाऱ्या मुलांना या शाळांमध्ये प्रवेश मिळावेत असे असले तरी असे प्रवेश शाळा प्रशासनाकडून नाकारले जातात. या मुलांच्या शिक्षणाची फी शासनाकडून शाळेला दिली जाते. तरीही आपल्या शाळेतील शिक्षणाचा दर्जा घसरु नये व आपले उत्पन्न कमी होवू नये यासाठी अशा मुलांना प्रवेश नाकारले जातात. ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया या मुलांच्या प्रवेशासाठी खाजगी शाळांमध्ये राबविली जाते. पण मुलांचे राहण्याचे ठिकाण व शाळेचे अंतर हे जास्त असते. झोपडपट्टीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुलांना या शाळांत इतर मुलांशी जुळवून घेणे. त्यांच्या बरोबरीने येणे, त्यांच्याशी स्पर्धा करणे, मुलांना अवघड होवून बसते. असे असले तरी पालक मुलांना चांगल्या शाळांमध्ये शिकवण्याची व दर्जेदार शिक्षण मुलाला मिळवण्यासाठी प्रयत्न करतात.

'महाराष्ट्रात सन २०१८ मध्ये ६ ते १४ वर्ष वयोगटातील ८% विद्यार्थी कधीही शाळेत प्रवेश न घेतलेले आहेत. विविध कारणांनी शाळाबाह्य झालेल्या मुला-मुलींमध्ये ७२% मुले ही आर्थिकदृष्ट्या दुर्बलच होती. शाळेत प्रवेश घेतलेल्या मुला - मुलींपैकी ६१% विद्यार्थ्यांचे शिक्षण पुर्ण होते. तर ३९% मुले - मुली शिक्षणाच्या विविध टप्प्यांवर शाळाबाह्य होतात. राज्यघटनेने हमी दिलेला शालेय शिक्षण हा मुलभूत हक्क ठरतो. कारण तो सर्वांनाच समान संधी या मुलभूत हक्कांतील तत्वाशी सुसंगत आहे. परंतु स्वयंअर्थ सहाय्यित शाळांनाच प्रोत्साहन दिल्यामुळे शिक्षणाची विषमता वाढत जाते व त्याबरोबर नोकऱ्यांच्या संधीतील विषमता वाढते. विकसित देशांनी आपल्या विकासाबरोबर शिक्षणावरील खर्च वाढवत नेला व शालेय शिक्षण अधिक बळकट केले. शैक्षणिक व्यवस्था अधिकाधिक बळकट करण्यावर भर दिला आहे. म्हणून राज्य व राष्ट्र पातळीवर भारत सरकारने सर्व खाजगी शाळा, महाविद्यालये शासकीय पातळीवर आणणे व त्याची मुक्तता वाढविण्याबरोबर प्रत्येक मुलाला व मुलींना बालवाडी ते पदवीपर्यंत व पदव्युत्तर वर्गापर्यंत मोफत शिक्षण उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. यामुळे भारतात सर्वांना शिक्षण मोफत स्वरुपात उपलब्ध झाल्यास सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विषमता कमी होण्यास निश्चितपणे मदत होईल व रोजगाराच्या, उद्योगांच्या संधी निर्माण होतील.

उच्च शिक्षणामध्ये १८ ते २३ वयोगटातील व्यक्तींचे प्रमाण एकूण उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येशी मोजले जाते. २०१४ मध्ये महाराष्ट्रातील ३१% उच्चशिक्षण घेणाऱ्या व्यक्ती होत्या. पण सर्वच स्तरातील व्यक्तींना उच्च शिक्षणाच्या संधी मिळत नाही. उच्च उत्पन्न गटातील ६५% व्यक्ती उच्चशिक्षणात

प्रवेशित होत्या. तर ३५% इतर सर्व वर्गातील होत्या. अनुसूचित जाती, जमाती, मुस्लिम व बौद्ध असणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण उच्चशिक्षणात अतिशय कमी असल्याचे आढळले आहे. यात अनुसूचित जाती प्रवेशित दर १२%, अनुसूचित जमाती २६% तर ओबीसी ३६% असा आहे.

महाराष्ट्रात उच्च शिक्षणाचे खाजगीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. म्हणून या खाजगी शिक्षण संस्थांत जास्तीची फी असल्यामुळे अनुसूचित जाती - जमाती व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना प्रवेश घेता आला नाही. यामुळे उच्च शिक्षणात विषमता अधिक वाढताना दिसते. तसेच शासकीय धोरणांमुळे अधिक उत्पन्न असणाऱ्या गटांना अधिक लाभ दिला जातो.'(४)

कुटुंबातील शाळेत जाणाऱ्या मुलांची संख्या दर्शविणारी सारणी

अ.क्र.	शाळेत जाणारी मुले संख्या	वारंवारिता	टक्केवारी नाशिक	वारंवारीता	टक्केवारी मुंबई
१)	एक मुल असणारे कुटुंब	१४	१४	२	२
२)	दोन मुलं असणारे कुटुंब	२५	२५	१९	१९
३)	तीन मुलं असणारे कुटुंब	१४	१४	२५	२५
४)	चार मुलं असणारे कुटुंब	१	१	२२	२२
५)	पाच मुलं असणारे कुटुंब	-	-	९	९
६)	सहा मुलं असणारे कुटुंब	-	-	७	७
७)	सात मुलं असणारे कुटुंब	-	-	१	१
८)	शाळेत जाणारी मुले नसणारे कुटुंब	४६	४६	१५	१५
	एकूण	**१००**	**१००**	**१००**	**१००**

वरील सारणीवरून नाशिकमध्ये एक मुल असणारे कुटुंब १४ , दोन मुलं २५%, तीन मुले १४%, चार मुलं असणारे २% कुटुंब आहे, तर शाळेत जाणारी मुले नसणारी कुटुंबे ४६% आहेत. मुंबईमध्ये एक मुल असणारे कुटुंब २%, दोन मुलं असणारे कुटुंब १९%, तीन मुलं असणारे कुटुंब २५%, चार मुलं असणारे कुटुंब २२%, पाच मुले असणारे कुटुंब ९%, सहा मुले असणारे कुटुंब ७% व सात मुले असणारे कुटुंब १% आहे व शाळेत जाणारी मुले नसणारी १५% कुटुंबे आहेत.

यावरून नाशिक शहरातील झोपडपट्टीपेक्षा मुंबईतील झोपडपट्ट्यांत उत्तर प्रदेशातील ३९% कुटुंबात चार व त्यापेक्षा जास्त मुले आहेत. यात मुलगा व्हावा म्हणून अधिक अपत्य जन्माला घातली आहेत. म्हणजेच कुटुंब नियोजन करण्यास प्राधान्य दिलेले नाही. प्राथमिक, माध्यमिक, शिक्षण घेतलेल्या पालकांचे प्रमाण ९०% आहे. असे असले तरी स्त्रियांचे शिक्षण प्राथमिक व माध्यमिक शाळेपर्यंत झालेले आहे, असे असले तरी काम करण्यासाठी कुटुंबात अधिक मुले असतील तर आई-वडिलांचे उत्पन्न वाढेल व चांगले जीवन जगता येईल, यादृष्टीने जास्त मुलगे असण्यावर भर दिला जातो. म्हणजेच ही कुटुंबे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक दृष्टीने मागासलेली कुटुंबे आहेत.

पालकांच्या कामाच्या प्रकारामध्ये, टेलर, ड्रायव्हर, सिक्युरिटी गार्ड, कारपेन्टर, रिक्षा ड्रायव्हर, न्हावी, बिगारी, गवंडी, सेल्समन, ऑफिस कर्मचारी, छोटे कॉन्ट्रॅक्टर व कंपनीत काम करणारे तसेच स्वत:चा व्यवसाय असणारे पालक आहेत. दरमहा १५ ते २० हजार रुपये कमावणारी ८०% कुटुंबे आहेत

तर २० ते ३० हजार रुपये कमावणारी २०% कुटुंबे आहेत. स्त्रिया फक्त घरातील स्वयंपाक व कुटुंबाची देखभाल करणे या स्वरूपाची कामे करतात म्हणजेच या कुटुंबातील स्त्रिया बाहेर नोकरी किंवा इतर स्वरूपाची कामे करत नाहीत. ३०% कुटुंबांमध्ये मुले व मुली नोकरी करणाऱ्या आहेत. यामुळे कुटुंबाचे उत्पन्न वाढते व कुटुंबांच्या प्राथमिक गरजा पूर्ण होण्याबरोबर इतर गरजा भागविणे शक्य होते.

कुटूंब नियोजन कार्यक्रमाचा प्रसार व जबाबदार पालकत्वाची भूमिका नव्या पिढीने स्विकारलेली आहे. शिक्षणाचा प्रसार व मुलांच्या संगोपना विषयीची जाणीव, मुला-मुलींमधील भेद याचे प्रमाण कमी झाल्याचे दिसते. अपत्यांची संख्या कमी असल्यामुळे कुटूंबावरील येणारा आर्थिक ताण कमी होतो. यामुळे कुटूंबाच्या जीवनामानात सुधारणा होते. मुलाच्या जन्माला असणारे महत्व, पहिल्यांदा मुली जन्माला आल्या असतील तर मुलगा होण्यासाठी आणखी अपत्य जन्माला घातली जातात. म्हणून कुटूंबातील अपत्यांची संख्या वाढलेली दिसते. एक मुलगा असेल तर दुसऱ्या मुलाला जन्म दिला जात नाही. भविष्यात कुटूंबाचा आधार, संरक्षण, संपत्ती मिळवणे या कारणांमुळे मुलाच्या जन्माला महत्व दिले जाते.

मुलांच्या शाळेचा प्रकार दर्शविणारी सारणी

अ.क्र.	शाळेचा प्रकार	वारंवारिता	टक्केवारी नाशिक	वारंवारीता	टक्केवारी मुंबई
१)	महानगरपालिका	१७	२२	४९	४९
२)	शासन अनुदानित	३४	४३	२	२
३)	इंग्रजी माध्यम	२५	३१	४६	४६
४)	उर्दू	३	४	३	३
	एकूण	**७९**	**१००**	**१००**	**१००**

वरील सारणीवरून मुलांच्या शाळेच्या प्रकारामध्ये नाशिक शहरात महानगरपालिका शाळांत २२%, शासन अनुदानित शाळे ४३%, इंग्रजी माध्यमात ३१% व उर्दू शाळेत ४% मुले शिक्षण घेत आहेत, तर मुंबई शहरात महानरपालिका शाळांमध्ये ४९%, शासन अनुदानित शाळेत २%, महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत ४६% व उर्दू शाळेत ३% मुले शिक्षण घेत आहेत.

नाशिक व मुंबई शहरात महानगरपालिका शाळांबरोबरच इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्येही मुले शिक्षण घेत आहेत. शिक्षण हक्क कायद्यानुसार २५% जागा गरीब वर्गातील मुलांसाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत राखीव असल्यामुळे पालक आपल्या मुलांना या शाळांमध्ये पाठवतात. यात मुलांची निवड करून प्रवेश दिला जात असतो. या मुलांची शिक्षण फी शासनाकडून संबंधित शाळांना दिली जाते.

मुंबईत महानगरपालिकेने इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू केल्या आहेत, म्हणून झोपडपट्टीतील मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळा उपलब्ध होतात व या मुलांना शिक्षण घेता येते, असे असले तरी झोपडपट्टीतील वातावरणाचा परिणाम मुलांच्या शिक्षणावर होत असतो.

महानगरपालिका शाळांमध्ये जाणाऱ्या मुलांची संख्या जास्त आहे. त्यानंतर शासन अनुदानित शाळेत जाणारी मुले आहेत. म्हणजेच आर्थिक परिस्थिती अभावी पालकांना आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश घेता येत नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळा खाजगी तत्वावर चालवल्या जातात. येथील शिक्षणाचा दर्जा, सुविधा महानगरपालिका शाळा व शासन अनुदानित शाळांपेक्षा निश्चितच चांगला आहे. झोपडपट्टीत पालकांना आपल्या मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देता येत नाही. पालकांचे शिक्षणही कमीच असते व शाळेव्यतिरिक्त इतर ठिकाणी मुलांना शिकवणी वर्ग लावणे, पैशांअभावी शक्य नसते. यामुळे येथील मुलांचा शिक्षणाचा दर्जा खालावलेला आहे.

शिक्षणाचे माध्यम दर्शविणारी सारणी

अ.क्र.	शिक्षणाचे माध्यम	वारंवारिता	टक्केवारी नाशिक	वारंवारीता	टक्केवारी मुंबई
१)	मराठी	५१	६५	४९	४९
२)	हिंदी	०	०	२	२
३)	इंग्रजी	२५	३१	४६	४६
४)	उर्दू	३	४	३	३
	एकूण	**७९**	**१००**	**१००**	**१००**

वरील सारणीवरून नाशिक शहरात मराठी माध्यमातून शिक्षण घेणारी ६५%, इंग्रजी माध्यमातून ३१% व उर्दू माध्यमातून ४% मुले शिक्षण घेत आहेत. तसेच मुंबईत ४९% मुले मराठी माध्यमातून तर ४६% मुले इंग्रजी माध्यमातून व २% हिंदी आणि ३% उर्दू माध्यमातून शिक्षण घेत आहेत. मुंबई महानगरपालिकेत मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळा चालविल्या जातात. हिंदी भाषिक मुले असली तरी मुंबईत मराठी शिकण्याला सर्वांनाच प्राधान्य द्यावे लागते म्हणून हिंदी, इंग्रजी व मराठी या तीन भाषा मुले शाळेतून तसेच आपल्या अनुभवातून व इतर व्यक्तींच्या संपर्कातून व इलेक्ट्रॉनिक मिडियाच्या माध्यमातून शिकत असतात. मुंबईत इंग्रजी भाषा शिकण्याला जास्त महत्त्व दिले जाते. यामुळे मुलांना नोकरीच्या संधी वाढतात. मुलांना कंपनीत चांगल्या पदावर व चांगल्या पगाराची नोकरी मिळते. तसेच परदेशातही नोकरी करण्यास प्राधान्य दिले जाते. मुंबईतील झोपडपट्ट्यांतून अनेक लोक सौदी अरेबिया या देशांमध्ये नोकरी करण्यास प्राधान्य देतात, कारण या देशांमध्ये चांगल्या पगाराची नोकरी मिळते व काही कालावधीनंतर पैसे कमवून आणणे व मुंबई व इतर ठिकाणी जागा, फ्लॅट घेणे किंवा कुटुंबातील व्यवसाय सुरू करणे, मुलांचे पालनपोषण यासाठी मुंबईतील झोपडपट्ट्यांमधून अरेबियन देशांमध्ये विशेषत: मुस्लिम व्यक्तींचे स्थलांतर काही कालावधीसाठी स्थलांतर होत असते.

नाशिक शहरात ६५% मुलांचे शिक्षणाचे माध्यम हे मराठी आहे. कारण मराठी माध्यमाच्या शाळांमधूनच येथील मुलांचे शिक्षण होते आहे. इतर भाषेतून शिक्षण घेताना मुलांना भाषेची समस्या निर्माण होते. येथील जास्तीत जास्त मुले ही महानगरपालिका शाळांमधून शिक्षण घेत असल्याने त्यांचे मराठी माध्यम आहे. पालकांच्या शिक्षणाच्या अभावी तसेच आर्थिक परिस्थिती, राहण्याचे ठिकाण, कुटूंबाचा आकार हे घटक येथील मुलांच्या शिक्षणात अडथळा निर्माण करतात.

मुलांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळा ठरणारे घटक दर्शविणारी सारणी

अ.क्र.	अडथळा ठरणारे घटक	वारंवारिता	टक्केवारी नाशिक	वारंवारीता	टक्केवारी मुंबई
१)	कुटुंबाची सामाजिक, आर्थिक परिस्थिती	२०	२०	१६	१६
२)	कुटुंबातील व्यवसाय	५	५	१६	१६
३)	कुटुंबाचा मोठा आकार	२	२	२१	२१
४)	जागेचा अभाव	१५	१५	१३	१३
५)	मुलांचा अभ्यास घेता न येणे	१०	१०	१४	१४
६)	पालकांच्या शिक्षणाचा अभाव	१०	१०	०८	०८
७)	वातावरणाचा परिणाम	१२	१२	०७	०७
८)	मुलांच्या शाळेचे अंतर	०५	०५	०५	०५
९)	प्रतिसाद न देणारे पालक	२१	२१	००	००
	एकूण	**१००**	**१००**	**१००**	**१००**

वरील सारणीवरून मुलांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळा ठरणाऱ्या घटकात नाशिक शहरात कुटुंबाची सामाजिक, आर्थिक परिस्थिती २६%, कुटुंबातील व्यवसाय ७%, कुटुंबाचा मोठा आकार ३%, जागेचा अभाव १९%, मुलांचा अभ्यास घेता न येणे १३%, पालकांच्या शिक्षणाचा अभाव १३%, वातावरणाचा परिणाम १६% व मुलांच्या शाळेचे अंतर ७% अशी सांगितली आहेत तर मुंबईत कुटुंबाचा मोठा आकार व जागेचा अभाव आणि कुटुंबाची सामाजिक, आर्थिक परिस्थिती यामुळे मुलांच्या शिक्षणात अडथळा निर्माण होतो, असे सांगितले आहे.

सर्वच कारणे कमी अधिक प्रमाणात मुलांच्या शिक्षणामध्ये अडथळा ठरले आहेत. कुटूंबाची सामाजिक, आर्थिक परिस्थिती खालावलेली असल्यामुळे कुटूंबांना झोपडपट्टीत राहण्याशिवाय पर्याय राहत नाही. येथील वातावरण, जागेचा अभाव, पालकांच्या शिक्षणाचा अभाव यामुळे मुलांना अभ्यास करण्यास पोषक वातावरण तयार होत नाही. झोपडपट्टीतील व्यसनाधिनता, गुन्हेगारी याबरोबर कुटूंबातील भांडणे, अवैध व्यवसाय, अस्वच्छता याचा परिणाम मुलांच्या शिक्षणावर होत असतो. मुलांच्या मनोरंजनासाठी असणारे विविध खेळ, शिकविण्यासाठी उपलब्ध असणारे शिक्षक, खेळाची मैदाने, विविध प्रकारची कला कौशल्ये शिकवणारे क्लासेस, मुलांच्या आवडी निवडी, मुलांच्या मताला असणारे महत्व या सर्वांचा अभाव येथे असतो म्हणून येथील मुले शैक्षणिक प्रगतीत मागे पडतात. प्राथमिक स्वरुपाच्या मुलांच्या गरजादेखील पुर्ण होत नाहीत.

येथील संस्कृतीचा प्रभाव मुलांच्या शिक्षणावर होतो. मुले जशी मोठी होतात. तशा प्रमाणात शिक्षणापासून दुरावत जातात. शहरांमध्ये असणारी विविध दुकाने, मॉल्स, गाड्या या चंगळवादी संस्कृतीमुळे मुले अस्वस्थ होतात. आपल्या वयाची इतर मुले व त्यांना मिळणाऱ्या सोयी-सुविधा याचा मुलांच्या मनावर वाईट परिणाम होतो. एकतर ही मुले शाळा सोडतात किंवा शिक्षणामध्ये त्यांचे मन रमत नाही. पालकांच्या व्यसनांच्या सवयींचाही परिणाम मुलांच्या शिक्षणावर होत असतो.

मुले खाजगी शाळेत जाण्याच्या कारणांमुळे दर्जेदार शिक्षण ७५%, शाळेचे अंतर कमी असणे, खर्च कमी व सरकारी शाळाजवळ नाही, असे २५% पालकांनी सांगितले आहे, असे असले तरी आपल्या मुलांचे शिक्षण गुणवत्तापूर्ण व्हावे, चांगल्या मुलांच्या संगतीत व शाळेतील स्वच्छता तसेच चांगल्या सवयी, मुलांची शाळेतील प्रगती, त्याचा अभ्यास करून घेणे, त्याच्या शिक्षणाकडे शिक्षकांनी लक्ष देणे इत्यादी कारणांमुळे पालकांचा मुलांचे शिक्षण महानगरपालिका शाळांतून होण्याऐवजी चांगल्या दर्जेदार शाळांमधून व्हावे, ही अपेक्षा असते. पालक खाजगी शाळांमध्ये आपल्या मुलांना शिकविण्यासाठी प्रयत्न करत असतात, असे असले तरी शिक्षणाच्या फी अभावी व आर्थिक उत्पन्न अभावी ५०% पालक आपल्या मुलांना महानगरपालिका शाळांमध्ये पाठवतात.

मुलांचे शिक्षण सोडण्याचे प्रमाण दर्शविणारी सारणी

अ.क्र.	शिक्षण सोडण्याचे प्रमाण	वारंवारिता	टक्केवारी नाशिक	वारंवारीता	टक्केवारी मुंबई
१)	नापास होणे	६	६	५	५
२)	शाळेचे जास्त अंतर	४	४	१६	१६
३)	कौटुंबिक अडचण	२३	२३	१०	१०
४)	मुले कामाला जातात	२१	२१	१०	१०
५)	प्रतिसाद नाही	४६	४६	५९	५९
	एकूण	**१००**	**१००**	**१००**	**१००**

वरील सारणीवरून नाशिक शहरात मुलांचे शिक्षण सोडण्याच्या प्रमाणामध्ये नापास होणे ६%, शाळेचे अंतर ४%, कौटुंबिक अडचण २३%, मुले कामाला जातात म्हणून २१% व प्रतिसाद न देणारी कुटुंबे ४६% आहे. म्हणजेच कौटुंबिक अडचण व मुले कामाला जाण्यामुळे शिक्षण सोडण्याचे प्रमाण जास्त आहे, तर मुंबई शहरात शाळेचे अंतर त्याबरोबर कौटुंबिक अडचण व मुले कामाला जातात म्हणून शिक्षण सोडण्याचे प्रमाण ३६% आहे. याबरोबर इतरही कारणे मुलांचे शिक्षण सोडण्याला जबाबदार असतात. वर्गात मुलांची संख्या जास्त असणे, मुलांना भाषेची अडचण, शिक्षकांचा धाक, मुलांची समजून घेण्याची क्षमता कमी असणे, मुलांना शिकवण्याच्या पारंपारीक पद्धती असणे, मुलांना शिकविण्यासाठी आवश्यक असणारी शिक्षकांची बौद्धिक क्षमता नसणे, त्याबरोबर मुलांची कौटूंबिक परिस्थिती, झोपडपट्टीतील वातावरण इत्यादी अनेक घटकांचा परिणाम मुलांच्या शिक्षणात अडचणी निर्माण करतात. यासाठी मुलांना त्यांच्या बौद्धिक क्षमतेनुसार खेळण्याच्या माध्यमातून चार भिंतींच्या बाहेर शिकविणे, मुलांच्या मनात निर्माण होणाऱ्या प्रश्नांना मोकळी वाट करुन देणे, मुलांच्या आवडी निवडी यांची काळजी घेणे महत्वाचे असते. मुलांच्या शिक्षणासाठी येथील कुटूंबे शाळेतील शिक्षकांवरच अवलंबून असतात. इंग्रजी, गणित, विज्ञान यांसारखे विषय मुलांना समजत नाहीत. त्याबरोबर मुलांना एका वर्गातून दुसऱ्या वर्गात ढकलले जाते. मुलांचे मन शाळेत रमेल अशा प्रकारचे वातावरण नसल्यामुळे झोपडपट्टीतील मुलांचे शिक्षण पुर्ण होत नाही. ६ ते १४ वयोगटातील मुलांना सक्तीचे व मोफत शिक्षण कायदा २००९ होवून देखील येथील अनेक मुले शाळाबाह्य होतात. १४ वर्षांनंतरच्या शिक्षणाच्या तरतुदीसाठी पुढील कायदा नाही. शिक्षणानंतर नोकरीची हमी नाही. हे घटक मुलांच्या शिक्षणावर परिणाम करतात. मुलांचे कुटूंबात कुपोषण होत असते. शाळेत पोषण आहार दिला जात असला तरी त्यात सातत्याने दररोज एकच पदार्थ दिला जात असतो. म्हणून शाळेतील पोषण आहार झोपडपट्ट्यांतील मुलांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी प्रभावी ठरलेला नाही.

मुलांना शिकवणी वर्ग लावण्याचे प्रमाण दर्शविणारी सारणी

अ.क्र.	नियमित शाळेत	वारंवारिता	टक्केवारी नाशिक	वारंवारीता	टक्केवारी मुंबई
१)	होय	२३	२३	४८	४८
२)	नाही	५६	५६	३५	३५
३)	प्रतिसाद नाही	२१	२१	१७	१७
	एकूण	**१००**	**१००**	**१००**	**१००**

वरील सारणीवरुन नाशिक शहरात मुलांना शिकवणी वर्ग लावण्याचे प्रमाण २३% आहे, तर मुंबईत ४८ % आहे. म्हणजे मुंबई शहरात मुलांच्या शिक्षणाकडे पालक जास्त लक्ष देतात. तसेच येथे मुलांसाठी शिकवणी वर्ग देखील उपलब्ध असतात व पालकांची इच्छा व पालक शिक्षणासाठी पैसे खर्च करतात. नाशिकमध्ये मात्र त्याबाबत जास्त जागरूकता पालकांमध्ये दिसत नाही. खाजगी शाळेत व इंग्रजी माध्यमांच्या शाळेत जाणारे जवळपास सर्वच विद्यार्थी पैसे देवून शिकवणी वर्ग लावतात. पण येथील मुलांना फक्त शाळेतील शिक्षकांवरच अवलंबून रहावे लागते. शिकवणी वर्गांमध्ये जास्त फी देवून त्या मुलाच्या गुणवत्तेची व पुस्तकी ज्ञानाची हमी घेतली जाते. अधिकाधिक मुलांनी शिकवणी वर्गात यावे व आपला शिकवणी वर्ग सोडून जावू नये यासाठी खाजगी क्लासेस मुलांच्या गुणवत्तेवर लक्ष देतात. परंतु महानगरपालिका शाळांमध्ये शिक्षकांनी मुलांच्या गुणवत्तेवर लक्ष देवूनही त्यांची गुणवत्ता व बौद्धिक दर्जा वाढत नाही. याला इतर कौटूंबिक कारणेही जबाबदार आहेत. मुलांच्या शिक्षणासाठी जास्त पैसे देवून पालक आपल्या मुलांना खाजगी शाळांमध्ये शिकवतात व मोफत शिक्षण असूनही महानगरपालिका शाळांमध्ये शिकवत नाहीत. याचाच अर्थ येथे असणारी मुले हि अतिशय गरीब, स्थलांतरीत, ठराविक उत्पन्न नसणाऱ्या कुटूंबातील मुले असतात. आर्थिक पातळी चांगली असणारी कुटूंबे आपल्या मुलांना महानगरपालिका शाळांमध्ये पाठवत नाहीत. येथे शिकविणारे शिक्षकही आपल्या मुलांना खाजगी शाळांमध्ये पाठवतात. विविध प्रकारचे छंद वर्ग, स्कॉलरशिपचे क्लासेस, कला, कौशल्यासाठीचे वर्ग याचा लाभ येथील मुलांना आपल्या सामाजिक आर्थिक परिस्थितीमुळे घेता येत नाही.

खूप मोठ्या प्रमाणात इंग्रजी भाषा शिकण्यात मुलांना अडचणी येतात. त्याची कारणे म्हणजे मुलांना इंग्रजी भाषा शाळेत शिकवली जात नाही व कुटूंबात पालकांच्या शिक्षणाअभावी मुलांना इंग्रजी शिकवली

जात नाही. याचा परिणाम मुले नापास होणे, पुढील शिक्षणात मुलांच्या गळतीचे प्रमाण वाढत जाते. मुलांना इंग्रजी, विज्ञान, गणित हे विषय शिक्षणाच्या प्रक्रियेतून बाहेर ढकलतात व हळूहळू मुलांच्या आकलन क्षमतेपेक्षा अधिक क्षमतेची क्रमिक पुस्तके लावली जातात. मुलांची बौद्धिक व शारीरिक क्षमता शैक्षणिक वातावरण यानुसार मुलांना शिक्षण दिले जात नाही. परिणामी मुलांच्या गळतीचे प्रमाण वाढत जाते.

मुलांनी शाळेत शिक्षण सोडण्याच्या कारणांमध्ये नापास झाल्यामुळे तसेच कौटूंबिक अडचणींमुळे कामाला जातात म्हणून मुलांनी शिक्षण सोडले. शाळेचे अंतर जास्त असल्यामुळे मुलांकडे दुर्लक्ष केले. पालक मुलांकडे आर्थिक उत्पन्नाचा भाग म्हणून पाहतात. कुटूंबाला रोजगार उपलब्ध नसणे, आई वडीलांचे स्थलांतर व शिक्षणापासून आर्थिक साधन प्राप्त होण्याची शक्यता कमी वाटते म्हणून मुले शाळा सोडतात.

मुलांची प्राथमिक शाळेपासून गळती होत असल्याचे दिसते व माध्यमिक शाळेत गळतीचे प्रमाण वाढत गेल्याचे दिसते. उच्च माध्यमिक शिक्षणात मुलांनी शिक्षण सोडले आहे.

नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासीयांचे आरोग्य :-

प्रस्तावना :- आरोग्य हे गुणात्मक व संख्यात्मक स्वरुपाचे असते. विविध प्रकारचे प्रदूषण हे झोपडपट्टीवासीयांच्या जीवनावर परिणाम करत असते. यात शारीरीक आरोग्य, मानसिक आरोग्य, उत्पन्न, सामाजिक संबंध, सवयी, सामाजिक मुल्य व व्यक्तीमत्व विकासावर प्रदूषणाचा परिणाम होत असतो. झोपडपट्टी ही मुळातच प्रदूषणाच्या ठिकाणी विकसित होते आणि झोपडपट्टीच्या आजूबाजूला अस्वच्छता निर्माण होते. सांडपाण्याची व्यवस्था नसणे, कचऱ्याची विल्हेवाट लावली जात नाही. यामुळे जास्त प्रदूषण येथे होते. कुटूंबाचा मोठा आकार हादेखील घरातील पर्यावरणावर परिणाम करतो. व्यक्तीगत आजारांवर सामाजिक सांस्कृतिक घटक प्रभाव टाकतात. व्यक्तीगत आजारांमध्ये आंघोळ आणि स्वच्छता यांचा समावेश होतो. चांगले आरोग्य राखण्यासाठी व विविध आजारांपासून स्वत:चे संरक्षण करण्यासाठी आंघोळ करणे व कपड्यांची स्वच्छता ठेवणे आवश्यक असते. उघड्या गटारांमुळे विविध प्रकारचे किटाणू तयार होतात. हे किटाणू मानवाच्या श्वासोच्छ्वासात जातात. उघडी गटारे आरोग्यदृष्ट्या घातक असतात. आरोग्य म्हणजे लोकसंख्येची गुणात्मकता असते. लोकसंख्येची गुणात्मकता म्हणजे फक्त लोकसंख्या रोगमुक्त करणे नव्हे तर भौतिक परिस्थितीत सुधारणा करणे. याबरोबर चांगले आरोग्य राखण्यासाठी नैतिक आणि मानसिक विकास हा कोणत्याही सामाजिक दडपणाशिवाय होणे आवश्यक असते. आरोग्यदायी व रोगमुक्त आरोग्याचा संबंध हा फक्त रोगमुक्त असणे एवढा नसून व्यक्तीगत संबंध हे त्याच्या शारिरीक मानसिक वातावरणावर अवलंबून असल्यामुळे हे वातावरण मानवी शरीर आणि मनावर परिणाम करत असते. मानवी शरीरावर सामाजिक व सांस्कृतिक वातावरणाचा प्रभाव होत असतो. त्यातून अशक्तपणा ताण व थकवा येत असतो. इतर व्यक्तींच्या संपर्कात आल्यामुळे संसर्गजन्य आजार होतात. झोपडपट्ट्यांमध्ये अधिकतर घरे एक किंवा दोन लहान खोल्यांची असतात. इतर घरेही एकमेकांच्या बाजूला असतात. त्यामुळे सुर्यप्रकाश व मोकळी हवा येथील खोल्यांमध्ये येत नाही. झोपड्यांची जास्त गर्दी असल्यामुळे प्रदूषण होते.

पिण्याचे पाणी स्वच्छ नसल्यामुळे व्यक्तीगत आजार होतात. सामान्यत: खाण्या पिण्याचे पदार्थ पुर्णपणे स्वच्छ नसणे. त्याबरोबर वैयक्तीक स्वच्छतेत दातांची स्वच्छता, केस, नखे, कपडे अस्वच्छ असल्यामुळे विविध आजार होतात. अन्नसुरक्षा ही झोपडपट्टीतील लोकांच्या जीवनावर अनेक बाजूंनी परिणाम करते. सामाजिक आर्थिक घटकांमध्ये उत्पन्न, खर्च आणि शिक्षणावरील प्रभाव व अन्नाची सवय आणि आरोग्याबाबतचे ज्ञान हे लहान मुलांच्या आरोग्यावर परिणाम करते. अनारोग्यकारक वातावरणाचा

लहान मुलांवर वाईट परिणाम होतो. लहान मुलांना अतिशय स्वस्त असणारा आहार दिला जातो. म्हणजे सकस आहाराचा अभाव असतो. दैनंदिन आहारात बटाटे, तांदुळ, पालेभाज्या व सर्वसाधारण स्वरुपाचे तेल यांचा वापर केला जातो. यातून मुलांना पुरेसा प्रोटीनचा पुरवठा होत नाही. अंडी, दुध, फळे यांचे मुलांच्या आहारात अतिशय कमी प्रमाण असते. कुटूंबाच्या उत्पन्नानुसार आहारावरील खर्च केला जातो. विविध प्रकारच्या आहारांचा अभाव मुलांच्या जेवणात असतो.

कचरा कुठे टाकावा याचे नियोजन नसते. कोठेही मोकळ्या जागेवर तसेच रस्त्याच्या कडेला कचरा टाकला जातो. झोपडपट्ट्यांमध्ये कचरा गोळा करण्यासाठी अडचणी येतात. लहान मुलांसाठी येथील वातावरण अतिशय धोकादायक असते. लहान मुले अशा वातावरणात खेळतात व त्याचा मुलांच्या आरोग्यावर परिणाम होतो. अनेक संशोधनामध्ये मुलांना कचरा उघड्यावर टाकल्यामुळे विविध प्रकारचे आजार झाले आहेत. विविध आजारांमुळे पालकांना मुलांच्या आरोग्याची व्यवस्थितपणे काळजी घेता येत नाही. आई ही जास्त वेळ घरगुती कामांमध्येच असते म्हणून ती मुलांची जास्त वेळ काळजी घेवू शकत नाही.

पालकांचे शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे देखील मुलांच्या आरोग्याबाबतची फारशी जाणीव नसते. अस्वच्छ पाणी असल्यामुळे विविध प्रकारचे आजार होतात. सांडपाण्याची विल्हेवाट योग्य न लावल्यामुळेही अनारोग्यकारक वातावरण येथे तयार होते. साथीचे आजार पसरतात. येथील वातावरणाचा परिणाम आजूबाजूच्या परिसरावरही होत असतो. झोपडपट्ट्यांमध्ये मुलांचे वजन, वय, उंची योग्य प्रमाणात नसते. शारीरीक वाढ परिपुर्ण होत नाही. त्याबरोबर विविध मनोविकृतीही जडतात. व्यसने, गुन्हेगारी, अनैतिकता याचा परिणाम मुलांच्या आरोग्यावर व मानसिकतेवर होत असतो. झोपडपट्टीतील घरांमध्ये महत्वाची समस्या म्हणजे आरोग्याची आहे. कारण येथे कमी जागेत अतिरिक्त लोक राहतात. घरांची रचना कच्च्या स्वरुपाची असते व त्यावर वरचा मजला तयार केला जातो यामुळे संसर्गजन्य रोगांचे प्रमाण व त्वचेचे रोग झपाट्याने फैलावतात. पिण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात असते. पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत म्हणजे सार्वजनिक नळाचे पाणी, हातपंप या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात आजार फैलावतात. पाणी साठवून ठेवल्यामुळे त्याचा परिणाम आरोग्यावर प्रत्यक्ष होतो. स्वच्छतागृह आणि सांडपाणी वाहून नेण्याची सुविधा असणे आवश्यक असते आणि याचाच परिणाम म्हणून झोपडपट्ट्यांत अनारोग्यकारक परिस्थिती निर्माण होते. पिण्याच्या पाण्यातून अनेक प्रकारच्या आजारांचा जन्म होतो. सांडपाण्याची चांगली व्यवस्था नसणे पिण्याचे शुद्ध पाणी नसणे यामुळे आजारांचे व साथीचे प्रमाण वाढते. यातून डायरीया, मलेरिया सारखे

आजार फैलावतात. शौचालय हि एक अतिशय गंभीर आणि सार्वत्रिक समस्या शहरी भागातील झोपडपट्ट्यांमध्ये आहे. महापालिका अंतर्गत शहरी भागात स्वच्छता ही राज्य सरकारांची जबाबदारी आहे. शहरी भागातील एक चतुर्थांश लोकसंख्येला सुरक्षित स्वच्छतेच्या सुविधांचा लाभ मिळू शकत नाही. खुल्यावर शौचास जाण्याचे प्रकार हे अनेक शहरांमध्ये दिसून येतात जे पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्य बिघडविण्यास कारणीभूत ठरतात. हक्काचे शौचालय असणे ही मानवाची सामाजिक प्रतिष्ठा आहे. पाणी आणि स्वच्छता, हे गरीबांसाठी गृहनिर्माण व रोजगार निर्माणाशी जोडले गेले पण एक वेगळी समस्या म्हणून त्याकडे पाहिले गेले नाही. शहरी गरीब म्हणून झोपडपट्ट्यांच्या पाणीपुरवठा आणि स्वच्छता याबाबतच्या गरजांकडे पुरेसे लक्ष दिले नाही. घरसुची आणि घरगणना २०११ नुसार शहरातील झोपड्या हे शहरी गरीबीचे मुर्त रुप आहे. भारतात सुचित न केलेल्या झोपड्या ४२% असून ४५% झोपडपट्ट्यांमध्ये सांडपाण्याची सुविधा नाही. तर कचरा विल्हेवाटीची सुविधा ३८% झोपडपट्ट्यांमध्ये नाही.

झोपडपट्टीतील राहण्याच्या ठिकाणावरील अस्वच्छता, उघड्या गटारी, मच्छरांचे प्रमाण व इतर जीवजंतू हे अन्नपदार्थावर व येथील व्यक्तींच्या घरांमध्ये, वातावरणामध्ये मिसळत असतात. सार्वजनिक शौचालये ही लोकसंख्येच्या मानाने अपुरी असतात. स्त्रियांसाठी असणारी शौचालये आणखी कमी असतात त्यात पाण्याचा अभाव, जुनी शौचालये, भरपूर पाणी नसल्यामुळे शौचालयांची प्रचंड दुर्गंधी येत असते. अशाही वातावरणात येथील स्त्रीया, पुरुष, वृद्ध, लहान मुले यांना या सार्वजनिक शौचालयांचा वापर करावा लागतो. मानवी आरोग्यास प्रचंड प्रमाणात घातक असणारी ही शौचालये येथील माणसांच्या शारीरिक वाढीवर परिणाम करतात. तसेच त्वचेचे आजार होतात. झोपडपट्ट्यांमध्ये शौचालये ही रस्त्याच्या कडेला किंवा झोपडपट्ट्यांमध्येच असतात. शासनमान्य झोपडपट्ट्यांत सार्वजनिक शौचालये झोपडपट्ट्यांच्या जवळच रस्त्याच्या कडेला किंवा एका बाजूला बांधलेली आहेत. तरीही त्याची दुर्गंधी ही येथील सर्वच परिसरात पसरत असते. पहाटेपासून शौचालयांसाठी पुरुषांची रांग लागत असते. तशीच स्त्रियांचीही रांग असते. पाणी मात्र एक मोठा डबा भरून घरूनच घेऊन जावे लागते किंवा शौचालयाजवळ पाण्याची टाकी असते तेथून पाणी असल्यास घेतले जाते. म्हणजेच झोपडपट्टीतील घरांच्या समस्येबरोबरच शौचालयांची समस्या अतिशय गंभीर अशा स्वरूपाची, विविध प्रकारचे आजार, दुर्गंधी व रोगांचा फैलाव करणारी आहे. सार्वजनिक शौचालये अपुऱ्या प्रमाणात असण्याबरोबरच पाण्याचा अभाव व शौचालयाच्या आजूबाजूला सांडपाणी बाहेर येते.

लहान मुले उघड्यावर शौचालयाला बसविली जातात किंवा घरासमोर असणाऱ्या उघड्या गटारींमध्ये बसविली जातात. मुंबईमध्ये हायवेच्या बाजूला, नाल्यांच्या बाजूला व खड्ड्यांच्या रिकाम्या जागांवर हजारो झोपडपट्टीवासिय व उघड्यावर राहाणारे लोक स्वच्छतागृहाअभावी उघड्यावर शौचाला बसत होती. आजही काही ठिकाणांवर ही परिस्थित आहे. ग्रामीण भागात हजारो वर्षे लोक उघड्यावर शौचाला जात होते व आजही मोठ्या प्रमाणात उघड्यावर शौचाला बसतात. हे लोक मुंबईत स्थलांतरीत झाली तरी हजारो लोक असे उघड्यावर बसलेले बघितल्यानंतर आहे ती परंपरा मुंबईतही पाळण्याकडे या लोकांचा कल होता. म्हणजेच स्वच्छतेबाबत जागरूकता नसल्यामुळे व सोयीसुविधांचा अभाव असल्यामुले आणखी अस्वच्छता निर्माण होते व विविध आजारांना, रोगांना झोपडपट्टीवासीय बळी पडतात. सर्वाधिक खर्च हा येथील लोकांचा आरोग्यावर होत असतो. म्हणजेच प्राथमिक गरजा भागविण्याच्या खर्चाबरोबरच दवाखान्याचा खर्चही येथील लोकांचा वाढत असतो. कच्च्या झोपडपट्ट्यांमध्ये स्वच्छतागृह नाहीत. सांडपाणी वाहून जाण्यासाठीची व्यवस्था नाही असे लोक जवळपास असणाऱ्या सार्वजनिक शौचालयांचा किंवा बसस्टँड, रेल्वे येथील शौचालयांमध्ये पैसे देऊन अशा ठिकाणी जात असतात. कामाच्या ठिकाणी असणाऱ्या शौचालयाचा वापर करतात. म्हणजे मुंबईमध्ये शौचालयांची समस्या झोपडपट्ट्यात अतीव गर्दीमुळे अधिक बिकट स्वरूपाची झाली आहेत.

अतिशय कमी जागेत दाटीवाटीने छोट्या-छोट्या खोल्यांमध्ये लोक राहातात तेथे सूर्यप्रकाश व मोकळी हवा येत नाही. जाण्यायेण्यासाठी रस्ता अतिशय छोटा असतो. झोपडपट्टीधारक आपली झोपडी पुढे पुढे सरकवत आणतात व त्या जागेचा वापर घरातील पाण्याची भांडी, पलंग, खुर्ची ठेवणे, तेथे बसणे यासाठी करत असतात. कच्च्या झोपडपट्ट्यांची अवस्था अतिशय बिकट अशा स्वरूपात असते. नियोजनाचा अभाव, स्वच्छतागृह नसणे, सांडपाणी रिकाम्या जागेत वाहत राहाणे, झोपडीच्या अवतीभोवती पाणी साचणे व त्यामुळे दुर्गंधी होत असते. उंदिर, घुशी यांचा वावर रात्रीच्या वेळेस वाढत असतो. रेल्वेलाईनच्या कडेला असणाऱ्या झोपडपट्ट्यांना दिवसा व रात्रीसुद्धा उंदीर, घुशी यांचा त्रास सहन करावा लागतो. झोपडीच्या खाली उंदरे, घुशी बिळ तयार करतात व घरामध्ये अचानक खड्डा पडत असतो. फरशी किंवा कोबा खाली जातो. पावसाळ्यात घराचे पत्रे, स्लॅब, भिंती ओल्या होतात व गळतात. घरात ओलावा येत असतो. गटारांचे पाणीही घरांमध्ये येत असते. काही झोपड्या ह्या प्लास्टिक कागद टाकून केलेल्या असल्यामुळे व नाल्यांच्या ठिकाणी असल्यामुळे येथील कुटुंबांना आणखीनच दुर्गंधीचा सामना करावा लागतो. म्हणजेच शहरातील

कच्च्या झोपडपट्ट्यांतील झोपडपट्टीवासियांचे जीवनमान अतिशय कनिष्ठ दर्जाचे झाल्याचे दिसते.

शहरीकरणामुळे झोपडपट्ट्यांची वाढ झाली असून शहरातील झोपडपट्टीवासीयांचे आरोग्य हे ते राहत असलेल्या भौतिक पर्यावरणावर अवलंबून असते. झोपडपट्टीवासीय राहत असलेल्या घरांची स्वच्छता, पुरेशी मोकळी हवा, घराचा आकार व सभोवतलाचे पर्यावरण यावर अवलंबून असते. झोपडपट्ट्यांमध्ये वैयक्तिक शौचालयांचा अभाव, सार्वजनिक शौचालयांची संख्या, लोकसंख्येच्या प्रमाणात अतिशय कमी असल्यामुळे येथील लोकांचे सार्वजनिक व वैयक्तिक आरोग्य धोक्यात आले आहे. जमिनी अंतर्गत सांडपाण्याची व्यवस्था नसते. उघडी-तुंबलेली गटारे, डासांचा प्रादूर्भाव, सार्वजनिक नळावरील अपुरा पाण्याचा पुरवठा, सार्वजनिक ठिकाणी टाकलेला सुका व ओला कचरा व त्याची दुर्गंधी यामुळे येथील लोकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. सार्वजनिक ठिकाणच्या कचऱ्यामुळे व झोपडपट्टीतच सार्वजनिक शौचालये असल्यामुळे आजूबाजूच्या झोपडपट्टीवासीयांना या दुर्गंधीला सामोरे जावे लागते. सार्वजनिक ठिकाणचा कचरा दररोज उचलला जात नाही. यामुळे येथे आजारांचे प्रमाण जास्त आहे. साथीचे आजार, संसर्गजन्य रोग येथे दिसून येतात. मुलांचे कुपोषण तसेच सर्दी, ताप, खोकला, जुलाब, त्वचारोग, काविळ यासारख्या आजारांचे प्रमाण लहान मुलांबरोबर, स्त्रिया, पुरुष व वृद्धांनाही होतात. झोपडपट्टीतील भौतिक पर्यावरणामुळे किरकोळ आजारांनी सुद्धा येथील लोक मृत्यू पावतात. आरोग्याविषयी येथील लोकांमध्ये असणारे अज्ञान, अशिक्षितपणा, दारिद्र्य यामुळेही वैयक्तिक आरोग्याचा दर्जा राखता येत नाही. पुरेशा जागेचा अभाव, अतिदाट लोकसंख्या, मोठ्या रस्त्यांचा अभाव, नियोजन विरहीत झोपड्या इत्यादी कारणांमुळे झोपडपट्टीवासीयांना आरोग्यपुर्ण भौतिक वातावरण मिळत नाही. म्हणून भौतिक पर्यावरण व झोपडपट्टीवासीयांच्या आरोग्याचा घनिष्ठ संबंध आहे. झोपडपट्टीवासीयांची आरोग्याची गुणवत्ता व जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी शासकिय पातळीवरुन सातत्याने प्रयत्न होणे आवश्यक आहे.

झोपडपट्टीतील लोकांनीच येथील पर्यावरणीय स्वच्छता ठेवण्याची गरज आहे. म्हणून येथील लोकांमध्ये प्रदूषणाच्या परिणामाची जाणीव निर्माण करुन देणे. प्रदूषण कमी करण्यासाठी पर्यावरणीय दृष्टीकोन आणि शिक्षणाची भूमिका व पर्यावरणाचे व्यवस्थापन करणे. प्रदूषणापासून सुरक्षिततेसाठी सहकार्याची व जबाबदारीची भावना असणे आवश्यक आहे. पर्यावरणाशिवाय मानवाचे जीवन असू शकत नाही. जीवनाची गुणात्मकता ही पर्यावरणावर अवलंबून असते. पर्यावरणीय परिस्थिती बिघडवण्यात मानवाची भूमिका महत्वाची आहे. प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे परिणाम हा मानवाच्या कार्यक्षमतेवर होतो, यावरून स्पष्ट केली आहे.

झोपडपट्टीची निवड करण्याचे कारण दर्शविणारी सारणी

अ.क्र.	निवड करण्याची कारणे	वारंवारिता	टक्केवारी नाशिक	वारंवारीता	टक्केवारी मुंबई
१)	झोपडपट्टी पुनवर्सन	७	७	२१	२१
२)	मूळ गाव येथून जवळ असणे	४५	४	०	०
३)	घरांची किंमत स्वस्त	२	२	२८	२८
४)	कामाचे अंतर कमी	२९	२	२०	२०
५)	घराची सहज उपलब्धता	१०	१०	१६	१६
६)	विवाह झाल्यामुळे	७	७	६	६
७)	आई-वडील राहत असल्याने	४१	४१	९	
	एकूण	**१००**	**१००.००**	**१००**	**१००**

वरील सारणीवरून नाशिक शहरात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून ७%, मुळगाव जवळ असणे ४%, घरांची किंमत स्वस्त २%, कामाचे अंतर कमी २९%, घराची सहज उपलब्धता १०%, विवाह झाल्यामुळे ७% व आई-वडील राहत असल्यामुळे ४१% व्यक्तींनी सांगितले आहे तर मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन योजना २१%, घरांची स्वस्त किंमत २८%, कामाचे कमी अंतर २०%, घराची सहज उपलब्धता १६%, विवाह झाल्यामुळे ६% तर आई-वडील राहत असल्यामुळे ९% व्यक्तींनी सांगितले आहे तर मुंबईत मूळगाव येथून जवळ असल्याचे कोणीही सांगितले नाही. नाशिक शहरालगत असणारी ग्रामीण भागातील कुटुंबे आपल्या गावाकडे जाणारे रस्ते व परिसरातील झोपडपट्ट्यांमध्ये राहिली आहेत. त्र्यंबकेश्वर, इगतपुरी येथील कुटुंबे सातपूर, अंबड, सिडको या परिसरातील झोपडपट्ट्यांत राहिले आहेत. तसेच कामाचे अंतरही कमी असते. औद्योगिक वसाहतींमध्ये काम करणाऱ्या लोकांना येथे राहणे परवडते, त्याबरोबर झोपडपट्टीत घराची सहज उपलब्धता होते व घरभाडे आणि इतर सोयी-सुविधांवरील खर्च कमी असतो म्हणजे इतर सोयी-सुविधा या सार्वजनिकच असतात. तसेच विवाह झाल्यामुळे झोपडपट्टीची निवड करण्याचे प्रमाण नाशिक व मुंबई शहरात जवळपास सारखेच आहे तर नाशिकमध्ये आई-वडील राहत असल्यामुळे त्याच झोपडपट्टीत राहण्याचे प्रमाण ४१% आहे. कारण स्वत:ची झोपडी असण्याबरोबर आपल्या परिचयातील किंवा नातेवाईक तसेच आपल्या जातीची कुटुंबे राहत असल्यामुळे आणि सुरक्षितता वाटत असल्यामुळे येथे राहणे सोयीचे वाटते. त्याबरोबर किरकोळ स्वरूपाचा व्यवसायही झोपडपट्टीत काही कुटुंबांना करता येतो. स्त्रियांना जवळपास धुणी, भांडी, कंपनीतील कामे, दुकान, हॉटेल यातील कामे मिळविलेली असतात, म्हणून एका

ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी झोपडपट्टीत गेल्यास उदरनिर्वाहाचा, रोजगाराचा प्रश्न निर्माण होत असतो, म्हणून नाशिक शहरात आहे त्याच झोपडपट्टीत अधिक काळापर्यंत वास्तव्यास असणारी कुटुंबे आहेत.

मुंबईमध्ये झोपडपट्टीतही जागा मिळविणे व ती टिकवून ठेवणे आवश्यक असते. स्वत:ची झोपडी असेल तर एक ते दोन पिढ्यांमध्ये राहिलेली कुटुंबे आहेत. कामाचे ठिकाण कितीही दूर असले तरी चालणारे असते. कारण मुंबईत आपल्या जातीसमूहाचे, धर्माचे व गावाकडील तसेच नातेवाईक व्यक्ती जवळपास त्याच भागात झोपडपट्टीत राहत असतील तर अशाच ठिकाणी एकमेकांच्या ओळखीने झोपडी मिळविलेली असते किंवा साधारणपणे १९९५ सालापर्यंतच्या झोपड्यांना शासनाने मान्यता दिली असली तरी झोपडी अधिकृत नसेल तर अशा कुटुंबांना या ठिकाणाहून काढून दिले जाते किंवा तेथील कच्च्या व पक्क्या मटेरिलपासून बांधलेल्या झोपड्या पाडल्या जातात, म्हणून मुंबईमध्ये असे असले तरी बऱ्याच कालावधीपासून राहणारी कुटुंबे ही आपल्या गावापासून दूर आहेत. त्याबरोबर मुंबईतही झोपडी व फ्लॅटमधील घरांच्या किंमतीत खूप मोठी तफावत आहे. आपल्या सामाजिक आर्थिक परिस्थितीनुसार व नातेवाईकांच्या ओळखी व जाती धर्मानुसार कामाच्या दर्जानुसार झोपडपट्टीत राहणे स्वस्त असते. तसेच विवाह झाल्यामुळे व आई-वडील राहत असल्यामुळे मुंबईत झोपडपट्टीची निवड करण्याचे प्रमाण अतिशय कमी आहे.

मुंबईमध्ये घाटकोपर, चेंबूर येथे दलित वस्त्या अधिक प्रमाणात वसलेल्या आहेत. रमाबाई आंबेडकनगर, कामराजनगर, पंतनगर, टिळकनगर येथील सर्वच झोपडपट्ट्यांत महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील दलित लोकांनी विशेषत: आंबेडकरी अनुयायी असणाऱ्या व नवबौद्ध असणाऱ्या लोकांनी स्थलांतर केलेले आहे. येथे स्वातंत्र्यापूर्वीपासूनच दलितांनी शहरात विशेषत: मुंबईत स्थलांतर करण्यास सुरुवात केली. ग्रामीण भागात गावात पाळली जाणारी अस्पृश्यता व गावकीची पारंपरिक कामे सोडून मुंबईत खाड्यांमध्ये रस्त्यांच्या व रेल्वेच्याकडेला उघड्यावर राहिलीत. स्वातंत्र्यानंतर हा ओघ आणखीच वाढत गेला व या झोपड्यांना शासनाने काही कालावधीनंतर मान्यता दिली, तरी सार्वजनिक सुविधा, त्यांची देखभाल याकडे दुर्लक्ष केले. दलित लोकांवर होणारे अन्याय अत्याचार कमी झालेत, असे म्हणता येणार नाही. मुंबईत शासनावर दबाव टाकून आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली चळवळी केल्यात व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतरही या चळवळी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिक पातळीवर सुरू आहेत. कसेही असले तरी झोपडपट्टीतील जीवन दलितांनी स्विकारले, त्याबरोबर कमी-अधिक प्रमाणात इतर जातीतील मागासवर्गीय, ओबीसी, भटके विमुक्त या लोकांनीही दलितांच्या आधाराने मुंबईतील

झोपडपट्ट्यांमध्ये स्थलांतर केले. अधिकाधिक लोकांनी कष्टाने मिळेल ते काम करत चांगले जीवन जगण्याचा प्रयत्न केला, यातून पुढील पिढ्यांना चांगले जीवन जगण्यास मिळते आहे. अनेक कुटुंबांनी कधीच झोपडपट्ट्या सोडून मुंबईत व इतर शहरांमध्ये, कंपनी व शासकीय नोकऱ्यांमध्ये आपले स्थान पक्के केले आहे. शिक्षणातून बदल घडविण्याचे व कायदेशीर दृष्टिने चळवळी करून तर कधी दलित साहित्यातून आपल्या व्यथा मांडून जनजागृती करून तसेच हिंदू धर्माचा त्याग करून आपले जीवन जगण्याचे संपत्ती, शिक्षण, मानसन्मान, प्रतिष्ठा, नोकरी, व्यवसाय, सर्व स्तरातील समाजात राहण्याचे स्वातंत्र्य राज्य घटनेने दिलेल्या अधिकारातून मिळविण्याचा प्रयत्न करत आहेत. म्हणजेच दलित समूहाने झोपडपट्ट्यात राहून सामाजिक न्याय मिळविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला मार्ग अवलंबून दलित समाजाने आपल्या जीवनात सामाजिक, सांस्कृतिक क्रांती अल्पावधीतच घडवून आणली आहे. मुंबईतील झोपडपट्ट्यात आजही दलित समाज मोठ्या संख्येने राहतो आहे. यात दलितांमधील असणाऱ्या महार किंवा नवबौद्ध असणाऱ्या कुटुंबांची संख्या कमी आहे. ज्या दलित जातींनी आपण दलित आहोत हे मान्यच केले नाही, अशा जातींनी ग्रामीण भाग गावे लवकर सोडली नाहीत. आपली पारंपरिक स्वच्छतेची कामे करत राहिलीत. आपण दलित नसून आपण वरिष्ठ जातीतील असून आपणास इतर वरिष्ठ जातींकडून जो थोडाफार मानसन्मान व रोजीरोटी मिळते, यातच धन्यता मानली व वरिष्ठ जातींच्या मर्जीतच राहण्याचा या दलित जातीतील इतर समूहांनी प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशी या दलित जाती फटकून राहिल्यात. जातीय विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत उभ्या राहिल्या नाहीत, यात मांग, चांभार या सर्वांना माहीत असणाऱ्या दलित जातींचा समावेश आहे.

झोपडपट्टीत इतर दलित जातींना घर भाड्याने देणे, खुल्या जागांवर झोपडी उभारून देणे, ती अनाधिकृत असली तरीसुद्धा त्याची परवानगी नंतर शासनाकडून घेण्यासाठी प्रयत्न करणे, याबरोबर इतर सर्वच जातीतील रोजगारांसाठी आलेल्या लोकांना आंबेडकरी अनुयायांनी झोपडपट्टीत सामावून घेतले व त्यांना आधार दिला. राजकीय नेतृत्व केले. महाराष्ट्राच्या बाहेर येणाऱ्या उत्तर प्रदेश, बिहार, आसाम, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, केरळ, कर्नाटक, तामिळनाडूत अशा देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या लोकांना मुंबईतील झोपडपट्टीत राहणाऱ्या दलित वस्त्यांनी आधार दिला व त्यांच्या राहण्याची, खाण्या-पिण्याची, नोकरी, कामधंदा करण्याची सोय सतत करत राहिले. म्हणजेच मुंबई शहरातील झोपडपट्ट्यांत राहून आपले जीवनमान कष्टाने सुधारून मुंबईच्या विकासाला, सेवाक्षेत्राला स्वस्तात मनुष्यबळ पुरविण्याचे

काम केले आहे. फिल्म इंडस्ट्रीमध्ये आज नावाजलेले दिग्गज कलाकार, दिग्दर्शक यांच्या मागील पिढ्या झोपडपटट्यांतून राहिल्या आहेत.

मुंबईतही जाती धर्माच्या आधारावर झोपडपट्ट्या वसलेल्या आहेत. भिवंडी, गोवंडी, मोमीनपुरा अशा ठिकाणी मुस्लिम लोक राहतात. त्याबरोबर इतरही हिंदू धर्मीय, ख्रिश्चन धर्मीय कुटुंबे राहतात. उत्तर प्रदेशातील मुस्लीम लोक अधिक प्रमाणात झोपडपट्ट्यांत राहत आहेत व इतर मागास व अतिमागास दलित कुटुंबे ज्यांना मुंबईत भैया असा शब्द प्रचलित आहे. या उत्तर प्रदेशातील मजूर लोकांची संख्या जास्त झाल्यामुळे मराठी लोकांना काम मिळत नाही, असे राजकीय नेते प्रचार करतात व मते मिळवितात, असे असले तरी कष्टाची व इतर कामे महाराष्ट्रात व इतरही राज्यांमध्ये याच व्यक्ती करत आहेत. मजुरी कमी असली तरी काम मिळणे व मिळविणे याकडे अधिक लक्ष असते व शहरांमध्ये हे मनुष्यबळ सहज उपलब्ध होते. आर्थिक उत्पन्न कमी असणाऱ्या कुटुंबांना झोपडपट्टीत राहणे परवडणारे असते व येथील लोक नव्याने येणाऱ्या मजुरांना स्थलांतरितांना राहू देतात व सामावून घेतात.

नाशिकमध्ये पंचवटीत फुलेनगर येथे भाजी मार्केट मध्ये काम करणाऱ्या लोकांचे प्रमाण जास्त आहे. तर अंबड, सातपूर येथे कंपन्यांमध्ये काम करणारे कामगार आहेत. ग्रामीण भागाच्या जवळ असणाऱ्या वस्तीतील लोक शेतमजूरी करतात. बऱ्याचदा शहरात राहण्यासाठी आईवडिलांनी झोपडी मिळवलेली असते. घराची किंमत व घरभाडे कमी असल्यामुळे देखील झोपडपट्टीची राहण्यासाठी निवड करावी लागते. घराचे डिपॉझीट व घरभाडे हे महिना दोन महिने रोजंदारीने काम केल्यावर देता येते. नाशिक शहराच्या जवळपास असणाऱ्या गावांमधून आलेली कुटूंबे ही आपल्या गावाकडे जाण्या येण्यासाठी जवळच्या असणाऱ्या झोपडपट्ट्यांमध्ये राहिलेली आहेत. त्र्यंबकेश्वर व इगतपुरी येथील लोक अंबड, सिडको, सातपूर या भागात राहिली आहेत. तर दिंडोरी, पेठ, सुरगाणा येथून येणारी कुटूंबे म्हसरुळ, पेठरोड, पंचवटी, फुलेनगर येथील झोपडपट्ट्यांत राहिली आहेत. तर नाशिकरोड भागात सिन्नर कडून येणारी कुटूंबे राहिली आहेत.

स्वयंपाक बनविण्यासाठी गॅस शेगडी वापरत असल्याचे नाशिकमध्ये ८८% तर मुंबईत ९५% कुटुंबांनी सांगितले आहे. तसेच इतर स्वयंपाक बनविण्यासाठी वापरत असलेल्या साधनांमध्ये रॉकेल, इलेक्ट्रिक हिटर वापरत असल्याचे सांगितले आहे तर नाशिकमध्ये ६% कुटुंबांनी मातीची चूल वापरत असल्याचे सांगितले.

उज्ज्वला गॅस योजनेमुळे शहरातील झोपडपट्ट्यांतील गरीब कुटुंबांना व ग्रामीण भागातसुद्धा गॅसचे कनेक्शन मोफत तसेच कमीत कमी पैशांमध्ये देण्यात आले. भटके विमुक्त कुटुंबे जी शहरांमध्ये सिग्नलजवळ भीक मागणे, विविध किरकोळ नाविन्यपूर्ण वस्तू विकून तात्पुरत्या स्वरूपात पैसे मिळविण्यात, अशी कुटुंबे चूल व रॉकेलचा वापर करतात. या कुटुंबांकडे राहण्यासाठी झोपडी नसल्यामुळे व कोठेही नाव नोंदणी, रेशनकार्ड, आधारकार्ड, शाळेतील नाव नोंदणी दाखला, गावाचे नाव, रहिवासी पत्ता याची उपलब्धता नसल्यामुळे कोणत्याही शासकीय योजनेची मदत या लोकांना मिळत नाही. नाशिकमध्ये म्हसरूळ येथे व पंचवटी विभागातील फुलेनगरमध्ये वडार असणाऱ्या व भटके विमुक्त कुटुंबांना शासकीय योजनेतून घरे मिळाली आहेत व स्वतंत्र पक्क्या घरांची वस्ती भटक्या विमुक्त जातीतील कुटुंबांची आहे.

नाशिकमधील फुलेनगर झोपडपट्टीत पाच वर्षापूर्वी भटक्या, विमुक्त व शहरातील कष्टाची कामे करणाऱ्या बहुसंख्य कुटुंबाकडे स्वयंपाक करण्यासाठी गॅस शेगडी नव्हती तर रॉकेल व चुलीचा वापर केला जात होता. वडार समाजातील लोक फुलेनगर झोपडपट्टीत व झोपडपट्टीच्या आश्रयाने राहिली आहेत. शहरातील रस्ते खोदण्याचे काम या लोकांकडूनच करून घेतली जातात. शारीरिक कष्टाचे काम हे लोक करत असले तरी त्यातून मिळणाऱ्या मोबदल्यातून प्राथमिक गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. म्हणजेच भारतात शारीरिक कष्टाच्या, अंगमनेहतीच्या कामांना पुरेसा मोबदला मिळत नाही, पण ज्या लोकांना बैठे काम असते. शासकीय नोकरी असते अशा लोकांना नियमित वेतन ठराविक स्वरूपात दिले जाते. सहा महिन्याने, वर्षाने महागाई भत्ता, घरभाडे वाढवून दिले जाते. प्रत्येक व्यक्तीच्या सेवेनुसार वेतनात वाढ होत जाते, पण अनौपचारिक क्षेत्रातील अंगमेहनतीची कामे करणाऱ्या लोकांना याचे फायदे मिळत नाही. यामुळे रोजंदारीच्या कामांमध्ये व्यक्तींची कार्यक्षमता कमी होत गेली की, त्याचे उत्पन्न घटत जाते. अंगमेहनतीच्या कामांना भारतामध्ये कनिष्ठ दर्जा दिला जातो, त्याच्याकडे तुच्छतेने पाहिले जाते व रोजगारही अतिशय कमी दिला जातो. या सर्व बाबतीत शासनाची उदासिनता दिसून येते. अमर्त्य सेन म्हणतात की, उत्पादनाचे विषम वाटप त्यात नियोजन नसणे व गरजेपेक्षा अधिक वस्तूंची साठवणूक तथाकथित लोकांकडून केली जाते व समाजामध्ये उपलब्ध असणाऱ्या संधी आणि या संधीवर समाजातील कोणत्या वर्गाचा प्रभाव आहे, यावर

साधनांचे वाटप अवलंबून असते. हे वाटप व्यक्तीच्या वैयक्तिक कर्तृत्वावर अवलंबून नसून शासनाकडून लोकोपयोगी साधनांची उपलब्धता व सामाजिक धोरणे यावर अवलंबून असते. म्हणजेच गरिबीचा फटका हा फक्त रोजंदारीने काम करणाऱ्या मजुरांनाच व हातावर पोट असणाऱ्या लोकांनाच बसत असतो, यात अन्नधान्य, पैसा, वस्तू, घरे, सोयीसुविधा चांगल्या कामांची उपलब्धता याचा तुटवडा नसून त्याचे योग्य वाटप न होण्यामध्ये व लोकांचा त्यावरील हक्क बजवण्याच्या सवयींमध्ये आहे. सट्टा बाजार, वस्तूंची साठवणूक व लोकांची नफा कमावण्याची वृत्ती यामुळे गरिब लोकांचे शोषण होत असते.

शहरातील झोपडपट्ट्या हा औद्योगिकरणाचा विकासाचा परिणाम असला तरी या विकासासाठी वापरण्यात आलेल्या मनुष्यबळाचा त्यांच्या विकासाचा विचार करण्यात आला नाही. अधिकाधिक नफा कमावण्याची वृत्ती असल्यामुळे लोकांची संपत्ती साठवण्याची प्रवृत्ती वाढत गेली व मोठ्या इमारती, उद्योगधंदे, मॉल, चकचकीत शहरे उभी राहिलीत पण यात खूप मोठ्या प्रमाणात मागासलेल्या जातींचे शोषण करण्यात आले आहे. हे शहरीकरणाचे वैशिष्ट्ये आहे. भारतातील उच्च जातींना संपत्ती मिळविण्याच्या अधिकारातून व भांडवल संचय यामुळे मोठे उद्योग, व्यवसाय वाढवता आले व साधनसंपत्तीवरील मालकी आणखी विस्तारता आली आहे, असा वर्ग आणखी श्रीमंत होत गेला आहे.

बाजारपेठांच्या मुख्य ठिकाणांचे शहरामध्ये रूपांतर झाले व छोट्या शहरांचे मोठ्या शहरात, महानगरात रुपांतर झाले, यात आजूबाजूची गावे, जमीन, पाडे, वाड्या, आदिवासी, दलित वस्त्या अशा सर्वांचा समावेश होत गेला. शहरांच्या विस्तारीकरण करणाच्या प्रक्रियेत हे होत गेले आहे. लोकसंख्या वाढ व लोकांच्या गरजा भागविण्यासाठी उभारलेले उद्योग असले तरी त्यात प्रचंड विषमता, नफेखोरीवृत्ती, साधनसंपत्तीची साठवणूक, जमीन, उद्योग इमारती यावर असणारा ताबा व तो सतत वाढवत नेणे, यामुळे ही शोषणाची व्यवस्था अधिक बळकट करण्याचे कार्य केले आहे. त्याला कायदे, जाती-धर्म याचा आधार देऊन वंचित समूहांचे अधिकाधिक शोषण केले जाते आहे. या सर्व प्रक्रियेत झोपडपट्ट्यांची निर्मिती ही अपरिहार्य प्रक्रिया जाणीवपूर्वक तयार केल्याचे स्पष्ट होते. यामुळे येथून स्वस्त मनुष्यबळाची निर्मिती सर्वच क्षेत्रांसाठी होत राहते, याची व्यवस्था शहरीकरणातून झालेली आहे. मजुरांमध्ये स्पर्धा निर्माण होऊन अधिक स्वस्त मजूर मिळतील, हे पाहिले जाते. म्हणजेच कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध न होऊ देणे, सरकारी मालमत्तेचे खासगीकरण करणे, आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा दबाव आहे, म्हणून खासगीकरण केले जाते आहे, असा प्रचार करणे, कंत्राटी स्वरूपात नोकरभरती करणे, सरकारी उद्योग भाड्याने देणे यातून माणसाच्या

श्रमाचे अवमुल्यन करून त्यांना आहे, त्या मजुरीपेक्षा कमी मजुरीत काम करण्यास भाग पाडणारी व्यवस्था भक्कमपणे तयार केलेली आहे. लोकशाहीत स्वातंत्र्य, काम मिळविण्याचा हक्क असे असले तरी जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या रोजगाराचे हक्क शासनाकडून आजपर्यंत देण्यात आले नाहीत व यापुढेही देण्यात येतील, याची शक्यता नाही म्हणजेच शहरातील झोपडपट्ट्यांबरोबरच ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांना आदिवासी, भटके, विमुक्त, दलित इतर मागासवर्ग समूहांना अधिकाधिक गरिबीच्या कक्षेत ढकलण्याचे सोयीस्कर प्रयत्न शासकीय यंत्रणांकडून, राजकीय निर्णयांमधून होत असल्याचे दिसते आहे. शासनाची जबाबदारी फक्त देशाचे संरक्षण व अंतर्गत सुरक्षा व्यवस्था पाहणे एवढीच आहे, असा प्रचार केला जातो आहे. गरीब, वंचित समूहाची जबाबदारी शासनाची नाही, त्यांना नोकरी देणे, ज्यांचे जीवनमान उंचाविणे, त्यांचे शोषणास प्रतिबंधित कायदे व अंमलबजावणी करणे याची जबाबदारी अप्रत्यक्षपणे टाळली आहे.

झोपडपट्ट्यांमध्ये होणारी भांडणे, आत्महत्या हे सर्व प्रकार आर्थिक विवंचनेतून व सामाजिक परिस्थितीत बदल घडवून आणण्यास असमर्थ असणाऱ्या परिस्थितीतून येत असल्याचे दिसते. शासनाकडून शेतीक्षेत्रात दिली जाणारी अनुदाने १९९१ नंतर हळूहळू बंद करण्यात आली आहेत व त्याच क्रमाने शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण शेतीच्या दुष्काळी भागांमध्ये वाढत गेल्याचे दिसते. शासनाने शेतीक्षेत्रातील अनुदान व इतर सर्वच बाबतीत अंग काढून घेतल्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विकासाच्या नावाखाली शेतीसाठी लागणारी औषधे, बियाणे, इतर साहित्याच्या किंमती वाढवत नेल्या. त्याबरोबर जमिनीचे भाव प्रचंड प्रमाणात जाणीवपूर्वक नियोजनबद्धपणे शासनाला हाताशी धरून वाढवले आहेत व शेतीतून येणाऱ्या उत्पादनाचे भाव याच पद्धतीने कमी करत राहायचे, शेतीतून उत्पन्न मिळणार नाही, शेतीवर गुजराण करणे अशक्य होईल व शेतकरी आपली शेती विकतील, यातून अनेक शेतकऱ्यांनी जमिनी विकल्या आहेत. या जमिनी उद्योग, इमारती यासाठी शासनाचा दबाव टाकून कायदे करून मिळविल्या जात आहेत. अल्पभूधारक शेतकरी, कारागीर, शेतमजूर यांनी शहरांमध्ये झोपडपट्ट्यांत स्थलांतर केले आहे. नाशिकमध्ये झोपडपट्ट्यांत असे अनेक अल्पभूधारक शेतकरी, शेतीशी संबंधित कारागीर झोपडपट्ट्यांमधून राहत आहेत. यात इतर मागास वर्ग, मराठा, सोनार अशा अनेक जातीतील खेड्यातून आलेल्या कुटुंबाचा समावेश आहे.

स्वत:ला व झोपडपट्टीसाठी पिण्याच्या पाण्याचे मुख्य साधन

अ.क्र.	पिण्याच्या पाण्याचे मुख्य साधन	वारंवारिता	टक्केवारी नाशिक	वारंवारीता	टक्केवारी मुंबई
१)	सार्वजनिक नळ	७५	७५	८८	८८
२)	बोअरवेल	०	०	३	३
३)	हातपंप	१	१	४	४
४)	खासगी पाण्याचे टँकर	०	०	१	५
५)	सरकारी पाण्याचे टँकर	०	०	०	०
६)	स्वत:चा पाण्याचा नळ	२४	२४	४	०
	एकूण	**१००**	**१००**	**१००**	**१००**

वरील सारणीवरून नाशिक शहरात सार्वजनिक नळ ७५%, हातपंप २% व स्वत:चा पाण्याचा नळ २४% कुटुंबाकडे आहे, तर मुंबईत सार्वजनिक नळ ८८%, बोअरवेल ३%, हातपंप ५%, खासगी पाण्याचे टँकर १% व स्वत:चा पाण्याचा नळ कोणत्याही कुटुंबाकडे नाही. नाशिक शहरात २४% कुटुंबाकडे स्वत:चा पाण्याचा नळ आहे, तर मुंबईमध्ये मात्र स्वत:चा पाण्याचा नळ नाही. स्वत:चे अधिकृत घर किंवा फ्लॅट असेल तरच पाण्याचे कनेक्शन मिळू शकते. मुंबईत बहुधा झोपडपट्टीत स्वत:च्या घरात असण्याबरोबर भाड्याने राहणारी ही कुटुंबे आहेत. तसेच अनधिकृत झोपडपट्ट्यांतून कुटुंबे राहत असल्यामुळे पाण्याची सुविधा कुटुंबांसाठी स्वतंत्रपणे दिली जात नाही. अधिकृत इमारतींमध्ये मात्र सुरळीत पाणीपुरवठा होईल, याकडे महापालिकेकडून लक्ष दिले जाते. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून वाटप झालेल्या इमारतींमध्येही सुरळीत पाणीपुरवठा होत नाही. बऱ्याच इमारतींमधील कुटुंबांना पाणी विकत घ्यावे लागते. म्हणजे पुनर्वसन योजनेतून घर मिळाले असले तरी सार्वजनिक सुविधांचाच वापर करणे भाग पडते. यातून या लोकांकडे प्रशासन, महानगरपालिका, अधिकारी व कर्मचारी हे दुर्लक्ष करत असतात. नाशिक येथील वडाळा येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून मिळालेल्या फ्लॅटमध्ये सार्वजनिक स्वच्छता राखली जात नसल्याचे दिसून आले. बांधकाम निकृष्ट दर्जाचे आहे. स्वच्छतागृहांसाठी असणाऱ्या मल्लनिसारण टाक्या छोट्या आहेत. ती पाण्याने लवकर भरून येते व हे अस्वच्छ पाणी बाहेर येते. घंटागाडी ही आठ दिवसातून येते म्हणजे कचरा दररोज गोळा केला जात नाही. येथील काही कुटुंबे इमारत कोसळेल म्हणून इतर ठिकाणी भाड्याने राहण्यासाठी गेली आहेत. कधीही रात्री झोपेत असे होऊ शकते, अशी भिती येथील रहिवाशांनी

व्यक्त केली आहे. पाण्याचा पुरवठा होत असला तरी इमारतीच्या सांडपाणी व्यवस्थेसाठी बाथरूम व टॉयलेटसाठी असणारे इमारतीच्या पाईपमधून पाणी गळत राहते. ही परिस्थिती येथे सर्वच इमारतींमध्ये आहे. २६९ स्क्वेअर फुटाचा फ्लॅट देण्यात आला आहे. यात काही कुटुंबे समाधानी आहेत, पण काही कुटुंबांनी येथे राहण्याला नापसंती दर्शविली आहे. येथील लोक जास्तीत जास्त वेळ घराच्या बाहेर इमारतीच्या मोकळ्या जागांमध्ये व रस्त्याच्या कडेला आपला वेळ घालवतात. इमारतीच्या ड्रेनेजसाठी असणाऱ्या पाईपमधून सातत्याने घाण पाणी बाहेर येते व ते इमारतीच्या आजूबाजूला साचते, यातून दुर्गंधी तयार होते. टॉयलेट बाथरूम लिकेज असल्यामुळे घरात ओलसरपणा असतो, यामुळे इमारत कोसळण्याचा धोका येथील कुटुंबांनी व्यक्त केला आहे.

येथील इमारतींच्या मोकळ्या जागेत भंगारची दुकाने, गॅरेज, नादुरूस्त मोटारसायकल, फोर व्हीलर लावलेल्या आहेत. तसेच भाजीपाला व छोटे किराणा दुकान आहे. मासे व मटनाची तात्पुरती रस्त्याच्या कडेला लावलेली दुकाने आहेत. चपलाचे दुकान लावले आहे. तसेच गॅस सिलेंडर साठीच्या रिक्षा, वाहतुकीसाठीच्या रिक्षा व जास्त करून हातगाडे व्यवसायासाठी वापरले जातात. शासनाकडून येथील कुटुंबांना राहण्याची व्यवस्था करण्यात आली, पण ती तुटपुंज्या स्वरूपाची आहे. या घरांमध्ये कुटुंबाचा आकार मोठा असल्यामुळे इतर व्यक्ती दुसऱ्या ठिकाणी राहावयास गेल्या आहेत. चांगल्या रोजगाराची उपलब्दता नसल्यामुळे हातगाडीवर फिरत्या स्वरूपात भाजीपाला व इतर किरकोळ वस्तू विक्री केली जाते. मुस्लिम व अनुसूचित जातीतील कुटुंबे राहत आहेत. एकंदर शासनाकडून झोपू योजनेतून घर मिळाले असले तरी येथील कुटुंबांचा रोजगारचा प्रश्न कायम राहिला आहे. येथील हातमजुरी करणारी कुटुंब व हातगाड्यावर किरकोळ व्यवसाय करणारी कुटुंबे आहेत. मुस्लिम कुटुंबे छोटे-छोटे किरकोळ व्यवसाय करतात. यात हातगाड्यावर भंगार गोळा करणे, भंगारचे दुकान लावणे, मासे-मटन यांची विक्री करणे, त्या त्या सिझननुसार आंबे, द्राक्ष, विविध फळे यांचा व्यवसाय हातगाडीवर करतात. इतर अनुसूचित जाती-जमातीतील व इतर कुटुंबेही इमारतीच्या बांधकामांवर मजूर, कारागीर म्हणून काम करणे, म्हणजेच दुकाने, हॉटेल्स, गॅस सिलेंडर वाटप इत्यादी ठिकाणांवर अंगमेहनतीची कामे करणारी आहेत. या लोकांना आर्थिक व आरोग्यविषयक समस्यांना सातत्याने सामोरे जावे लागते. निस्तेज चेहऱ्याने बसलेल्या कोणत्याही प्रकारचा उत्साह नसणाऱ्या व्यक्ती येथे पहावयास मिळतात. आला तो दिवस आपल्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यात घालवयाचा, पुन्हा दुसऱ्या दिवशी कामाच्या शोधात रहायचे. येथील जगणे स्वीकारल्याशिवाय

पर्याय या कुटुंबांकडे राहिलेला नाही. आपली परिस्थिती शहरात येऊन सुधारेल, या आशेने आलेल्या कुटुंबांची निराशाच झाल्याचे दिसते. रस्त्याने झोपडपट्टीच्या समोरून जाणाऱ्या गाड्या, समोरच उंच इमारती, बंगले येथील कुटुंबाची जीवन जगण्याची पद्धत, वस्तुंची रेलचेल हे सर्व बघितल्यानंतर ही कुटुंबे हतबल होतात व आपल्या वाट्याला हे चांगले जीवन कधीच येणार नाही, हे येथील लोकांशी संवाद साधल्यावर जाणवते. मुस्लिम कुटुंबांनी मात्र आपले जीवन आहे, तसे स्विकारले आहे व परिस्थितीला पूर्णपणे सामोरे जाण्याचा प्रयत्न केला आहे. कारण या कुटुंबांनी ग्रामीण भाग गावे सोडली असल्यामुळे व सुरक्षिततेमुळे मुस्लिम समुदायात एकमेकांच्या आधाराने अधिक सोयीच्या वाटणाऱ्या ठिकाणी राहत आहे. तसेच शहरांमध्ये मुस्लिम कुटुंबांना इतर ठिकाणी फ्लॅट, जागा, रो-हाऊस बिल्डरकडून किंवा इतर धर्मातील जातीतील व्यक्तींकडून विकले जात नाहीत, याची कारणे म्हणजे कुटुंबाचा मोठा आकार, मांसाहार करणे, सातत्याने माणसांची वर्दळ, दादागिरी करणे, असभ्य वर्तन, शिक्षणाचा अभाव, धार्मिकतेचा पगडा, भांडणांची भिती व इतर अवैध व्यवसाय करण्याची भिती असते. मुस्लिम मुले स्त्रिया-पुरुष यांच्याविषयीची भिती व तिरस्कार अशी विविध कारणे इतर धर्मिय लोकांकडून सांगितली जातात. म्हणून शहरातील एखाद्या विशिष्ट ठिकाणी व त्या परिसरामध्येच या कुटुंबांना राहावे लागते. झोपडपट्टीतील कुटुंबांनी कितीही या ठिकाणांवरून बाहेर पडून चांगल्या ठिकाणी राहण्याचा प्रयत्न केला तरी त्यासाठी अनेक अडचणी असतात. नाशिक शहरात गंजमाळ, वडाळा, काझीची गढी, भद्रकाली, द्वारका या परिसरातच मुस्लिम कुटुंबांची संख्या अधिक आहे. या कुटुंबांनाही झोपडपट्टीतील सर्वच समस्यांना सामावे जावे लागते आहे.

नोटाबंदी व त्यानंसर आलेल्या कोविड-१९ रोगामुळे शहरातून मजूर असणाऱ्या व भाड्याने झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबांनी आपल्या गावी स्थलांतर केले आहे. कारण या कालावधीत अनेक कुटुंबांचे किरकोळ स्वरूपाचे रोजगार बुडाले व इतरत्र घराच्या जवळच्या अंतरावर काम मिळणे ही बंद झाले. उत्तर प्रदेश, बिहार या राज्यातील तसेच महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा तसेच इतर जिल्ह्यातील कुटुंबांनी आपल्या गावाकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतर केले. कारण ग्रामीण भागात कमीत कमी खर्चात प्राथमिक गरजा भागविण्याचा प्रयत्न केला जातो. लाईट, पाणी, मेन्टेन्स, घरभाडे यावरील खर्च कमी होतो. यामुळे बहुसंख्य व्यक्तींनी पुन्हा कुटुंबासह शहरात येण्याचा प्रयत्न केला नाही.

मुंबईतील झोपडपट्टीतील कुटुंबे आपल्या मुलांचे प्रचंड लाड करतात मग ती मुले मोठी झालीत काम करत असतील तरीही यातून मुलांच्या शिक्षणाकडे व त्यांच्या आरोग्य व इतर सवयींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

करतात. त्यामुळे मुलेही जीवनाविषयी फारशी गंभीर राहात नाहीत. कामाला जात नसतील तर उशीरापर्यंत झोपून राहाणे, रात्री जास्त वेळ जागणे, मोबाईल, टिव्ही पाहाणे, आपल्या सोबतच्या मुलांबरोबर जास्त वेळ घालविणे, स्वत: मिळवलेला पैसा स्वत:साठीच खर्च करणे हे प्रकार होत असतात. उच्च शिक्षणात झोपडपट्टीतील मुलांचे प्रमाण अतिशय कमी आहे. मुंबईतील शिक्षणव्यवस्था व झोपडपट्टीतील वातावरण व कौटुंबिक वातावरण तसेच मुंबईतील झगमगाट यासर्व बाबींमुळे मुलांचे शिक्षणातील लक्ष विचलीत होते व पुढील शिक्षणाकडे मुले लक्ष देत नाहीत किंवा ते शिकू शकत नाहीत. त्यांना शिक्षणात रस राहात नाही. म्हणून आठवी, दहावीपर्यंतचे शिक्षण हे येथील मुलांचे महानगरपालिकांच्या शाळेत होत असते. त्यानंतर मुलांचे शिक्षण थांबते. कारण पुढील वर्गांसाठी महाविद्यालये उपलब्ध होत नाहीत. महाविद्यालयात प्रवेश मिळत नाही. एखाद-दुसरा मुलगा, मुलगी यांना प्रवेश मिळाला तरी त्यांचे शिक्षण पूर्ण होण्याची शक्यता कमी असते. मुले पुढच्या वर्गात जाणे, शिकणे तसेच बौद्धिक क्षमता उंचाविणे यात कमी पडतात. मुंबईत कॉमर्स शाखेला महत्त्व दिले जाते. १२ वी, कॉमर्स व बी.कॉममध्ये पदवी मिळविलेल्या मुलांना कंपन्यांच्या ऑफिसमध्ये लवकर नोकरी मिळत असते. पण झोपडपट्टीतील मुले या वर्गांपर्यंत पोहोचण्याच्या आतच शिक्षण सोडतात. नाहीतर शिक्षणव्यवस्थेतूनच बाहेर ढकलले जातात.

झोपडपट्टीतील १५ ते १६ वर्षांची मुलेदेखील इतर वयाने मोठ्या असणाऱ्या मुलांच्या बोलण्यातील शब्द, गप्पागोष्टी ऐकत असतात व याचा वाईट परिणाम येथील मुलांच्या मनावर होत असतो. मुलांचीदेखील पुर्ण वाढ होत नाही. मुलींचे कुपोषण होत असते. मुलींचीही शिक्षणातील गळती होत असते व मुलींना आईकडून घरातील स्वयंपाक, धुणी-भांडी करण्याची सवय केली जाते. लहान अल्पवयीन मुलींना प्रेमाच्या नावाखाली फसविले जाते व ती मुलगी एकदा प्रेमाच्या जाळ्यात अडकली की तिला वेगवेगळी अमिषे दाखविली जातात. यात विवाहाचेही अमिष दाखविले जाते. पुढे प्रेमभंग होऊन किंवा शारीरिक शोषण होऊन मुली गरोदर राहिल्यास काही पर्याय नाही म्हणून आत्महत्या करतात. म्हणजेच मुंबईतील झोपडपट्ट्यात शाळेतील मुलांच्या आत्महत्या होण्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे. नाशिक शहरातही झोपडपट्ट्यांमध्ये प्रेमप्रकरणे, प्रेमभंग यामुळे मुले व मुली आत्महत्या करतात. यात मुलींचे प्रमाण जास्त असते. मुलींच्या प्रेमप्रकरणातूनच मुलांमध्ये आपसात भांडणे होऊन तरूण मुलांचे खून होतात. म्हणून झोपडपट्ट्यांमध्ये मुलींचे विवाह लवकर करून दिले जातात किंवा ती मुलगी प्रेमविवाह करून घेत असते. कारण मुळातच झोपडपट्ट्यांत रिकामी असणारी मुले, मुलींविषयीचे प्रचंड आकर्षण यातून मुलींना नादी लावणे, मुलींचा पाठलाग करणे,

मदत करणे, सातत्याने कोणत्या ना कोणत्या कारणाने संपर्कात येणे, मुलीच्या आईवडिलांना किंवा आईला मदत करणे असे प्रकार अवलंबून मुलींना प्रेम प्रकरणात ओढले जाते. म्हणजेच मुलींना झोपडपट्टयांत अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागते. विशेषत: एकाच प्रवर्गातील विविध जातीतील मुले-मुली विवाह करण्यास पसंती देतात.

मुंबईत झोपडपट्ट्यांतील तरूण मुलं-मुलींना सिनेमाचे प्रचंड आकर्षण असते. आवडते हिरो-हिरॉईन, सिनेमा त्या पद्धतीची गाणी, पेहराव, नाचणे, बोलणे, संगीत ऐकणे, सिनेमावरती गप्पा मारणे, प्रत्येक झोपडपट्टीतील घरांमध्ये मोठमोठे टिव्ही असतात व केबलवरचे विविध चॅनल्स पाहिले जातात. म्हणजेच येथील लोक मनोरंजनासाठी टिव्हीचा वापर करतात. वास्तवातील जीवनमान विसरून टिव्हीवरती दाखविला जाणारा उच्चभ्रु असणाऱ्या वर्गाचे कपडे, दागिने, जीवनमान, प्रशस्त घरे, परदेशात जाणे, चकचकीत रंगी बेरंगी असणारे पोषाख, दणकट स्त्रिया, पुरुष, गोरेपान असणारी धडधाकट माणसे, त्यांचे प्रश्न, जीवनमान, जीवन जगण्याची चंगळ, मोठे उद्योगपती, त्यांची कोटी रुपयांमध्ये असणारी उलाढाल, कंपन्यांची मालकी, अलिशान गाड्या, नोकर, उंच इमारती व त्यातील जीवनमान याला आकर्षित होत असतात व झोपडपट्टीतील जीवन जगण्याचा विसर पडावा म्हणून टिव्हीवरील सिरियल, पिक्चर, विविध कार्यक्रम पाहिले जात असतात. म्हणजेच आपणही झोपडपट्टीतील असलो तरी सिनेमामध्ये दाखवल्या जाणाऱ्या जीवनाचा आनंद घेऊ शकतो अशी इच्छा निर्माण होत असते व सातत्याने दाखविल्या जाणाऱ्या जाहिरातींचा प्रभावही येथील लोकांवर होत असतो. ब्यूटीपार्लरमध्ये स्त्रियांनी जाणे, सौंदर्य प्रसाधनांवरील खर्च करणे, चांगले दिसण्यासाठी सतत मेकअप करणे हे प्रकार येथील स्त्रिया करत असतात. येथील स्त्रिया व मुलींचे जास्त प्रमाणात शोषण होत असते. मुळातच शारीरिक वाढ झालेली नसल्यामुळे खुजेपणा असणे, कुपोषित असणे, खाण्यापिण्याचे पदार्थ म्हणजे चटपटीत असणारा पाववडा व तत्सम खाद्यपदार्थ तात्पुरत्या स्वरूपात भूक भागवत असले तरी कसदार, पौष्टिक अन्न येथील स्त्रियांना उपलब्ध होत नाही. कारण कुटुंबाचे तेवढे उत्पन्न नसल्यामुळे बालपणापासून येथील मुलींचे कुपोषण होत असते. त्यांचेच रुपांतर पुढे स्त्रियांमध्ये होत असते व या स्त्रियांची शारीरिक, मानसिक, बौद्धिक वाढ न झाल्यामुळे जन्माला येणारी अपत्येही कुपोषित, कमी वजनाची जन्माला येतात. विविध प्रकारचे आजार स्त्रिया व मुलींमध्ये होत असतात.

मुंबईतील शहराच्या मध्यवस्तीत असणाऱ्या व बराच काळपर्यंत वास्तवास असणाऱ्या झोपडपट्टीधारकांनी आपली झोपडी पक्क्या स्वरूपात एक एक मजले करून लोखंडी पाईपचा आधार देऊन, स्टीलचे बीम भरून

बांधल्या आहेत. म्हणजेच एकावर एक झोपडी केल्यास ती स्वत:ला वापरता येते. किंवा भाड्यानेही दिली जाते. कामाचे स्वरूप हे काहीही असले तरी मुंबईत राहण्यासाठी झोपडी असणे आवश्यक असते. म्हणजेच पुढील काही वर्षांमद्ये चांगले कामधंदा मिळाल्यास महानगरपालिकेत स्वच्छता विभागात किंवा कंपनीत नोकरी मिळाल्यास नवीन झोपडी विकत घेता येते किंवा रिकाम्या जागेवर झोपडी बांधता येते. याप्रकारे येथील लोक मुंबईत झोपडपट्ट्यांत राहिले आहेत. तसेच कुटुंबाला नंतर सोबत आणणे, नातेवाईक आणणे, कारागिरी शिकणे, आपल्या हाताखाली किंवा काम करण्यासाठी जास्त माणसे गावावरून आणणे. यामुळे आपल्या गावातील, नात्यातील, कुटुंबातील, जातीधर्मातील लोकांची संख्या वाढत जाते व आपण सुधारतो आहोत, चांगले पैसे कमवितो आहोत, कुटुंबाच्या गरजा पूर्ण करतो आहोत याचेच समाधान येथील लोकांना असते.

कुटुंबातील इतर सदस्य काम करत असल्याचे प्रमाण दर्शविणारी सारणी

अ.क्र.	कुटुंबातील काम करणारे सदस्य	वारंवारिता	टक्केवारी नाशिक	वारंवारीता	टक्केवारी मुंबई
१)	मुले	७४	२६	५३	८०
२)	मुली	२	१	१४	२०
३)	काम न करणारे मुले	२०६	७३	०	०
	एकूण	**२८२**	**१००**	**६७**	**१००**

वरील सारणीवरून नाशिक शहरात कुटुंबात एकूण २८२ मुलांपैकी मुले काम करण्याचे प्रमाण २६%, मुलींचे प्रमाण १% आहे व काम न करणाऱ्या मुलांचे प्रमाण ७३% आहे. तर मुंबईत कुटुंबात एकूण ६७ मुलांपैकी ८०% मुले व २०% मुली काम करतात. काम न करणाऱ्या मुलांचे प्रमाण मुंबईत शुन्य टक्के आहे. म्हणजेच मुंबईत मुले व मुली यांचे काम करण्याचे प्रमाण जास्त आहे. मुंबईत असणारी कार्यसंस्कृती व कामाची होणारी उपलब्धता त्यातून मिळणारा पगार स्वत:च्या व कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी महत्त्वपूर्ण असतो व स्वत:ला इतर आवडीनिवडी जीवन जगण्याचे उद्दिष्ट्ये, महत्त्वाकांक्षा, नवीन कौशल्य शिकण्याची इच्छा यामुळे येथे मुले मुलींना अधिक गोष्टी शिकण्यास मिळतात. मुलांमध्ये काम करण्याची इच्छा उत्पन्न होत असते. बाहेरून कामासाठी येणाऱ्या लोकांना विविध कामांबरोबरच विविध संधी उपलब्ध होत असतात. एकप्रकारे काम करण्याची संस्कृती रूजलेली असल्यामुळे रिकाम्या वेळेचा सदूपयोग करण्याकडे अधिक कल असतो. मुंबईत विविध ठिकाणी फिरणे, दुकाने, मॉल वेगवेगळ्या ठिकाणची दृश्ये पाहाणे, भेटी देणे, सिनेमा पाहाणे, वस्तू खरेदी करणे यामध्ये वेळ घालवला जात असतो. म्हणून मुंबईतील जीवन जगण्याची शैली, धावपळ व जीवनाची गती यांना अधिक महत्त्व असते. वैयक्तिक गरजांकडे येथील सर्वच मुले लक्ष देतात. पैसे कमविणे व स्वत:साठी खर्च करणे, विवाह करण्याला प्राधान्य दिले जात नाही. कारण जागेचा अभाव व जबाबदारी टाळणे, खर्चाचा मेळ बसविणे, आईवडिलांची जबाबदारी, पत्नीकडचे नातेवाईक तसेच सर्वात मोठी समस्या म्हणजे विवाहासाठी मुलगी मिळत नाही. मुलींची संख्याच मुळात कमी झालेली असल्यामुळे येथील झोपडपट्यांतील लोक ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील मुली विवाहासाठी निवडतात. वेगवेगळ्या प्रकारची अमिषे दाखविली जातात व नात्यातील मुलींना मिळवण्यास प्राधान्य दिले जाते. म्हणून मुलांना नोकरी असणे महत्त्वाचे असते. अपत्यांची जबाबदारीही टाळली जाते. ग्रामीण भागातील मुलींना विवाहानंतर मुंबईसारख्या शहरात धावपळीच्या व गर्दीच्या जीवनाबरोबर जुळवून घेणे

अवघड असते. मुलांना जन्म देणे, घरातील कामे करणे, पती व सासुसासरे यांच्या इच्छेनुसार राहावे लागते. म्हणजेच ग्रामीण भागातील विवाहीत मुलींचेही येथे कुपोषण होत असते. शारीरिक-मानसिक छळांना सामोरे जावे लागते. आणि हा कालावधीही आयुष्यभराचा असतो. यात पतीच्या व्यसनांच्या सवयीचाही त्रास होत असतो. म्हणजेच झोपडपट्ट्यातील जीवन नवविवाहीत मुलींसाठी त्रासदायक ठरत असते. म्हणून ग्रामीण भागातील लोक मुंबईतील झोपडपट्ट्यांत मुलींचे विवाह करण्यास तयार होत नाहीत. तसेच फ्लॅटमध्ये राहात असणाऱ्या कुटुंबातही मुलींचे विवाह करण्यास ग्रामीण भागातील लोक तयार होत नाहीत. म्हणजेच ग्रामीण भागातील नितीमूल्ये पाळली जात नाही. प्रामाणिकपणा, माणुसकी यांचा अभाव, ग्रामीण भागातील लोकांना कमी लेखने, त्यांना नावे ठेवणे, जास्त शिष्टाचार दाखविणे इत्यादी कारणांमुळे मुंबईतील झोपडपट्टीतील मुलांचे विवाह होत नाहीत. येथील मुलांची शरीरयष्टी ही बारीक व कुपोषीत असल्याचे दिसते. सिनेमाच्या प्रभावामुळे केसांची स्टाईल, कपड्यांची स्टाईल, बोलण्यातील ओंगळपणा, गुटखा खाणे, कान टोचून घेणे व कानात बाळी घालणे असे राहाण्यातील वेगवेगळे प्रकार केले जातात. आपण इतरांपेक्षा हुशार असून आपल्याला मुंबईची व जगाची खुपच माहिती आहे असे दाखविले जाते. असाच प्रभाव कमी-अधिक प्रमाणात नाशिक शहरातील झोपडपट्ट्यांतील मुलांमध्येही दिसून येतो.

संदर्भ -

1) www.nuepa.org/Download/Publications/Occasional%20Paper-34schugh.pdf Date : 22/03/2018

२) लोकसत्ता - शाळाबाह्य मुलांची संख्या ४८ हजारांवर. दैनिक लोकसत्ता, पान नं. ४. शनिवार २६ मार्च २०१८.

३) सुकदेव थोरात (दि. २३ मार्च २०१८), उच्च शिक्षणातील वाढती असमान संधी, दैनिक लोकसत्ता.

४) सुकदेव थोरात (दि. १६ मार्च २०१८), शिक्षणाचा खेळखंडोबा महाराष्ट्राकडून शिकावा, दैनिक लोकसत्ता, पान नं. ७.

५) राखी चव्हाण (४ जानेवारी २०१८), शहरी भागातही कुपोषणाची स्थिती गंभीर, नागपूर दैनिक लोकसत्ता, पान नं. ९.

६) प्राथमिक स्त्रोत - मुलाखत अनुसूची डिसेंबर २०१६

७) अमर्त्य सेन व ज्या द्रिज (२०१०), भारतीय राज्योंका विकास, कुछ प्रादेशिक अध्ययन, राजपाल प्रकाशन.

8) D. Sai (2012), Urban slum and poverty, Dph. New Delhi.

9) Henna Tabussum (2011), Slum in India, ABP, Jaipur.

10) B. Hema and Shagufta, Environmental Perception of Slum Dwellers Jamal Mittal Pub. New Delhi 59.

११) विनोद निरभवणे (२०२१), नाशिक शहरातील झोपडपट्टीवासियांचा समाजशास्त्रीय अभ्यास, (अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध) कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.

प्रकरण - ६

संशोधनाचे निष्कर्ष आणि शिफारशी

नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासियांचे सामाजिक जीवन

१. नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासीयांचा तुलनात्मक अभ्यास केला असता झोपडपट्टीत सरासरी तीस ते पस्तीस टक्के कुटुंबे ही भाड्याने राहणारी आहेत गेल्या वीस वर्षात नाशिक शहरात मोठ्या प्रमाणात स्थलांतर झालेले आहे यामध्ये उत्तर प्रदेश, बिहार तसेच जालना, परभणी, नांदेड येथील कुटुंबांचे अधिक प्रमाणात स्थलांतर झाले आहे. कारण नाशिक शहराचा विकास हा २००१ नंतर अधिक वेगाने झालेला आहे मुंबईत होणारे स्थलांतर हे मुंबईच्या जवळपास असणाऱ्या शहरांमध्ये झालेले आहे. मुंबई व नाशिकमध्ये ३० ते ४० वर्षापासून जे झोपडपट्टीवासिय राहत होते. त्यांनी झोपडपट्टी सोडून इतर शहरांमध्ये फ्लॅट, रो हाऊस, जागा घेऊन घरे बांधली आहेत व काही कुटुंबे तेथे राहत आहेत. मुंबईतून महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील काही कुटुंबे निवृत्तीनंतर ग्रामीण भागात आपल्या गावाकडे स्थलांतरित झाली आहेत मुंबईत उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, आसाम येथील मजूर असणाऱ्या गरीब कुटुंबातील लोकांचे स्थलांतर होत आहे.

२. नाशिक व मुंबईतील कुटुंबातील अपत्यांचा अभ्यास केला असता नाशिकमध्ये सरासरी दोन अपत्य असणारी कुटुंबे ८० टक्के आहेत तर मुंबईतील कल्याण येथील चार झोपडपट्ट्यांचा अभ्यास केला असता सरासरी चार अपत्य कुटुंबामध्ये आहेत म्हणजेच उत्तर प्रदेश येथील कुटुंबांमध्ये कुटुंब नियोजन मुलगा होईपर्यंत केले जात नाही.

३. या कुटुंबांमधील स्त्रिया घरातलीच कामे करतात व घराच्या बाहेरची कामे करत नाही. कारण पारंपारिक प्रथा परंपरा म्हणजेच स्त्रियांवरील बंधने आहेत स्त्रियांनी घराबाहेर जाऊ नये याकडे कटाक्षाने लक्ष दिले जाते तसेच कुटुंबाचा मोठा आकार व अपत्यांची संख्या जास्त असल्यामुळे ही स्त्रिया इतर ठिकाणी नोकरी करू शकत नाही, या स्त्रियांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झालेले आहे.

४. मुंबईत राहणाऱ्या उत्तर प्रदेश मधील कुटुंबांमध्ये सर्वच मुलांना शिकवले जाते आहे तसेच काही कुटुंबातील मुले मुली नोकरी करत आहेत म्हणजेच मुलांच्या शिक्षणाकडे पालकांचे लक्ष आहे व

शिक्षणावर अधिक खर्च केला जातो आहे. पालकांचेही शिक्षण माध्यमिक व उच्च माध्यमिक झालेले आहे तसेच पाच ते सात टक्के पालक बी.ए, बी.कॉम झालेले आहेत. कॉल सेंटर मध्ये काम करणारी मुले या कुटुंबांमध्ये आहेत.

मुंबईतील कुटुंबेही वैयक्तिक विकासाकडे अधिक लक्ष देत असल्याचे दिसते १५ ते १६ वर्षाच्या पुढील मुले काम करतात व नवीन कौशल्य आत्मसात करत असल्याचे दिसून आले आहे.

५. मुंबईमध्ये मुलांच्या शिक्षणातील गळतीचे प्रमाण हे माध्यमिक स्तरावर कमी दिसून आले तर नाशिकमध्ये हे गळतीचे प्रमाण जास्त दिसून आले आहे. नाशिकमध्ये झोपडपट्टीतील बहुतांशी मुले काम नसल्यामुळे रिकामी फिरतात नाशिकमध्ये तरुण मुलांना रोजगाराच्या संधी पाहिजे तेवढ्या प्रमाणात नाहीत व वेतनही कमी असल्यामुळे मुले काम करत नाहीत. विविध कौशल्य शिकण्याकडे येथील मुलांचा कल नसल्यामुळे त्यांचा व्यक्तिमत्व विकास होत नाही. ही मुले कमकुवत व कुपोषित अशा स्वरूपाची दिसतात. भाषा कौशल्य नसल्यामुळे कंपनीत, दुकानांमध्ये चांगल्या पदांवर येथील मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत मुंबईमध्ये मात्र मुलांमध्ये अनुभव, शिकण्याची जिद्द, मुंबईतील कार्यसंस्कृती, उच्चशिक्षित व्यक्तींबरोबर येणारा संपर्क, फिल्म इंडस्ट्रीचा प्रभाव यामुळे येथील मुले ही अनेक गोष्टी शिकतात व नोकऱ्या मिळवतात. मुलांमध्ये आत्मविश्वास वाढीला लागतो. म्हणजेच मुंबईतील झोपडपट्टीतील मुलांच्या आजूबाजूचे वातावरणाचा परिणाम मुलांवर होत असतो व मुले ही काहीतरी कामधंदा शोधण्याकडे अधिक प्रोत्साहित होतात याचा परिणाम मुलांमध्ये मुलींमध्ये काम करण्याची सवय होते व मुले त्यातून अनेक गोष्टी शिकतात आणि चांगल्या संधी येथील मुलांना मिळतात. नाशिकमध्ये मात्र रिकामा वेळ मुलांकडे असल्यामुळे आणि कायमस्वरूपी काम नसल्यामुळे मुले कायमस्वरूपी काम करत नाहीत बहुतांशी मुले आपला वेळ वाया घालवतात व कुटुंबावरच अवलंबून राहतात.

६. झोपडपट्टीतील मुंबईतील मुले जागेअभावी विवाह करण्याचे टाळतात. कारण मुलींचे प्रमाण कमी असल्यामुळे ही मुलांना विवाहासाठी मुली मिळत नाहीत कमी अधिक प्रमाणात नाशिक शहरात देखील झोपडपट्ट्यांमध्ये बहुतांशी मुले अविवाहित असल्याचे दिसते.

७. नाशिकमध्ये मुलांचे प्रमाण व्यसनाचे जास्त आहे तर मुंबईत हे प्रमाण मुलांमध्ये कमी आहे. म्हणजेच मुंबईत मुले नोकरी कामधंद्याला महत्व देतात तर नाशिकमध्ये कामधंद्याला जास्त संधी नसल्यामुळे

व मुले आपला बराचसा वेळ हा चोरून-लपून व्यसन करण्यामध्ये घालवतात दारूची दुकाने ही नाशिक शहरात झोपडपट्ट्यात अधिक प्रमाणात आहेत. मुंबईत झोपडपट्टीत अवैध व्यवसायांचे प्रमाण कमी दिसून आले आहे तर नाशिक मध्ये अवैध व्यवसाय काही प्रमाणात होत असल्याचे दिसते. मुंबईत कमी जागेत अधिकाधिक लोक राहतात व संघर्ष आणि धावपळीचे जीवन मुंबईत आहे. त्यामानाने नाशिक शहरात तेवढे धावपळीचे आणि संघर्षाचे जीवन नाही यामुळे एक प्रकारची शितिलता येथील झोपडपट्टीतील मुलांमध्ये आल्याचे दिसते.

८. नाशिक शहरात धुणीभांडी करणाऱ्या व इतर कामे करणाऱ्या महिलांचे प्रमाण जास्त दिसून आले आहे तर मुंबईमध्ये हे प्रमाण झोपडपट्ट्यात कमी दिसून आले आहे. अनधिकृत झोपडपट्ट्या या नाशिकमध्ये जास्त आहेत. म्हणजेच अधिकृत झोपडपट्ट्या मुंबईत जास्त आहेत मुंबईमध्ये पन्नास लाख लोकसंख्या म्हणजे ४१ टक्के लोक झोपडपट्टीत राहतात तर नाशिक शहराच्या तुलनेत झोपडपट्ट्यांमध्ये बारा टक्के म्हणजेच जवळपास तीन ते साडेतीन लाख लोक झोपडपट्ट्यांमध्ये राहत आहेत नाशिक मधील सर्वात मोठी झोपडपट्टी पंचवटी प्रभागातील फुलेनगर ही आहे तर मुंबईत धारावी पाठोपाठ रमाबाई आंबेडकर नगर, कामराज नगर अशा सर्वच झोपडपट्ट्या काही किलोमीटरपर्यंत पसरलेल्या आहेत. नाशिकमध्ये मात्र झोपडपट्ट्या एखाद्या किलोमीटरच्या परिसरातच पसरलेल्या आहेत. फक्त जेलरोड परिसरात पाटकॅनॉल ते उपनगर अशी रस्त्याच्या कडेला असणारी मोठी झोपडपट्टी आहे म्हणजेच नाशिक शहरात झोपडपट्ट्यांचे प्रमाण कमी आहे मुंबईमध्ये गृहनिर्माण प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन योजना ही चांगल्या प्रकारे राबविली जाते आहे त्यामानाने नाशिकमध्ये मात्र तेवढ्या तीव्र गतीने काम होणे व घरांचे वाटप होत नाही. मुंबईमध्ये मात्र जागेला अधिक महत्त्व असल्याने झोपडपट्टी धारक हे अधिक जागरूक व राजकीय दृष्टीनेही अधिक प्रभावी स्वरूपात आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी प्रयत्न करत असतात मुंबईमध्ये कमी जागेत एकावर एक अशा झोपड्या बांधल्या आहेत. नाशिकमध्ये मात्र याचे प्रमाण कमी आहे.

९. नाशिकमध्ये वडाळा येथे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून इमारती बांधल्या गेल्यात पण त्याची गुणवत्ता मात्र राखली गेली नाही आणि म्हणून येथे राहण्यास झोपडपट्टीधारकांना भीती वाटते मुंबईमध्ये मात्र झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून बांधलेल्या इमारती त्यांची देखभाल याबाबत काळजीपूर्वक सर्व सभासद लक्ष देतात आणि त्या इमारतीची स्वच्छता राखतात. मुंबईत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून

मिळालेला फ्लॅट अनेक कुटुंबांनी विकला आहे.

नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासियांचे आर्थिक जीवन

१. महिलांच्या कामाच्या प्रकारांमध्ये घरातील कामे करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण मुंबईतील कुटुंबात जास्त आहे तर नाशिक मध्ये महिला स्वतःच्या घरातील काम करण्या बरोबर बाहेरील धुणीभांडी स्वयंपाक, भाजीपाला विकणे, कंपनीतील कामे याव्यतिरिक्त असणारी इतर कामे करतात तर मुंबईत मात्र हे प्रमाण कमी आहे.

२. कुटुंबातील मुलांचे काम करण्याचे प्रमाण नाशिकमध्ये कमी व मुंबईत जास्त आहे. त्याबरोबर मुलींचे ही काम करण्याचे प्रमाण मुंबईत जास्त आहे नाशिकमध्ये मात्र कमी आहे काम न करणारी मुले नाशिक शहरात जास्त आहेत तर मुंबईत हे प्रमाण शून्य आहे.

३. कामधंद्याला जाण्यासाठी चे अंतर एक ते पाच किलोमीटर परिसरात नाशिकमध्ये कमी तर मुंबईत जास्त आहे. तसेच सहा ते दहा किलोमीटर व त्यापेक्षा अधिक अंतरावर कामाला जाण्याचे प्रमाण मुंबईत जास्त आहे. कारण मुंबईत असणारी कामाची उपलब्धता व वाहतुकीच्या सोयी असल्यामुळे लांबच्या अंतरावर कामाला जाता येते मुंबईत रेल्वेचा प्रवास स्वस्त असल्यामुळे दूरच्या अंतरावर जाऊन कामधंदा करता येतो नाशिकमध्ये मात्र कामाच्या उपलब्धतेचा अभाव व दूरच्या प्रवासासाठी स्वस्त प्रवासाची साधने उपलब्ध नाहीत.

४. शासनाने घरासाठी जागा उपलब्ध करून दिल्यास झोपडपट्टीतील घर सोडण्यास नाशिकमध्ये ७३ टक्के कुटुंबांनी सहमती दर्शवली तर मुंबईत हे प्रमाण ९५ टक्के आहे. म्हणजेच मुंबईत असणारी अरुंद घरे, जागेचा अभाव व इतर सोयी सुविधांच्या अभावामुळे मुंबईतील कुटुंबांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून घर मिळाल्यास लगेच झोपडपट्टीतून जाण्याची तयारी दर्शविली आहे.

५. स्वस्त रेशन दुकानातून रेशन विकत घेण्याचे प्रमाण नाशिक मध्ये ५८ टक्के आहे तर मुंबईत हे प्रमाण ९१ टक्के आहे.

६. मासिक भाडे तत्वावर राहणारी कुटुंबे नाशिक शहरात ३७ टक्के आहेत तर मुंबईत हे प्रमाण २३ टक्के आहे असे असले तरी दोन्ही शहरात सरासरी ३० ते ३५ टक्के कुटुंबे भाड्याने राहणारी आहेत

७. घर बांधण्यासाठी वापरण्यात आलेल्या साहित्यात सिमेंट विटा व स्लॅब असणारी घरे मुंबईत जास्त आहेत तर नाशिकमध्ये कमी आहेत तसेच सिमेंट विटा व पत्रे असणारी आणि मातीच्या भिंती व पत्रे

असणारी घरे नाशिकमध्ये जास्त आहेत तसेच मुंबईतही सिमेंट विटा व पत्रे असणारी घरे आहेत जास्त आहेत. दोन घरांमधील अंतर एक ते पाच फुटापर्यंतचे नाशिकमध्ये ५२ टक्के तर मुंबईत ५९ टक्के आहे म्हणजेच मुंबईत दोन घरांमधील अंतर कमी असण्याचे प्रमाण जास्त आहे नाशिक शहरात ६० टक्क्यांपेक्षा अधिक झोपडपट्ट्यातील घरांमध्ये सूर्यप्रकाश व मोकळी हवा येत नाही घर दुरुस्तीसाठी मागील दहा वर्षात खर्च करण्याचे प्रमाण नाशिक पेक्षा मुंबईत जास्त आहे.

८. घर बांधण्यासाठी कर्ज घेण्याचे प्रमाण मुंबईत जास्त आहे तर कामधंद्यासाठी कर्ज घेण्याचे प्रमाण नाशिकमध्ये जास्त आहे तसेच विवाहासाठी कर्ज घेणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण दोन्ही शहरांमध्ये सारखेच आहे कर्ज न घेणारी कुटुंबे नाशिक मध्ये जास्त आहेत याचे कारण म्हणजे कामाची उपलब्धता कमी असणे व कर्ज देणाऱ्या बँका पतपेढी यांचा अभाव असल्यामुळेदेखील कर्ज घेत नाहीत. मुंबई मध्ये हे प्रमाण जास्त आहे कारण बँका पतपेढ्या या येथील लोकांना कर्ज देतात.

९. कौटुंबिक बाबींवर होणाऱ्या खर्चात नाशिक मध्ये घर भाडे यावर होणारा खर्च ३७% आहे तर मुंबईत हे प्रमाण २३ टक्के आहे तसेच गॅस सिलेंडर, लाइट, पाणी, दवाखाना या बाबींवर खर्च होण्याचे प्रमाण नाशिकमध्ये जास्त आहे तर मुंबईत हे प्रमाण तुलनेने कमी आहे.

नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासियांचे शिक्षण

१. नाशिक महानगरपालिकेत इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करणे आवश्यक आहे. मुंबई महापालिकेत इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु केल्या आहेत. नाशिक महानगरपालिकेतील शाळांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे खूपच गरजेचे झालेले आहे. यातील काही शाळांमधील मुलांकडे पालक व शिक्षकही लक्ष देतात. त्यांचा अभ्यास करुन घेतात पण काही झोपडपट्ट्यांत मात्र महानगरपालिकेतील शाळांतील मुलांकडे पुर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे दिसते. येथील पालक आर्थिक व सामाजिक दृष्टीने वंचित असल्यामुळे मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देत नाहीत. त्याबरोबर शिक्षक देखील खूप प्रयत्न करुनही मुलांमध्ये सुधारणा करु शकत नाही. म्हणजेच नाशिक शहरातील काही झोपडपट्ट्यांतील वातावरण मुलांच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन देणारे व मुलांची गुणवत्ता वाढविणारे नाही. स्त्रियांचे शिक्षण कमी असणे व घरातील भांडणे, नवऱ्याचे व्यसन आर्थिक विवंचना यातच स्त्रिया गुरफटलेल्या असल्यामुळे मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देवू शकत नाही.

२. नाशिक शहरापेक्षा मुंबईत शाळेत जाणाऱ्या मुलांची संख्या जास्त आहे नाशिक मध्ये दोन मुले असणाऱ्या कुटुंबांची संख्या जास्त आहे तर मुंबईत तीन व चार मुले असणाऱ्या कुटुंबांची संख्या जास्त आहे. तसेच पाच व सहा मुले असणारी कुटुंबे सोळा टक्के आहेत सात मुले असणारे एक कुटुंब आहे म्हणजेच मुंबईतील कुटुंबात सरासरी चार मुले असण्याचे प्रमाण आहे तर नाशिकमध्ये हे प्रमाण २ टक्के आहे.

३. मुलांच्या शाळेच्या प्रकारांमध्ये नाशिकमध्ये ६५ टक्के मुले महानगरपालिका व शासन अनुदानित शाळेत जातात तर इंग्रजी माध्यमाच्या शाळेत ३१% मुले आहेत त्या तुलनेत मुंबई महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा असल्यामुळे ४४ टक्के मुले या शाळांमध्ये जातात तर ५१ टक्के मुले महानगरपालिका व शासन अनुदानित शाळेत जातात.

४. कौटुंबिक अडचणी व इतर कारणांमुळे मुलांचे शाळा सोडण्याचे प्रमाण नाशिक शहरात जास्त आहे तर मुंबईत कमी आहे झोपडपट्टीतील वातावरणाचा जास्त परिणाम नाशिक शहरातील शाळेत जाणाऱ्या मुलांवर होतो तर मुंबईत हा परिणाम मुलांना काम करण्यासाठी प्रोत्साहित करतो.

५. शाळेत मुलांना खेळण्यासाठी उपलब्ध सुविधा नाशिक शहरातील शाळांमध्ये जास्त आहे तर मुंबईत जागेअभावी खेळणी, बगीचा, मैदान यांचे प्रमाण कमी आहे संगणकाचा वापर मुंबईतील शाळांमध्ये जास्त असल्याचे दिसते.

६. शाळेत मुलांना शिकविलेले समजण्याचे प्रमाण दोन्ही ठिकाणी ५० टक्के आहे तर ५० टक्के मुलांना थोडेफार समजते. यात मुलांच्या भाषेचा अडथळा व कुटुंबात शैक्षणिक वातावरण नसणे यामुळे येथील मुलांना शिक्षण घेताना अनेक अडथळे येतात नाशिकमध्ये मुलांना शिकण्यासाठी शाळेवरच अवलंबून राहावे लागते म्हणून येथील मुले शिक्षणात मागे पडत जातात तर मुंबईत पालकांचे मुलांच्या शिक्षणावरील जास्त लक्ष व शिकवणुकी साठी खाजगी क्लासेस उपलब्ध होतात म्हणून मुलांना शाळेत व शिकवणी वर्ग आणि कुटुंबांचे मुलांच्या शिक्षणावर असणारे लक्ष यामुळे मुंबईतील मुलांचे शिक्षण घेण्याचे प्रमाण नाशिकच्या तुलनेत अधिक चांगल्या दर्जाचे आहे. मुलांना लिहिता-वाचता येण्याचे प्रमाण नाशिकच्या तुलनेत मुंबई चांगले आहे. इंग्रजी भाषा शिकण्यात नाशिकमधील मुलांना जास्त अडचणी येतात तर मुंबईमध्ये इंग्रजी भाषा शिकण्यावर जास्त भर दिला जातो व मुले काही प्रमाणात लवकर इंग्रजी भाषा शिकतात नाशिकमध्ये मात्र मुलांना इंग्रजी भाषा शिकण्यात जास्त

अडथळे येतात मुले शैक्षणिक वातावरणाअभावी इंग्रजी भाषा शिकू शकत नाही मुले नियमित शाळेत जाण्याचे प्रमाण मुंबईमध्ये जास्त आहे तर मुलांनी शाळेत शिक्षण सोडण्याचे प्रमाण नाशिक शहरात जास्त आहे.

नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासियांचे आरोग्य :-

१. नाशिक व मुंबई शहरात पिण्याचे पाणी हे सार्वजनिक नळावरून भरण्याचे प्रमाण ७५% आहे. तसेच दररोज एक ते दोन तासापेक्षा जास्त पाणी मिळते असे प्रमाण दोन्ही ठिकाणी सरासरी ६५ टक्के आहे तर दोन तासांपेक्षा जास्त पाणी मिळते असे प्रमाण २५ टक्के आहे व नियमित पाणी मिळत नाही, असे प्रमाण दोन्ही ठिकाणी पाच टक्के आहे.

२. एक ते दोन वर्षात पाणी वाटप व्यवस्थेत सुधारणा झाल्याचे नाशिक व मुंबई शहरातील प्रमाण जवळपास ७० टक्के आहे तर थोडीफार सुधारणा झाली असे प्रमाण नाशिकमध्ये कमी व मुंबईत जास्त आहे तर सुधारणा झाली नाही असे प्रमाण दोन्ही ठिकाणी ७% आहे. नाशिकमध्ये स्वयंपाक बनविण्यासाठी चे मुख्य साधन हे ८८% गॅस शेगडी हे आहे, तर मुंबईमध्ये हे प्रमाण ९५ टक्के आहे तसेच इतर साधनांमध्ये रॉकेल, इलेक्ट्रिक हिटर हे मुंबईत वापरले जाते. नाशिकमध्ये मातीची चूल, इलेक्ट्रिक हिटर व रॉकेल स्वयंपाकासाठी वापरले जाते

३. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून फ्लॅट मिळण्याचे प्रमाण मुंबई शहरात जास्त आहे तर नाशिकमध्ये हे प्रमाण कमी आहे.

४. कुटुंबासाठी नाशिकमध्ये वैयक्तिक स्वच्छतागृहे २२ टक्के आहे तर मुंबईत हे प्रमाण १२ टक्के आहे नाशिकमध्ये सार्वजनिक शौचालयांचा वापर ७५ टक्के कुटुंबे करतात तर मुंबई ते प्रमाण ८८ टक्के आहे. बाहेर उघड्यावर शौचालयाला जाण्याचे प्रमाण नाशिक मध्ये तीन टक्के आहे तर मुंबई ते प्रमाण शून्य टक्के आहे. नाशिकमध्ये नदीकिनारी राहणारी कुटुंबे तसेच शहराच्या बाहेर पाट कॅनॉल शेजारी, शहरालगतच्या गावांमध्ये राहणारी कुटुंबे स्वच्छतागृहाच्या सोयीअभावी बाहेर उघड्यावर शौचाला बसतात. नवीन पिढीमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढलेले असल्यामुळे व शहरी संस्कृतीच्या वातावरणाचा परिणाम म्हणूनही उघड्यावर शौचालयास जाण्याचे टाळले जाते.

५. मुंबई महानगरपालिकेकडून स्वच्छतागृहे वाढवण्यात आली आहेत तसेच झोपडपट्ट्यांमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृहांचा व अधिक पाण्याचा पुरवठा केला जातो आहे. मुंबईत स्वच्छतागृह नव्याने बांधण्यात

आलेली आहेत झोपडपट्टी पुनर्वसन योजना, म्हाडा यांच्या प्रकल्पामध्ये प्रत्येक घरामध्ये स्वतंत्र पिण्याचा पाण्याचा नळ व स्वच्छतागृह बांधलेली आहेत मुंबईत आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छतागृहावर अधिक लक्ष केंद्रीत करण्यात आलेले आहे त्या मानाने नाशिक महानगर पालिकेकडून स्वच्छतागृहांवर झोपडपट्ट्यांमध्ये फारसे लक्ष दिलेले नाही आणि म्हणून येथील कुटुंबांमध्ये दवाखान्यासाठी होणारा खर्च हा जास्त आहे, कारण साथीचे आजार हे याठिकाणी वारंवार होत असतात तसेच मुंबई महानगरपालिकेकडून झोपडपट्ट्यातील कचरा दररोज उचलला जातो यामुळे स्वच्छता राखली जाते, याबाबत येथील लोक जागरूक आहेत नाशिकमध्ये काही झोपडपट्ट्यांमधील कचरा दररोज उचलला जात नाही, यामुळे येथे लवकर दुर्गंधी होऊन साथीचे आजार पसरतात. नाशिक मधील काही झोपडपट्ट्यात शौचालय ही झोपडपट्टीच्या मध्यभागी आहेत व आजूबाजूने घरे आहेत आणि सांडपाणी, त्याची दुर्गंधी पसरते यामुळे येथील लोकांना थंडी ताप यासारख्या आजारांना सामोरे जावे लागते.

६. सार्वजनिक शौचालयांचा वापर दोन्ही शहरांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोक एका युनिटचा वापर करतात व हे प्रमाण वाढत जाऊन दोनशे व्यक्तीपर्यंत असल्याचेही येथील कुटुंबांनी सांगितले आहे. मुंबईमध्ये सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्याची सफाई दररोज होण्याचे प्रमाण ३७ टक्के आहे तर नाशिक मध्ये हे प्रमाण तीन टक्के आहे. मुंबईत दोन दिवसातून नाल्यांची सफाई होते असे प्रमाण २२ टक्के आहे तर नाशिकमध्ये ७ टक्के आहे. साधारणपणे आठवड्यातून एक वेळा तसेच पंधरा दिवसातून नाल्यांची सफाई होते, असे म्हणणाऱ्या लोकांचे प्रमाण नाशिक व मुंबईमध्ये सारखेच आहे

७. नाशिक मध्ये घरातील ओला व सुका कचरा कचरा कुंडीत टाकण्याचे प्रमाण नाशिक व मुंबईत सारखेच म्हणजे ४४ टक्के आहे तर कचरा गाडी मध्ये कचरा टाकण्याचे प्रमाण ३० टक्के आहे दोन्ही शहरांमध्ये हे प्रमाण सारखेच आहे तर मोकळ्या जागेत नाशिकमध्ये कचरा टाकण्याचे प्रमाण ३२ टक्के आहे तर मुंबईत हे प्रमाण ३० टक्के आहे म्हणजेच झोपडपट्ट्यात ३० टक्के कुटुंबे मोकळ्या जागेत कचरा टाकतात व यातून येथील परिसरात दुर्गंधी पसरते व त्यातून आजारांचे प्रमाण वाढते व कमी अधिक प्रमाणात झोपडपट्टीतील लोकांना आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागते. यामुळे आरोग्यावरचा खर्च येथील कुटुंबांचा वाढतो म्हणजेच ३० टक्के कुटुंबे ही झोपडपट्ट्यात आरोग्याबाबत जागृत नाही व स्वच्छतेकडे लक्ष देत नाहीत.

८. झोपडपट्टीतील दोन्ही शहरांमधील कचरा दररोज उचलण्याचे प्रमाण जवळपास ५० टक्के आहे तर दोन

दिवसातून तसेच आठवड्यातून एकदा कचरा उचलला जातो, असे प्रमाण नाशिक मध्ये ३८ टक्के आहे तर कचरा उचलला जात नाही हे प्रमाण नाशिकमध्ये १८ टक्के आहे मुंबईत दोन दिवसातून कचरा उचलला जातो. असे प्रमाण ५० टक्के आहे. स्वच्छता कर्मचारी उपलब्ध नसल्यास दोन दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागतो म्हणजेच याचाही परिणाम येथील कुटुंबांच्या आरोग्यावर होता. झोपडपट्टीच्या परिसरातील स्वच्छता दोन्ही शहरांमध्ये अतिशय चांगली आहे असे म्हणणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण ५० टक्के आहे तर पन्नास टक्के व्यक्ती या थोडीफार प्रमाणात चांगली आहे असे म्हणणारे आहेत. किरकोळ स्वरूपाचे आजार बरे होण्यासाठी नाशिक शहरात सरकारी दवाखान्यात जाण्याचे प्रमाण ६० टक्के पेक्षा अधिक आहे तर मुंबईत हे प्रमाण ३० टक्क्यांपेक्षा जास्त आहे खाजगी दवाखान्यात जाण्याचे प्रमाण मुंबईत जास्त आहे तर नाशिक मध्ये ४० टक्के आहे तसेच सरकारी व खासगी अशा दोन्ही दवाखान्यांमध्ये या कुटुंबांना वेळप्रसंगी जावे लागत असते. दवाखान्यात जाण्याऐवजी काही कुटुंबे ही मेडिकलमधून औषधे घेतात व यातून डॉक्टरची फी वाचवली जाते. किरकोळ आजारांसाठी मेडिकलमधील गोळ्या व औषधांचा आधार घेतला जातो.

९. मागील पाच वर्षात कुटुंबातील एखादी व्यक्ती गंभीर स्वरुपात आजारी असल्याचे प्रमाण नाशिक मध्ये कमी आहे तर मुंबईत हे प्रमाण जास्त आहे. त्यात नाशिकमध्ये हृदयरोग, क्षयरोग, दमा सांध्याचे आजार कॅन्सर व इतर आजार असणाऱ्या व्यक्ती १०० कुटुंबांमागे २७ आहे तर हे प्रमाण मुंबईत ६० टक्के आहे मुंबईतील झोपडपट्टीतील वातावरण अरुंद घरे, महागाई, मानसिक ताण-तणाव, धावपळीचे व संघर्षाचे जीवन, अतिरिक्त गर्दी, मोकळी व स्वच्छ हवा नसणे यामुळे जास्त व्यक्तींना विविध स्वरूपाच्या गंभीर आजारांना सामोरे जावे लागते नाशिकमध्ये शारीरिक कष्टाची व अंगमेहनतीची कामे करणारी कुटुंबे जास्त आहेत तर मुंबईत हे प्रमाण कमी आहे. येथे विविध प्रकारची कला, कौशल्य व ऑफिस तसेच व्यवसाय संबंधीची कामे केली जात असतात आणि म्हणून मुंबईमध्ये शारीरिक कष्टाची कामे करणारी कुटुंबे कमी आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन कायद्यातील तरतुदी -

१. १९७६ मध्ये महाराष्ट्र शासनाने झोपडपट्ट्यांची पाहणी केली आणि झोपडपट्टी वस्त्यांना फोटोपास देण्यात आले. तसेच १९८० मध्ये काही ठिकाणी जागतिक बँकेच्या सहाय्याने झोपडपट्टी उन्नतीकरण कार्यक्रम (स्लम अपग्रेडेशन प्रोग्रॅम) घेण्यात आला.

२. झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास करण्याच्या उद्देशाने अफझलपूर समितीने आपल्या अहवालात सुचविल्यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना स्विकारण्यात आली.

३. झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १६ डिसेंबर १९९५ च्या परिपत्रकानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली.

४. मुंबई महानगरपालिका कायदा (म्युनिसिपल कॉर्पोरेशन) व महाराष्ट्र प्रादेशिक नगर योजना (रिजनल टाऊन प्लॅनिंग) कायद्यातील तरतुदीनुसार व डी. सी. टुल्सनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवण्याबाबतचे सर्व अधिकार देण्यात आले.

५. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे उद्दिष्ट केवळ झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास एवढेच नसून गरीब झोपडीधारकांचे योग्य पुनर्वसन करणे हा आहे. त्यासाठी प्राधिकरणाने प्रत्येक १०० झोपड्यांमागे एक बालवाडी, एक वेल्फेअर सेंटर तसेच शाळा, दवाखाना, व्यायामशाळा इत्यादी शैक्षणिक तसेच सामाजिक गरजांची तरतुद केली.

६. ही योजना राबवण्याच्या अनुषंगाने झोपडपट्टीधारकांची यादी परिशिष्ट - २ बनवण्यात आली. यामध्ये महानगरपालिका जागेवरील झोपड्यांची यादी महानगरपालिकेला म्हाडाच्या जागेवरील झोपडीधारकांची यादी बनवण्याचे अधिकार जिल्हाधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना देण्यात आले.

७. पात्र झोपडीधारकांची यादी बनवताना प्रत्येक झोपडीधारक कुटूंबाला २२५ चौ. फुटाची एक सदनिका देण्याचे ठरविण्यात आले. ज्यामध्ये नंतर २६९ चौ. फुट क्षेत्रफळाची सदनिका बदल करण्यात आला. मात्र व्यावसायिकाला त्यांच्या गाळ्याएवढेच क्षेत्र देण्याचे निश्चित करण्यात आले. तर निवासी व व्यावसायिक क्षेत्रासाठी आर. सी. ची तरतूद करण्यात आली.

८. झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवण्यापुर्वी प्रत्येक झोपडीधारकाने विकासाबरोबरच वैयक्तिक करारनामे विहित नमुन्यात करण्याचे बंधन घालण्यात आले.

९. महत्वाची तरतूद म्हणजे विकासकाने झोपडीधारकांना निवासी सदनिका व दुकान गाळे हे मोफत देण्याचे निश्चित करण्यात आले. एवढेच नव्हे तर विकासकाने प्रति सदनिका किंवा गाळे रक्कम रु. २०,०००/- एवढी रक्कम झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे जमा करण्याची तरतुद करण्यात

आली.

भविष्यात या रकमेच्या व्याजाचा विनियोग करुन पुनर्वसन झालेल्या झोपडीधारकांना त्यांचा मालमत्ता कर, वीज व पाणी बील इ. खर्चाचा बोजा हलका करण्यात येईल.

१०. तसेच पुनर्विकास करण्यापुर्वी विकासकाने झोपडीधारकांची राहण्याची सोय करण्यासाठी संक्रमण शिबिरे बांधायची अथवा त्यांना मासिक भाडे देण्याची अट विकासकांना घालण्यात आली. तसेच जेवढ्या क्षेत्रफळाचा पुनर्विकास विकासकांतर्फे केला जाईल तेवढ्याच क्षेत्रफळाचे बांधकाम करुन विक्री करण्यास विकासकांना परवानगी देण्यात आली.

११. सगळ्यात महत्वाचे म्हणजे झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या सदनिकांची मालकी पती व पत्नी यांच्या नावे संयुक्तरित्या असणार आहे व त्यामुळे भविष्यात या सदनिकांच्या विक्रीबाबत गैरप्रकार होण्याची शक्यता नाही.

१२. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत महत्वाची बाब म्हणजे या योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेल्या सदनिका किंवा गाळे हे वाटप झाल्याच्या तारखेपासून १० वर्षांत विकता येणार नाहीत व भाड्याने देता येणार नाहीत. तसेच ते गहाण ठेवून त्यावर कर्ज घेता येणार नाही. त्याचे अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करता येणार नाही. १० वर्षांनंतर त्याची विक्री करावयाची असल्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची पुर्वसंमती आवश्यक आहे. मात्र २० वर्षे पुर्ण झाल्यावर याबाबत सदनिकाधारक आपल्या मर्जीनुसार सदनिका विक्री करु शकतात. यावरुन झोपडीधारकांना त्यांना मिळणाऱ्या सदनिका किंवा गाळ्यांचा वापर स्वत:च करावा याबाबत शासनाची जागरुकता दिसून येते.

पक्क्या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या लोकांना अनेक सुविधा पुरवणारे व काबाडकष्ट करणारे नागरिक याच वस्त्यांमधून राहत असल्यामुळे झोपडपट्ट्यांमध्ये राहण्यायोग्य किमान नागरी सुविधा पुरवून येथील नागरिकांचे राहणीमान उंचावता येईल.

झोपडपट्टी पुनर्विकास कार्यक्रमातून शहरांचा बकालपणा कमी करुन झोपडीधारकांना घर देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. आशियातील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून गणल्या जाणाऱ्या धारावीचा पुनर्विकास हे याच प्रयत्नांचे दृश्य स्वरुप आहे. धारावी पुनर्विकास योजनेस शासनाने अत्यावश्यक नागरी प्रकल्पाचा दर्जा दिला आहे. या प्रकल्पांतर्गत सुमारे ५७ हजार झोपडीधारकांचे पुनर्वसन

करण्यात येणार आहे. पुनर्वसनात १ जानेवारी १९९५ पर्यंतच्या झोपडीधारकांना २२५ चौरस फुटांची सदनिका देण्यात येणार आहे.

केंद्र सरकारने ३ डिसेंबर २००५ रोजी शहरातील गरीब नागरिकांना मुलभूत सुविधा देण्यासाठी नागरी विभागासाठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियानांतर्गत शहरी गरीबांकरीता मुलभूत सुविधा पुरविण्याची योजना (बीएसयुपी) सुरु केली आहे. झोपडपट्टीवासीयांना घरांची उपलब्धता व इतर मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी पुढील उपाययोजना करणे आवश्यक आहे.

१. निराश्रित व झोपडपट्टीत राहणाऱ्यांसाठी एक व्यापक स्वरुपाचा घरे देण्यासाठीचा कायदा बंधनकारक करणे, घोषित व अघोषित झोपडपट्टीधारकांना उठविताना घरे देणे आवश्यक आहे.

२. कमी किंमत असणारी घरे उपलब्ध करुन देणे.

३. निराश्रित व झोपडपट्टीवासीयांच्या हितासाठी सर्वोच्य न्यायालय व उच्च न्यायालय यांचे आदेश कार्यान्वित करणे.

४. घरासंबंधी सरकारी धोरण हे कार्यान्वित व पारदर्शक असावे व वेळेच्या आत पुर्ण होऊन झोपडपट्टीवासीयांना त्याचे वाटप व्हावे.

५. निराश्रित लोकांच्या वाढत्या संख्येनुसार घरांच्या बजेटमध्ये वाढ व्हावी.

६. उच्च व मध्यमवर्गीय वस्त्यांमध्ये ज्या अनुदानित सुविधा आहेत त्या सुविधा झोपडपट्ट्यांमध्ये देणे.

७. जेथे व्यक्तीगत शौचालय बांधणे शक्य नाही तेथे सामुदायिक शौचालय बांधणे.

८. शहरी गरीब व स्थानिक प्रशासन व शासन यांच्यातील संबंध भागीदारी स्वरुपाचे असावेत.

९. फिरत्या दवाखान्याची सुविधा सरकारने उपलब्ध करुन देणे.

१०. अनधिकृत वस्त्यांमधून राहणाऱ्यांना स्वस्त व कायमस्वरुपी निवारा पुरवणे अशा लोकांची वारंवार घरे तोडल्याने कुपोषणाचे प्रमाण वाढते. तसेच नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे.

११. असंघटित क्षेत्रातील स्त्री कामगारांसाठी कामाच्या ठिकाणी पाळणा घरांची व्यवस्था करणे.

नाशिक व मुंबई शहरातील झोपडपट्टीवासीयांनी सुचविलेले उपाय

१) स्वत:चे घर शासनाने उपलब्ध करुन द्यावे.

२) शौचालयांची सुविधा स्त्री-पुरुष संख्येनुसार करावी.

३) सांडपाण्याची व्यवस्था करावी.

४) पुरुष व महिलांना शासनाकडून रोजगार उपलब्ध करुन द्यावा.

५) दारुची दुकाने बंद करावी.

६) आरोग्य सुधारण्यासाठी झोपडपट्टीमध्ये मुलभूत सोयीसुविधा पुरवाव्यात. यामध्ये स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, मोठे रस्ते, लाईटची व्यवस्था करावी.

७) गुन्हेगारीवर पोलिसांचे नियंत्रण असावे.

८) मुलांच्या चांगल्या शिक्षणासाठी शासनाने प्रयत्न करावे.

९) कुटूंबातील सदस्यांच्या संख्येनुसार घरे मिळावीत.

१०) महिलांसाठी गृहउद्योग सुरु करण्यासाठी बँकांकडून अनुदानित स्वरुपात कर्ज मिळावे.

११) अघोषित झोपडपट्ट्यांना महानगरपालिकेकडून जागा उपलब्ध करुन घरे बांधून द्यावीत.

१२) कंत्राटी स्वरुपातील घंटागाडीवर काम करणाऱ्या कामगारांना कायमस्वरुपी महानगरपालिकेकडून नोकरी मिळावी.

१३) नदीच्या कडेला असणाऱ्या झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करावे. कारण घरामध्ये पुराचे पाणी येते व अस्वच्छता निर्माण होते.

१४) महिलांना सुरक्षितता मिळावी.

१५) कचरा उचलण्यासाठी नियमित घंटागाडीची व्यवस्था व्हावी.

१६) झोपडपट्टी परिसराच्या बाहेर शौचालयांची व्यवस्था असावी व कायमस्वरुपी पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी.

१७) झोपडपट्टीच्या जवळ शासकिय दवाखान्यांची उपलब्धता असावी.

१८) झोपडपट्टीतील प्रत्येक कुटूंबाला रेशनकार्ड, घरपट्टी, लाईटबील मिळावे व स्वस्त धान्य उपलब्ध करुन द्यावे.

१९) अनधिकृत असणाऱ्या झोपडपट्ट्यांना अधिकृत करावे.

संशोधकाने केलेल्या शिफारशी :-

१. नाशिक शहरातील झोपडपट्टीवासीयांना कामाची उपलब्धता व त्याचा चांगला मोबदला मिळणे आवश्यक आहे. नाशिकमध्ये मुलांना काम मिळाले तर व्यसनाचे प्रमाण कमी होईल यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे.

२. झोपडपट्टी पुनर्वसन योजना अधिक गतीने राबवून नाशिकमधील झोपडपट्ट्यांतील कुटुंबांना घरे देणे.

३. अनधिकृत झोपडपट्ट्यात राहणाऱ्या कुटुंबांनाही विविध सोयी सवलती देण्यात येऊन त्यांचे आरोग्य व मुलांचे शिक्षण सुधारणे आवश्यक आहे. येथील कुटुंबांच्या झोपड्या ही अधिकृत करण्यात येऊन त्यांनाही झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा लाभ मिळावा.

४. अन्न सुरक्षितता कायद्याअंतर्गत सर्वच कुटुंबांना स्वस्त रेशन दुकानातून रेशन मिळावे ज्या कुटुंबांना असे रेशन मिळत नाही त्याची कारणे शोधून त्यांना त्याचा लाभ देणे आवश्यक आहे.

५. नाशिकमध्ये स्त्रियांसाठी विविध प्रकारचे गृह उद्योग सुरू करणे, बँकांकडून कर्जाची उपलब्धता करून देणे, बचत गट स्थापन करणे यामध्ये स्वयंसेवी संस्था व शासनाच्या पुढाकाराने विविध योजना राबविणे.

६. मुंबईमध्ये उत्तर प्रदेशातील कुटुंबांमध्ये कुटुंब नियोजन कार्यक्रमाविषयी जागरुकता निर्माण करणे आवश्यक आहे तसेच या कुटुंबांना मोफत आरोग्याच्या सुविधा व स्त्रियांबाबत जनजागृतीसाठी कार्यक्रम राबविण्याची गरज आहे.

७. नाशिकमध्ये मुंबईच्या धर्तीवर महानगर पालिका शाळांकडून इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्यात याव्यात.

८. झोपडपट्टीच्या आजूबाजूला असणारी दारूची दुकाने बंद करण्यात यावीत. त्याबरोबर थोड्याफार प्रमाणात असणारे अवैध धंदे बंद करण्यात यावेत.

९. महानगर पालिकेच्या शाळांचा गुणवत्तेचा दर्जा सुधारण्यात यावा खाजगी क्लासेस सुद्धा उपलब्ध

करुन देण्यात यावेत. महानगरपालिका शाळा ह्या आधुनिक पद्धतीने करण्यात आल्या तर झोपडपट्टी व्यतिरिक्त असणाऱ्या मुलांनासुद्धा मोफत व दर्जेदार शिक्षणाची सोय उपलब्ध होऊ शकेल व पालकांचेही येथील शाळांवर लक्ष राहील. कुटुंबातील पालकांशी मुलांच्या शिक्षणाबाबत संवाद साधून पालकांच्या घरी नियमित भेटी देणे व मुलाच्या अभ्यासाकडे पालक लक्ष देतील याबाबत जागरूकता निर्माण करणे मुले आणि शिक्षक यांच्यात जिव्हाळा निर्माण होईल व जास्तीत जास्त वेळ मुलांना शाळेत राहून शिक्षणात गोडी निर्माण होईल. विविध स्पर्धा मुलांसाठी आयोजित करणे मैदानी खेळ तसेच इतर शाळांबरोबर मुलांच्या स्पर्धा आयोजित करणे.

१०. खाजगी माध्यमातील इंग्रजी शाळातील शिक्षकांनी महानगरपालिका शाळेमध्ये स्वच्छेने जाऊन काही दिवस शिकवणे, त्यासाठी शासनाकडून अशा शिक्षकांना मानधन दिल्यास निश्चितच येथील विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा दर्जा उंचावू शकेल विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल.

११. झोपडपट्टीतील मुलांच्या उच्च व माध्यमिक शिक्षणाबरोबर पदवी शिक्षणासाठी महाविद्यालयांनी पुढाकार घेणे मुले दत्तक घेणे तसेच आपले महाविद्यालय या झोपडपट्ट्यांना जोडून घेणे. महाविद्यालयांनी हे काम स्वच्छेने करावे व त्या संबंधात विद्यापीठ व शासनाकडून थोड्याफार प्रमाणात सूचना व कायदे करण्यात आले तर उच्च शिक्षणामध्ये झोपडपट्टीतील मुलींचे प्रमाण निश्चित वाढू शकेल त्यांच्या शिक्षणाची फी व इतर शिक्षणातील अडथळे दूर करता येतील यामुळे मुले व मुलांचे ही शिक्षणाचे प्रमाण वाढून गुन्हेगारीचे प्रमाण, व्यसनांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल मुलांना चांगल्या ठिकाणी कंपन्यांमध्ये, प्लेसमेंट साठी प्रयत्न महाविद्यालयांकडून करणे आवश्यक आहे.

Date: 07/04/2022

To,
The Director,
University Grants Commission,
Ministry of Human Resource Development, Govt. of India,
Western Regional Office,
Ganeshkhind, Pune- 7

Sub: Final Report of the Minor Research Project Submission

Ref: UGC Letter No. F. 23-1848/14(SC/61/(WRO)XII Plan dated 28/07/2017

Respected Sir,

I, Dr. Vinod Kalu Nirbhavane, Principal Investigator of the Minor Research Project entitled, **'Nashik Va Mumbai Shaharatil Zhopadpattivasiyancha Tulnatmak Samajshatriya Abhyas (नाशिक व मुंबई शहरतील झोपडपट्टीवासियांचा तुलनात्मक समाजशास्त्रीय अभ्यास)'**, am hereby, submitting the copy of Final Report of the same. The report is for the period from 28/07/2017 to 28/07/2019 (amount sanctioning UGC approval Letter No. F. 23-1848/14(SC/61/(WRO)XII Plan dated 28/07/2017), and the work is carried out at NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh Arts & Commerce Mahila Mahavidyalaya , Nashik Road Nashik-422101. Objectives of the project were fulfilled and the report ended on 28/03/2022.

I have submitted one hard bound copy of the final report of the minor research project in the library and an executive summary of the report has been posted on the website of the college.

Kindly accept the Final Report of the Minor Research Project.

Thanking You,

Yours faithfully,

Dr. Vinod Kalu Nirbhavane,

Principal Investigator

Leena Pandhare

Dr. Leena Pandhare
PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road-422101

Enclosures:

1. Annexure III
2. Annexure IV
3. Annexure V
4. Annexure VI
5. Annexure VII
6. Annexure VIII

Annexure - III

UNIVERSITY GRANTS COMMISSION
BAHADUR SHAH ZAFAR MARG
NEW DELHI – 110 002

STATEMENT OF EXPENDITURE IN RESPECT OF MINOR RESEARCH PROJECT

1. Name of Principal Investigator **Dr. Vinod Kalu Nirbhavane**
2. Dept. of PI **Sociology**
3. Name of College **NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh Arts & Commerce Mahila Mahavidyalaya , Nashik Road Nashik-422101**
4. UGC approval Letter No. and Date **No. F. 23-1848/14(SC/61/(WRO)XII Plan**
5. Title of the Research Project **Nashik Va Mumbai Shaharatil Zhopadpattivasiyancha Tulnatmak Samajshatriya Abhyas**
6. Effective date of starting the project **28/07/2017**
7. a. Period of Expenditure: From **28/07/2017** To **28/07/2019**
8. b. Details of Expenditure

Sr.No.	Item	Amount Approved (Rs.)	Expenditure Incurred (Rs.)
i.	Books & Journals	**20,000/-**	**20,742/-**
ii.	Equipment	**10,000/-**	**5,098/-**
iii.	Contingency including special needs	**10,000/-**	**17,350/-**
iv.	Field Work/Travel (Give details in the proforma).	**20,000/-**	**20,400/-**
v.	Hiring Services	___	___
vi.	Chemicals & Glassware	___	___
		Total	**63,590/-**

9. if as a result of check or audit objection some irregularly is noticed at later date, action will be taken to refund, adjust or regularize the objected amounts.

10. It is certified that the grant of Rs. ***60,000/- (Rupees Sixty Thousand only/-)*** received from the University Grants Commission under the scheme of support for Minor Research Project entitled ***Nashik Va Mumbai Shaharatil Zhopadpattivasiyancha Tulnatmak Samajshatriya Abhyas*** *(नाशिक व मुंबई शहरतील झोपडपट्टीवासियांचा तुलनात्मक समाजशास्त्रीय अभ्यास)* vide UGC letter No. ***F. 23-1848/14(SC/61/(WRO)XII Plan*** dated ***28/07/2017*** has been fully utilized for the purpose for which it was sanctioned andin accordance with the terms and conditions laid down by the University Grants Commission.

SIGNATURE OF PRINCIPAL INVESTIGATOR

Leena Pandhare
PRINCIPAL

PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road-422101

(Seal)

Nasik Shikshan Prasarak Mandal's Late Bindu Ramrao Deshmukh Arts & Commerce Mahila Mahavidyalaya Jail Road, Nashik Road - 422 101

Annexure - IV

UNIVERSITY GRANTS COMMISSION
BAHADUR SHAH ZAFAR MARG
NEW DELHI – 110 002

STATEMENT OF EXPENDITURE INCURRED ON FIELD WORK

Name of the Principal Investigator:

Sr. No	Name of the Place visited	Duration of the Visit		Mode of Journey	Expenditure Incurred (Rs.)
		From	To		
1	Nashik	13/5/2018	13/5/2018	Car	600/-
2	Nashik	20/5/2018	20/5/2018	Car	600/-
3	Nashik	27/5/2018	27/5/2018	Car	600/-
4	Nashik	10/6/2018	10/6/2018	Car	600/-
5	Nashik	17/6/2018	17/6/2018	Car	600/-
6	Nashik	24/6/2018	24/6/2018	Car	600/-
7	Nashik	8/7/2018	8/7/2018	Car	600/-
8	Nashik	15/7/2018	15/7/2018	Car	600/-
9	Nashik	22/7/2018	22/7/2018	Car	600/-
10	Nashik	12/8/2018	12/8/2018	Car	600/-
11	Nashik	19/8/2018	19/8/2018	Car	600/-
12	Nashik	9/9/2018	9/9/2018	Car	600/-
13	Nashik	16/9/2018	16/9/2018	Car	600/-
14	Nashik	16/9/2018	16/9/2018	Car	600/-
15	Mumbai	13/5/2018	13/5/2018	Car	1500/-

16	Mumbai	20/5/2018	20/5/2018	Car	1500/-
17	Mumbai	27/5/2018	27/5/2018	Car	1500/-
18	Mumbai	10/6/2018	10/6/2018	Car	1500/-
19	Mumbai	17/6/2018	17/6/2018	Car	1500/-
20	Mumbai	24/6/2018	24/6/2018	Car	1500/-
21	Mumbai	8/7/2018	8/7/2018	Car	1500/-
22	Mumbai	15/7/2018	15/7/2018	Car	1500/-
				Total	20,400/-

Certified that the above expenditure is in accordance with the UGC norms for Major Research Projects.

SIGNATURE OF PRINCIPAL INVESTIGATOR

Leena Pandhere

PRINCIPAL

PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road-422101

(Seal)

Nasik Shikshan Prasarak Mandal's Late Bindu Ramrao Deshmukh Arts & Commerce Mahila Mahavidyalaya Jail Road, Nashik Road - 422 101

Annexure - V

UNIVERSITY GRANTS COMMISSION
BAHADUR SHAH ZAFAR MARG
NEW DELHI – 110 002

Utilization certificate

Certified that the grant of Rs. ***60,000/- (Rupees Sixty Thousand only/-)*** received from the University Grants Commission under the scheme of support for Minor Research Project entitled ***Nashik Va Mumbai Shaharatil Zhopadpattivasiyancha Tulnatmak Samajshatriya Abhyas*** *(नाशिक व मुंबई शहरतील झोपडपट्टीवासियांचा तुलनात्मक समाजशास्त्रीय अभ्यास)* vide UGC letter No. ***F. 23-1848/14(SC/61/(WRO)XII Plan*** dated ***28/07/2017*** has been fully utilized for the purpose for which it was sanctioned and in accordance with the terms and conditions laid down by the University Grants Commission.

For M/s. D P PALDE AND COMPANY
Chartered Accountants

Leena Pandhare
PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road-422101

Dilip P. Palde (Proprietor)
M. No 110861

SIGNATURE OF THE PRINCIPAL INVESTIGATOR

PRINCIPAL
(Seal)

STATUTORY AUDITOR
(Seal)

For M/s D P PALDE AND COMPANY
FRN 153562W
CHARTERED ACCOUNTANT

Annexure -VI

UNIVERSITY GRANTS COMMISSION
BAHADUR SHAH ZAFAR MARG
NEW DELHI – 110 002.

Annual/Final Report of the work done on the Minor Research Project.
(Report to be submitted within 6 weeks after completion of each year)

1. Project report No. Final
2. UGC Reference No.F ***F. 23-1848/14(SC/61/(WRO)XII Plan***
3. Period of report: from ***28/07/2017*** to ***28/07/2019***
4. Title of research project ***Nashik Va Mumbai Shaharatil Zhopadpattivasiyancha Tulnatmak Samajshatriya Abhyas*** *(नाशिक व मुंबई शहरतील झोपडपट्टीवासियांचा तुलनात्मक समाजशास्त्रीय अभ्यास)*
5. (a) Name of the Principal Investigator **Dr. Vinod Kalu Nirbhavane**
   (b) Dept. **Sociology**
   (c) College where work has progressed **NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh Arts & Commerce Mahila Mahavidyalaya , Nashik Road Nashik-422101**
6. Effective date of starting of the project ***28/07/2018***
7. Grant approved and expenditure incurred during the period of the report:
   a. Total amount approved **Rs. 60,000/-** ***(Rupees Sixty Thousand only/-)***
   b. Total expenditure **Rs. 63,590/-**
   c. Report of the work done: (Please attach a separate sheet)

i. Brief objective of the project

The study presents a comparative historical review of the growth of slums in Nashik and Mumbai. It is an attempt to make a comparative study of the social and economic life of slum dwellers in Nashik and Mumbai. It also deals with the comparative study of the educational and health life of slum dwellers in Nashik and Mumbai

ii. Work done so far and results achieved and publications, if any, resulting from the work (Give details of the papers and names of the journals in which it has been published or accepted for publication

In Process

iii. Has the progress been according to original plan of work and towards achieving the objective.: **YES**

iv. please enclose a summary of the findings of the study. One bound copy of the final report of work done may also be sent to the concerned Regional Office of the UGC.

Project Completed, Summary attached

v. Any other information

SIGNATURE OF THE PRINCIPAL INVESTIGATOR

Leena Pandhare

PRINCIPAL

PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road-422101

(Seal)

Nasik Shikshan Prasarak Mandal's Ramrao Deshmukh Arts & Commerce Mahila Mahavidyalaya Nashik Road - 422 101

Annexure – VII

UNIVERSITY GRANTS COMMISSION
BAHADUR SHAH ZAFAR MARG
NEW DELHI – 110 002

PROFORMA FOR SUBMISSION OF INFORMATION AT THE TIME OF SENDING THE FINAL REPORT OF THE WORK DONE ON THE PROJECT

1. Title of the Project **Nashik Va Mumbai Shaharatil Zhopadpattivasiyancha Tulnatmak Samajshatriya Abhyas** *(नाशिक व मुंबई शहरतील झोपडपट्टीवासियांचा तुलनात्मक समाजशास्त्रीय अभ्यास)*
2. NAME AND ADDRESS OF THE PRINCIPAL INVESTIGATOR **Dr. Vinod Kalu Nirbhavane**
3. NAME AND ADDRESS OF THE INSTITUTION **NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh Arts & Commerce Mahila Mahavidyalaya , Nashik Road Nashik-422101**
4. UGC APPROVAL LETTER NO. AND DATE **No. F. 23-848/14(SC/61/(WRO)XII Plan**
5. DATE OF IMPLEMENTATION **28/07/2017**
6. TENURE OF THE PROJECT **2017- 2019**
7. TOTAL GRANT ALLOCATED **Rs. 60,000/-**
8. TOTAL GRANT RECEIVED **Rs. 45,000/-**
9. FINAL EXPENDITURE **Rs. 63,590/-/-**
10. TITLE OF THE PROJECT **Nashik Va Mumbai Shaharatil Zhopadpattivasiyancha Tulnatmak Samajshatriya Abhyas** *(नाशिक व मुंबई शहरतील झोपडपट्टीवासियांचा तुलनात्मक समाजशास्त्रीय अभ्यास)*
11. OBJECTIVES OF THE PROJECT

i. 1. A comparative historical review of the growth of slums in Nashik and Mumbai

ii. 2. To make a comparative study of the social and economic life of a person in Nashik and Mumbai

3. To make a comparative study of the educational and health life of a person in Nashik and Mumbai

12. WHETHER OBJECTIVES WERE ACHIEVED **YES**

13. ACHIEVEMENTS FROM THE PROJECT

14. SUMMARY OF THE FINDINGS

A comparative study of slum dwellers was conducted in slums of Nashik and Mumbai. On an average, 30 to 35% of the families are tenants. As the development of Nashik city has been faster since 2001 in the last twenty years, a large number of families have migrated to Nashik. The migration to Mumbai has taken place in the cities near Mumbai. Slum dwellers have been living in Mumbai and Nashik for 30 to 40 years. They have left the slums and built flats, row houses and other houses in other cities and some families are residing there. Some rural families in Maharashtra have migrated from Mumbai to their hometowns in rural areas after retirement. In Nashik and Mumbai, 80% of families have two children on average, while in Mumbai, four slums in Kaylan have an average of four children. The women in these families work in the house and do not work outside the house. Reason traditionally, there are restrictions on women, women are not allowed to go out of the house, due to the large size of the family and the large number of children, these women cannot work elsewhere, these women have primary and secondary education.

All the children are educated in the families living in Mumbai, Uttar Pradesh and some of the boys and girls in the family are working, which means that the parents are paying more attention to their children's education and more is being spent on education. The education of parents has also become secondary and higher secondary and 5 to 7% parents have done B.A, B.Com. The children working in the call center are in these families. Families in Mumbai also seem to be paying more attention to personal development. Children between the ages of 15 and 16 are seen working and acquiring new skills. In Mumbai, the dropout rate in children's education is less at the secondary level, while in Nashik, the dropout rate is higher. Most of the slum children in Nashik are left empty-handed due to lack of work. As the children here do not have a tendency to learn various skills, their personality does not develop. These children look weak and malnourished. Due to lack of language skills in the company, the children here do not get jobs in good positions in the shops. Confidence increases in children. This means that the environment around the children in the slums of Mumbai affects the boys and the boys are more motivated to look for a job. In Nashik, however, children do not work permanently as they have free time and no permanent job. Most of the children waste their time and depend on their family. Children in slum Mumbai avoid getting married due to lack of space. Because of the low number of girls, these boys do not get girls for marriage. More or less even in Nashik city, most of the boys in the slums seem to be unmarried.

15. CONTRIBUTION TO THE SOCIETY

The present research will serve as a guide to all the sections of the society. It will create awareness among the people regarding the actual life of the slum dwellers in relation to their sociological, financial, educational and health factors. The present research has studied various problems faced by the slum dwellers at micro level. The various Government Schemes implemented for the slum dwellers may be enhanced and improved for further effective implementation of these schemes.

16. WHETHER ANY PH.D. ENROLLED/PRODUCED OUT OF THE PROJECT

NO

17. NO. OF PUBLICATIONS OUT OF THE PROJECT

Publication of One Research Article and One book is in process

Vinod Hirbhavane

(PRINCIPAL INVESTIGATOR)

Leena Pandhare

(PRINCIPAL)

PRINCIPAL
N.S.P.M's Late Sitaram Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road-422101

(Seal)

Nasik Shikshan Prasarak Mandal's Late Sitaram Ramrao Deshmukh Arts & Commerce Mahila Mahavidyalaya Nashik Road - 422 101

Annexure – VIII

UNIVERSITY GRANTS COMMISSION
BAHADUR SHAH ZAFAR MARG NEW
DELHI – 110 002

ASSESSMENT CERTIFICATE
(to be submitted with the proposal)

It is certified that the proposal entitled **Nashik Va Mumbai Shaharatil Zhopadpattivasiyancha Tulnatmak Samajshatriya Abhyas** (नाशिक व मुंबई शहरतील झोपडपट्टीवासियांचा तुलनात्मक समाजशास्त्रीय अभ्यास) by **Dr. Vinod Kalu Nirbhavane** Dept. of **Sociology** has been assessed by the committee consisting the following members for submission to the UGC Regional Office for financial support under the scheme of Minor Research Projects:

Details of Expert Committee:

The present research has been carried out as per the suggestions given from time to time. The researcher has followed all the guidelines given by UGC. He has prepared progress reports properly. He has also prepared the Final Research Report as per the guidelines given by UGC

1. **Dr. Leena Pandhare**
2. **Dr. Karuna Kushare**
3. **Mr. Prakash Warkari**
4. **Dr. Deepa Holkar**

The proposal is as per the guidelines.

Leena Pandhare
(PRINCIPAL)
PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road-422101

(Seal)

Certificate

This is to certify that **Dr. Vinod Kalu Nirbhavane**, Associate Professor, Dept. of Sociology, NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh Arts & Commerce Mahila Mahavidyalaya , Nashik Road Nashik has completed his Minor Research Project of UGC entitled **'Nashik Va Mumbai Shaharatil Zhopadpattivasiyancha Tulnatmak Samajshatriya Abhyas (नाशिक व मुंबई शहरतील झोपडपट्टीवासियांचा तुलनात्मक समाजशास्त्रीय अभ्यास)'**.

He has submitted one hard bound copy of the final report of the minor research project in the library and an executive summary of the report has been posted on the website of the college.

Leena Pandhare

Dr. Leena Pandhare

PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road-422101

Certificate

This is to certify that **Dr. Vinod Kalu Nirbhavane,** Associate Professor, Dept. of Sociology, has submitted the reference book with Accession No.**8685 to 9761** in the library of the college under Minor Research Project of UGC entitled, **'Nashik Va Mumbai Shaharatil Zhopadpattivasiyancha Tulnatmak Samajshatriya Abhyas (नाशिक व मुंबई शहरतील झोपडपट्टीवासियांचा तुलनात्मक समाजशास्त्रीय अभ्यास)'** during 2017- 2019.

Leena Pandhare

Dr. Leena Pandhare
PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road-422101